# महानगरपालिका औरंगाबाद

## स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत

**दिनांक ०६-०४-१९९० ते ०५-११-१९९०**

**रजिष्टर क्र. ७**

**विषय क्र.६७७ :**

स्थायी समिती सभासदाकडून मांडण्यात आलेला प्रस्ताव, एप्रिल महिन्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर, व छत्रपती शिवाजी महाराज या राष्ट्रपुरुषांची जयंती येत आहे. राष्ट्र पुरुषांची तैलचित्रे सभागृहात लवून त्यांचा गौरव वाढवण्याची प्रथा आहे. त्यादृष्टीने महानगरपालिका सभागृहात महात्मा गांधी व पंडीत जवाहरलाल नेहरु यांची तैलचित्रे कार्यालयाने आधीच लावली आहेत.

तेव्हा वरील महापुरुषांची जयंती औचित्य साधुन डॉ.बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतीबा फुले, मौलाना अबुल कलाम आझाद या राष्ट्रपुरुषांची तैलचित्रे सभागृहात लावण्यात यावीत.

नेहरु व महात्मा गांधी यांची ५X३ आकाराची तैलचित्रे ज्या कलाकारांकडून तयार करुन घेतली आहेत. त्यांचे कडूनच तात्काळ वरील चार महापुरषांची तैलचित्रे तयार करुन घेण्यास स्थायी समितीने मान्यता देण्यात यावी असा प्रस्ताव ठेवण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका सभागृहात डॉ.बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतीबा फुले व मोलाना अबुल कलाम आझाद या चार महापुरुषांची तैलचित्रे ५X३ या आकाराची, ज्या कलाकाराकडून पंडित नेहरु व महात्मा गांधी यांची ५X३ या आकारांची तैलचित्रे तयार करुन घेतली आहेत. त्यांचे कडूनच तात्काळ वरील चार महापुरुषांच्या तैलचित्रे तयार करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र.६७८ :**

पशुधन विकास अधिकारी महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेतर्फे चालविण्यांत येणारे प्राणी संग्रहालय व स्वानंदा प्रतिबंधक योजनेकरिता सन १९९०-९१ या वर्षाकरिता खालील प्रकारच्या वस्तुंच्या खाद्याच्या निविदा मागविण्यांत आल्या. निविदा प्राप्त झालेल्या निविदा धारकांचे नांव व त्यांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

**(अ) बिफ (दर प्रति किलो)**

| अ.क्र. | निविदाधारकांचे नांव | हड्डीसह | बिनाहड्डी |
|---|---|---|---|
| १ | श्री.शेख रुस्तुम शेख चाँद | रु.०९.६० पैसे | रु.११.६० पैसे |
| २ | श्री.शेख मुख्तार शेख इसाक | रु.०९.७५ पैसे | रु.११.७० पैसे |
| ३ | श्री.अ.मजीद शेख फकीर | रु.०९.९० पैसे | रु.१२.०० पैसे |
| ४ | श्री.अ.रहेमान शेख चाँद | रु.१०.१० पैसे | रु.१२.२० पैसे |

वरीलप्रमाणे एकूण चार ४ निविदा प्राप्त झाल्यापैकी श्री.रुस्तुम शे.चाँद रा.सिल्लेखाना यांनी दिलेले दर सर्वात कमी आहेत.

**(ब) मटन (दर प्रती किलो)**

| अ.क्र. | निविदाधारकांचे नांव | हड्डीसह | बिनाहड्डी |
|---|---|---|---|
| १ | श्री.म.खालेद | रु.३४.५० पैसे | रु.४०.०० पैसे |
| २ | श्री.अ.रफिक अ.कादर | रु.३५.०० पैसे | रु.४१.०० पैसे |
| ३ | श्री.अ.लतीफ | रु.३३.५० पैसे | रु.४०.०० पैसे |

वरील एकूण तीन निविदा प्राप्त झाल्यापैकी श्री.अ.लतीफ यांचे हड्डीसहचे दर सर्वात कमी तर श्री.म.खालेद व श्री.अ.लतीफ यांचे बिनाहड्डीचे दर समान आहेत. करिता अ.लतीफ यांचे दोन्हीचे दर(हड्डीसह व बिनाहड्डी) चे दर सर्वात कमी आहे.

**(क) मासोळीचे (दर प्रति किलो)**

| अ.क्र. | निविदाधारकांचे नांव | मासोळीचे प्रकार व दर | | |
|---|---|---|---|---|
| | | कतला | रहु | मिरगळ |
| १ | श्री.शे.महेबुब शे.गणी | ३३.५० | ३२.०० | ३१.५० |
| २ | श्री.मुमताज अहमद | २८.५० | २८.५० | ३८.५० |
| ३ | श्री.शे.मजहर शे.अफसर | ३२.०० | ३१.७५ | ३०.५० |

वरीलप्रमाणे तीन निविदा प्राप्त झाल्या पैकी आयटम नं.(४) व आयटम नं.(१३) चे दर तिन्हीचे समान असून इतर (११) अकरा आयटमचे दर मे.लहोटी प्रोव्हीजन यांचे सर्वात कमी आहेत. करिता वरील दोन्ही पदार्थात समान दर असले तरी तरीही इतर पदार्थात मे.लाहोटी प्रोव्हीजन यांचे दर कमी असल्याने त्यांचेकडून वरील सर्व पदार्थ घेणे बाबत विचार व्हावा. तसेच हे पदार्थ दररोज कमी प्रमाणात लागत असल्याने सदरील कमी असलेले दरात संबंधितांकडून नगदीने खरेदी करण्यास मान्यता असावी.

याशिवाय प्राणी संग्रहालय येथे दररोज शासकीय योजनेतून दुध (शासकीय दुध योजना) रुपये ५.०० प्रति लिटरचे भावाने खरेदी करण्यात येते. तसेच घासलेट रु.२.४० प्रति लिटर प्रमाणे (शासकीय दर) विकत घेण्यात येते. याशिवाय अमृत खाद्याचे मे.अरिहंत ट्रेडींग कंपनी हे अधिकृत विक्रेते असलेले अमृत खाद्य हयांचे कडून खरेदी करण्यांत येते. दररोज लागणारे फळे व भाजीपाला खुल्या बाजारातून नगदीने खरेदी करण्यांत येतो. कारण सदरील पदार्थाच्या भावात नेहमी चढ-उतार होत असतो.

प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेतर्फे चालविण्यांत येणारे प्राणी संग्रहालय व स्वानंदा प्रतिबंधक योजनेकरिता सन १९९०-९१ वर्षाकरिता लागणारे साहित्य खालीलप्रमाणे सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

अ) बिफ (दरप्रति किलो) साठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे श्री.शे.रुस्तुम शे-चाँद यांचे दर ९.६० हड्डीसह आणि ११.६० पैसे बिनाहड्डीचे

ब) मटन (दर प्रति किलो) तीन निविदा धारकांपैकी श्री.अ.लतीफ यांचे हड्डीसह दर सर्वात कमी तर श्री.खालेद व लतीफ यांचे बिनाहड्डीचे दर समान आहेत. त्यापैकी श्री.अ.लतीफ यांच्या दोन्हीच्या रु.३३.५० पैसे हड्डीसह आणि रु.४०.०० पैसे बिना हड्डीचे दर मंजूर.

क) मासोळी (दर प्रती किलो) वरीलप्रमाणे तीन दरापैकी सर्वात कमी श्री.मुमताज अहेमद यांचे दर कतला २८.५०, रहू २८.५०, मिरगळ २८.५० चे दर मंजूर.

ड) ब्रेड (दर प्रति पुडा-२५० ग्रॅम) ला तीन निविदा धारकांपैकी सर्वात कमी दर मे.एलोरा बेकरी रु.२.०० प्रति पुडा दर मंजूर.

इ) कडबा (बाटुक) प्रति टनास तीन निविदा धारकांपैकी सर्वात कमी श्री.जनार्दन शेळके यांचे प्रति टन रु.२९.७५/- प्रमाणे मंजूर.

फ) ल्युसर्न घास तीन निविदा धारकांपैकी सर्वात कमी दराचे श्री.जनार्दन कोंडाजी शेळके रु.०२.०५ दर मंजूर.

उ) इतर पदार्थांसाठी तीन निविदा धारकांपैकी आयटम नं.४ व आयटम नं.१३ चे तिन्हीचे दर समान असून इतर (११) आयटमचे दर मे.लाहोटी प्रोव्हीजन यांचे आहेत. तरी लाहोटी प्रोव्हीजन यांचेकडून वरील सर्व पदार्थ नगदीने खरेदी करण्यास मंजूरी देण्यांत येते.

तसेच प्राणी संग्रहालय येथे दररोज शासकीय दुध योजनेमधून दुध खरेदी प्रति लिटर रु.०५.०० प्रमाणे नगदीने खरेदी करण्यास मंजूरी देण्यांत येते.

तसेच शासकीय दर रु.२.४० प्रमाणे घासलेट नगदीने खरेदी करण्यांस मंजूरी देण्यांत येते.

तसेच अमृत खाद्य मे.अरिहंत ट्रेडींग कंपनी अधिकृत विक्रेते यांच्याकडून अमृत खाद्य नगदीने खरेदी करण्यास मंजूरी देण्यांत येते.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
मा.सभापती, स्थायी समिती
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक ६ एप्रिल, १९९० रोजी भरलेल्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचा इतिवृत्तांत.**

**शुक्रवार दिनांक ६ एप्रिल, १९९० रोजी औरंगाबाद महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभा दुपारी ३.०० वाजता सभापती सभागृहात मा.सभापती श्री.गंगाधर गाडे यांच्या अध्यक्षतेखाली सुरु झाली. या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह निम्ननिर्दिष्ट स.सभासद उपस्थित होते.**

१. श्री.अलफखान हुसेन खान
२. श्री.गील इकबालसिंग प्रितमसिंग
३. श्री.घडामोडे मोतीराम नारायण
४. श्री.जैस्वाल प्रदिप शिवनारायण
५. श्री.मिर्झा अन्वरबेग हमीद बेग
६. श्री.स.अ.इकबालेद्दीन स.मो.कुतुबुद्दीन
७. श्री.यादव अशोक सायन्ना
८. श्री.सावे मोरेश्वर दिनानाथ
९. श्री.मगर शंकर जिजाराम

**विषय क्र.६७९ :**

दिनांक ३०.०३.१९९० संपन्न झालेल्या गत स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**<u>संवाद :</u>**

**श्री.प्रदिप जैस्वाल :** जकात विभागातील पावती पुस्तक गहाळ संदर्भातील चौकशीचा अहवाल ऑफिस संचिका सभागृहात दाखल करणे संबंधीची आणि जकात विभागातील कथीत भ्रष्टाचार व भ्रष्टाचार यंत्रणेवर कार्यवाही करणे संबंधीची पत्रे मा.सभापती, स्थायी समिती, यांच्याद्वारे प्रशासनास सादर करावे. दि.३०.०३.१९९० च्या सभेत मालमत्ता करासंबंधीच्या नागरिकांच्या अडचणी बाबत चर्चा घडून आली होती. या चर्चेनुसार आवश्यक तो खुलासा करण्यासाठी आजच्या सभेत करमूल्य अधिकारी नाहीत. तेंव्हा स.सभासदांनी मांडलेल्या जनतेच्या अडचणींचा खुलासा व्हावा. कशा प्रकारे केला जाईल याचा खुलासा व्हावा. तसेच चिकलठाणा येथील मालमत्ता कराबाबतचे बंच सभागृहात मागविण्यांत यावेत.

**मा.सभापती :** दि.३०.०३.९० च्या सभेत स.सभासदांनी मालमत्ता कराबाबतच्या नागरिकांच्या अडचणी बाबत उपस्थित केलेल्या प्रश्नांची माहिती करमुल्य अधिकारी यांना मिळाली आणि सभासदांच्या प्रश्नाचे निरसन करण्याचे दृष्टीने करमूल्य अधिकारी यांनी आजच्या सभेस उपस्थित राहण्याबाबत मा.उपआयुक्त, यांचकडे तशा प्रकारची पूर्व सूचनाही देण्यात आली होती. मा.उपआयुक्त यांचेकडे पूर्व सूचना देऊनही करमूल्य अधिकारी श्री.शिंदे हे

सभागृहात वेळेवर उपस्थित न राहिल्यामुळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (२) (५) अन्वये दंड आकारण्याची मा.आयुक्त यांनी कडक कार्यवाही व्हावी व स्थायी समितीच्या शिफारशी प्रमाणे केलेल्या कार्यवाहीची माहिती सभागृहास द्यावी.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** फकीरवाडी येथे तयार करावयाच्या पुलाबाबत मागील दोन सभातून विचारणा करण्यांत येत आहे. या प्रकरणी मा.शहर अभियंता यांचेसोबत प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली असता या भागातील महिलांना नाल्यातील घाण पाण्यातून रस्ता ओलांडावा लागतो. हे प्रत्यक्ष नजरेस आलेले आहे. तेव्हा या कामाबाबत खुलासा व्हावा.

**मा.शहर अभियंता :** स.सभासदांच्या सुचनेप्रमाणे फकीरवाडी येथील पुलाच्या बांधकामाबाबत पाहणी करण्यांत आलेली आहे. पुढील बैठकीत अंदाजपत्रक ठेवण्यांत येईल.

**उपआयुक्त :** महापालिकेच्या कर्मचारी वर्गाकडून कार्यालयीन वेळे व्यतिरिक्त जनगणनेचे काम करुन घेण्यच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या आहेत. अशा सूचना देऊनही कर्मचारी जनगणना कामाच्या नावाखाली कार्यालयीन कामात विलंब अथवा कार्यालयात वेळेवर उपस्थित राहत नसतील तर अशा कर्मचाऱ्यांविरुध्द संबंधित अधिकाऱ्यांनी दंडनीय कार्यवाही करावी.

**श्री.प्रदिप जैस्वाल, श्री.अशोक सायन्ना :** दि.३०.०३.९० च्या सभेतील चर्चेनुसार विशेष जलनिःसारण शुल्क भरणा केला नाही म्हणून प्रलंबित असलेली सर्व प्रकरणे निकाली काढण्यात यावीत. या निर्णयानुसार संबंधित विभागाकडून काय कार्यवाही झाली. याचा खुलासा व्हावा.

**सहा.संचालक, नगररचना :** प्रति चौ.फुट रु.१४/- या दराने जलनिःसारण शुल्क आकारणेस मंजूरी दिलेली आहे. मंजूरीनुसार ठरावाची अंमलबजावणी केली जात आहे. त्यास सर्वसाधारण सभेत अग्रसीन करण्याची आवश्यकता नाही असे मला वाटते.

**श्री.अलफखा हुसेन खा :** मुख्य ड्रेनेज लाईनपासून दुर अंतरावर असलेल्या कॉलनीतील जलनिःसारण वाहिनी मुख्य लाईन जोडण्याच्या कामासाठी येणारा जादा खर्च महापालिकेला करावा लागतो. ले-आऊट धारकांनी जमा केलेल्या विकास खर्चामध्ये याचा समावेश नसतो. पर्यायाने अशा जोडणीसाठी महापालिकेला करावा लागलेल्या खर्चाचा भार कर दात्यावर पडतो. या बाबींचा विचार करुन अशा कामासाठी येणाऱ्या खर्चाकरीता ले-आऊट मंजूर प्रकरणे दाखल करणाऱ्या व्यवसाईकांचा या खर्चास हातभार लागावा यादृष्टीने मा.आयुक्त यांना असलेल्या अधिकारानुसार जलनिःसारण शुल्क आकारण्याच्या प्रस्तावास सभागृहाने मंजूरी दिलेली आहे. तरी पण सभागृह हे शुल्क आकारीत नसेल तर माझी काहीही हरकत नाही.

**सहा.संचालक,नगररचना :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५९ (२) अन्वये मा.आयुक्त यांना अशा प्रकारचे विशेष कर लावण्याचे अधिकार आहेत. (उक्त कलम सभागृहात वाचून दाखविले.)

**श्री.अशोक सायन्ना, श्री.मोरेश्वर सावे :** जलनिःसारण शुल्क आकारण्यास आमची हरकत नाही. परंतू स्थायी समितीने मंजूर केलेल्या ठरावास सर्वसाधारण सभेत मंजूरी घेतल्यनंतरच या ठरावाची अंमलबजावणी नियमाप्रमाणे घेणे आवश्यक आहे. त्यासाठी ठराव घेण्यापुर्वीच कार्यालयात दाखल झालेल्या प्रकरणातील अर्जदारांना हे शुल्क आकारण्याची सक्ती करण्यात येऊ नये. या ठरावास

मंजूरी होण्याच्या अगोदर पासून जलनिःसारण शुल्क आकारणी चालू होती. ही बाब उघडकीस आल्यानंतर सदर प्रस्ताव प्रशासनातर्फे स्थायी समितीसमोर ठेवण्यांत आला होता. जलनिःसारण शुल्क वसुली संदर्भात बरीच प्रकरणे कार्यालयात पडून आहेत. हे योग्य नाही. सहाय्यक संचालकांनी सभागृहात आयुक्तांचे अधिकार संदर्भात कलम १५९ (२) वाचून दाखवून सभागृहाची दिशाभूल केलेली आहे. कलम १५९ (२) अन्वये मा.आयुक्तांना शुल्क आकारणीस अधिकार आहेत. असा कोठेही उल्लेख नाही. या कलमान्वये तयार इमारतीचे सांडपाणी रस्त्यावर वाहत असेल तर अशा इमारत मालकांकडून रस्त्यावर वाहत असणारे सांडपाणी फी आकारुन जलनिःसारण वाहिनीस जोडण्यांत येईल असा त्याचा अर्थ आहे.

**मा.सभापती :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये स्थायी समितीने मंजूर केलेल्या जलनिःसारण शुल्क आकारणीच्या ठरावास नियमाप्रमाणे सर्वसाधारण सभेच्या मंजूरीची आवश्यकता असेल तर जलनिःसारण शुल्क आकारणी बाबत स्थायी समितीने मंजूर केलेल्या ठरावास नियमाप्रमाणे सर्वसाधारण सभेची मंजूरी घेण्यात यावी. आणि या ठरावामुळे प्रलंबित असलेली प्रकरणे निकाली काढण्यात यावीत.

**श्री.मोतीराम घडामोडे :** दि.३०.०३.९० च्या सभेतील चर्चेनुसार रु.४००/- ऐवजी रु.३००/- वार्षिक या दराने पाणीपट्टी आकारणे बाबत मंजूर केलेल्या ठरावाच्या अंमलबजावणी बाबत काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा.

**मा.सभापती :** रु.४००/- ऐवजी रु.३००/- वार्षिक पाणीपट्टी आकारणी बाबत सर्वसाधारण सभेच्या मंजूरीनुसार पाणीपट्टी बाबत अंमलबजावणी करण्यात यावी. पाणीपट्टी आकारणी बाबत नागरिकांना वाटप करण्यांत आलेली देयके दुरुस्त करुन पुन्हा वाटप करण्यांत यावीत.

**श्री.मोतीराम घडामोडे :** दि.३०.०३.९० च्या सभेत ऐनवेळेवरील ठराव क्र.६७१ अन्वये अभिनव केमीकल्स यांचेकडून फिनेल खरेदीस मंजूरी दिलेली आहे. अभिनव केमीकल्स यांचेकडून खरेदी करण्यात आलेल्या फिनेलची चौकशी पूर्ण झालेली नाही. चौकशी पूर्ण झालेली नसतांना पुन्हा त्याच एजन्सीकडून फिनेल खरेदी करणे योग्य होणार नाही. सबब ठराव क्र.६७१ अन्वयेची अंमलबजावणी रद्द करण्यांत यावी.

**मा.सभापती :** सदर प्रस्ताव तूर्त स्थगित ठेवण्यांत यावा.

**श्री.प्रदिप जैस्वाल, श्री.कचरु नवपुते, श्री.मिर्झा अन्वर बेग, श्री.स.अ.एकबालोद्दीन :** मालमत्ता करधारकांकडून पुर्वीच्या करयोग्य मुल्यावर कर आकारणी करण्याचा ठराव सर्वसाधारण सभेने मंजूर करुनही प्रशासनातर्फे वाढीव मालमत्ता कर आकारणी केली. जात असल्याचे निदर्शनास आले आहे. (उदाहरणा दाखल काही आक्षेपार्ह मालमत्ता बिले)

**मा.सभापती :** स.सभासदांनी मालमत्ता कराबाबत दाखल केलेल्या पावल्यापैकी चिकलठाणा येथील रहिवाशी हरी रावजी नवपुते यांना दिलेल्या नोटीस क्र.६१६/८१५ बाबत करमूल्य अधिकारी यांचेकडे विचारणा करुन संबंधित कागदपत्राची पाहणी केली असता हरी रावजी नवपुते यांच्या मालमत्तेवरील कर रु.३५९/- असा हिरव्या शाईने दाखविण्यांत आल्याची माहिती करमूल्य अधिकारी यांनी सभागृहाला दिली. त्याचप्रमाणे श्री.चंद्रभान रखामाजी नवपुते, रा.चिकलठाणा यांना देण्यांत आलेल्या नोटीस क्र.६२५/८२७ अन्वये रु.७७३/- मालमत्ता कर

आकारण्याचे स्पष्ट दिसते. पण प्रत्यक्षात चिकलठाणा बंचात अ.क्र.८२७ ची पाहणी केली असता रु.३०२/- मालमत्ता कर हिरव्या शाईत नोंदविण्यांत आल्याचे दिसते. याशिवाय मो.रोहीलागल्ली येथील रहिवाशी श्री.मो.जलीलउल्ला खान यांचे घर क्र.१-२४-५० बाबत देण्यांत आलेले देयक नं.८८/५८ दि.३१.०३.९० अन्वये रु.३९१/- मालमत्ता कराची आकारणी केली असून संबंधित पावतीवर विभागीय अधिकाऱ्यांची स्वाक्षरी नाही. सबब या सर्व प्रकारची चौकशी करुन कार्यवाही करण्याच्या दृष्टीने स.सभासदांनी सभागृहात दाखल केलेल्या नोटीसेस व चिकलठाणा विभागातील मालमत्ता कर आकारणी बाबतचा बंच मा.उपआयुक्त यांचे स्वाधीन करण्यात येत आहे.

याशिवाय श्रीयुत राजहंस, श्रीयुत दाभाडे, व अन्य यांचेकडील कर आकारणी बाबतच्या नोटीसेस प्रकरणात स.सभासद श्री.मिर्झा अन्वर बेग, श्री. प्रदिप जैस्वाल, व श्री.इकबालसिंग गील यांनी प्रत्यक्ष पाहणी करावी.

**ठराव :**

ठराव क्र.६३८ चे काम तातडीचे असल्यामुळे एन-१ वर करुन घेण्यास आणि ठराव क्र.६७१ तुर्त स्थगित ठेवणे या दुरुस्त्यांसह दि.३०.०३.९० रोजी संपन्न झालेल्या गत स्थायी समितीचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.६८० :**

शहर अभियंता प्रस्ताव सादर केला की, सिध्दार्थ गार्डन ते प्रिंन्ट्राव्हल हॉटेल या १०० फुट डी.पी.रोडचे रुंदीकरण करुन खडी रस्ता तयार करणे व संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी सन १९८८-८९ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.३,९९,६१८/- ला स्थायी समितीचा ठराव क्र.४६६/१०, दि.१५.०३.१९९० नुसार मंजूरी मिळालेली आहे.

सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.(७) १९८९-९० दि.०२.०३.९० नुसार बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित दिनांकापर्यंत एकूण १२ बारा निविदा विक्री झाल्यास असून निविदा स्विकारणेच्या नियोजित दिनांकास एकूण (७) सात निविदा दर भरलेल्या वसुल झालेल्या आहेत. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.कैसर खान | - | २०% कमी दराने |
| २. | मे.पॉल कन्स्ट्रक्शन | - | १८.७८६% कमी दराने |
| ३. | मो.सलीम | - | १८.७८६% कमी दराने |
| ४. | श्री.एस.ए.नवाब | - | १८.१३% कमी दराने |
| ५. | श्री.कुलवंत सिंग | - | १५.१०% कमी दराने |
| ६. | मे.एस.एच.असोशिएटस | - | ७% कमी दराने |
| ७. | श्री.डी.अजितसिंग | - | १२% जास्त दराने |

तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी व अंदाज पत्रकाचे दरापेक्षा २०% कमी दराचे श्री.कैसर खान यांची निविदा असून मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ गार्डन ते प्रिन्ट्रव्हल हॉटेल या १०० फुट डी.पी.रोडचे रुंदीकरण करुन खडी रस्ता तयार करणे व संरक्षित भिंत बांधण्याबाबतच्या कामासाठी तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकापेक्षा (दरापेक्षा) २०% कमी दराची श्री.कैसरखान यांच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.६८१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, भाग्यनगर येथील रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९८८-८९ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.१,१२,७००/- ला स्थायी समितीचा ठराव क्र.४६३/७, दि.१५.०३.९० नुसार मान्यता मिळालेली आहे.

सदर काम करणेसाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.७/१९८९-९०, दि.०२.०३.९० नुसार बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित दिनांकापर्यंत एकूण दोन (२) निविदा विक्री झाल्या असून निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकूण दोन (२) निविदा दर भरलेल्या वसुल झाल्या आहेत. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.एस.एम.जग्गी | - | २% कमी दराने |
| २. | मे.रे.कन्स्ट्रक्शन | - | ५% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी दराचे श्री. एम.एस.जग्गी यांची निविदा असून मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भाग्यनगर येथील रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरपेक्षा २% कमी दराचे श्री.एम.एस.जग्गी यांचे निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र.६८२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, टेलिफोन भवन ते क्रांतीचौक पोलिस स्टेशन या ५०" फुट डी.पी.रोडचे रुंदीकरण करुन डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९८८-८९ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे जे.एस.आर.दराने र.रु.३,२३,७८०/- ला स्थायी समितीचा ठराव क्र.६७, दि.२३.०३.८९ नुसार मंजूरी मिळालेली आहे. सदरील कामापैकी रुंदीकरण, खडीकरण करणेच्या कामाच्या निविदा मागविल्या असून डांबरीकरण करणे बाकी आहे. असे रुंदीकरण करुन खडीकरण करणे व डांबरीकरण करणे या दोन्ही कामासाठी वरीलप्रमाणे मंजूरी मिळालेली आहे.

सदर काम करणेसाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.(७)/१९८९-९०, दि.०२.०२.९० नुसार बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित दिनांकापर्यंत एकूण दोन निविदा विक्री झाल्या असून निविदा स्विकारणेच्या नियोजित दिनांकपर्यंत एकूण दोन (२) दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.एस.एम.जग्गी | - | २% कमी दराने |
| २. | मे.रे.कन्स्ट्रक्शन | - | १०% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी दराचे श्री. एम.एस.जग्गी यांची निविदा असून मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे टेलिफोन भवन ते क्रांतीचौक पोलिस स्टेशन या ५०" फुट डी.पी.रोडचे रुंदीकरण करुन डांबरीकरण करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी दराची श्री.एम.एस.जग्गी यांच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.६८३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, पैठण गेट येथील वाहतुक बेटाजवळील रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९८८-८९ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर. दराने र.रु.१,९६,८४५/- ला स्थायी समितीचा ठराव क्र.८७५ दि.०८.०२.८९ नुसार मान्यता मिळालेली आहे. सदरील रकमेतून खालीलप्रमाणे काम करण्यात येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | खडी रस्ता | - | रु.५०,११५/- |
| २. | डांबरीकरण करणे | - | रु.४६,२८०/- |
| ३. | आयलँड तयार करणे | - | रु.१,००,४५०/- |

असे एकूण अंदाजपत्रक रक्कम रु.१,९६,८४५/- ला मंजूरी मिळालेली आहे. सदर कामापैकी डांबरीकरण करणेच्या कामासाठी दि.२०.०२.८९ चे निविदा सुचनेनुसार बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित दिनांकापर्यंत एकूण तीन (३) निविदा विक्री झाल्या असून निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेपासून एकूण दोन (२) निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.मुस्ताक इंडस्ट्रीज | - | ४.५% अधिक दराने |
| २. | श्री.एम.एस.जग्गी | - | ७% अधिक दराने |

अशा एकूण दोन निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या होत्या. त्यापैकी सर्वात कमी म्हणजे ४.५% कमी दराचे मे.मुस्ताक इंडस्ट्रीज यांची निविदा आहे. परंतू त्यांनी दिलेले दर जास्त असल्यामुळे त्यांचे सोबत वाटीघाटी करुन ४.५०% ऐवजी ४% जास्त काम करण्याची संमती दर्शविली आहे. व त्यानुसार स्थायी समितीचा ठराव क्र.९७९/४६, दि.३०.०३.८९ त्यांची निविदा मंजूर करण्यात आली. परंतू त्यांना वेळोवेळी लेखी व तोंडी पत्रके देऊन देखील त्यांनी एक वर्षाच्या दर कालावधी झालेला असतांना देखील काम केलेले नाही. व म्हणून सदरील कामामध्ये दुसऱ्या कमी दराचे ठेकेदार श्री.एम.एस.जग्गी यांना पहिल्या दराचे ठेकेदाराचे दराने म्हणजे ४% अधिक दराने काम करण्यासाठी विचारणा केली असता त्यांनी काम करण्याची तयारी दाखवून तशी लेखी संमती दिलेली आहे.

तरी पहिल्या कमी दराचे ठेकेदार मे.मुस्ताक इंडस्ट्रीज यांची अनामत रक्कम (२%) जप्त करुन सदरील काम दुसऱ्या कमी दराचे श्री.एम.एस.जग्गी यांचेकडून ४% अधिक दराने करुन घेणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

सदर प्रस्ताव तुर्त प्रलंबित ठेवण्यांत यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.६८४ :**

महानगरपालिका हद्दीतील जुन्या पध्दतीचे संडासाचे रुपांतर जलोधीत बाबत सर्वसाधारण सभेत ठराव क्र.४०/१६ ला मंजूरी मिळालेली आहे.

उपरोक्त ठरावानुसार निविदा मागवण्यिांत आल्या त्याचा तक्ता खालीलनुसार आहे.

झोन क्र.१ मधील ४१७ जुन्या पध्दतीच्या संडासाचे अंदाजपत्रक रक्कम रु.९,१७,४००/- रुपांतर जलोधीत करणेबाबत सदर कामाकरिता कार्यालयीन निविदा सूचना क्र.१२/९६६/८९, दि.१९.१२.८९ द्वारे बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण चार निविदा विकण्यात आल्या होत्या. व केवळ दोन निविदा वसुल झालेल्या आहेत. त्याचा तुलनात्मक तक्ता दर खालीलप्रमाणे आहे.

१. श्री.मझरुल हक्क - अंदाजपत्रकीय दराने
२. श्री.पॉल कन्स्ट्रक्शन - ५% जास्त दराने

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा म्हणजे अंदाजपत्रकाचे दराचे श्री.मझरुल हक्क यांचे दरपत्रक आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

सदर प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यांत यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.६८५ :**

झोन क्र.४ मधील १६० ज्यांचे अंदाजपत्रक रक्कम रु.३,५२,०००/- जुन्या पध्दतीचे संडासाचे रुपांतर जलेधीत करणे बाबत सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.१२/९६६/८९, दि.२९.१२.८९ द्वारे बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण तीन निविदा विकण्यात आल्या असून केवळ दोनच निविदा वसुल झालेल्या आहेत. व त्याचा तुलनात्मक दर खालील प्रमाणे आहे.

१. श्री.आनंद बिल्डर्स - १.९९% कमी
२. श्री.आर.एस.भाटीया - १.२३% कमी

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी न अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.९९% कमी दराचे श्री.आनंद बिल्डर्स यांचे दरपत्रक आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यांत यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.६८६ :**

झोन क्र.३ मधील (अ) विभागातील ५२० जुन्या पध्दतीचे संडासाचे रुपांतर अंदाजपत्रक रु.१ जलोधीत करणे बाबत सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.१२/९६६/८९, दि.२९.१२.८९ द्वारे बी-१ नमुन्या निविदा मागविण्यांत आल्या असता एकूण चार निविदा विकण्यात आल्या होत्या त्यापैकी केवळ दोनच निविदा वसुल झाल्या आहेत. त्याचा तुलनात्मक दर खालीलप्रमाणे आहे.

१. एम.एम.बेग - ०.०१% कमी
२. श्री.मझरुल हक्क - ८% जास्त

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रक दरापेक्षा ०.०१% कमी दराचे श्री.एम.एम.बेग यांचे दरपत्रक आहे. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यांत यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.६८७ :**

झोन क्र.२ मधील वार्ड क्र.ब मधील ५२० जुन्या पध्दतीच्या संडासाचे रुपांतर ज्याचे अंदाजपत्रक रु.११,४४,०००/- जलोधीत करणे बाबत सदर कामाकरिता कार्यालयीन निविदा सुचना क्र.१२/९६६/८९, दि.११.१२.८९ द्वारे बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण चार निविदा विकण्यात आल्या असून त्यापैकी केवळ तीनच निविदा वसुल झाल्या आहेत. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.पॉल कन्स्ट्रक्शन | - | १० % जास्त |
| २. | श्री.कुलवंतसिंग | - | ५% जास्त |
| ३. | श्री.बी.आर. आनंद | - | ०.१०% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी दराची श्री.बी.आर.आनंद यांचे दरपत्रक आहे. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यांत यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.६८८ :**

झोन क्र.३ मधील (क) विभागातील ५०४ जुन्या पध्दतीचे संडासाचे रुपांतर ज्याचे अंदाजपत्रक रु.११,०८,८००/- जलोधीत करणे बाबत सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.१२/९६६/८९, दि.१९.१२.८९ द्वारे बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण तीन निविदा विकण्यात आल्या होत्या. त्यापैकी केवळ दोनच निविदा वसुल झालेल्या आहेत. त्याचा तुलनात्मक दर खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.कुलवंतसिंग | - | ६% जास्त |
| २. | श्री.बी.आर.आनंद | - | ०.१०% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी दराचे श्री.बी.आर.आनंद यांचे दरपत्रक आहे. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यांत यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.६८९ :**

झोन क्र.४ मधील (अ) विभागातील ३९३ जुन्या पध्दतीचे संडासाचे रुपांतर ज्याचे अंदाजपत्रक रु.८,६४,६००/- जलोधीत करणे बाबत सदर कामाकरिता कार्यालयीन निविदा सूचना क्र.१२/९६६/८९, दि.१९.१२.८९ द्वारे बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण आठ निविदा विकण्यात आल्या होत्या. त्यापैकी सहा निविदा वसुल झालेल्या आहेत. त्याचा तुलनात्मक दर खालील प्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | एम.एम.बेग | - | ८.५०% जास्त |
| २. | कुलवंतसिंग | - | ०.५% कमी |
| ३. | बी.आर.आनंद | - | ३.२१% कमी |
| ४. | पी.जे.तमखाने | - | २.२२ कमी |
| ५. | डी.सी.पंजाबी | - | १०.५६ कमी |
| ६. | पॉल कन्स्ट्रक्शन | - | ७.८६% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०.५६% कमी दराचे श्री.डी.सी.पंजाबी यांचे दरपत्रक आहे. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यांत यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.६९० :**

झोन क्र.४ मधील (ब) विभागातील ४८३ जुन्या पध्दतीने संडासाचे रुपांतर ज्याचे अंदाजपत्रक रु.१०,६२,६००/- जलोधीत करणे बाबत सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.१२/९६६/८९, दि.१९.१२.८९ द्वारे बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण चार निविदा विकण्यात आल्या होत्या. त्यापैकी ०.०१% कमी दराची एकूण एकच निविदा श्री.पी.जे.तमखाने यांची निविदा वसुल झालेली आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

**विषय क्र.६९१ :**

झोन क्र.४ मधील (क) विभागातील ३०३ जुन्या पध्दतीचे संडासाचे रुपांतर ज्याचे अंदाजपत्रक रुपये ६,६६,६१०/- जलोधीत करणे बाबत सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.१२/९६६/८९, दि.१९.१२.८९ द्वारे बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण तीन निविदा विकण्यात आल्या होत्या. त्यापैकी केवळ दोनच निविदा वसुल झाल्या आहेत. ज्याचा तुलनात्मक दर खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.बी.आर.आनंद | - | २.३९% कमी |
| २. | मे.उदय इंजिनीयरींग | - | १% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.३९% कमी दराचे श्री.बी.आर.आनंद यांचे दरपत्रक आहे. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

सदर प्रस्ताव स्थगित ठेवण्यांत यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.६९२ :**

झोन क्र.६ मधील अ विभागातील ३५० जुन्या पध्दतीच्या संडासाचे, ज्याचे अंदाजपत्रक रु.७,७०,०००/- संडासाचे रुपांतर जलोधित करणे बाबत सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.१२/९६६/८९, दि.१९.१२.८९ द्वारे बी-१ नमुन्यात निविदा

मागविल्या असता एकूण सात निविदा विकण्यात आल्या होत्या. त्यापैकी केवळ चार निविदा वसुल झालेल्या आहेत. व त्याचा तुलनात्मक दर खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.एम.एम.बेग | - | ०.५०% कमी |
| २. | श्री.बी.आर.आनंद | - | ३.२१% कमी |
| ३. | श्री.पी.जे.तमखाने | - | २.२२% कमी |
| ४. | मे.पॉल कन्स्टक्शन | - | ७.८७% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.२१% कमी दराचे श्री.बी.आर.आनंद यांचे दर पत्रक आहे. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

सदर प्रस्ताव स्थगित ठेवण्यांत यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.६९३ :**

झोन क्र.६ मधील (ब) ३५० जुन्या पध्दतीचे ज्याचे अंदाजपत्रक रु.७,७०,०००/- संडासाचे रुपांतर जलोधीत करणे बाबत सदर कामासाठी कार्यालयीन सुचना क्र.१२/९६६/८९, दि.१९.१२.८९ द्वारे बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण चार निविदा विकण्यांत आल्या होत्या. त्यापैकी केवळ दोनच निविदा वसुल झालेल्या आहेत. व त्याचा तुलनात्मक दर खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.बी.आर.आनंद | - | ५% जास्त |
| २. | श्री.एस.एम.मंडोरे | - | ०.०१% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराचे श्री.एस.एम.मंडोरे यांचे दर पत्रक आहे. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

उपरोक्त सर्व कामाचे संबंधित उपयोगिता धारकाने २५% रक्कम महानगरपालिकेत प्रथम भरल्यानंतर व उर्वरीत कर्जाच्या परत फेडीचे करारनामा करुन घेतल्यानंतर त्यांचे करारनाम्याच्या अटीवर मान्यता देण्यांत येईल।

**ठराव :**

सदर प्रस्ताव स्थगित ठेवण्यांत यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.६९४ :**

वार्ड क्र.१४ मो.शहाबाजार येथे यु.सी.आर.एस.गटार बांधणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रु.६४,०००/- चे तयार करण्यात आली असून सदर अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र.२३८ दिनांक १५.०९.८९ नुसार मंजूरी मिळाली आहे. सदर कामासाठी निविदा सुचना क्र.१०/७३८, दि.१३.१०.८९ नुसार बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण दहा निविदा प्राप्त झाल्या त्या खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.एस.पी.सरोदे | - | २५% कमी |
| २. | श्री.शे.रफीक | - | ४.९०% कमी |
| ३. | श्री.विपुल कन्स्ट्रक्शन | - | २०% कमी |
| ४. | श्री.एस.एच. असोशिएट्स | - | २२.७५% कमी |
| ५. | श्री.के.बी.काल्डा | - | १३.९९% कमी |
| ६. | श्री.संतोष पगारे | - | २४.७५% कमी |
| ७. | श्री.देवराव वाहुळ | - | १८.९०% कमी |

८. श्री.पी.जे.तमखाने - १५.५५% कमी
९. श्री.एम.एम.बेग - १८.१०% कमी
१०. श्री.सलीम अहमद - १७.८६% कमी

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५% कमी दराची श्री.एस.पी.सरोदे यांचे दरपत्रक आहे. तसेच संबंधित गुत्तेदार यांचा दर फारच कमी असल्यामुळे त्यांच्या कडून रेट ॲनॅलिसीस दाखल करणेस्तव पत्रक देण्यात आले होते. तरी संबंधिताने खुलासा केला होता. तद्नंतर मा.आयुक्तांनी मंजूरी दिलेली आहे. विचारार्थ सादर.

<u>संवाद :</u>

**श्री.मोतीराम घडामोडे :** गुत्तेदार श्री.एस.पी.सरोदे यांचे काम निकृष्ट दर्जाचे आहे. तेव्हा प्रस्तावित काम संबंधितास देण्यात येऊ नये.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.१४ मो.शहाबाजार येथे यु.सी.आर.एस.गटार बांधणे करिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५% कमी दराच्या श्री.एस.पी.सरोदे यांचे निविदेस मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.६९५ :**

वार्ड क्र.१९ जुनाबाजार येथे एम.ए.हबीब यांच्या घराजवळ १५० मी.मी. व्यासाची लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र.रु.७,८१०/- ला स्थायी समिती ठराव क्र.५०० दि.०४.०१.९० द्वारे मंजूरी मिळालेली आहे. सदर कामासाठी निविदा मागविल्या असता एकूण दोनच निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे

१. श्री.जफर खान - २% जास्त
२. श्री.मझरुल हक्क - १% कमी

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराचे श्री.मझरुल हक्क यांचे दर पत्रक आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.१९ जुनाबाजार येथे एम.ए.हबीब यांच्या घराजवळ १५० मी.मी. व्यासाची लाईन टाकणेकरिता तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराची श्री.मझरुल हक्क यांचे निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र.६९६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, महावीर चौक ते मिलकॉर्नर या रस्त्यावर डांबरीकरण करणेच्या कामासाठी स्थायी समिती ठराव क्र.४६७ दि.२६.०२.९० अन्वये र.रु.४,००,०००/- च्या अंदाजपत्रकास मंजूरी मिळाली आहे. सदरील कामासाठी निविदा मागविल्या असता एकूण दोन निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे

१. श्री.एम.एस.जग्गी - अ.पेक्षा २% कमी

२. श्री.मे.रे.कन्स्ट्रक्शन - अंदाजपत्रकीय दराने

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी दराची निविदा श्री.एम.एस.जग्गी यांची आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महावीर चौक ते मील कॉर्नर या रस्त्यावर डझांबरीकरण करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी दराच्या श्री.एस.एस.जग्गी यांच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र.६९७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, घाटी येथील मनपा शाळेला कंपाऊंड वाल (नवीन शाळा) बांधणे बाबतच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दि.०९.१२.८९ ठराव क्र.३१० नुसार रु.९६,६६५/- ला मंजूरी मिळाली आहे. सदर कामासाठी निविदा मागविल्या असता एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे.

१. श्री.एकबाल अहमद - १०% जास्त
२. श्री.कुलवंतसिंग - ७% जास्त
३. श्री.सी.एस.आसन्ना - ५% जास्त

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराचे श्री.सी.एम.आसन्ना यांचे दर पत्रक आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे घाटी येथील मनपा शाळेला कंपाऊंड वॉल बांधणेच्या कामाकरिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराच्या श्री.एसी.एस.आसन्ना यांच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.६९८ :**

वार्ड क्र.३५ मो.समी कॉलनी येथे ३०० मी.मी. व्यासाची आहे. सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र.रु.४३,०००/- ला स्थायी समिती ठराव क्र.५२१ द्वारे मंजूरी मिळालेली आहे. सदर कामासाठी अ-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण तीन निविदा वसुल झाल्या. त्या खालीलप्रमाणे

१. श्री.एम.खान - १% जास्त
२. श्री.अब्दुल फकीर शे.रहीम - ०.०५% कमी
३. श्री.एम.ए.बेग - ६% जास्त

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराची श्री.अ.कदीर शे.रहीम यांचे दरपत्रक आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.३५ समी कॉलनी येथे ३०० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणे करिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय

दरापेक्षा ०.०५% कमी दराची श्री.अ.कदीर शे.रहीम यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.६९९ :**

वार्ड क्र.३५ मो.नागसेन कॉलनी येथे ३०० मी.मी. व्यासाची लाईन टाकणे बाबत रु.५६,३००/- ला स्थायी समिती ठराव क्र.५२० दि.२६.०२.९० द्वारे मंजूरी मिळाली आहे. सदर कामासाठी अ-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण तीन निविदा वसुल झाल्या त्या खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.एम.एम.बेग | - | ५% जास्त |
| २. | श्री.कदीर शे.रहीम | - | ०.०५% कमी |
| ३. | श्री.एम.खान | - | १% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराची श्री.अ.कदीर शे.रहीम यांचे दर पत्रक आहे. मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.३५ मो.नागसेन कॉलनी येथे ३०० मी.मी. व्यासाची लाईन टाकणे करिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराचे श्री.अ.कदीर मो.रहीम यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७०० :**

सिध्दार्थ उद्यानातील सांबर पिंजऱ्याची उंचित वाढ करणेच्या कामासाठी अंदाजपत्रक र.रु.२८,६१८/- ला स्थायी समिती दि.२६.०२.९० ठराव क्र.४६२ द्वारे मंजूरी मिळाली आहे. सदर कामासाठी जाहीर निविदा मागविल्या असता एकूण दोन निविदा प्राप्त झाल्या त्या खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.कैसर खान | - | ६.२५% जास्त |
| २. | श्री.इ.बी.पठाण | - | ०.०५% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराची श्री.इ.बी.पठाण यांची निविदा आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ उद्यानातील सांबर पिंजऱ्याची वाढ करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराची श्री.इ.बी.पठाण यांच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र.७०१ :**

मा.आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांचे अनुज्ञाप्ती अंती, सचिव महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, नवनिर्वाचित सहा विशेष समित्यांचे सभापती व उपसभापती आणि समाकक्षातील कर्मचारी वृंद हयांचा पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकांचे कामकाज पाहणी विषयक संयुक्त अभ्यास दौरा आयोजित करावयाचा आहे. एकूण १५ ते २० व्यक्ती साठी किमान ३ ते ४ दिवसाचे अभ्यास दौऱ्या

प्रित्यर्थ र.रु.१५,०००/- (रु.पंधरा हजार) खर्च अेपक्षित आहे. करिता र.रु.१५,०००/- च्या अंदाजित प्रवास खर्चाचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपाच्या नवनिर्वाचित सहा विशेष समित्यांचे सभापती व उपसभापती आणि सभा कक्षातील कर्मचारी वृंद हयांच्या पुणे, पिंपरी चिंचवड महानगरपालिकाचे कामकाज पाहणी विषयक संयुक्त अभ्यास दौऱ्यासाठी एकूण १५ ते २० व्यक्तींच्या ३ ते ४ दिवसाचे अभ्यास दौऱ्याकरिता र.रु.१५,०००/- च्या खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७०२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र.५८ आकाशवाणी ते त्रिमुर्ती चौक या रोडच्या बाजुस दगडी गटारीचे बांधकाम करणेच्या कामासाठी सन १९८९-९० चे.सा.बां.खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.६५,२४८/- चे अंदाजपत्रक तयार करण्यास आलेले असून सदरचा खर्च हा "भांडवली रस्ते" या सदरातून करण्यात येईल. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.५८ आकाशवाणी ते त्रिमुर्ती चौक या रोडच्या बाजुस दगडी गटारीचे बांधकाम करणेच्या कामासाठी र.रु.६५,२४८/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. काम आवश्यक असल्यामुळे ए-१ वर करुन घेण्यांत यावे असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.७०३ :**

जलगृह अभियंता-१ यांनी प्रस्ताव सादर केला की, बसैय्ये नगर येथे १५० मी.मी./१०० मी.मी. व्यासाची अे.सी.जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी र.रु.१,६९,६०५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आली आहे. सदरील अंदाजपत्रक ८९-९० च्या डी.एस.आर.प्रमाणे तयार करण्यांत आले आहे.

सदरील भागातील प्लॉट धारकांनी १००% विकास खर्च भरलेला आहे. तरी रक्कम रु.१,६९,६०५/- चे अंदाजपत्रक मंजूरीस्तव सादर.

सदरील रक्कम विकास निधी खर्च १९९०-९१ मध्ये समाविष्ट करण्यात येईल.

**ठराव :**

सदर प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.बसैय्ये नगर येथे १५०/१०० मी.मी. व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी र.रु.१,६९,६०५/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७०४ :**

वार्ड क्र.१९ धनंजय आईस कंपनी पासून ते कबाडीपुऱ्यांपर्यंत नाला पिंचींग करणे बाबत अंदाजपत्रक र.रु.१,४०,०००/- चे तयार करण्यांत आले आहे. सदर नाल्याच्या ठिकाणी दोन्ही बाजुने घरे आहेत. त्यामुळे सदर नाल्यचे पाणी पावसाळ्यात नागरिकांच्या घरात जाते. त्यामुळे नागरिकांच्या अडचणी लक्षात घेता सदर ठिकाणी नाला पिंचींग करणे जरुरी आहे. व सदरचा खर्च नाला ट्रेडींगच्या तरतूदीतून करण्यात येईल.

प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.१९ धनंजय आईस कंपनी पासून ते कबाडीपुऱ्यापर्यंत नाला पिंचींग करणेच्या कामाकरिता र.रु.१,४०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७०५ :**

वार्ड क्र.१९ बुढ्ढी लाईन येथे गिजांतली लॉजजवळ रोड क्रॉसींग ला दगडी गटार बांधून आर.सी.सी.स्लॅब टाकणे. अंदाजपत्रक रक्कम रु.१२,४००/- चे तयार करण्यात आलेले आहे.

सदरील ठिकाणी म्हणजे गितांजली लॉज जवळ क्रॉसींगला ४५० मी.मी.व्यासाचा रोड क्रॉस पाईप आहे. परंतू पावसाळ्यात सदर ठिकाणी पाणी साचते. व येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना त्रास होतो. करिता नागरिकांच्या अडचणी लक्षात घेता. सदर ठिकाणी गटार बांधणे जरुरी आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.१९ बुढ्ढीलईन येथे गितांजली लॉज जवळ रोड क्रॉसला दगडी गटार बांधून आर.सी.सी.स्लॅब टाकणेच्या कामाकरिता र.रु.१२,४००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. काम तातडीचे असल्यामुळे अ-१ वर करुन घेण्यात यावे, असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.७०६ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा यांनी प्रस्ताव सादर केला की, सिडको एन-४ एच मधील पाणी पुरवठा पाईप लाईन सुधारणेचे कामासाठी सन १९८९-९० चे डी.एस.आर. दराने परिसर अभियांत्रिकी मंडळ, औरंगाबाद नुसार अंदाजपत्रक र.रु.४२,६०६/- चे तयार करण्यात आली असून सदरील काम फार तातडीचे असल्यामुळे मा.सभापती, बांधकाम समिती महानगरपालिका, औरंगाबाद यांनी आदेशीत केल्यानुसार सदरील काम ए-१ नमुन्यावर उपलब्ध गुत्तेदार श्री.शे.करीम शे.अमीर यांचे कडून करुन घेणेस्तव हाती घेण्यांत आलेले आहे.

तरी तयार केलेले अंदाजपत्रक व शे.करीम शे.अमीर ठेकेदार यांचे नावाने ए-१ नमुन्यातील कामास मंजूरी घेणेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको एन-४ एच मधील पाणी पुरवठा पाईप लाईन सुधारणेचे कामासाठी र.रु.४२,६०६/- च्या अंदाजपत्रकास व सदरील काम उपलब्ध गुत्तेदार श्री.शेख करीम शेख अमीर यांचेकडून करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७०७ :**

वार्ड क्र.२९ मराठा हायस्कुल पासून ते परिडस हाऊस पर्यंत २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र.रु.२४,१२५/- चे तयार करण्यात आलेले आहे. सदर ठिकाणी ही जुनी पाईप लाईन १५० मी.मी. व्यासाची चीनी मातीची असून सदर लाईनवर जास्त लोड वाढल्यामुळे सदर लाईन वारंवार चोक अप होते. व नागरिकांना अडचणी सहन कराव्या लागतात. करिता २५० मी.मी. व्यासाची लाईन टाकणे

आवश्यक आहे. काम तातडीने करावयाचे असल्यामुळे काम अ-१ निविदेवर करण्यात येईल व सदरचा खर्च मा.नगरसेवक यांच्या स्वेच्छा निधीतून करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.२९ मध्ये मराठा हायस्कुल पासून ते परिडस हाऊस पर्यंत २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणे करिता रक्कम रु.२४,१२५/- च्या अंदाजपत्रकास व सदर काम अ-१ निविदेवर करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र.७०८ :**

वार्ड क्र.२८ श्रीमान गल्ली येथे १५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र.रु.२५,०००/- चे तयार करण्यात आली असून सदर जुनी लाईन ही १५० मी.मी. व्यासाची चीनी मातीची असून सदर लाईन वारंवार चोकअप होतो. करिता सदर ठिकाणी १५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. लाईन टाकणे जरुरी आहे. सदर काम तातडीने करुन घ्यावयाचे असल्याने अ-१ निविदेवर मा.नगरसेवक स्वेच्छा निधीतून सदर खर्च करण्यात येईल. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड २८ श्रीमान गल्ली येथे १५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणे करिता र.रु.२५,०००/- च्या अंदाजपत्रकास व सदर काम ए-१ निविदेवर करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. सदर खर्च नगरसेवक यांच्या स्वेच्छानिधीतून करण्यात यावा.

**विषय क्र.७०९ :**

वार्ड क्र.२० मध्ये मनपाच्या शाळेपासून ते चव्हाण यांच्या घरापर्यंत यु.सी.आर.एस.गटार बांधणे बाबत अंदाजपत्रक र.रु.२५,०००/- चे तयार करण्यात आली आहे. सदर ठिकाणी अद्यापही गटार नसल्यामुळे सांडपाणी रोडवरुन व गल्ल्यातून वाहते. व जागोजागी साचते. त्यामुळे दुर्गंधी सुटते. करिता तेथील नागरिकांच्या अडचणी लक्षात घेता सदर ठिकाणी गटार बांधणे जरुरी आहे. सदर काम तातडीने करुन घ्यावयाचे असल्याने संबंधित काम अ-१ निविदेवर करण्यात येईल व सदरचा खर्च मा.नगरसेवक यांच्या सन १९८९-९० च्या स्वेच्छानिधीतून करण्यात येईल. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.२० मनपा शाळेपासून ते चव्हाण यांच्या घरापर्यंत यु.सी.आर.एस.गटार बांधणे करिता र.रु.२५,०००/- च्या खर्चास व सदरील काम अ-१ निविदेवर करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. सदर खर्च नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीतून करण्यात यावा.

**विषय क्र.७१० :**

वार्ड क्र.५२ मो.बन्सीलालनगर येथे सरफेस गटार बांधणे बाबत अंदाजपत्रक र.रु.२५,०००/- चे तयार करण्यात आले आहे. सदरचा खर्च संबंधित नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीतून करण्यात येईल, विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.५२ मो.बन्सीलालनगर येथे सरफेस गटार बांधणे करिता र.रु.२५,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. सदरचा खर्च संबंधित नगरसेवकांचे स्वेच्छा निधीतून करण्यात यावा.

**विषय क्र.७११ :**

वार्ड क्र.२२ मो.नंदनवन कॉलनी (शांतीपुरा) येथे स.न.२९,३० मध्ये ड्रेनेज लाईन टाकणे करिता र.रु.१२,००,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वसाधारण सभा ठराव क्र.४१, दि.२०.११.८९ नुसार मंजूरी मिळालेली आहे.

सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.१९ दि.०६.०३.९० अन्वये बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण सात निविदा वसुल झाल्या. त्या खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.पॉल कन्स्ट्रक्शन | - | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | श्री.एम.एम.बेग | - | १२.९९% कमी |
| ३. | श्री.कुलवंतसिंग | - | १०% कमी |
| ४. | श्री.उदय इंजिनियरींग | - | ७% कमी |
| ५. | श्री.आर.एल.बारवाल | - | ९.९९% कमी |
| ६. | श्री.बी.आर.आनंद | - | ६.६५% कमी |
| ७. | श्री.पी.जे.तमखाने | - | १६.०५% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६.०५% कमी दराचे श्री.पी.जे.तमखाने यांचे दरपत्रक आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.२२ मो.नंदनवन कॉलनी (शांतीपुरा) येथे स.नं.२९,३०, मध्ये ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६.०५% कमी दराचे श्री.पी.जे.तमखाने यांचे निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७१२ :**

मालमत्ता अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महापालिका क्षेत्रातील खालील आठवडी बाजाराची बाजार फीस कार्यालयामार्फत वसूल केली जाते. मागील काही वर्षाचा अनुभव पहाता आठवडी बाजारापासून मिळणारे वार्षिक उत्पन्न व त्याचे वसूली साठी होणारा कर्मचारी वेतन इत्यादी खर्च विचारात घेता कार्यालयामार्फत बाजार फीस वसूल करण्याची पध्दत आर्थिक हिताचे दृष्टीने फायदेशीर नाही.

त्यासाठी सन १९९०-९१ मधील ११ महिन्याच्या कामासाठी सदरचे बाजार फीस वसुलीचे काम आयुक्त, महानगरपालिका ठरवतील त्या अटी व शर्तीवर लिलाव पध्दतीने गुत्तेदारांना देणे बाबत विचार होणेस्तव व मान्यता घेणेस्तव प्रस्ताव सादर.

<u>आठवडी बाजार</u>

१. जाफर गेट आठवडी बाजार
२. चिकलठाणा आठवडी बाजार
३. पिरबाजार आठवडी बाजार

आठवडी बाजारातील विविध विक्रीय मालावरील आकारल्या जाणाऱ्या फिसचे दर खालील प्रमाणे त्यास मान्यता घेणेस्तव सादर.

आठवडी बाजार फी वसुलीचे दरपत्रक

| | | **लहान उघडे दुकान** | **फळाचे दुकान** |
|---|---|---|---|
| १. | कटलरी दुकान | १.०० | २.०० |
| २. | कापड दुकान | -- | २.०० |
| ३. | भाजीपाला | १.०० (दोन टोपली) | २.०० |
| ४. | आलुवाले | -- | २.०० |
| ५. | मिरची वाले (वाळलेली) | -- | २.०० |
| ६. | मिठाई वाले | -- | २.०० |
| ७. | हातगाडीवाले/माळविक्रिते | -- | २.०० |
| ८. | धान्य प्रति पोत्यास | ०.५० | -- |
| ९. | कुंभार | १.०० | -- |
| १०. | भांडीवाले | -- | २.०० |
| ११. | बांगडीवाले | -- | २.०० |
| १२. | किराणा | -- | २.०० |
| १३. | चहावाले | -- | २.०० |
| १४. | चांभार | १.०० | २.०० |
| १५. | मासेवाले | -- | २.०० |
| १६. | बकरा कसाई | -- | २.०० |
| १७. | ढोर कसाई | -- | २.०० |
| १८. | झाडुवाले | १.०० | -- |
| १९. | टीनवाले | १.०० | -- |
| २०. | टरबुज/काकडीवाले | -- | २.०० |
| २१. | अगरबत्ती, अत्तर | -- | २.०० |
| २२. | लोखंडी सामान | -- | २.०० |
| २३. | तेळवाले | -- | २.०० |
| २४. | बोंबिलवाले | -- | २.०० |
| २५. | तंबाखुवाले | -- | २.०० |
| २६. | उसवाले | -- | २.०० |
| २७. | बोजवार वाले | -- | २.०० |
| २८. | शरबत वाले | १.०० | -- |

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९०-९१ मधील ११ महिन्याच्या कालावधीसाठी महापालिका क्षेत्रातील बाजार फी वसुलीचे काम मा.आयक्त, महानगरपालिका ठरवतील त्या अटी व शर्तीवर लिलाव पध्दतीने गुत्तेदारांना देणेस, तसेच आठवडी बाजारातील विविध मालावरील आकारल्या जाणाऱ्या तक्त्यात दर्शविलेल्या दरास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. जाहीर लिलाव करतांना वृत्तपत्रात जाहित देण्यात यावी.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७१३ :**

मा.शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सर्व जकात नाक्यावर फोकस लाईट लावणेच्या कामासाठी स्थानिक ठेकेदारामार्फत (विद्युत परवानाधारक) निविदा मागविल्या असता एकूण चार ४ निविदा प्राप्त झाल्या त्या दि.०६.१०.८९ रोजी उघडण्यात आल्या. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.लाई वेळ | - | ६% जास्त अंदाजपत्रकीय पेक्षा |
| २. | मे.शांती इलेक्ट्रीकल्स | - | ८% जास्त |
| ३. | मे.वरद इलेक्ट्रीकल्स | - | ८% जास्त |
| ४. | मे.इगल इलेक्ट्रीकल्स | - | ४.५% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या मे.इगल इलेक्ट्रीकल्स यांचे दर सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ४.५% जास्त आहे. परंतू दि.११.११.८९ क्र.५७८९/८९ नुसार मे.इगल इलेक्ट्रीकल्स यांना दर कमी करण्यास बोलविण्यात असता मे.इगल इलेक्ट्रीकल्स यांनी लेखी पत्राद्वारे दि.२२.१२.८९ रोजी दर ०.५% कमी केल्याचे पत्र दिले. त्यानुसार मे.इगल इलेक्ट्रीकल्स यांची निविदा अंदाजपत्रकाच्या रु.२३,८१४/- दरापेक्षा ४% नी जास्त आहे.

तरी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या सर्व जकात नाक्यावर फोकस लाईट लावणेच्या कामाकरिता मे.इगल इलेक्ट्रीकल्स यांचे सोबत दि.२२.१२.८९ रोजी झालेल्या वाटाघाटीनुसार उक्त काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

यानंतर सभेचे कामकाम संपल्याचे मा.सभापती यांनी जाहीर केले.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
मा.सभापती, स्थायी समिती
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक १२ एप्रिल, १९९० रोजी भरलेल्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचा इतिवृत्तांत.**

**गुरुवार दिनांक १२ एप्रिल, १९९० रोजी दुपारी ३.५० वाजता समिती सभागृहात मा.सभापती श्री.गंगाधर गाडे यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभेस सुरुवात झाली. या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह पुढील सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

१. श्री.अलफखान हुसेन खान
२. श्री.गील इकबालसिंग प्रितमसिंग
३. श्री.जैस्वाल प्रदिप शिवनारायण
४. श्री.नवपुते कचरु चंद्रभान
५. श्री.स.अ.इकबालेद्दीन स.मो.कुतुबुद्दीन
६. श्री.यादव अशोक सायन्ना
७. श्री.सावे मोरेश्वर दिनानाथ
८. श्री.पंडागळे रतनकुमार नारायणराव

**विषय क्र.७१४ :**

दिनांक ०६.०४.९० रोजी संपन्न झालेल्या गत स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

<u>संवाद :</u>

**श्री.यादव अशोक सायन्ना :** वार्ड क्र.१ मधील विद्युत पोल बसविण्याबाबत सभागृहात अनेक दिवसापासून चर्चा घडवून आणली जात आहे. मागील सभेत पोल बसविण्याबाबत येणाऱ्या खर्चास मंजूरी देण्यांत आली आहे. परंतू या प्रकरणी अद्याप काय कार्यवाही झाली याची माहिती मिळालेली नाही. तेव्हा प्रशासनाने याबाबत काय कार्यवाही केली, याचा खुलासा व्हावा.

**निवासी उप अभियंता :** विद्युत पोलच्या खर्चाबाबत सभागृहाने मंजूर केलेल्या ठरावानुसार अप्पाची कडी, स्लॉटर हाऊस या ठिकाणी विद्युत पोल उभे करण्यासाठी विशेष बाबत म्हणून महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने मंजूरी दिलेली आहे. या मंजूरी नुसार सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यांत येत आहे व जिल्हा नियोजन विकास मंडळाच्या खर्चातून सदर काम करुन घेण्यात येईल.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** जकात पावती गहाळ प्रकरणी व जकात विभागातील भ्रष्टाचार प्रकरणी दि.०६.०४.९० रोजी दिलेल्या पत्राप्रमाणे संबंधित संचिका सभागृहात उपलब्ध करुन द्यावी. सदर प्रकरणात गहाळ झालेले पावती पुस्तक सन १९८७ मध्ये गहाळ झाल्याची माहिती मिळाली आहे. या पुस्तकातील पावत्या सन १९८९ मध्ये वापरल्या गेल्याचे निदर्शनास आले आहे. गहाळ पुस्तकातील पावत्यांच्या उपयोग करणारे काही कर्मचारी सध्या कामावर आहेत. तेव्हा या प्रकरणी चालू असलेली मुळ संचिका सभागृहामध्ये ठेवण्यात यावी.

**मा.आयुक्त :** जकात पावती पुस्तक गहाळ प्रकरणी एका कर्मचाऱ्यांला निलंबित करण्यात आले आहे. व सदर प्रकरणी पोलिस खात्याकडे गुन्हा नोंदविण्यांत आला आहे. व सदर प्रकरणी पोलिस खात्याकडे गुन्हा नोंदविण्यांत आला आहे. नोंदविण्यात आलेल्या गुन्ह्यानुसार पोलिस खात्याकडून सदर प्रकरणी आवश्यक ती पूर्ण कार्यवाही झाल्यानंतर प्रशासनातर्फे पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**श्री.यादव अशोक सायन्ना :** आजच्या स्थानिक वृत्तपत्रात एका महापालिका कर्मचाऱ्यांने अटकपूर्व जामीन घेतला अशी बातमी प्रसिध्द झालेली आहे. याचा खुलासा व्हावा.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** जकात पावती पुस्तक गहाळ प्रकरणी याच पुस्तकातील एक पावती एका विशिष्ट ठिकाणी आणून त्या पावतीचा पंचनामा केला असता संबंधित कर्मचारी यांनी सदर पावती फाडण्याबाबत दुसऱ्या कर्मचाऱ्यांचे नांव सांगितले. यावरुन पावती फाडणारा दुसरा कर्मचारी सुध्दा या प्रकरणात सामील आहे. हे सिध्द होते. तसेच जकात विभागात काम करणारे काही विशिष्ट कर्मचारी गेल्या २० ते २५ वर्षापासून त्याच विभागात काम करीत असल्यामुळे त्यांची साखळी निर्माण झाली असून मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार घडून येत आहे. व या भ्रष्टाचाराबाबत चर्चा झाल्यास यातील काही कर्मचाऱ्यांच्या तात्पुरत्या इतरत्र बदल्या करुन २/३ महिन्यांनी त्यांना पुन्हा जकात विभागात काम दिले जाते. तेव्हा गेली २०/२५ वर्षे जकता विभागात सातत्याने काम करणारे असे किती कर्मचारी आहेत. याची माहिती पुढील सभेत देण्यात यावी. याशिवाय नियमाप्रमाणे एखाद्या कर्मचाऱ्यांस निलंबित करावयाचे असेल तर स्थायी समितीची मंजूरी घेणे आवश्यक आहे. परंतू जकात पावती पुस्तक गहाळ प्रकरणी केलेल्या कार्यवाहीत स्थायी समितीची मंजूरी घेतलेली नाही.

**श्री.एकबालसिंग गील :** स.सभासदांनी सुचविल्याप्रमाणे स्थायी समितीच्या मंजूरीशिवाय श्री.जैस्वाल यांना बडतर्फे करण्यात आले आहे.

**उपआयुक्त :** मा.आयुक्त यांना प्रदान झालेल्या अधिकारानुसार स.सभासदांनी सभागृहात उपस्थित केलेल्या दोन्ही प्रकरणी नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे.

**श्री.मोरेश्वर सावे :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (१) अन्वये जकात पावती पुस्तक गहाळ व श्री.जैस्वाल यांना बडतर्फे करणे या दोन्ही प्रकरणात अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही या दोन्ही प्रकरणात झालेली नाही. तसेच या दोन्ही प्रकरणातील मुळ गुन्हेगार बाजुला राहिले व त्यात दुसऱ्याच कर्मचाऱ्यास शासन झाले आहे. यावरुन मा.आयुक्त यांनी या प्रकरणी जी कार्यवाही केली ती चुकीची आहे.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** चिकलठाणा येथील मालमत्ता कर आकारणी बंचवरुन चिकलठाणा येथील रहिवासी श्री.हरीभाऊ नवपुते व अन्य मालमत्ता कराबाबत ज्या नोटीसेस देण्यात आल्या आहेत. त्यापैकी एका नागरिकांस रु.३००/- ऐवजी रु.७७३/- ची नोटीस देण्यात आली आहे. या प्रकरणी प्रशासनाने काय कार्यवाही केली याचा खुलासा व्हावा.

**करमूल्य निर्धारण अधिकारी :** वार्ड क्र.६० येथील नागरिकांना देण्यात आलेल्या मालमत्ता कर नोटीस प्रकरणी संबंधित विभागाचे कर्मचारी यांना कारणे दाखवा नोटीस जारी करण्यांत आली आहे.

**श्री.कचरु नवपुते :** चिकलठाणा येथील मालमत्ता कर आकारणी बाबत देण्यात आलेल्या चुकीच्या नोटीसेसची सभागृहातील चर्चा लक्षात घेता वार्ड क्र.६० मधून एक पैसा मालमत्ता कर प्रशासनास मिळणार नाही, याची नोंद घ्यावी.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** वार्ड क्र.६० प्रमाणे शहरातील अनेक भागात जास्त रक्कमेच्या नोटीसेस वाटप झालेल्या आहेत. त्यामुळे मालमत्ता कराविषयी जनता त्रस्त झाली आहे. ही बाब लक्षात घेता मालमत्ता कर आकारणी विषयी जन आंदोलन छेडले जाईल.

**श्री.मोरेश्वर सावे :** मालमत्ता कर आकारणी काम अत्यंत बेजबाबदार व हलगर्जीपणाने केली जात आहे. यास कोण जबाबदार आहे? याची शहानिशा प्रशासनाने करावी व दोषी कर्मचारी/अधिकारी यांचेवर कडक कार्यवाही करावी. सभागृहातील चर्चेनुसार सर्वसाधारणपणे स्थायी समितीच्या सर्व सभासदांचे असे मत आहे की, जकात विभागामार्फत महापालिकेस आवश्यकतेपेक्षा फारच कमी उत्पन्न मिळणे तेव्हा यावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने व जकात उत्पन्नात वाढ होण्यासाठी आवश्यक कार्यवाही व्हावी असे सर्वानुमते ठरले. या जकात पाहणी पथकात स.सभासद श्री.कचरु नवपुते, श्री.स.अ.एकबालोद्दीन, श्री.प्रदिप जैस्वाल, श्री.यादव अशोक सायन्ना, व श्री.मोतीराम घडामोडे आणि एन.ए.वाहुळ, श्री.सी.एस.सोनी, व श्री.आय.टी.गायकवाड यांचा समावेश राहील. या पथकाचे अध्यक्ष मा.सभापती राहतील.

**श्री.अल्फखान हुसेन खान :** मालमत्ता कर आकारणी बाबत कलम १२३ प्रमाणे ज्या नोटीसेस देण्यात येतात. त्या नोटीसेसवर नोटीस क्रमांकाचा उल्लेख असणे आवश्यक आहे. परंतू कलम १२३ अन्वये शहरातील नागरिकांना मालमत्ता कराबाबत ज्या नोटीसेस वाटप करण्यांत आल्या. त्यावर नोटीस क्रमांक नाही. हे योग्य नाही. याबाबत यापुर्वीही आवश्यक त्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

**मा.सभापती :** मालमत्ता कराविषयी सभागृहातील चर्चेनुसार कर आकारणी विषयी नागरिकांच्या अनेक तक्रारी/अडचणी सोडविण्यासाठी स.सभासद श्री.अलफ खाँ हुसेन खाँ यांचे अध्यक्षतेखाली स.सभासद श्री.एकबालसिंग गील, श्री.प्रदिप जैस्वाल, श्री.मोरेश्वर सावे, श्री.शंकर मगर आणि शहर अभियंता व मुख्य लेखा परिक्षक यांची एक समिती कायम करण्यात येते. व मा.उपआयुक्त हे या समितीत को-ऑर्डीनेटर म्हणून काम करतील.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** मालमत्ता कर आकारणी संबंधी समिती कायम झाली असली तरी वार्ड क्र.६० च्या कर आकारणी बाबत झालेल्या चर्चेवर काय कार्यवाही करणार याचा खुलासा व्हावा.

**श्री.रतनकुमार पंडागळे :** ठराव क्र.६७६ अन्वये थोर पुरुषांचे पुतळे उभारण्यास मंजूरी मिळाली असली तरी त्याबाबतचे आवश्यक अंदाजपत्रक अद्याप सभागृहापुढे मंजूरीसाठी ठेवण्यात आले नाही.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** थोर पुरुषांचे पुतळे उभारण्याच्या कामी मराठवाड्यातील कलावंतांना प्राधान्य देण्यात यावे. आणि या कामाचे अंदाजपत्रक पुढील सभेत सादर करावे.

**मा.सभापती :** स.सभासदांच्या सुचनेप्रमाणे त्वरीत कार्यवाही होईल.

**श्री.इकबालसिंग गील :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, शाहू महाराज हयांचे पुतळे बसविण्याच्या कामाला गती देणे करिता मा.सभापती हयांच्या अध्यक्षतेखाली महापुरुष स्मारक समिती स्थापन व्हावी व तीत श्री.एकबालसिंग गील, श्री.प्रदिप जैस्वाल, श्री.यादव अशोक सायन्ना, श्री.अन्वर बेग, आणि शहर अभियंता व सहाय्यक संचालक, नगर रचना यांचा समावेश राहील. श्री.अशोक सायन्ना हयांनी वरील सुचनेस पाठींबा दिला.

**श्री.अलफखाँ हुसेन खाँ :** समितीच्या सभापतीकडे असलेल्या दुरध्वनीचे देयकाची रक्कम महापालिकेने अदा करावी, अशा प्रकारचा प्रस्ताव देऊनही सदर प्रस्ताव सभागृहापुढे मंजूरीसाठी मांडला जात नाही.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** स.सभासदांच्या सुचनेस आमचा विरोध आहे. सभापती प्रमाणे उपसभापती कडूनही दुरध्वनी देयकाच्या अदाईची मागणी होईल. आणि यानंतर सर्वच सभासद अशी मागणी करतील. याचा या ठिकाणी विचार करणे आवश्यक आहे.

**श्री.अलफ खाँ हुसेन खाँ :** पैठण गेट येथील घरे रस्ता रुंदीकरणाच्या कामासाठी संपादित केली जाणार अशा आशयाचे वृत्त स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द झाल्यामुळे नागरिकांमध्ये याविषयी चर्चा सुरु झाली आहे. तेव्हा हे वृत्त कोणी प्रसिध्दीस दिले आणि प्रशासनातर्फे त्यावर काय खुलासा केला गेला. याची माहिती द्यावी.

**मा.सभापती :** स.सभासदांनी उपस्थित केलेल्या मुद्याविषयी सहा.संचालक नगररचना यांनी संबंधित नगरसेवक यांचेशी संपर्क साधून उचित कार्यवाही करावी. हया संबंधी वृत्तपत्रात त्वरीत खुलासा करावा. व पैठणगेट येथील घरे, रस्ता रुंदीकरणामध्ये तुटणार या मथळ्याखाली स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमीची योग्य अशी शहानिशा करणे व त्याबाबतचा खुलास वृत्तपत्रात प्रसिध्द करणे इ.कर्तव्यात कसूर केल्या बद्दल जनसंपर्क अधिकारी यांना मेमो देण्यात यावा.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** जुब्लीपार्क येथे चालू असलेले योग्य प्रकारे चालू आहे काय? याचा शहर अभियंता यांनी खुलास करावा. या बांधकामामुळेच मनपा निवासस्थानात राहणाऱ्या काही कर्मचाऱ्यांचा रस्ता बंद होत आहे.

**उपअभियंता (बांध.)** : ज्युब्लीपार्क येथे संरक्षित भिंत बांधण्याचे काम चालु आहे. त्या ठिकाणी राहात असलेल्या कर्मचाऱ्यांकडून २११ ते ३ फुट गल्ली ठेवण्याची मागणी झाली आहे.

**मा.सभापती :** ज्युब्लीपार्क येथे राहात असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांची सोय होईल अशा प्रकारे २११ ते ३ फुट गल्ली ठेवण्याबाबत शहर अभियंता यांनी सतर्क राहावे. तसेच शासनाकडून मिळालेल्या अनुदानातून अथवा मनपा खर्चातून चालु असलेल्या निविदा कामासाठी वापरण्यात येणारे साहित्य योग्य प्रकारे वापरले जात नसून अशी कामे निकृष्ट दर्जाची होत आहेत. असे निदर्शनास आले आहे. याबाबत संबंधित विभागाचे अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येऊन त्यांच्यावर कार्यवाही करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

**ठराव :**

ठराव क्र.६७१ ला खालीलप्रमाणे मंजूरी देण्यांत येते. सन १९८९-९० सालकरिता फिनेल खरेदी करिता दर पत्रके मागविली असता खालील कंपनीचे दर सर्वात कमी असून

त्यांच्याकडून खालील वस्तु अभिनव केमीकल यांचेकडून सिन्थेटिक फिनेल रु.१५.२० प्र.लिटर आणि सेंटेड फिनेल रु.२०/- प्र.लिटर खरेदी करणेस तसेच मनोज इंटरप्राईजेस यांचेकडून नोव्हान २०५/- रु.प्र.बॅग) प्रमाणे गॅमॅग्झीन पावडर रु.१०२,९५ (५० किलोची प्र.बॅग) प्रमाणे खरेदी करण्यास सर्वानुमते मंजूरी दिली जाते. सदरील खर्च सन १९९०-९१ सालच्या अंदाजपत्रकातील तरतूदीतून करण्यात यावा तसेच फिनेल ड्रम (६०) खरेदी करण्यात यावेत. अशी सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. या दुरुस्तीसह दिनांक ६ एप्रिल, १९९० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात (येते) आली.

**विषय क्र.७१५ :**

जलगृह अभियंता (१) यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र.३६ मधील मो.आजम कॉलनी येथे ८० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामाचे रक्कम रु.२८,११०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदरील काम जिल्हा नियोजन व विकास मंडळामार्फत मिळालेल्या अनुदानातून करावयाचे आहे.

मनपा/पापू/निविदा/३८५/९०, दि.१६.०२.९० अन्वये जाहिररित्या निविदा मागविल्या असता एकूण ५ निविदा विक्री झाल्या. व पुढीलप्रमाणे एकूण ४ निविदा प्राप्त झाल्या.

| | | |
|---|---|---|
| १. | खलील अहमद - अंदाजपत्रकीय दरापेक्षा | - २२.५% कमी दराने |
| २. | आर.एस.भाटीया - अंदाजपत्रकीय दरापेक्षा | - २०.४५%कमी दराने |
| ३. | ए.एम.फारुकी - अंदाजपत्रकीय दरापेक्षा | - १८% कमी दराने |
| ४. | अे.अे.अबेदी - अंदाजपत्रकीय दरापेक्षा | - २०.९९% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा कंत्राटदार श्री.खलील अहमद यांची असून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २२.५% कमी दराची आहे. मंजूरीस्तव सादर (सदरील कामात लेबर पेमेंट रु.११,३८६/-) इतके आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.३६ मधील मो.अजम कॉलनी येथे ८० मी.मी. व्यासाची अे.सी.जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.५% कमी दराचे कंत्राटदार, श्री.खलील अहमद यांचे दरपत्रकास तसेच लेबरपेमेंट रु.११,३८६/- चे खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७१६ :**

जलगृह अभियंता (१) यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र.२३ मधील कोतवालपुरा येथे सेंट्रल बस स्थानकाजवळील शहर बस थांब्यापासून ते आनंद निवास पर्यंत ८० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणेचे कामाचे रक्कम रुपये १६,१८९/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले. असून सदरील कामाचा खर्च जिल्हा नियोजन व विकास मंडळामार्फत मिळालेल्या अनुदानातून करावयाचा आहे. मनपा/पापु/निविदा/३८५/९०, दि.२६.०२.९० अन्वये जाहिररित्या निविदा मागविण्यांत आल्य असता एकूण तीन निविदा विक्री झाल्या व एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १. | आर.एस.भाटीया - अंदाजपत्रकीय दरापेक्षा | - ४.९९% जास्त दराने |
| २. | खलील अहमद - अंदाजपत्रकीय दरापेक्षा | - २२.५% कमी दराने |
| ३. | अबेदी अे.अे. - अंदाजपत्रकीय दरापेक्षा | - ०.०५% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा कंत्राटदार श्री.खलील अहमद यांची असून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २२.५% कमी दराची आहे. मंजूरीस्तव सादर. लेबर पेमेंट रु.५,५०४/- इतके आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.२३ मधील कोतवालपुरा येथे सेंट्रल बस स्थानकाजवळील शहर बस थांब्यापासून ते आनंद निवास पर्यंत ८० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणे बाबतचे कामसाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.५% कमी दराचे कंत्राटदार श्री.खलील अहमद यांचे दरपत्रकास तसेच लेबर पेमेंट रु.५,५०४/- चे खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र.७१७ :**

जलगृह अभियंता (१) यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र.५८ मधील विकास को-ऑपरेटीव्ह हाऊसिंग सोसायटी (टिळकनगर) येथे १०० मी.मी.व्यासाची अे.सी.जलवाहिनी टाकणेचे कामाचे रक्कम रु.६५,०२५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून सदरील कामावर लेबर पेमेंन्ट रुपये २८,५५४/- इतके असून सदरील काम जिल्हा नियोजन व विकास मंडळामार्फत मिळालेल्या अनुदानातून करावयाचा आहे.

मनपा/पापु/निविदा/३८५/९०, दि.१६.०२.९० अन्वये जाहिररित्या निविदा मागविली असता एकूण पांच निविदा विक्री झाल्या. व एकूण चार निविदा प्राप्त झाल्या त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १. | आर.एम.भाटीया - अंदाजपत्रकीय दरापेक्षा | - १९.२०% कमी दराने |
| २. | के.जी.गुणवानी - अंदाजपत्रकीय दरापेक्षा | - १५.८६% कमी दराने |
| ३. | अे.एम.फारुकी - अंदाजपत्रकीय दरापेक्षा | - २१.२०% कमी दराने |
| ४. | अे.अे.अबेदी - अंदाजपत्रकीय दरापेक्षा | - २०.९९% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा कंत्राटदार श्री.फारुकी अे.एम.यांची असून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २१.२०% कमी दराची आहे. मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.५८ मधील विकास को-ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी (टिळकनगर) येथे १०० मी.मी. व्यासाची अे.सी.जलवाहिनी टाकणेचे कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.२०% कमी दराचे कंत्राटदार श्री.अे.एम.फारुकी यांचे दरपत्रकास तसेच सदरील कामातील लेबर पेमेंट रुपये २८,५५४/- चे खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७१८ :**

जलगृह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र.३५ मधील मो.कैसर कॉलनी व समी कॉलनी येथे ८० मी.मी. व्यासाची अे.सी.जलवाहिनी टाकणेच्या कामाचे र.रु.४८,८५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदरील कामाला लेबर पेमेंट रु.१८,२४३/- इतके आहे. सदरील काम जिल्हा नियोजन व विकास मंडळामार्फत मिळालेल्या अनुदानातून करावयाचे आहे.

मनपा/पापु/निविदा/३८५/९०, दि.१६.०२.९० अन्वये जाहिररित्या निविदा मागविली असता एकूण सात निविदा विक्री झाल्या. व एकूण पाच निविदा प्राप्त झाल्या त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १. | आर.एस.भाटीया - अंदाजपत्रकीय दरापेक्षा | - २१.९५% कमी दराने |
| २. | के.जी.गुणवाणी - अंदाजपत्रकीय दरापेक्षा | - १७.१०% कमी दराने |
| ३. | खलील अहमद - अंदाजपत्रकीय दरापेक्षा | - १८.५% कमी दराने |
| ४. | अे.एम.फारुकी - अंदाजपत्रकीय दरापेक्षा | - १९% कमी दराने |
| ५. | अब्दुल कदरी शे.रहीम - अंदाजपत्रकीय दरापेक्षा | - १६% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा श्री.आर.एस.भाटीया यांची असून अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.९५% कमी दराची आहे. मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.३५ मो.कैसर कॉलनी व समी कॉलनी येथे ८० मी.मी. व्यासाची अे.सी.जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३१.९५% कमी दराचे कंत्राटदार श्री.आर.एस.भाटीया यांचे दरपत्रकास तसेच लेबरपेमेंट रु.४८,८५०/- चे खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७१९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, जवाहरलाल नेहरु (अंतर्गत) मध्यवर्ती बसस्थानकासमोर कोतवालपूरा येथील रस्त्याचे डांबरीकरण करणे बाबतच्या कामासाठी सन १९८९-९० च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डी.एस.आर.दराप्रमाणे अंदाजपत्रक रक्कम रु.४८,६८०/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च भांडवली रस्ते या सदराखाली करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जवाहरलाल नेहरु (अंतर्गत) मध्यवर्ती बसस्थानकासमोर कोतवालपूरा येथील रस्त्याचे डांबरीकरणाचे कामासाठी तयार करण्यात आलेले र.रु.४८,६८०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र.७२० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, उदय कॉलनी, कोतवालपूरा, पारधीपुरा भागातील रस्त्यावर २० मी.मी. जाडीचे मिक्स सरफेसींग करणे बाबतच्या कामासाठी सन १९८८-८९ च्या सा.बा.खात्याचे डी.एस.आर.दराप्रमाणे अंदाजपत्रक र.रु.२,२६,७४०/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च भांडवली रस्ते या सदराखाली करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे उदय कॉलनी, कोतवालपूरा, पारधीपुरा भागातील रस्त्यावर २० मी.मी. जाडीचे मिक्स सरफेसिंग करणे बाबतचे कामासाठी तयार करण्यांत आलेले र.रु.२,२६,७४०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७२१ :**

उप अभियंता (झोपडपट्टी सुधारणा) यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.चिकलठाणा वार्ड क्र.६० येथे कामगार कॉलनीच्या कडील बाजारच्या बाजूस संडासाची आवश्यकता आहे. लोकसंख्येच्या तुलनेत सध्या अस्तित्वात असलेले सार्वजनिक संडास कमी पडतात. करिता नवीन सार्वजनिक संडास बांधण्याचे अंदाजपत्रक र.रु.१,१२,०००/- चे तयार करण्यांत आलेले आहे. मंजूरीकरिता व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.चिकलठाणा वार्ड क्र.६० येथे कामगार कॉलनीच्या कडील बाजारच्या बाजुस सार्वजनिक संडास बांधणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेले र.रु.१,१२,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७२२ :**

उपअभियंता (झोपडपट्टी सुधारणा) यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.चिकलठाणा वार्ड क्र.६० येथे सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे डांबरीकरण व रुंदीकरण करण्याचे काम होत असल्यामुळे गावांतील सांडपाणी वाहुन रस्त्यावर येत आहे व त्यामुळे रस्ता खराब घेण्याची शक्यता आहे. त्यामुळे या विभागात नवीन गटार बांधणे आवश्यक आहे.

करिता अंदाजपत्रक र.रु.१,९५,०००/- चे तयार करण्यांत आलेले आहे. मंजूरीकरिता व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.चिकलठाणा वार्ड क्र.६० येथे नवीन गटार बांधणे बाबत तयार करण्यांत आलेले र.रु.१,९५,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७२३ :**

मा.शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, स्ट्रिट लाईट दुरुस्तीसाठी ४"x४० वॅट स्ट्रीट लाईट फिक्चर खरेदी करण्यासाठी निविदा मागविण्यांत आल्या होत्या. त्यात एकूण ४ निविदा प्राप्त झाल्या. त्या दि.२०.०३.९० रोजी उघडण्यांत आल्या असता त्यांचे दर खालीलप्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.चिंतामणी ट्रेडींग कंपनी | - | रु.५९०/- प्रति नग |
| २. | मे.आर.बी. इंटरप्राईजेस | - | रु.५९९/- प्रति नग |
| ३. | मे.मगारिया इन्टरप्राईजेस | - | रु.५९०/- प्रति नग |
| ४. | मे.क्रॅम्टन ग्रीव्हज कंपनी | - | रु.६४९/- प्रति नग |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी मे.चिंतामणी ट्रेडींग कंपनी व मे.पगारिया एन्टरप्राईजेस यांचे दर असून त्यांना दर कमी करणेसाठी बोलाविण्यांत आले असता मे.पगारिया एन्टरप्राईजेस यांचे दर असून त्यांना दर कमी करणेसाठी बोलाविण्यांत आले असता मे.पगारिया इन्टरप्राईजेस यांचे दर असून त्यांना दर कमी करणेसाठी बोलाविण्यांत आले असता मे.पगारिया एन्टरप्राईजेस यांचे दर जे ५९०/- प्रति नग आहेत. त्यात त्यांनी ४/- रु. कमी करुन दर रुपये ५८६/- प्रति नग व मे.चिंतामणी ट्रेडींग कंपनी यांनी दर कमी करणेस नकार दिला आहे. त्यामुळे पगारिया एन्टरप्राईजेस यांचे दर सर्वात कमी म्हणजे

५८६/- प्रति नग आहेत. तरी त्यानुसार एक हजार फिक्चरचे एकूण रु.५,८६,०००/- असे होतात. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स्ट्रीट लाईट दुरुस्तीसाठी ४"x४० वॅट स्ट्रीट लाईट फिक्चर खरेदी करण्यासाठी मे.पगारिया एन्टरप्राईजेस यांचेशी झालेल्या (चर्चेनुसार) वाटाघाटी नुसार रु.५८६/- प्रति नग या दराने तद्नुषंगीक एक हजार फिक्चर खरेदी करणेसाठी र.रु.५,८६,०००/- खर्च करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७२४ :**

कार क्र.एम.एच.-२०/२२२ च्या कुशनचे काम श्री.अजिज जहागिरदार (सभागृह नेते) मे.गफ्फार मोटर गॅरेज औरंगाबाद हयांचे कडून रु.६५००/- मध्ये करुन घेऊन हृया रकमेची अदाई करुन कॅश बिल सादर केले आहे. तसेच नाशिक मोटर गॅरेज, औरंगाबाद हयाचे कडून चेसिस/बेल्डींगचे दरवाजे इ.चे काम रु.१,२४५/- मध्ये करुन घेऊन हया बिलासोबत अदाई केली आहे. व हे दोन्ही बिले मिळून रु.७,७६५/- च्या रकमेची परतफेड व्हावी असे पत्र दिले आहे. तरीही झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता मिळावी तसेच रक्कम रु.७,७६५/- ची अदाई श्री.अजिज जहाँगिरदार, सभागृह नेता, महानगरपालिका, औरंगाबाद हयांना करण्यासाठी मंजूरी मिळावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कार क्र.एम.एच.-२०/२२२ च्या कुशनचे काम मे.गफ्फार मोटर गॅरेज, औरंगाबाद हयांचेकडून रु.६,५००/- मध्ये तसेच चेसिस/वेल्डींग दरवाजे इ.चे काम रु.१,२४५/- मध्ये श्री.अजिज जहाँगिरदार सभागृह नेता, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी करुन घेतले मुळे दोन्ही कामावर झालेला एकूण खर्च रुपये ७,७६५.०० ची अदाई श्री. अजिज जहाँगिरदार, सभागृह नेता महानगरपालिका, औरंगाबाद यांना करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७२५ :**

जिन्सी पाणी पुरवठा केंद्र येथे १०० के.ए.च्या ट्रान्सफार्मच्या विद्युत पुरवठ्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळातर्फे रुपये ५१,५२८/- चा भरणा करण्यासाठी कोटेशन आलेले आहे. स्थायी समितीच्या मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जिन्सी पाणी पुरवठा केंद्र येथे १०० के.व्ही.ए.च्या ट्रान्सफार्मच्या विद्युत पुरवठ्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळास कोटेशनसाठी रक्कम रु.५१,५२८/- चा भरणा करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७२६ :**

महानगरपालिका औरंगाबाद कर्मचाऱ्यांतर्फे दरवर्षी छत्रपती शिवाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती व गणेशोत्सव इत्यादी कार्यक्रम साजरे केले जातात. समिती स्थापन करुन कर्मचारी व अधिकारी स्वच्छेने वर्गणी गोळा करतात. या वर्षापासून "रमझान ईद" हा कार्यक्रम "ईद मिलन" करुन साजरा करणे आहे.

तरी सर्वधर्म समभाव हा दृष्टीकोन समोर ठेवून वरील चार कार्यक्रमांना मनपा कर्मचारी समितींना दरवर्षी प्रत्येक समितीस रु.५,०००/- (एकूण रुपये २०,०००/-) महानगरपालिकेतर्फे अनुदान म्हणून मंजूर करण्यांत यावे ही विनंती.

**सुचक :** श्री.इगबालसिंग गिल,
**अनुमोदक :** श्री.मोरेश्वर सावे
दिनांक :- १२.०४.९०

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका, औरंगाबाद कर्मचाऱ्यांतर्फे दर वर्षी साजऱ्या होणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती व गणेशोत्सव तसेच "रमझान ईद" अशा कार्यक्रमासाठी मनपा कर्मचारी समित्यांना प्रत्येक समितीस रु.५,०००/- (एकूण रु.२०,०००/-) महानगरपालिकेतर्फे अनुदान म्हणून मंजूर करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा.सभापती, यांनी जाहीर केले.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
मा.सभापती, स्थायी समिती
महानगरपालिका, औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक २१ एप्रिल, १९९० रोजी भरलेल्या स्थायी समिती सभेचा इतिवृत्तांत गुरुवार दिनांक २१ एप्रिल, १९९० रोजी दुपारी ३.२५ वाजता समिती सभागृहात मा.सभापती श्री.गंगाधर गाडे यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभेस सुरुवात झाली. या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह पुढील सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

१. श्री.अलफखान हुसेन खान
२. श्री.गील इकबालसिंग प्रितमसिंग
३. श्री.जैस्वाल प्रदिप शिवनारायण
४. श्री.नवपुते कचरु चंद्रभान
५. श्री.स.अ.इकबालेद्दीन स.मो.कुतुबुद्दीन
६. श्री.मिर्झा अन्वर बेग हमीद बेग

**विषय क्र.७२७ :**

दिनांक १२.०४.१९९० रोजी संपन्न झालेल्या गत स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री.प्रदिप जैस्वाल :** दि.१२.०४.९० च्या सभेत जकात पावती पुस्तक गहाळ प्रकरणी पंचनाम्यात ज्या कर्मचाऱ्यांच्या नावाचा उल्लेख करण्यात आला आहे. त्या कर्मचाऱ्यांस निलंबित करण्याबाबत काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा.

**मा.उपआयुक्त :** स.सभासद यांनी विचारलेल्या प्रश्नाला दि.१२.०४.९० च्या सभेत योग्य असे उत्तर देण्यात आले आहे. तरी पण कार्यालयाच्या अभिलेखाप्रमाणे गहाळ पावती पुस्तक प्रकरणी जो कर्मचारी जबाबदार आहे. त्या कर्मचाऱ्यांवर कार्यवाही करण्यांत आली आहे. व प्रकरण चौकशीसाठी पोलिस विभागाकडे सोपविण्यांत आले आहे. पोलिस विभागातर्फे होणाऱ्या चौकशी अंती या प्रकरणात जे जे कर्मचारी दोषी असल्याचे निष्पन्न होईल अशा कर्मचाऱ्यांवर अहवाल प्राप्ती नंतर कार्यवाही करण्यात येईल.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** १९८९ मध्ये गहाळ झालेल्या पावती पुस्तकातून ज्या पावत्या फाडल्या त्या पावत्या निदर्शनास आल्यानंतर जकात अधिक्षक यांनी पंचनामा केला आहे. हा पंचनामा करतांना या पंचनाम्यात ज्या कर्मचाऱ्यांच्या नावाचा समावेश करण्यात आला आहे. त्यांना निलंबित का केले नाही. याचा खुलासा व्हावा.

**जकात अधिक्षक :** गहाळ पावती पुस्तकातील निदर्शनास आल्यानंतर या बाबत संबंधित कंपनीकडे चौकशी केली असता त्यांनी पावती लिपीक श्री.साजेद यांच्याकडून मिळाली असल्याचे सांगितले. चौकशी मध्ये सदर कंपनीने वरीलप्रमाणे खुलासा केला असला तरी कार्यालयाचे अभिलेखानुसार गहाळ झालेले पावती पुस्तक श्री.शिरोडकर, लिपीक यांना हस्तांतर केल्याची नोंद आहे. म्हणून कार्यालयाने उक्त नमूद केल्याप्रमाणे वैधानिक कार्यवाही केली आहे.

**श्री.यादव अशोक सायन्ना** : गुन्हेगार कर्मचाऱ्यास शासन होणे आवश्यक (उचित) आहे. पोलिस तपासाचे काम दिर्घकाळ चालेल तेव्हा प्रथम संबंधित गुन्हेगार कर्मचाऱ्यांना निलंबित करण्याची कार्यवाही करण्यांत यावी.

**श्री.कचरु नवपुते** : पावती पुस्तक क्र.२२३६१० पावती क्र.१० मध्ये खाडाखोड करुन ओरिजिनल डुप्लीकेट करण्यात आले. असल्याबद्दल माहिती मिळाली आहे. याबाबत कार्यालयाने काय कार्यवाही केली याचा खुलासा व्हावा. तसेच जानेवारी ८७ ते मार्च ८७ या काळातील अफरातफरीची रक्कम रु.३३,०००/- आहे. यावरुन या काळात बरीच अफरातफर झाली असल्याचे स्पष्ट होते.

**श्री.प्रदिप जैस्वाल, श्री.यादव अशोक सायन्ना** : गहाळ झालेले "सी बुक" सध्या कोठे आहे?

**जकात अधिक्षक** : श्री.शिरोडकर यांनी दिलेल्या लेखी खुलाशात गहाळे झालेले "सी बुक संबंधितांकडेच असल्यामुळे त्याचा दुरुपयोग आजही कार्यरत असल्याची शक्यता टाळता येत नाही.

**श्री.प्रदिप जैस्वाल** : सभासदांच्या मागणीनुसार पावती पुस्तक गहाळ प्रकरणी श्री.शिरोडकर यांचे प्रमाणेच अन्य दोषी असलेल्या (ज्या कर्मचाऱ्यांच्या नावाचा उल्लेख पंचनाम्यात करण्यात आला आहे.) त्या कर्मचाऱ्यांना सुध्दा निलंबित करण्यात यावे.

**मा.सभापती** : जकात पावतीपुस्तक गहाळ प्रकरणांतर्गत जो पंचनामा करण्यात आले आहे. त्या पंचनाम्यात ज्या कर्मचाऱ्यांच्या नावाचा उल्लेख करण्यात आला आहे. अशा सर्व कर्मचाऱ्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम (५६) अन्वये ताबडतोब निलंबित करण्यांत यावे.

**श्री.यादव अशोक सायन्ना** : दि.१२.०४.९० च्या सभेत वार्ड क्र.१ मधील विद्युत पोल उभे करण्याबाबतच्या प्रकरणात काय कार्यवाही झाली. याच्या खुलाशाची मागणी केली होती. तेव्हा या प्रकरणी खुलासा व्हावा.

**निवासी उपअभियंता** : म.रा.वि.मंडळाने पोल उभारणेस मंजूरी दिली असून याबाबतचे कोटेशन प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार रक्कम भरुन पोल उभारण्याचे काम सुरु करण्यांत येईल.

**श्री.यादव अशोक सायन्ना** : वार्ड क्र.१ मध्ये आवश्यक ते पोल उभारण्यांबाबत गेल्या एक वर्षापासून सातत्याने मागणी येत आहे. पोल उभारण्याच्या कामी स्वत: जातीने लक्ष घालीन असे आश्वासन मा.सभापतींनी दिले आहे. परंतू आजच्या सभेत या प्रकरणात समाधानकारक कार्यवाही झाल्याचा खुलासा झालेला नाही.

**मा.सभापती** : स.सभागृह नेता व स.सदस्य श्री.अजिजुल्ला बेग यांचेकडील कर आकारणी विभागाचे करमूल्य निर्धारण अधिकारी श्री.शिंदे यांना निलंबित करण्याबाबतचे पत्र वाचून दाखविले (पत्र मा.सभापतींकडे आहे.)

याचवेळी वार्ड क्र.१३ चे स.सभासद श्री.मुजीब आलमशा खान यांनी सभागृहात प्रवेश करुन वार्ड क्र.१३ मधील मुजीब कॉलनी अंतर्गत जलनि:सारण वाहिनीचे दुषित पाणी पुरवठा पाईप लाईनमध्ये मिसळून दुषित पाण्याच्या या भागात झाल्यामुळे मुजीब कॉनली येथील किमान ४७ व्यक्ती (स्त्री, पुरुष, मुले, मुली) औषधोपचारासाठी रुग्णालयात दाखल झालेल्या आहेत. या प्रकरणी सातत्याने प्रयत्न करुनही उचित अशी कार्यवाही न झ ााल्यामुळे आज असा प्रसंग उद्भवत आहे. तेव्हा दुषित पाण्यामुळे मुजीब

कॉलनीतील नागरिकांचे आरोग्यास अपाय झाला तर स्थायी समिती व प्रशासनास जबाबदार धरण्यात येईल, असा खुलासा केला.

**श्री.इकबालसिंग गील, श्री.प्रदिप जैस्वाल, श्री.यादव अशोक सायन्ना, श्री.मिर्झा अन्वर बेग :** स.सभासदांच्या मागणीनुसार सदर प्रस्ताव आजच्या सभेत ऐनवेळेस ठेवण्यात येत असल्याचे निदर्शनास येत आहे. तेव्हा जनतेच्या आरोग्याची निगडीत असलेला प्रस्ताव सभागृहापुढे उशिरा का दाखल झाला. यासंबंधी अधिकाऱ्यांनी खुलासा करावा तसेच ज्या कमाचे अंदाजपत्रक तयार झाले आहे. अशा कामाचा प्रस्ताव अंदाजपत्रक तयार झाल्यापासून १५ दिवसाचे आंत स्थायी समितीसमोर ठेवण्यात यावा. असा सभागृहाने निर्णय घेतलेला असतांनाही या प्रस्तावाची अंमलबजावणी का झाली नाही. याचा खुलासा व्हावा. आणि मुजीब कॉलनी येथील ड्रेनेज लाईन दुरुस्तीच्या कामास मंजूरी देऊन सदर काम "ए-१" वर अग्रक्रमाने हाती घेण्यास मंजूरी देण्यांत यावी.

**मा.सभापती :** मा.आयुक्त यांनी मुजीब कॉलनी येथे ९ इंच व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे बाबतच्या र.रु.४६,०००/- च्या अंदाजपत्रकास दि.२०.१२.८९ ला मंजूरी देऊनाही संबंधित विभागाचे उपअभियंता श्री.कलीम अख्तर यांनी या संबंधीचा प्रस्ताव दि.२३.०३.९० रोजी स्थायी समितीकडे पाठविला दि.२६.०३.९० नंतर सदर प्रस्ताव स्थायी समिती समोर ठेवण्यासाठी दि.०३.०४.९० रोजी सभापती यांची सही झाल्याचे संचिकेवरुन दिसते. परंतू दिनांक ०३.०४.९० नंतर देखील सदर प्रस्ताव स्थायी समितीकडे न पाठवता १८ दिवसांनी हा प्रस्ताव स्थायी समितीसमोर ठेवलेला आहे. परिणामी या भागातील जनतेला बांधा झाल्या संबंधिची गंभीर तक्रार स.सभासद श्री.मुजीब आलमशा खान यांनी सभागृहात केली. व या भागातील नागरिक दवाखान्यात झाले असून त्यांचे जिवीतास धोका असल्याची भिती व्यक्त केली आहे. सर्व प्रकरणात संबंधित अधिकाऱ्यांनी आपल्या कर्तव्यात कसूर केल्याचे निष्पन्न होते. तेव्हा संबंधितांवर कडक कार्यवाही करण्याची सभागृहातर्फे मागणी करण्यात येते. तसेच कार्यकारी अभियंता (जलगृह, ज.नि.व स्लम) यांनी देखील दि.२६.०३.९० ला मंजूर झालेल्या प्रस्तावाचा पाठपुरावा न केल्यामुळे ते देखील दोषी असल्याचे दिसून येते. यावरुन त्यांच्यावरही कार्यवाही करावी व ते ज्या खात्यातून या कार्यालयात प्रतिनियुक्तीवर आहेत. त्या खात्यास याबाबत तक्रार नोंदवावी.

जनतेच्या जिव्हाळ्याचा प्रश्न लक्षात घेऊन प्रस्ताव क्र.१६ अंतर्गत वार्ड क्र.१३ मो.मुजीब कॉलनी येथे २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामासाठी र.रु.४६,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. सदर कामाची तातडी लक्षात घेता हे काम एन-१ करुन घेण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

स.सभासद श्री.मुजीब आलमशा खान यांची सूचना संयुक्तिक नसती तरी जनतेच्या जिव्हाळ्याच्या प्रश्न लक्षात घेता आजची सभा याच ठिकाणी तहकूब करण्यात येते.

सभेचे कामकाज तहकुब करण्यात आल्याचे मा.सभापतींनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | मा.सभापती, स्थायी समिती |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक २४ एप्रिल, १९९० रोजी भरलेल्या स्थायी समिती सभेचा इतिवृत्तांत दिनांक २१ एप्रिल, १९९० रोजी तहकुब करण्यांत आलेली स्थायी समितीची सभा मंगळवार दिनांक २४.०४.९० रोजी दुपारी ३.३५ वाजता समिती सभागृहात मा.सभापती श्री.गंगाधर गाडे यांचे अध्यक्षतेखाली सुरु झाली. या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह पुढील सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

१. श्री.अलफखान हुसेन खान
२. श्री.गील इकबालसिंग प्रितमसिंग
३. श्री.जैस्वाल प्रदिप शिवनारायण
४. श्री.नवपुते कचरु चंद्रभान
५. श्री.स.अ.इकबालेद्दीन स.मो.कुतुबुद्दीन
६. श्री.मिर्झा अन्वर बेग हमीद बेग

(विषय क्र.७२७/१ च्या संदर्भाने चर्चा पुढे चालू)

<u>संवाद :</u>

**श्री.प्रदिप जैस्वाल :** दि.२१.०४.९० च्या सभेस मागणी केल्याप्रमाणे जकात पावती पुस्तक गहाळ प्रकरणी दोषी असलेल्या कर्मचाऱ्यांना निलंबित केले काय? याबाबत खुलासा व्हावा. तसेच मुजीब कॉलनी येथील दुषित पाणी प्रकरणात कार्यकारी अभियंता, जलगृह, ज.नि.व स्लम आणि उप अभियंता (ज.नि.) यांच्यावर जो ठपका ठेवण्यात आला आहे. त्या बाबत दि.२१.०४.९० रोजी प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली असता या प्रकरणात संबंधित अधिकाऱ्यांचा काहीही दोष नाही. असे निदर्शनास आले आहे. तेव्हा कार्यकारी अभियंता (पा.पु.ज.नि.व स्लम) व उपअभियंता (ज.नि.) यांच्यावर ठेवण्यांत आलेला ठपका रद्द करण्यांत यावा. दि.२१.०४.९० रोजी मुजीब कॉलनी येथे प्रत्यक्ष स्थळ पाहणी करीत असतांना या कामात गुत्तेदरांचा दोष आहे. असे दिसले. व हे काम पुर्वीच झालेले आहे.

**कार्य.अभियंता ज.नि.जगृ.स्लम :** दि.२१.०४.९० च्या सभेत मुजीब कॉलनी येथील विभागाचा पदभार घेण्यापुर्वीच झालेले आहे. त्यामुळे या कामाची देखभाल माझ्याकडून झालेली नाही. सबब मुजीब कॉलनी येथील कामाशी माझा काहीही संबंध नाही.

**मा.सभापती :** कार्यकारी अभियंता (जलगृह, ज.नि. व स्लम) आणि उपअभियंता (ज.नि.) यांनी दि.२१.०४.९० रोजी मुजीब कॉलनी येथील कामाबाबत सभागृहात केलेला खुलासा आणि सदर कामाची केलेली प्रत्यक्ष पाहणी या दोन्ही बाबी लक्षात घेता दि.२१.०४.९० रोजी कार्यकारी अभियंता (जलगृह, ज.नि. व स्लम) आणि उप अभियंता (ज.नि.) यांच्यावर या कामाबाबत (करण्यात) ठेवण्यात आलेला ठपका रद्द करण्यांत येतो. त्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

**श्री.अलफखॉं हुसेन खॉं** : सभागृहात आताच सुचित केल्याप्रमाणे मुजीब कॉलनी येथील काम पुर्वीच म्हणजे निश्चित केव्हा झाले याचा खुलासा व्हावा.

**ज.नि.अभियंता :** मुजीब कॉलनी येथील काम दोन वर्षापूर्वी झालेले आहे.

**श्री.प्रदिप जैस्वाल** : शहरात चालू असलेल्या कामाची माहिती नगरसेवकांना असावी यादृष्टीने कार्यालयातर्फे चालू असलेल्या कामाची माहिती ज्या विभागात काम चालू आहे. त्या विभागाचे संबंधित नगरसेवक यांना देण्याची मागणी यापुर्वीच करण्यात आली होती. परंतू त्याबाबतची अंमलबजावणी अद्याप झालेली नाही. त्यामुळे नगर सेवकांना त्यांच्या वार्डात कोणकोणती कामे चालू आहेत. याची अधिकृत माहिती मिळत नाही.

**मा.सभापती :** कार्यालयातर्फे रेटलिस्टवर हाती घेण्यात येणाऱ्या कामाच्या सविस्तर माहितीची मागणी वारंवार करुनही आवश्यक ती माहिती अद्याप मिळालेली नाही. रेटलिस्टच्या कामात फार मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार चालू असल्याचा संशय स्थायी समितीला आहे. नियमानुसार शक्य तेवढ्या लवकर रेटलिस्टवरील व इतरही कामाची माहिती द्यावी.

**मा.उपआयुक्त** : सर्व विभाग प्रमुखांनी स.नगरसेवकांनी मागितलेली आवश्यक माहिती पुरविण्याची व्यवस्था त्वरीत करण्यांत येईल.

**श्री.अलफखॉं हुसेन खॉं** : विविध विशेष समित्यांच्या दुरध्वनीचे देयक मनपातर्फे अदा करण्यात यावे या विषयी दिनांक १२.०४.९० रोजी झालेल्या चर्चेत सर्वसाधारण सभेस शिफारस करण्यात येते. अशी वाढ करण्यात यावी.

**श्री.स.अ.एकबालोद्दीन :** सर्व नगरसेवकांना दुरध्वनीचे देयक द्यावे.

**श्री.मिर्झा अन्वर बेग** : विविध समित्यांच्या सभापतींच्या दुरध्वनीचे देयक मनपाने अदा करावयाचे नसेल तर सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता, स्थायी समिती सभापती, उपमहापौर, यांच्या दुरध्वनीचे देयकही मनपाने भरण्याची कायद्यात तरतूद नाही. तेव्हा या पदाधिकाऱ्यांच्या दुरध्वनीचे देयक सुध्दा भरण्यात येऊ नये.

**श्री.एकबालसिंग गील, श्री.स.अ.एकबालोद्दीन** : विविध समित्यांच्या सभापतींच्या दुरध्वनी देयक मनपाने अदा करण्यास आमचा विरोध आहे.

**मा.सभापती :** विविध विशेष समित्यांच्या सभापतींच्या दुरध्वनीचे देयक मनपातर्फे अदा करण्याबाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत विचारार्थ ठेवण्यात यावा.

**श्री.स.अ.एकबालोद्दीन :** वार्ड क्र.१८मधील कबाडीपुरा व जुनाबाजार येथे प्रत्येकी रु.९,०००/- पाण्याबाबत च्या दोन कामाचे टेंडर दीड वर्षापूर्वी मंजूर झालले आहे. परंतू अद्याप काम झालेले नाही. त्यामुळे वार्ड क्र.१८ मधील नागरी पाण्याचा त्रास सहन करावा लागत आहे. अशा परिस्थितीत एका विशिष्ट नागरिकांना पाणी मिळावे म्हणून वार्ड क्र.१८ मध्ये पाईप लाईनचे काम चालू आहे. तेव्हा जोपर्यंत १८ मधील सर्व नागरिकांना पाणी देण्याची व्यवस्था होत नाही. तोपर्यंत एका विशिष्ट नागरिकांला पाणी देण्याबाबत चालू असलेले काम थांबविण्यांत यावे.

**उपअभियंता :** जुनाबाजार व कबाडीपुरा येथे पाणी पुरवठ्याचे काम करणाऱ्या गुत्तेदारास या कामाबाबत नोटीस दिली आहे.

**श्री.एकबालसिंग गील, श्री.प्रदिप जैस्वाल :** मु.प्रा.मनपा अधिनियम चे कलम ५६ (अ) अन्वये कोणत्याही महानगरपालिका कर्मचाऱ्यास स्थायी समितीची पुर्व परवानगी न घेता निलंबित करता येत नाही. परंतू श्री.भरतकुमार जैस्वाल, तंत्र सहाय्यक

यांना प्रशासनाने दि.१७.०९.९० ला कामावरुन कमी केले आहे. तो आदेश कायद्याला अनुसरुन नाही. तरी श्री.भरतकुमार जैस्वाल यांना प्रशज्ञसनाने दिलेला आदेश रद्द करण्यात यावा. आणि त्यांना तात्काळ कामावर घेण्यात यावे.

**मा.उपआयुक्त :** श्री.भरतकुमार जैस्वाल यांना कामावरुन कमी करण्यात आल्याचे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

**मा.सभापती :** मा.उपआयुक्त यांनी केलेल्या खुलाशाप्रमाणे न्यायप्रविष्ट प्रकरणावर भाष्य करणे इस्ट होणार नाही.

**ठराव :**

दि.१२.०४.९० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७२८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, नंदनवन कॉलनी वार्ड क्र.२२ येथे ५० फुट बी.टी.रोड तयार करण्याच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दि.०६.०७.८९ रोजी ठराव क्र.९६ नुसार अंदाजपत्रक र.रु.३,०३,७००/- ला मंजूरी प्राप्त झालेली आहे.

सदर कामासाठी तिसऱ्यांदा निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.रे.कन्स्ट्रक्शन | - | ०.०१% जास्त |
| २. | श्री.पी.एम.चोरडीया | - | अंदाजपत्रकाप्रमाणे |
| ३. | श्री.एम.एस.जग्गी | - | ५.२५% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५.२५% कमी दराची श्री.एम.एस.जग्गी यांची निविदा आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नंदनवन कॉलनी वार्ड क्र.२२ येथे ५० फुट बी.टी.रोड तयार करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५.२५% कमी दराची श्री.एम.एस.जग्गी यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

तसेच रु.चार लाखापेक्षा जास्त किंमतीचे अंदाजपत्रक असलेल्या कामाची निविदा राज्य पातळीवरील वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यास सभागृहाने मंजूरी दिलेली आहे. या मंजूरीप्रमाणे शहर अभियंता यांनी यापुढे कार्यवाही करावी.

**विषय क्र.७२९ :**

जलगृह अभियंता (१) यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र.१ मधील पडेगांव येथे महाराष्ट्र शासनाच्या प्राप्त विशेष अनुदानातून १०० मी.मी. १५० मी.मी.२०० मी.मी. व २५० मी.मी. व्यासाची सी.आय.(लोखंडी) जलवाहिनी टाकणेच्या कामाचे र.रु.८,९८,५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून सर्वसाधारण सभेमध्ये ठराव क्र.५४ दि.२०.११.८९ अन्वये मान्यताही मिळालेली आहे. मनपा/पापु/निविदा/२४३/९०, दि.०३.०२.९० अन्वये जाहीर निविदा मागविल्या असता एकूण चार निविदा प्राप्त झाल्या. त्या पुढीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अे.एस.फारुकी | - | ०.५०% कमी |
| २. | परदेशी वासुदेव इंटरप्राईजेस | - | ८.२०% जास्त |
| ३. | कुलवंतसिंग | - | ०.०५% जास्त |
| ४. | पॉल कन्स्ट्रक्शन | - | ०.५% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५०% कमी दराची श्री.अे.एम.फारुकी यांची निविदा आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पडेगांव येथे १०० मी.मी.१५० मी.मी.२०० मी.मी.२५० मी.मी. व्यासाची सी.आय.(लोखंडी) जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५०% कमी दराची श्री.अे.एम.फारुकी यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र.७३० :**

जलगृह अभियंता (२) यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र.५९ मधील मुकूंदवाडी महाराष्ट्र शासनाच्या विशेष अनुदानातून १०० मी.मी. १५० मी.मी.२०० मी.मी.२५० मी.मी. व्यासाची सी.आय. (लोखंडी) जलवाहिनी टाकणेच्या कामाचे र.रु.१६,०८,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वसाधारण सभा ठराव क्र.५४ दि.२०.११.८९ अन्वये मान्यताही मिळाली आहे.

मनपा/पापु/निविदा/२४३/९०, दि.०३.०२.९० अन्वये जाहिर निविदा मागविल्या असता एकूण चार निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | परदेशी वासुदेव इंटरप्राईजेस | - | ५.२६% जास्त |
| २. | पॉल कन्स्ट्रक्शन | - | ०.५% जास्त |
| ३. | एम.एम.बेग | - | ०.०१% कमी |
| ४. | कुलवंतसिंग | - | १% जास्त |

पैकी सर्वात कमी दराची निविदा श्री.एम.एम.बेग यांची असून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराची आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.५९ मुकूंदवाडी येथे १०० मी.मी.१५० मी.मी. २०० मी.मी.२५० मी.मी. व्यासाची सी.आय.(लोखंडी) जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराची श्री.एम.एम.बेग यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७३१ :**

जलगृह अभियंता (२) यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र.६० मधील चिकलठाणा येथे महाराष्ट्र शासनाच्या विशेष अनुदानातून १०० मी.मी.१५० मी.मी.२०० मी.मी. ३०० मी.मी. ३५० मी.मी. व्यासाची सी.आय.(लोखंडी) जलवाहिनी टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रक र.रु.१७,४२,१००/- चे अंदाजपत्रकास मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्र.५४ दि.२०.११.८९ अन्वये मंजूरीही मिळालेली आहे.

मनपा/पापु/निविदा/२४३/९०, दि.०३.०२.९० अन्वये जाहिर निविदा मागविल्या असता एकूण चार निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | परदेशी वासुदेव इंटरप्राईजेस | - | ३.८७% जास्त |
| २. | पॉल कन्स्ट्रक्शन | - | ०.५% जास्त |
| ३. | एम.एम.बेग | - | २% जास्त |
| ४. | कुलवंतसिंग | - | ०.०५% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा श्री.कुलवंतसिंग यांची असून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराची आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चिकलठाणा वार्ड क्र.६० येथे १०० मी.मी.१५० मी.मी. २०० मी.मी. ३०० मी.मी. व ३५० मी.मी. व्यासाची सी.आय.(लोखंडी) जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराची श्री.कुलवंतसिंग यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७३२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयासमोर वाहतूक बेट तयार करणेच्या कामाचे अंदाजपत्रक र.रु.३१,५२०/- च्या खर्चास स्थायी सभा दि.२६.०२.९० ठराव क्र.४७८ अन्वये मंजूरी मिळालेली आहे. सदर कामासाठी निविदा मागविल्या असता चार दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.बी.एम.काथार | - | १०% जास्त |
| २. | श्री.कुलवंतसिंग | - | ७% जास्त |
| ३. | श्री.कैसरखान | - | ६% जास्त |
| ४. | श्री.अब्दुल सलाम | - | २.९०% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.९०% जास्त दराने श्री.अब्दुल सलाम यांची निविदा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयासमोर वाहतुक बेट तयार करणेच्या कामाकरिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.९०% जास्त दराची श्री.अब्दुल सलाम यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७३३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, चेलीपुरा चौक ते रोषनगेट पर्यंतच्या ५० फुट डी.पी.रोड तयार करण्याबाबतच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दि.२२.०१.९० रोजी ऐनवेळी ठराव क्र.४४८ अन्वये मंजूरी प्राप्त झालेली आहे. सदर कामासाठी निविदा मागविल्या असता एकूण सहा निविदा प्राप्त झाल्या त्या खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | आर.सी.बालचंदानी | - | ४.९०% कमी |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | एस.एच.असोशिएटस | - | १०.११% कमी |
| ३. | पॉल कन्स्ट्रक्शन | - | १२.७८६% कमी |
| ४. | आर.एल.बारवाल | - | ६.९१% कमी |
| ५. | बी.आर.आनंद | - | २.०२% कमी |
| ६. | एस.ए.नवाब | - | १७.५३% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.५३% कमी दराची श्री.एस.ए.नवाब यांची निविदा आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चेलीपुरा ते रोषनगेट पर्यंतच्या ५० फुट डी.पी.रोडचे काम करणेसाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.५३% कमी दराची श्री.एस.ए.नवाब यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७३४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, मिल कॉर्नर ते औरंगपुरा बलवंत वाचनालयापर्यंत ८० फुट डी.पी.रस्त्याचे रुंदीकरण करणे व कर्बीन पट करणे बाबतच्या कामासाठी स्थायी समिती ठराव क्र.३९१ दिनांक ०४.०१.९० रोजी मान्यता प्राप्त झालेली आहे. सदर कामासाठी निविदा मागविल्या असता एकूण चार दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.गुरुनानक इंडस्ट्रीज | - | १२% कमी |
| २. | श्री.पी.एम.चोरडीया | - | ७% कमी |
| ३. | श्री.रे.कन्स्ट्रक्शन | - | १३.१०% कमी |
| ४. | श्री.एम.एस.जग्गी | - | १३.२५% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३.२५% कमी दराची श्री.एम.एस.जग्गी यांची निविदा आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मिल कॉर्नर ते औरंगपुरा बलवंत वाचनालयापर्यंत ८० फुट डी.पी.रस्त्याचे रुंदीकरण करणे कर्बीन पट करणे बाबतच्या कामाकरिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३.२५% कमी दराची श्री.एम.एस.जग्गी यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. यापुढे कायदेशीर तरतूदीप्रमाणे विशेष समित्यांमध्ये प्रस्ताव ठेवण्यांत येतील. याची मा.सचिवांनी दक्षता घ्यावी.

**विषय क्र.७३५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, बन्सीलालनगर येथील रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन ८८-८९ चे सा.बा.खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.६८,२५४/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरचा खर्च "भांडवली रस्ते" या सदरातून करण्यात येईल, विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बन्सीलालनगर येथील रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी र.रु.६८,२५४/- च्या (खर्चास) अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७३६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद औद्योगिक वसाहत अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन ९०-९१ च्या सा.बा.खात्याच्या डी.एस.दराने र.रु.२,१८,२१२/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरचा खर्च "भांडवली रस्ते" या सदरातून करण्यांत येईल.विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद औद्योगिक वसाहत अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी र.रु.२,१८,२१२/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७३७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, चिकलठाणा एम.आय.डी.सी. एरिया मध्ये अस्तित्वात असलेल्या रोडचे पार्ट पोरशनचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन ९०-९१ चे सा.बा.खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.६,५४,७३९/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरचा खर्च "भांडवली रस्ते" या सदरातून करण्यात येईल.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चिकलठाणा एम.आय.डी.सी.एरियामध्ये अस्तित्वात असलेल्या रोडचे पार्ट पोरशनचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी र.रु.६,५४,७३९/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७३८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, क्रांतीचौक ते पैठणगेट रस्त्याचे नुतनीकरण करणेच्या कामासाठी सन ८९-९० चे सा.बा.खात्याचे डी.एस.आर.दराने रक्कम रु.७,१७,८९५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरचा खर्च "भांडवली रस्ते" या सदरातून करण्यांत येईल.

मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे क्रांती चौक ते पैठण गेट रस्त्याचे नुतनीकरण करणे कामासाठी र.रु.७,१७,८९५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७३९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, चिकलठाणा स्मशानभुमी जाणाऱ्या रस्त्यावरील नदीवर पुलाचे बांधकाम करणेच्या कामसाठी सन ८८-९९ चे सा.बा.खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.१,१७,८००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदरचा खर्च "भांडवली रस्ते" या सदरातून करण्यात येईल.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चिकलठाणा येथील स्मशानभुमी कडे जाणाऱ्या रस्त्यावरील पुलाचे बांधकाम करणेच्या कामासाठी र.रु.१,१७,८००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७४० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, दिल्लीगेट येथे स्टोअर बांधणेच्या कामासाठी सन ८९-९० चे सा.बा.खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.७७,८७१/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरचा खर्च "भांडवली रस्ते" या सदरातून करण्यात येईल. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिल्ली गेट येथे स्टोअर बांधण्याच्या कामासाठी र.रु.७७,८७१/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७४१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, जनकपुरी रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन ८९-९० चे सा.बा.खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.१०,५२१/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. तसेच सदरील काम तातडीने करुन घ्यावयाचे असल्याने उपलब्ध ठेकेदार श्री.डी.एस.जग्गी यांचेकडून अे-१ निविदेवर करुन घेणेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जनकपुरी येथील रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी र.रु.१०,५२१/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर कामाची तातडी लक्षात घेता उपलब्ध ठेकेदार श्री.डी.एस.जग्गी यांचेकडून ए-१ निविदेवर करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७४२ :**

वार्ड क्र.१३ मो.मुजीब कॉलनी २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र.रु.४६,५००/- चे तयार करण्यात आले आहे. सदर ठिकाणी १५० मी.मी.व्यासाची लाईन आहे. व सदर लाईनवरुन वाहणाऱ्या सांडपाण्यामुळे मातीने दबल्या गेल्यामुळे सदर लाईन वारंवार चोकअप होते. व तेथील नागरिकांना दुर्गंधीमुळे व घाणीचा त्रास सहन करावा लागतो. करिता सदर ठिकाणी २५० मी.मी.व्यासाची लाईन टाकणे जरुर आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर तसेच सदर काम ए-१ वर करुन घेणेस्तव सादर.

**ठराव :**

दि.२१.०४.१९९० च्या सभेत सदर प्रस्तावास रितसर मंजूरी दिलेली आहे.

**विषय क्र.७४३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, औरंगपुरा ते समर्थनगर हया ८० फुट डी.पी.रोडव्रील भूषण कॉम्पलेक्सच्या बाजुस असलेल्या स्लॅब कल्बर्टची रुंदी वाढविणे बाबतच्या कामासाठी सन ८९-९० चे सा.बा.खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.१,६९,४८०/- चे

अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च शझसनाकडून मिळणाऱ्या अनुदान या या सदराखाली करण्यात येईल. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगपुरा ते समर्थ हया ८० फुट डी.पी.रोडवरील भुषण कॉम्लेक्सच्या बाजुस असलेल्या स्लॅब कल्वर्टची रुंदी वाढविणेच्या कामासाठी र.रु.१,६९,४८०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७४४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, बेगमपुरा स्मशानभुमी कंपाऊंड वॉल बांधणे बाबतच्या कामासाठी सन ८९-९० च्या सा.बा.खात्याचे डी.एस.आर.दराने अंदाजपत्रक र.रु.४,३७,६२०/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च "भांडवली इमारती" या सदराखाली करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बेगमपुरा स्मशानभुमी येथे कंपाऊंड वॉल बांधण्याच्या कामासाठी र.रु.४,३७,६२०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७४५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र.५४ मधील सिल्कमिल कॉलनी येथील अंतर्गत रोडचे डांबरीकरण कामासाठी सन ८९-९० चे सा.बा.खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.२,११,४५५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरचा खर्च "भांडवली रस्ते" या सदरातून करण्यात येईल. वचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिल्कमिल कॉलनी येथील अंतर्गत रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी र.रु.२,११,४५५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७४६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र.५५ रेल्वेस्टेशन येथील महानगरपालिका विश्राम गृहाचे आवारातील रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन ८८-८९ चे सा.बा.खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.२९,८६५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरचा खर्च "भांडवली रस्ते" या सदरातून करण्यात येईल.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रेल्वेस्टेशन येथील मनपा विश्राम गृहाचे आवारातील रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी र.रु.२९,८६५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७४७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र.५७ एकनाथ नगर, मिलींद नगर येथील अंतर्गत रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन ८८-८९ चे सा.बा.खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.४,०४,२३०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरचा खर्च "भांडवली रस्ते" या सदरातून करण्यात येईल.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एकनाथ नगर, मिलींद नगर येथील अंतर्गत रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी र.रु.४,०४,२३०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७४८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र.२ मसनतपूर येथील प्राथमिक शाळेच्या मोकळ्या जागेस संरक्षित भिंत व पाण्याच्या हौद बांधणेच्या कामासाठी सन ८९-९० चे सा.बा.खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.१,८२,१५४/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरचा खर्च "भांडवली इमारती" या सदरातून करण्यात येईल. वचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मसनतपूर येथील प्राथमिक शाळेच्या मोकळ्या जागेस संरक्षित भिंत बांधणे व पाण्याच्या हौद बांधणेच्या कामासाठी र.रु.१,८२,१५४/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७४९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र.५५ रेल्वेस्टेशन हमालवाडा येथील रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन ८८-८९ चे सा.बा.खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.१,५८,९००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरचा खर्च "भांडवली रस्ते" या सदरातून करण्यात येईल.

प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रेल्वेस्टेशन हमालवाडा येथील रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी र.रु.१,५८,९००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७५० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र.६ दिल्ली गेट शासकीय गाड्या दुरुस्ती करणेसाठी गॅरेजचे बांधकाम करणेच्या कामासाठी सन ८९-९० चे सा.बा.खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.७०,०५७/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरचा खर्च "भांडवली इमारती" या सदरातून करण्यात येईल.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिल्ली गेट येथे शासकीय गाड्या दुरुस्त करणेसाठी गॅरेजचे बांधकाम करणेच्या कामासाठी र.रु.७०,०५७/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७५१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र.५५ रेल्वेस्टेशन पासून डेक्कन फ्लोअर मिलच्या पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन ८८-८९ चे सा.बा.खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.२,१५,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरचा खर्च "भांडवली रस्ते" या सदरातून करण्यात येईल.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रेल्वे स्टेशन पासून डेक्कन फ्लोअर मिल पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणेसाठी र.रु.२,१५,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७५२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, वार्ड क्र.४५ मध्ये रस्त्यावर विद्युत दिवे लावण्याकरिता ३x७ मिटर आकाराचे नवीन जी.आय.पोल (खांब) लावण्याच्या कामाकरिता र.रु.१५,८७५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.४५ मध्ये रस्त्यावर विद्युत दिवे लावण्याकरिता ३x७ मीटर आकाराचे नवीन जी.आय.पोल लावण्याकरिता र.रु.१५,८७५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७५३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, कोतवालपूरा येथील सी.टी.एस.नं.२९३० (भाग) येथील मंजूर रेखांकनातील खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी सन ८९-९० चे सा.बा.खात्याच्या डी.एस.आर.दराने र.रु.१,३५,४३०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर खर्च "गार्डन ॲण्ड प्ले ग्राऊंड" या सदराखाली करण्यांत येईल.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कोतवालपूरा येथील सी.टी.एस.नं.२९३० (भाग) येथील मंजूर रेखांकनातील खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी र.रु.१,३५,४३०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७५४ :**

वार्ड क्र.३८ मो.भवानी नगर येथे विविध गल्ल्यामधील माती/घाण कचरा उचलणे बाबत र.रु.२४,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर ठिकाणी म्हणजे ड्रेनेज लाईनवर माती व कचरा जमा झालेला आहे. त्यामुळे तेथील ड्रेनेज लाईन चोकअप होऊन मोहल्ल्यात दुर्गंधी सुटते व नागरिकांना त्रास सहन करावा लागतो. करिता सदर मोहल्ल्यातील नागरिकांच्या अडचणी लक्षात घेता सदर ठिकाणची माती उचलणे जरुर आहे. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.३८ मो.भवानीनगर येथे विविध गल्ल्यामधील माती/घाण/कचरा उचलणे बाबत र.रु.२४,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. सदर काम तातडीने असल्यामुळे नियमाप्रमाणे "ए-१" वर करुन घेण्यात यावे.

**विषय क्र.७५५ :**

वार्ड क्र.५७ मो.महावीर नगर येथे २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे बाबत र.रु.२६,६९०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

सदर ठिकाणी ६" व्यासाची चिनी मातीची जुनी लाईन असून सदर लाईनवर सध्या स्थितीत जास्त लोड वाढल्यामुळे सदर लाईन वारंवार चोकअप होते. करिता सदर ठिकाणच्या नागरिकांच्या अडचणी व आरोग्याच्या दृष्टीकोनाचा विचार करता सदर ठिकाणी २५० मी.मी.व्यासाची लाईन टाकणे जरुरीचे आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.५७ मो.महावीर नगर येथे २५० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे बाबतचे र.रु.२६,६९०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. सदर काम तातडीचे असल्यामुळे नियमाप्रमाणे ए-१ वर करुन घेण्यात यावे.

**विषय क्र.७५६ :**

वार्ड क्र.५७ मो.सम्राटनगर येथे १५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र.रुपये ६७,५०९/- चे तयार करण्यात आलेले आहे. सदर ठिकाणी अद्यापही ड्रेनेज लाईन टाकण्यांत आलेली नाही. करिता सदर मोहल्ल्यातील नागरिकांच्या अडचणी लक्षात घेता सदर ठिकाणी लाईन टाकणे आवश्यक आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.५७ मो.सम्राटनगर येथे १५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे बाबत र.रु.६७,५०९/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. सदर काम तातडीचे असल्यामुळे नियमाप्रमाणे "ए-१" वर करुन घेण्यात येते.

**विषय क्र.७५७ :**

वार्ड क्र.३५ झोन क्र.३ मध्ये गटारीवर आर.सी.सी.ढापे टाकणे करिता अंदाजपत्रक रक्कम रु.१९,०००/- चे तयार करण्यात आलेले आहे. सदर ठिकाणी रोडच्या लगत असलेल्या गटारी उघड्या आहेत. त्यामुळे तेथील रहदारीला अडथळा दूर व्हावा व गटारीवर ढापे व स्लॅब नसल्यामुळे गटारीत कोणीही पडू नये याकरिता गटारीवर ढापे टाकणे आवश्यक आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.३५ मध्ये झोन क्र.३ मध्ये गटारीवर आर.सी.सी.ढापे टाकणे बाबतचे र.रु.१९,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. सदर काम तातडीचे असल्यामुळे नियमाप्रमाणे ए-१ वर करुन घेण्यात यावे.

**विषय क्र.७५८ :**

मो.स्टेट बँक कॉलनी वार्ड क्र.५७ ज्योती नगर येथील ड्रेनेज लाईन अप्रुटींग करुन १५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी. पाईप लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र.रु.३६,७८७/- चे तयार करण्यात आली आहे. सदर ठिकाणची पाईप लाईन १५० मी.मी.व्यासाची असून गाळ व मातीने पूर्णपणे भरलेली असून पाणी रस्त्यावरुन वाहात असल्यामुळे तेथील रहिवाशांना त्रास सहन करावा लागतो. तसेच ड्रेनेज लाईन जास्त खोलवर नसल्यामुळे वारंवार तुटत असते. करिता सदर ठिकाणी ची ड्रेनेज लाईन काढून नवीन १५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी. लाईन टाकणे जरुरीचे आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.स्टेट बँक कॉलनी वार्ड क्र.५७ ज्योतीनगर येथील ड्रेनेज लाईन अपरुटींग करणे १५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी. पाईप लाईन टाकणे बाबत र.रु.३६,७८७/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. सदर काम तातडीचे असल्यामुळे नियमाप्रमाणे ए-१ वर करुन घेण्यांत आले.

**विषय क्र.७५९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, महापौर निवासस्थानाच्या आवारात विटांची करबींग बांधणेच्या कामासाठी सन ९०-९१ चे सा.बा.खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.१५,२५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदरचा खर्च "नवीन उद्यान" या सदरातून करण्यात येईल.

प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महापौर निवासस्थानाच्या आवारात विटांची कार्बीन बांधणेच्या कामासाठी र.रु.१५,२५०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७६० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मुकूंदवाडी येथील प्राथमिक शाळेस संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी सन ८९-९० च्या सा.बा.खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.१,४०,९००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदरचा खर्च "भांडवली इमारती" या सदरातून करण्यात येईल. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.५९ मुकूंदवाडी येथील मनपा प्राथमिक शाळेस संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी र.रु.१,४०,९००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७६१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.रेल्वेस्टेशन येथील सुयूफोद्दीन मगरबी कॉलनी अंतर्गत खडी रस्ता तयार करणेच्या कामासाठी सन ८९-९० च्या सा.बा.खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.१,६९,७९६/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदरचा खर्च "भांडवली रस्ते" या सदरातून करण्यात येईल. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.रेल्वेस्टेशन येथील युसूफोद्दीन मगरबी कॉलनी अंतर्गत खडी रस्ता तयार करण्याच्या कामासाठी र.रु.१,६९,७९६/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७६२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, पदमपूरा येथील अंतर्गत रोडचे खडीकरण करणेच्या कामासाठी सन ८९-९० चे सा.बा.खात्याचे डी.एस.आर.दराने

र.रु.३२,२८८/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदरचा खर्च "भांडवली रस्ते" या सदरातून करण्यात येईल.

प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.पदमपूरा येथील अंतर्गत रोडचे खडीकरण करणेच्या कामासाठी र.रु.३२,२८८/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७६३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, पिरबाजार भाजी मंडी येथे ओटे व रोड बांधणेच्या कामासाठी सन ८८-८९ चे सा.बा.खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.१,६०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदरचा खर्च "भांडवली रस्ते" या सदरातून करण्यात येईल. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पिरबाजार भाजी मंडी येथे ओटे व शेड बांधणेच्या कामासाठी र.रु.१,६०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७६४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, बनेवाडी येथील पंप हाऊसला संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी सन ८९-९० चे सा.बा.खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.१,८८,२९०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदरचा खर्च "भांडवली इमारती" या सदरातून करण्यात येईल. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बनेवाडी येथील पंप हाऊसला संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी र.रु.१,८८,२९०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७६५ :**

वार्ड क्र.१३ मो.हस्तेसिंगपुरा येथे १५० मी.मी.व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र.रु.८९,९३०/- चे तयार करण्यांत आलेले आहे.

सदर ठिकाणी अद्यापही ड्रेनेज लाईन टाकण्यांत आलेली नाही. करिता सदर मोहल्ल्यातील नागरिकांच्या अडचणी लक्षात घेता सदर ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे आवश्यक आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.१३ हत्तेसिंगपुरा येथे १५० मी.मी.व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणे बाबत तयार करण्यात आलेले रक्कम रु.८९,९३०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७६६ :**

शहर अभियंता याांी प्रस्ताव सादर केला की, विविध विभागाकरिता १० नग एअर कुलर खरेदीसाठी अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विद्युत दर सुची सन १९८९-९० नसुार तयार करण्यांत आले असून ते एकूण र.रु.३१,३५०/- चे आहे.

प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विविध विभागाकरिता १० नग एअर कुलर खरेदी करणेसाठी तयार करण्यांत आलेले र.रु.३१,३५०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७६७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, टाऊन हॉल परिसरात नवीन बांधण्यांत आलेले शेडमध्ये विद्युत वायरिंगचे कामाकरिता अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विद्युत दर सुची सन १९८९-९० नुसार तयार करण्यांत आलेले असून ते एकूण र.रु.२१,२३५/- चे आहे.

प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे टाऊन हॉल परिसरात नवीन बांधण्यांत आलेले शेडमध्ये विद्युत वायरिंगचे कामकरिता तयार करण्यात आलेले र.रु.२१,२३५/- अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७६८ :**

जलगृह अभियंता-१ यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र.१८ मधील जुनाबाजार येथे ८० मी.मी.व्यासाची अे.सी.जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी र.रु.९,०००/- चे अंदाजपत्रकास ठराव क्र.२५९/दि.१७.०८.८८ अन्वये मान्यता मिळालेली आहे. मनपा/पापु/७००/८८ दि.२३.०८.८८ अन्वये जारि निविदा मागविल्या असता एकही निविदा विक्री झाली नाही.

त्यानंतर मा.आयुक्तांच्या दि.३०.११.८८ रोजीच्या आदेशास अनुसरुन सदरील कामासाठी अ-१ नमुन्यावर तीन कोटेशन प्राप्त केली. ती पुढीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सिद्दीकी झेड अे | - | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | मॅकवेल कॅन्ट्रक्टर | - | ४% जास्त दराने |
| ३. | जावेद खान | - | २% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे कोटेशन कंत्राटदार श्री.सिद्दीकी झेड.अे. यांचे अंदाजपत्रकीय दराचे असून मा.आयुक्तांच्या २२/२ च्या आदेशास अनुसुरुन सिद्दीकी झेड अे. यांना कार्यादेश देण्यात आला आहे.

तरी सदरील प्रकरणी झेड.अे. सिद्दीकी यांचे अंदाजपत्रकीय दराचे दरपत्रकास मंजूरी मिळणे व कार्योत्तर मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.१८ मधील जुना बाजार येथे ८० मी.मी.व्यासाची अे.सी.जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराचे कंत्राटदार श्री.झेड अे.सिद्दीकी यांचे दरपत्रकास सर्वानुमते कार्योत्तर मान्यता देण्यात येते.

**विषय क्र.७६९ :**

शहरातील विहीरींच्या गाळकशी व दिवाट रिंगच्या कामासाठी ५ नग किर्लोस्कर कंपनीचे ५ एच.पी.चे डिझेल इंजिन्स, सेल्फ प्रायमिंग पंप होज पाईप, फुट व्हॅल्व इ. ॲक्सेसरीजसह त्वरीत विकत घेणे जरुरीचे आहे. त्यासाठी औरंगाबाद येथील किर्लोस्कर

कंपनीचे अधिकृत विक्रेते मे.हैद्राबाद मशिनरी कंपनी हयाचे कडून दरपत्रक आले असून एक सेट साठी रु.१४,५००/- असे ५ सेटसाठी रु.७२,५००/- एवढा खर्च येईल.

टेंडर्स बोलावल्यास बराच वेळ लागेल. तेव्हा कंपनीच्या अधिकृत विक्रत्याकडूनच ५ नग सेट रु.७२,५००/- चे खरेदी करण्यासाठी मंजूरी मिळावी म्हणजे डिवाटरिंगचे काम त्वरीत करता येईल. सदरील खर्च कॅपीटल वाटरवर्क्स हया सदरातून करावा लागेल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरातील विहिरींच्या गाळकशी व दिवाटरिंग च्या कामासाठी ५ नग किर्लोस्कर कंपनीचे ५ एच.पी.चे डिझेल इंजिन्स सेल्फ प्रायसिंग पंप, होज पाईप, फुटव्हॉल्व इत्यादी ॲक्सेसरीसह मे.हैद्राबाद मशिनरी कंपनी, औरंगाबाद हयांचे कडून प्रती सेट रक्कम रुपये १४,५००/- या दराने खरेदी करण्यास तसेच रक्कम रु.७२,५००/- एवढा खर्च कॅपीटल वाटर वर्क्स हया सदरातून करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७७० :**

भंडारी वेळ उस्मानपुरा हया विहीरीवर वॉटर टँकर भरण्याची सोय करण्यासाठी ५ एच.पी. चे डिपवेळ सबमरसी बल पंप हॉरीझेन्टल टाईपचे बसविण्याचे काम त्वरीत करावयाचे असून त्यासाठी बजाज कंपनीचे पंपाचे अधिकृत विक्रेते मे.संदिप सेल्स कॉर्पोरेशन औरंगाबाद हयाचे दरपत्रक मोटर पंप, पाईप व इतर ॲक्सेसरीज, पॅनल बोर्डसह रु.१६,३८५/- चे आले आहे. दरपत्रक टेंडर्स मागविल्यास बराच वेळ लागेल. पाण्याचा प्रश्न असल्यामुळे व टँकर भरावयाची सोय त्वरीत करावयाची असल्यामुळे अधिकृत विक्रेत्याकडून पंपाचे काम इरेक्शन व सर्व ॲक्सेसरीज व पॅनल बोर्डसह रु.१६,३८५/- हया रकमेत करुन घेण्यासाठी मंजूरी मिळावी. सदरील खर्च कॅपीटल वाटर वर्क्स हया सदरातून करावा लागेल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भंडारी वेळ उस्मानपुरा हया विहीरीवर वॉटर टँकर भरण्याची सोय करण्यासाठी ५ एच.पी.चे डीपवेल सबमरसी बल पंप, हॉरीझेन्टल टाईपचे बसविण्याचे कामासाठी मे.संदिप सेल्स कॉर्पोरेशन औरंगाबाद यांचे मोटर पंप, पाईप व इतर ॲक्सेसरीज पॅनल बोर्डसह र.रु.१६,३८५/- चे दरपत्रकास तसेच सदरील खर्च कॅपीटल वॉटरवर्क्स हया सदरातून करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७७१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, स्थायी समिती दि.१७.०८.८८ ठराव क्र.२७० अन्वये सुपर मार्केट, औरंगपुरा इमारतीचे सुधारित अंदाजपत्रक रक्कम रु.७४,१५,४२०/- ची मंजूरी (अतिरिक्त बाबींसह) मिळाली होती. यामध्ये पायाचे खोदकाम करतांना पाणी उपसण्याची अतिरिक्त बाब समाविष्ट केलेली नव्हती. कारण आतापर्यंत या अतिरिक्त बाबींच्या गुत्तेदाराबरोबर पत्रव्यवहार घेऊन त्यांनी कार्यालयाने ठरविल्याप्रमाणे अतिरिक्त बाबींच्या दरात आता सम्मती दिली आहे.

ज्यामुळे रक्कम रु.७३,०००/- चे सुधारित अंदाजपत्रकात वाढ होत आहे. त्यामुळे सुधारित अंदाजपत्रकाची रक्कम रु.७४,८८,४२०/- होत आहे. या रकमेस मंजूरी मिळणेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात निर्दिष्ट केल्याप्रमाणे सुपर मार्केट, औरंगपुरा येथील इमारतीसाठी पायाचे खोदकामातील पाणी उपसण्याची अतिरिक्त बाब समाविष्ट करुन वाढ झालेल्या र.रु.७३,०००/- च्या वाढीमुळे तयार करण्यात आलेल्या र.रु.७४,८८,४२०/- च्या सुधारित अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७७२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, वार्ड क्र.४० फकीरवाडी (चुनाभुट्टी) जवळ पुलाची उंची वाढवून बांधकाम करणे बाबतच्या कामासाठी सन ८८-८९ च्या सा.बा.खात्याचे डी.एस.आर.दराने अंदाजपत्रक र.रु.३,००,०००/- चे तयार करण्यात आले असून सदरचा खर्च "भांडवली रस्ते" या सदराखाली करण्यात येईल.

प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.४० फकीरवाडी (चुनाभट्टी) जवळ पुलाची उंची वाढवून बांधकाम करणेच्या बाबतच्या कामासाठी तयार करण्यांत आलेले र.रु.३,००,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७७३ :**

सन १९८९-९० च्या अर्थसंकल्पात नगरसेवक "स्वेच्छा निधी" या लेखा शिर्षाखाली प्रत्येक नगरसेवकांसाठी रु.२५,०००/- ची तरतूद ठेवण्यात आलेली होती. परंतू संबंधित नगरसेवक तो निधी दिनांक ३१.०३.९० पर्यंत खर्च करु शकले नाहीत. तथापि संबंधितांच्या खाती असलेल्या वरील लेखा शिर्षाची रक्कम त्यांना सन १९९०-९१ च्या मध्ये खर्च करण्याची अनुमती असावी असे मत प्रदर्शित केले.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम १०२ मधील तरतूदीनुसार स्थायी समिती एखाद्या वर्षी खर्च न झालेला निधी पुढील वर्षी खर्च करण्याची मान्यता देऊ शकते. तेव्हा सन १९८९-९० वर्षाच्या अखेरीस शिल्लक राहिलेली स्वेच्छा निधीची रक्कम सन १९९०-९१ मध्ये खर्च करण्यासाठी अनुमती देण्याचा प्रस्ताव मंजूरीसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९८९-९० च्या अर्थसंकल्पात नगरसेवक "स्वेच्छा निधी" या लेखा शिर्षाखाली प्रत्येक नगरसेवकांसाठी ठेवण्यात आलेला रक्कम रुपये २५,०००/- चा निधी संबंधित नगरसेवक दिनांक ३१.०३.९० पर्यंत खर्च करु न शकल्यामुळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम १०२ मधील तरतूदीनुसार सन १९८९-९० वर्षाच्या अखेरीस शिल्लक राहिलेली स्वेच्छा निधीची रक्कम सन १९९०-९१ हया वर्षात खर्च करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७७४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, "गांधी भवन" शहागंज ते निजामोद्दीन दर्गा रोडवर विद्युत खांब रोवून व भुमीगत वायरींग करुन त्यावर २५० वॅट सोडीयम व्हेपर फिटींग बसविणे बाबतच्या अंदाजपत्रक र.रु.२,२८,४१९/- ला विषय क्र.५४५/८९, दि.२२.०१.९० द्वारे स्थायी समितीच्या बैठकीत मंजूरी मिळालेली आहे.

सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.मनपा/लाईट/२७७/९० दि.०९.०३.९० द्वारे बी-१ निविदा मागविल्या असता एकूण तीन निविदा विकण्यात आलेल्या होत्या. सदर तीनही निविदा प्राप्त झाल्या. त्या दि.२०.०३.९० रोजी सदर निविदा उघडण्यात आल्या. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.लुना इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद | - | १५% जास्त |
| २. | मे.अदित्य इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद | - | १५.२५% जास्त |
| ३. | मे.इगल इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद | - | १७.५% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या मे.लुना इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद यांची निविदा सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% जास्त आहे.

वरील कामाचे अंदाजपत्रक जुन्या सा.बा.खात्याचे डी.एस.आर.सन १९८८-८९ नुसार आहे. त्याची तुलना नवीन डी.एस.आर. सन (१९८९-९०) करण्यात आली असता मे.लुना इलेक्ट्रीकल्स यांचे दर १.८% जास्त आहे.

तरी मे.लुना इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद यांच्या कडून वरील काम अंदाजपत्रक दरापेक्षा १५% जास्त दराने करण्यास व एकूण रु.२,३८,७८६/- ला मंजूरी द्यावी.

प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गांधी भवन (शहागंज) ते निजामोद्दीन दर्गा रोडव्र विद्युत खांब रोवून व भुमिगत वायरिंग करुन त्यावर २५०वॅट सोडीयम व्हेपर फिटींग बसविणे बाबतचे कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% जास्त दराचे गुत्तेदार मे.लुना इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद यांचे दर पत्रकास तसेच रु.२,३८,७८६/- चे खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
मा.सभापती, स्थायी समिती
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक ३०.०४.१९९० रोजी भरलेल्या स्थायी समिती सभेचा इतिवृत्तांत.**

**सोमवार दिनांक ३०.०४.१९९० रोजी दुपारी ३.४५ वाजता समिती सभागृहात मा.सभापती श्री.गंगाधर गाडे यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभेस सुरुवात झाली. सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह पुढील सभासद उपस्थित होते.**

१. श्री.अलफखान हुसेन खान
२. श्री.गील इकबालसिंग प्रितमसिंग
३. श्री.घडामोडे मोतीराम नारायण
४. श्री.जैस्वाल प्रदिप शिवनारायण
५. श्री.नवपुते कचरु चंद्रभान
६. श्री.स.अ.इकबालेद्दीन स.मो.कुतुबुद्दीन
७. श्री.यादव अशोक सायन्ना
८. श्री.मिर्झा अन्वरबेग हमीद बेग
९. श्री.मगर शंकर जिजाराम
१०. पंडागळे रतनकुमार नारायणराव

**विषय क्र.७७५ :**

दिनांक २१.०४.९० आणि २१.०४.९० रोजी तहकुब झालेल्या पुनरायोजीत दि.२४.०४.९० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री.प्रदिप जैस्वाल :** जकात पावती गहाळ प्रकरणी मागील सभेत चर्चा झाल्यानुसार या प्रकरणात दोषी असलेल्या अन्य कर्मचाऱ्यांना निलंबित केले काय? याचा खुलासा व्हावा.

**मा.उपआयुक्त :** मागील सभेचा इतिवृत्तात आजच्या सभेत स्विकृत होत आहे. या स्विकृतीनंतर नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** नाका कारकून श्री.शिरोडकर यांच्याकडे गहाळ झालेले "सी" बुक आहे. असा खुलासा जकात अधिक्षक यांनी मागील सभेत केला आहे. पण प्राप्त माहितीनुसार प्रत्यक्षात गहाळ झालेले "सी" बुक श्री.शिरोडकर यांचेकडे नसल्याबाबत लेखी पत्र संबंधिताने दि.१०.०१.९० ला मा.आयुक्त यांचेकडे दिले आहे. या प्रकरणाशी संबंधित असलेल्या कर्मचाऱ्यांनी दडपण आणल्यामुळे गहाळ झालेले "सी"बुक माझ्याकडेच आहे. (श्री.शिरोडकर) असा लेखी खुलासा श्री.शिरोडकर यांना करणे भाग पडल्याबाबत लेखी कळविले आहे.

**मा.सभापती :** स.सभासद श्री.प्रदिप जैस्वाल यांनी मागील सभेत मुळ संचिकेची पहाणी केलेली आहे. याशिवाय या प्रकरणात दोषी असलेल्या अन्य कर्मचाऱ्यांना निलंबित करण्याचा ठरावही सभागृहाने मंजूर केलेला आहे. एकंदरीत परिस्थितीवरुन हा प्रश्न वादातीत आहे. असे दिसते. तेव्हा या प्रकरणांवर

जास्त चर्चा न करणे योग्य राहील. संबंधित प्रकरणाच्या चौकशीसाठी मा.आयुक्त योग्य ती कार्यवाही करतील.

"सी" बुक गहाळ प्रकरणात मा.आयुक्त यांनी जातीने लक्ष घालून चौकशी करावी. या चौकशीचे कामी स.नगरसेवक श्री.प्रदिप जैस्वाल यांना त्यांचे मत मांडण्याचा पूर्ण अधिकार राहील. चौकशी संबंधिचा अहवाल मा.आयुक्त यांनी शक्य तितक्या लवकर द्यावा.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** स्थायी समितीच्या मंजूरीशिवाय कोणत्याही महानगरपालिका कर्मचाऱ्यास निलंबित करता येत नाही. असा स्पष्ट उल्लेख मु.प्रा.मनपा अधिनियमचे कलम ५६ (अ) मध्ये नमुद केलेले असतांनाही मा.आयुक्त यांच्या जबाबदार अधिकाऱ्यांनी अशा प्रकारे आदेश काढणे योग्य नाही.

**श्री.शंकर मगर :** सुराणानगर येथे ड्रेनेज लाईन टाकण्याची काम गेल्या दीड-दोन वर्षापुर्वी कार्यान्वित झाले असून आजतागायत पुर्ण झालेले नाही. त्यामुळे नागरिकांची फार मोठी गैरसोय होत आहे.

**मा.सभापती :** नागरिकांच्या आरोग्याशी निगडीत असलेल्या सदरचे प्रकरणात मा.आयुक्त यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करुन कार्यकारी अभियंता यांनी कार्यवाही करावी.

**श्री.यादव अशोक सायन्ना :** वार्ड क्र.१ भावसिंगपुरा येथील रस्त्याचे कामास एक वर्षापूर्वी मंजूरी मिळाली आहे. परंतू अद्याप काम झालेले नाही. यासंबंधी चौकशी केली असता रस्त्याचे डिमार्केशन न मिळाल्यामुळे काम झाले नाही. अशी माहिती मिळाली आहे.

**मा.सभापती :** स.सभासदांच्या सूचनेप्रमाणे काम युध्द पातळीवर सुरु करुन ताबडतोब पूर्ण करण्याची व्यवस्था संबंधित अधिकाऱ्यांनी करावी.

**श्री.कचरु नवपुते, श्री.इकबालसिंग गील :** मागील सभेत ठरल्याप्रमाणे शहरात चालू असलेल्या कामाची माहिती संबंधित वार्डाचे नगरसेवकांना देण्याचे ठरले होते. याच बरोबर रेट लिष्टच्या कामाचीही माहिती देण्यात येणार होती. रेटलिस्टची कामे कार्यालयातर्फे मंजूर केली जातात. परंतू प्रत्यक्षात साईटवर काम न करताच बील उचलले जाते.

**श्री.यादव अशोक सायन्ना :** वार्ड क्र.१ अप्पाची वाडी येथे विद्युत व्यवस्थेसाठी खांब उभे करण्याचे कामाकरिता आवश्यक असलेल्या रकमेस सभागृहाने मंजूरी दिलेली आहे. तेव्हा सभागृहाचे दिलेल्या मंजूरीनुसार या प्रकरणी काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा.

**उपअभियंता :** अप्पाची वाडी येथील विद्युत व्यवस्थेसाठी आवश्यक असलेले विद्युत खांब उभे करण्याबाबत म.रा.वि.मंडळाशी संपर्क साधला असता कार्यकारी अभियंता (शहर विभाग) यांनी अप्पाची वाडी करिता १२ खांब उभे करण्याच्या कामास मंजूरी दिली असून या कामी योजने अंतर्गत र.रु.३६,१३५/- चा भरणा करण्यास सुचविले आहे. व उर्वरीत खांब उभे करण्यास या योजने अंतर्गत मंजूरी देणार आहेत. अशी माहिती मिळाली आहे.

**श्री.यादव अशोक सायन्ना :** निवासी उपअभियंता यांनी सभागृहात केलेला खुलासा निखाळस खोटा आहे. १२ विद्युत खांब उभे करुन अप्पाची वाडी येथील विद्युत व्यवस्थेसाठी सभागृहाने र.रु.३६,१३५/- च्या अंदाजपत्रकास मंजूरी देऊनही संबंधित अभियांना यांनी या प्रकरणात निराळी दिशा देऊन सभागृहाची दिशाभूल करण्याचे काम चालविले आहे. अप्पाची वाडी येथील विद्युत

व्यवस्थेसाठी गेल्या दोन वर्षापासून मागणी करुन व सभागृहाने यास मंजूरी देऊनही अद्याप काम पूर्ण झाले नाही. ही बाब लक्षात घेता या प्रकरणात दोषी असलेल्या कर्मचाऱ्यांवर योग्य अशी कारवाई व्हावी.

**मा.सभापती :** वार्ड क्र.१ अप्पाची वाडी या भागात विद्युत व्यवस्थेकरिता पोल उभे करण्याच्या कामासाठी ४/९० च्या स्थायी समितीने र.रु.३६,१३५/- च्या खर्चास मंजूर दिलेली आहे. याशिवाय या संबंधीचे कोटेशन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून या कार्यालयास प्राप्त झाले आहे. तरी देखील संबंधित कर्मचाऱ्यांना सभागृहाच्या ठरावानुसार या कामाची आवश्यक ती रक्कम महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडे भरलेली नाही. यावरुन निवासी उपअभियंता यांनी आपल्या कर्तव्यात कसूर केल्याचे निदर्शनास येते. करिता मा.आयुक्तांनी सदरचे प्रकरणात जातीने लक्ष घालावे व ठरावाप्रमाणे संबंधित अधिकाऱ्यांवर कार्यवाही करावी.

**श्री.स.अ.एकबालोद्दीन, श्री.अलफखान हुसेन खान :** शहरातील नाल्यावर खाजगी व्यवस्थापनाने इमारती उभ्या केल्यामुळे जुनाबाजार, औरंगपुरा या भागातील नाले साफ केली जात नाहीत. पर्यायाने साचलेल्या घाणीचा त्रास आजुबाजूच्या नागरिकांना सहन करावा लागतो. मागील वर्षी शहरातील नाले साफ करण्याबाबत ठराव मंजूर करण्यात आला होता.

**मा.सभापती :** नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने बॉम्बे मर्कंटाईल बँक, सुराणा कॉम्लेक्स, मेडीकल असोशिएशन, पिपल्स को.ऑप.बँक इ.ठिकाणी नाले त्वरीत साफ करुन घेण्याची व्यवस्था करण्यांत यावी.

**उपअभियंता (ज.नि.) :** शहरातील नाल्यांच्या जागा भाडेपट्ट्याने देतांना प्रस्तावित इमारतीखालील अच्छादित भागाची साफसफाई सदरचे व्यवस्थापनाने करावी असा करार झाला आहे.

**मा.सभापती :** उपअभियंता (ज.नि.) यांनी खुलासा केल्याप्रमाणे महापालिका प्रशासन आणि भाडे पट्टाधारक यांचेत अशा प्रकारे करार झाला असल्यास सहा.संचालक यांनी जातीने लक्ष घालून आवश्यक ती कार्यवाही करावी आणि संबंधित संस्थांना कराराप्रमाणे नाल्याच्या आवश्यक त्या साफसफाईचे काम सात दिवसाचे आत पूर्ण करुन घेण्याबाबत नोटीस देण्यांत यावी. दिलेल्या मुदतीत संबंधित संस्थेने नाल्याची आवश्यक ती साफसफाई न केल्यास सदर काम महापालिकेतर्फे करुन त्याबाबतची रक्कम नियमाप्रमाणे संबंधित संस्थेकडून वसुल करण्यात यावी.

**श्री.मोतीराम घडामोडे :** फुलेनगर भागात ड्रेनेज व सरफेस ड्रेनेजची व्यवस्था नसल्यामुळे वाहात जाणारे सांडपाणी घराच्या भिंतीत मुरते. वसाहतीतील घरांना धोका निर्माण झाला आहे. अशी मागणी सन १९८५ पासून संबंधित भागातील नागरिकांनी महापालिकेकडे केलेली आहे. तरीही या भागातील सांडपाण्याची योग्य ती व्यवस्था झालेली नाही. सांडपाणी भिंतीत मुरल्यामुळे या भागातील चार घरांच्या भिंती पडल्या असून त्यात नागरिकांचे नुकसान झालेले आहे. तेव्हा १९८५ पासून वारंवार मागणी करुनही महापालिका प्रशासनाने या कामाकडे दुर्लक्ष केल्यामुळे सदर नागरिकांच्या घराच्या भिंती पडल्या असल्यामुळे या नागरिकांना नुकसान भरपाई देण्यात यावी.

**मा.सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**उपअभियंता :** माहिती मिळताच कार्यकारी अभियंता व मी प्रत्यक्ष फुलेनगर घटनास्थळी भेट दिली असता जवळपास पाच नागरिकांच्या घराच्या भिंती पडलेल्या आहेत. व एकाच्या घराच्या भिंतीस तडा गेलेला आहे.

**मा.सभापती :** महात्माफुले नगर येथील काही भागात गटारी न काढल्यामुळे पाणी साचते व साचलेले पाणी बाजुच्या घराच्या भिंतीत मुरल्यामुळे या भागातील चार घरे पडली अशी तक्रार स.नगरसेवक श्री.मोतीराम घडामोडे यांनी सभागृहात केली आहे. सन १९८६ पासून या भागातील नागरिकांनी अर्ज देऊन ही बाब महापालिकेच्या लक्षात आणून दिलेली आहे. या वरुन संबंधित अधिकाऱ्यांनी याकडे दूर्लक्ष केले असे दिसते. तेव्हा प्रशासनाने या भागातील गटारी त्वरीत तयार करुन घेण्यास व खर्चास सभागृहातर्फे मंजूरी देण्यांत येते. आणि नुकसान झालेल्या नागरिकांना सानुग्रह अनुदान देण्यांत यावे.

**ठराव :**

ठराव क्र.७५२, ७६३, ७६५, ७६७ ची कामे तातडीची असल्याने नियमाप्रमाणे "ए-१" वर करुन घेण्यात यावीत. या दुरुस्तीसह दि.२१.०४.९० आणि २१.०४.९० रोजी तहकूब झालेल्या पुनरायोजित दि.२४.०४.९० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र.७७६ :**

जलगृह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिडको भागातील ४०० मी.मी.व्यासाचे अे.सी.प्रेशर पाईप्स फुटल्यामुळे पाणी पुरवठा खंडीत झाला होता. तो त्वरीत सुरु करण्यासाठी सिडको कार्यालयाकडून खालील किंमतीचे अे.सी.प्रेशर पाईप्स व सि.आय.डी.जाईन्टस खरेदी करण्यात आले. तरी र.रु.१२,५३७.३० च्या रकमेस व सिडकोकडून पाईप्स व सी.आय.डी.जाईन्टस खरेदी करण्यांबाबतचा प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

| | | |
|---|---|---|
| १. | ४०० मी.मी.व्यासाचे पाईप्स-२८ र.मी.X३३८.१० प्र.र.मी. | = ९,४६६.८० |
| २. | ४०० मी.मी.व्यासाचे सी.आय.डी.जाईन्टस | |
| | १० नग X ३०७.५० प्रति संच | = ३,०७०.५० |
| | | = १२,५३७.५० |

**ठराव :**

सिडको भागातील ४०० मी.मी.व्यासाचे अे.सी.प्रेशर पाईप्स फुटल्याने खंडीत झालेला पाणी पुरवठा पूर्ववत करण्यासाठी प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अे.सी.प्रेशर पाईप्स व सी.आय.डी.जॉईन्टस सिडको कार्यालयाकडून सिडको कार्यालयाकडून करण्यात आलेल्या खरेदीस व रक्कम रु.१२,५३७.३० च्या खर्चास कार्योत्तर मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र.७७७ :**

जलगृह अभियंता (२) यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र.७,११,५९ व १० मधील सिडको व झोन क्र.५ येथे सध्या पाणी टंचाई आहे. सध्या उन्हाळा असल्यामुळे सदरील भागातील जनतेला पुरेशा प्रमाणात पाणी पुरवठा केल्या जाऊ शकत नाही. सदरील ठिकाणची पाणी टंचाई कमी करण्यासाठी सदरील विविध भागात एकूण १५ अतिरिक्त विंधन विहिरी खोदणे आवश्यक आहे. करिता सदरील कामाचे अंदाजपत्रक र.रु.३,३५,८७०/- तयार करण्यांत आले आहे. अंदाजपत्रकातील दर हे जी.एस.डी.ए. महाराष्ट्र शासन यांचे मंजूर दराप्रमाणेच तयार करण्यात आले आहेत.

सध्या महानगरपालिकेतर्फे शहरात विविध ठिकाणी विंधन विहीरी खोदणेचे काम "सुरज ट्युबवेल्स" यांचे मार्फत करुन घेण्यांत येत आहे. सदरील कंत्राटदाराचे काम प्रगतीपथावर असून समाधानकारक आहे.

करिता पाणी पुरवठा विभाग-२ मधील एकंदरीत पाणी टंचाई दूर करण्याच्या दृष्टीने एकूण जास्तीचे पंधरा विंधन विहीरी खोदण्याचे काम मे.सुरज ट्युबवेल्स यांचेमार्फत अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्याची व रक्कम रु.३,३५,८७०/- चे अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.७,११,५९, व १० मधील पाणी टंचाई कमी करण्यासाठी विविध भागात एकूण १५ अतिरिक्त विंधन विहीरी खोदण्याचे कामाकरिता र.रु.३,३५,८७०/- च्या अंदाजपत्रकास व सदरील काम मे.सुरज ट्युबवेल्स यांचे मार्फत अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७७८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, हर्सुल येथील देवी मंदिर ते चतुर्थश्रेणी पर्यंत खडी रस्ता तयार करणेच्या कामासाठी स्थायी समिती ठराव क्र.५८५ दि.१५.०३.९० अन्वये र.रु.१,२३,०००/- च्या अंदाजपत्रकास मंजूरी मिळाली आहे. सदर कामासाठी निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.कुलवंतसिंग | - | ४% जास्त |
| २. | श्री.एस.पी.सरवदे | - | ५% जास्त |
| ३. | श्री.अब्दुल सलाम | - | ०.१०% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी दराची श्री.अब्दुल सलाम यांची निविदा आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हर्सुल येथील देवी मंदिर ते चतुर्थश्रेणी पर्यंत खडी रस्ता तयार करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी दराची श्री.अब्दुल सलाम यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७७९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, एम.आय.डी.सी. विभागात सोडीयम व्हेपरचे दिवे लावण्याचे अंदाजपत्रक र.रु.२,००,०००/- चे तयार करण्यात आले होते. एकूण २५ चौकात फिटींग लावण्याचे अंदाजपत्रक होते. परंतू मा.आयुक्तांच्या आदेशानुसार इ.स.१९८९-९० या वर्षी शिल्लक चौकात लावणे व इ.स.१९९०-९१ या वर्षी शिल्लक चौकात लावणे त्यानुसार ८९-९० या वर्षात एकूण १२ चौकात २४ फिटींग लावल्या आहेत. व सध्या राहिलेल्या एकूण २६ फिंटींग इ.स.१९९०-९१ या वर्षी मंजूर एजन्सी मे.लुना इलेक्ट्रीकल्स यांचेतर्फे मंजूर दरात म्हणजे अंदाजपत्रकापेक्षा २% जास्त दराने र.रु.९०,१५०/- २५० वॅटच्या एस.व्ही.फिटींग लावणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एम.आय.डी.सी. विभागात २६ एस.व्ही.फिटींग इ.स.१९९०-९१ या वर्षात मंजूर एजन्सी मे.लुना इलेक्ट्रीकल्स यांचेतर्फे अंदाजपत्रकापेक्षा २% जास्त दराने र.रु.९०,१५०/- च्या २५० वॅटच्या एस.व्ही.फिटींग लावणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७८० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, रेल्वेस्टेशन येथील सेल्टॅक्स भवन कार्यालयास संरक्षित भिंत व शेड बांधणेच्या कामासाठी सन ८९-९० चे सा.बा.खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.९६,१०३/- चे तयार करण्यांत आले (अंदाजपत्रक) असून काम तातडीने करुन घ्यावयाचे असल्यामुळे मा.आयुक्तांनी दि.१७.०३.९० चे टिप्पणीनुसार सदरील काम ए-१ नमुन्यावर करुन घ्यावे म्हणून आदेशीत केल्यानुसार निविदा मागविण्यांत आल्या असता एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे

१. श्री.आय.ए.खान - अंदाजपत्रकीय दराने
२. श्री.सईदखान - ४.९९% जास्त
३. श्री.फराज असोसिएटस - ४.८९% (परंतू कमी किंवा जास्त हे दिलेले नाही.)

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराचे श्री.आय.ए.खान यांचे दरपत्रक आहे. अंदाजपत्रक रक्कम रु.९६,१०३/- ला व श्री.आय.ऐ.खान यांचे दरपत्रकास मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रेल्वेस्टेशन येथील सेलटॅक्स भवन कार्यालयास संरक्षित भिंत व शेड बांधणेच्या कामासाठी र.रु.९६,१०३/- च्या अंदाजपत्रकास व सदर कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराचे श्री.आय.ए.खान यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. स.सदस्य श्री.गील इकबालसिंग किंवा श्री.अन्वर बेग हे कामाची पाहणी करतील.

**विषय क्र. ७८१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सन ९०-९१ हया आर्थिक वर्षात मॅटॅडोर वाहनांचे स्पेअर पाटर्स खरेदी कराण्याचा वार्षिक करार करण्यासाठी निविदापत्रके मागविली असता एकूण तीन निविदा वसुल झाल्या.

१. मे.धुत मोटर्स, औरंगाबाद - रुलींग प्राईजलिष्ट +१५%
(मेटॅडोर कंपनीचे अधिकृत विक्रेते)
२. मे.जैन ट्रेडर्स, औरंगाबाद - रुलींग प्राईजलिष्ट +२५%
३. मे.शिल्पा ट्रडर्स, औरंगाबाद - रुलींग प्राईजलिष्ट +१५%

वरीलपैकी क्र.१ व ३ हयांचे दर कमी आहेत. परंतू दोघांपैकी मे.धुत मोटर्स, औरंगाबाद हे मेटॅडोर कंपनीचे अधिकृत विक्रेते असल्यामुळे त्यांचे दर मंजूर करणे करणे योग्य राहील.

विचारार्थ सादर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९०-९१ हया आर्थिक वर्षात मॅटेडोर वाहनांचे स्पेअर पाटर्स खरेदी करण्याचा वार्षिक करार करण्यासाठी मेटॅडोर कंपनीचे अधिकृत विक्रेते मे.धुत मोटार्स, औरंगाबाद हयांचे रुलींग प्राईजलिस्ट + १५% दराचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७८२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, सन ९०-९१ हया आर्थिक वर्षात ॲम्बॅसडर कारचे स्पेअर पाटर्स खरेदी करण्याचा वार्षिक करार करण्यासाठी निविदापत्रके मागविली असता एकूण दोन निविदा पत्रके वसुल झाली.

१. मे.कैलास मोटर्स, औरंगाबाद - रुलींग प्राईजलिष्ट +१८%
(अधिकृत विक्रेते हिंदुस्थान मोटर्स)

२. मे.वर्धमान मोटर्स, औरंगाबाद - रुलींग प्राईजलिष्ट +१३%
(अधिकृत विक्रेते हिंदुस्थान मोटर्स)

दोघेही ॲम्बॅसडर कार पाटर्सचे अधिकृत विक्रेते आहेत. तेव्हा कमी दर असलेल्या मे.वर्धमन मोटर्स, औरंगाबाद यांचे दर मंजूर करणेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन ९०-९१ हया आर्थिक वर्षात ॲम्बॅसडर कारचे स्पेअर पाटर्स खरेदी करण्याचा वार्षिक करार करण्यासाठी कमी दर असलेल्या मे.वर्धमान मोटर्स, औरंगाबाद यांचे दरास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७८३ :**

वार्ड क्र.५७ मो.व्यंकटेश कॉलनी येथे १५० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे व चेंबर बांधणे बाबत र.रु.३४,३४९/- ला स्थायी समिती ठराव क्र.४०४, दि.०४.०१.९० अन्वये मान्यता मिळाली आहे. सदर कामाकरिता बी-१ निविदा मागविल्या असता एकूण चार दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे

१. श्री.एस.डी.कुलकर्णी - २९.७१% कमी
२. श्री.आर.एस.भाटीया - १४.९९% कमी
३. श्री.बी.एच.राठोड - ३०.०१% कमी
४. श्री.एम.ए.मोईद - २२% कमी

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०.०१% कमी दराची श्री.बी.एच.राठोड यांचे दर पत्रक आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.व्यंकटेश कॉलनी येथै १५० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे व चेंबर बांधणेच्या कामाकरिता तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०.०१% कमी दराचे श्री.बी.एच.राठोड यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र.७८४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सन १९९०-९१ मधील पहिल्य तिमाही कामासाठी १००० मेट्रीक टन सिमेंटची आवश्यकता आहे. तरी खुल्या बाजारातून निविदा मागवून सिमेंट घेणे बाबत तसेच अंदाजपत्रक रक्कम रु.१४,००,०००/- यास मान्यता मिळणेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९०-९१ मधील पहिल्यातिमाही कामासाठी १००० मेट्रीक टन सिमेंट खुल्या बाजारातून निविदा मागवून खरेदी करणेस व त्यासाठी र.रु.१४,००,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७८५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, गांधीनगर, रेल्वेस्टेशन, येथील अंतर्गत रोडचे खडी रस्त्याचे काम करणेसाठी सन १९९०-९१ चे सा.बा.खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.१,८४,४५६/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदरचा खर्च "भांडवली रस्ते" या सदरातून करण्यात येईल.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गांधीनगर, रेल्वेस्टेशन येथील अंतर्गत रोडचे, खडी रस्त्याचे काम करणेसाठी र.रु.१,८४,४५६/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७८६ :**

जलगृह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र.५७ मधील मो.ज्योतीनगर, येथे १०० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकणेच्या कामाचे रक्कम रु.५७,३०५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून मंजूरीस्तव सादर.

सदरील भागातील नळ कनेक्शन लांब अंतरा वरुन आहेत. त्यामुळे पाणीपुरवठा फार कमी दाबाबत होत आहे. त्यामुळे नागरिकांच्या तक्रारी जास्त आहेत. सदरील भागामध्ये पाणी पुरवठा क्रांतीचौक टाकीतून पंपीग द्वारे होत आहे. सदरील भागात जर नवीन जलवाहिनी १०० मी.मी.व्यासाची टाकल्यास शहानूरवाडी रोडवरील २०० मी.मी.व्यासाच्या मुख्य जलवाहिनीवरुन सदरील भागास पाणी पुरवठा समाधानकारक रित्या होऊ शकेल. सदरील काम ए-१ वर करुन घेणे योग्य.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.५७ मो.ज्योतीनगर येथे १०० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी र.रु.५७,३०५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७८७ :**

जालना रोडच्या दक्षिणेस फ्रान्सेस हायस्कुल पासून बनेवाडी पर्यंत मोठ्या व्यासाची ट्रंक शियर एक टप्पा २.७ कि.मी.लांबीची जलनि:सारण वाहिनी टाकण्याबाबत सर्वसाधारण सभा ठराव क्र.५४ दि.२०.११.८९ द्वारे र.रु.१,८१,१७,५००/- ला मंजूरी मिळालेली आहे.

उपरोक्त ठरावामधील रकमेतून टप्पा एकसाठी अंदाजपत्रक तयार केलेले आहे. अंदाजपत्रकीय रक्कम रु.२०,६४,६३०/- एवढी आहे. सदर कामासाठी बी-१ नमुन्यात निविदा सूचना क्र.१५/८९/-९० दि.३१.०१.९० नुसार निविदा मागविल्या असता एकूण सात निविदा विकण्यात आल्या पैकी तीन निविदा वसुल झाल्या. त्या खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.टी.बी.परमार | - | ४.९०% जास्त |
| २. | श्री.एस.ए.नवाब | - | १२% जास्त |
| ३. | श्री.बी.एन.बालचंदाणी | - | १७.८६% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९०% जास्त दराची निविदा श्री.टी.बी.परमार यांची आहे.

शहा कन्सल्टन्ट यांनी सुचविलेल्या दरानुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. त्यांचे दर जुने असून सन ८९-९० चे दर त्यापेक्षा जास्त आहेत. करिता श्री.टी.बी.परमार यांची निविदा ४.९०% जास्त असली तरी ती मंजूर करण्यास हरकत नाही. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जालना रोडच्या दक्षिणेस सेंट फ्रान्सीस हायस्कुल पासून बनेवाडी पर्यंत मोठ्या व्यासाची २.७ कि.मी.लांबीची टप्पा क्र.१ जलनिःसारण वाहिनी टाकण्याकरिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९०% जास्त दराची श्री.टी.बी.परमार यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र.७८८ :**

वार्ड क्र.४३ मो.अजबनगर भागात २० मी.मी.जाडीचे मिक्स सिल सरफेसिंग करण्याच्या कामासाठी सन ८९-९० चे सा.बा.खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.१,१४,३४९/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अजबनगर भागात २० मी.मी.जाडीचे मिक्स सिल सरफेसींग तयार करण्याच्या कामासाठी र.रु.१,१४,३४९/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा.सभापतींनी जाहिर केले.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
मा.सभापती, स्थायी समिती
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक २७.०६.१९९० रोजी भरलेल्या स्थायी समिती सभेचा इतिवृत्तांत**

**सोमवार दिनांक १७.०५.१९९० रोजी पुढे टकलण्यात आलेली आणि दिनांक २२.०५.१९९० रोजी अपरिहार्य कारणास्तव स्थगित करण्यात आलेली स्थायी समिती सभा बुधवार दिनांक २७.०६.१९९० रोजी दुपारी ३.०० वाजता समिती सभागृहात मा.सभापती श्री.रतनकुमार पंडागळे यांच्या अध्यक्षतेखाली सुरु झाली.**

**या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह निम्ननिर्दिष्ट स.सभासद उपस्थित होते.**

१. श्री.जैस्वाल प्रदिप शिवनारायण
२. श्री.नवपुते कचरु चंद्रभान
३. श्री.बारवाल गजानन रामकिसन
४. श्री.विधाते प्रभाकर सिताराम
५. श्री.सोनवणे केशव काशिनाथ

**विषय क्र.१/२ :**

दिनांक ३०.०४.९० रोजी संपन्न झालेल्या गत स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**<u>संवाद :</u>**

**श्री.प्रदिप जैस्वाल :** ठराव क्र.५७५, दि.३०.०४.९० मध्ये नमूद केल्याप्रमाणे अप्पाची वाडी येथील विद्युत व्यवस्थेसाठी विद्युत खांब उभे करण्याबाबत काय कार्यवाही झाली. याचा खुलासा व्हावा.

**निवासी, उपअभियंता :** महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे टेंडरनुसार अप्पाची वाडी येथील विद्युत व्यवस्थेसाठी रु.१,४६०/- च्या भरणा संबंधित विभागाकडे केला आहे. संबंधित विभागाचे अभियंता यांचेसोबत प्रत्यक्ष स्थळ पाहणी करण्यांत आली आहे.

**श्री.कचरु नवपुते :** वार्ड क्र.६० चिकलठाणा येथे इंधन विहीरीच्या कामांना मंजूरी देण्यांत आली आहे. पण अद्याप कामे सुरु झाली नाहीत. तेव्हा मंजूरीनंतर या कामात काय कार्यवाही झाली. याचा खुलासा व्हावा. सभागृहात ठराव मंजूर होण्यापुर्वीच काही कार्ये सुरु होतात. हे कसे?

**कार्यकारी अभियंता :** सभागृहाच्या मंजूरीनुसार वार्ड क्र.६० येथे इंधन विहीरी बाबत संबंधित गुत्तेदारांना कामाचे आदेश देणे बाकी आहे. ठरावास स्विकृती मिळाल्यानंतरच काम चालु करण्यांत येईल.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** ठराव क्र.५७५ दि.३०.०४.९० मध्ये नमूद केल्या प्रमाणे शहरातील नाल्यांवर खाजगी व्यवस्थापनाने इमारती उभ्या केल्यामुळे नाल्यातून वाहुन जाणारे पाणी व घाण सदरचे इमारतीपुढे तुंबून राहते. त्या भागातील सभोवतालचे नागरिकांना घाणीचा त्रास होत आहे. शहरातील नाल्यावर खाजगी व्यवस्थापनाने उभ्या केलेल्या इमारती खालील नाल्याचा भाग

तात्काळ साफ करुन घेण्याबाबतचा निर्णय झालेला असतांनाही सदर काम पूर्ण झालेले नाही. तेव्हा प्रशासनाने या बाबींकडे गांर्भीर्याने लक्ष पुरवावे.

**श्री.केशव सोनवणे :** दि.३०.०४.९० च्या सभेत आणि त्यापुर्वीच्या सभेत शहरात चालू असलेल्या कामांची माहिती संबंधित वार्डाचे नगरसेवकांना देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. तेव्हा सभागृहाचे निर्णयानुसार संबंधित वार्डाचे नगरसेवकांना अशा प्रकारची माहिती पुरविण्यांत आली आहे काय? याचा खुलासा व्हावा.

**मा.सभापती :** ज्या त्या विभागाचे विभाग प्रमुखांनी यापुढे विभागाशी संबंधित माहिती आगामी बैठकीपासून नियमीतपणे देण्याचे करावे.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** ठराव क्र.७८० दि.३०.०४.९० अन्वये रेल्वे स्टेशन येथील सेल टॅक्स भवन कार्यालयास संरक्षित भिंत व रोड बांधण्याचे काम अे-१ नमुन्यावर श्री.आय.अे.खान यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास मंजूरी देण्यात आली आहे. या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु.९६,१०३/- चे असल्याने ठराव क्र.७८० रद्द करण्यात यावा. व पुन्हा दरपत्रके मागविण्यांत यावीत.

**प्रभारी उपआयुक्त :** ठराव क्र.७८० चे काम तातडीचे असल्याने दृष्टीने अ-१ नमुन्यावर करुन घ्यावे पण ते योग्य व्हावे म्हणून व या कामाची पाहणी करण्यासाठी मा.सभापतींनी ठरावात नमूद केल्याप्रमाणे स.सभासदांना सूचना दिल्या आहेत.

**श्री.कचरु नवपुते, श्री.प्रदिप जैस्वाल :** ठराव क्र.७८० नामंजूर करण्यात यावा अशी आमची मागणी आहे.

**सचिव, प्रभारी उपआयुक्त :** सभागृहात सर्वानुमते मंजूर आलेला ठराव रद्द करता येत नाही. स्विकृतीच्या वेळी ठरावात काही दुरुस्ती असल्यास तशी दुरुस्ती करता येते.

**विधी सल्लागार :** सभा कामकाज नियमावलीचे कलम ६ व ७ सभागृहात वाचून दाखविले.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** विधी सल्लागांरानी खुलासा केल्याप्रमाणे सभा कामकाज नियमावलीचे कलम ६ व ७ अन्वये ठराव क्र.७८० बाबत कार्यवाही करता येत नसेल तर या कामासाठी पुन्हा दरपत्रके मागविण्यांत यावीत.

**शहर अभियंता :** ठराव क्र.७८० अंतर्गतच्या कामास स्विकृती मिळालेली नसल्यामुळे याकामाचा आदेश संबंधित गुत्तेदारांना दिलेला नाही.

**सचिव :** ठराव क्र.७८० मध्ये नमूद केल्याप्रमाणे स.सभासद श्री.एकबालसिंग गील व श्री.अन्वर बेग यांनी कामाची पाहणी करावी असे स्पष्ट नमूद केले आहे. तेव्हा संबंधित नगर सेवकांकडून पाहणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर काम सुरु करावे अशी दुरुस्ती करावी.

**विधी सल्लागार :** सचिवांनी सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे दुरुस्ती करणे योग्य राहील.

**मा.सभापती :** स.सभासदांच्या विनंतीस मान देऊन ठराव क्र.७८० चे काम स्थगित ठेवण्यात यावे असे रुलींग देण्यात आले.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दि.३०.०४.९० च्या इतिवृत्तातील ठराव क्र.७८० चे काम स्थगित ठेवण्यात यावे या दुरुस्तीसह दि.३०.०४.९० रोजी संपन्न झालेल्या गत स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.२/२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिल्लेखाना ते मोंढा नाका या ८० फुट डी.पी.रोडचे खडी रस्ता, करबींग व डांबरी करणाच्या कामासाठी कामासाठी सन ८८-८९ चे सा.बा.खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.१२,०२,७३२/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. त्यास स्थायी समितीचा ठराव क्र.७७५/२७ दि.०५.०१.८९ नुसार मंजूरी मिळालेली मिळालेली आहे.

तसेच सदरील रकमेमधून डांबरीकरणाचे काम करावयाचे बाकी असल्यामुळे कार्यालयीन निविदा सूचना क्र.(१०) ८९-९० दि.२९.०३.९० नुसार बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असून निविदा विक्रीच्या नियोजित दिनांकापर्यंत एकुण (३) तीन निविदा विक्री झाल्या असून निविदा स्विकारणेच्या नियोजित दिनांक ११.०४.९० रोजी एकूण तीन निविदा दर भरलेल्या वसुल झालेल्या आहेत. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.एम.एस.जग्गी | - | १२.२५"% कमी दराने |
| २. | श्री.पी.एम.चोरडीया | - | ८.७७% कमी दराने |
| ३. | श्री.मे.गुरुनानक इंडस्ट्रीज | - | ८.७७% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.२५% कमी दराची श्री.एम.एस.जग्गी यांची निविदा असून मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**<u>संवाद :</u>**

**श्री.कचरु नवपुते :** वार्ड क्र.६० चिकलठाणा येथील रस्त्याचे डांबरीकरणाचे कामास मंजूरी देण्यात आली आहे. पण काम अद्याप झालेले नाही. तेव्हा याबाबत खुलासा व्हावा.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** महापालिकेचे काही अधिकारी इंदौरला गेले आहेत. अशी माहिती मिळाली आहे. तेव्हा संबंधित अधिकारी इंदौरला कशा करता गेले व त्यात कोणकोणाचा समावेश आहे. याचा खुलासा व्हावा.

**प्रभारी उपआयुक्त :** सिध्दार्थ उद्यान येथील प्राणी संग्रहालयासाठी हत्ती आणण्याकरिता व त्यासंबंधीची आवश्यक ती माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता मा.आयुक्त यांचे परवानगीने पशुवैद्यकीय अधिकीर मा.आयुक्तांचे स्विय सहाय्यक, उपअभियंता (स्लम) आणि मा.उपआयुक्त इंदौरला रवाना झाले आहेत.

**श्री.प्रदिप जैस्वाल, श्री.केशव सोनवणे :** सिध्दार्थ उद्यानाकरिता हत्ती आणण्याचे कामी स्लम अधिकाऱ्यांचे काय काम होते. याचा खुलासा व्हावा. आणि वार्ड क्र.६० चिकलठाणा येथील डांबरीकरणाच्या कामाची फाईल सभागृहात मागविण्यांत यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिल्लेखाना ते मोंढा या ८० फुट डी.पी.रोडचे खडी रस्ता, फरबींग व डांबरीकरणाच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १५.२५% कमी दराचे गुत्तेदार श्री.एम.एस.जग्गी यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

(टिप : शहर अभियंता यांनी कामाची प्रत चांगली राहील याची दक्षता घ्यावी.)

**विषय क्र.३/३ :**

शहर अभियंता प्रस्ताव सादर केला की, चिकलठाणा एम.आय.डी.सी.येथील मास्को कंपनी ते पॅकप्रिन्ट पर्यंत रोडचे डांबरीकरण करणेचे कामासाठी सन १९८९-९० चे

सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.४,३१,८२०/- ला स्थायी समितीचा ठाव क्र.५७८/२९, दि.१५.०३.९० नुसार मंजूरी मिळालेली आहे.

सदर काम करणेसाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.१०/८९-९०, दि.२९.०३.९० नुसार बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित दि.०५.०४.९० पर्यंत एकूण चार निविदा विक्री झाल्या असून निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस दि.११.०४.९० ला एकूण चार निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.रे.कन्स्ट्रक्शन | - | १८.८% कमी दराने |
| २. | श्री.एम.एस.जग्गी | - | १५.२५% कमी दराने |
| ३. | मे.गुरुनानक इंडस्ट्रीज | - | १४.७% कमी दराने |
| ४. | श्री.पी.एम.चोरडिया | - | ११% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.८% कमी दराचे मे.रे.कन्स्ट्रक्शन यांची निविदा असून मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चिकलठाणा एम.आय.डी.सी.येथील मास्को कंपनी ते पॅकप्रिंट पर्यंत रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.८% कमी दराचे मे.रे.कन्स्ट्रक्शन यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.
(टिप : शहर अभियंता यांनी कामाची प्रत चांगली राहील याची दक्षता घ्यावी.)

**विषय क्र.४/४ :**

शहर अभियंता प्रस्ताव दिला आहे की, सरस्वती कॉलनी व मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दि.१५.०३.९० रोजी ऐनवेळी अंदाजपत्रक रक्कम रु.१,६५,५०५/- च्या खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

सदर कामासाठी कार्यालयीन निविदा क्र.१६/जा.क्र./मनपा/बांधकाम क्र.१/२०६१/९०, दि.२३.०३.९० रोजी निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत चार निविदा फॉर्म दर भरुन प्राप्त झाल्या. त्या दिनांक ०४.०४.९० रोजी उपस्थित असलेल्या ठेकेदारा समक्ष उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.गुरुनानक इंडस्ट्रीज | - | ५.६% कमी |
| २. | श्री.एम.एस.जग्गी | - | १% कमी |
| ३. | श्री.रे.कन्स्ट्रक्शन | - | ०५.१०% कमी |
| ४. | श्री.पी.एम.चोरडीया | - | ७% कमी |

वरील अनुक्रमांक ४ श्री.पी.एम.चोरडीया यांचे निविदाचे दर तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रका पेक्षा ७% कमी दराचे आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सरस्वती कॉलनी व मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करणे बाबतच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकापेक्षा ७% कमी दराचे गुत्तेदार श्री.पी.एम.चोरडीया यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.
(टिप : शहर अभियंता यांनी कामाची प्रत चांगली राहील याची दक्षता घ्यावी.)

**विषय क्र.५/५ :**

महानगरपालिका हद्दीतील जुन्या पध्दतीचे संडासाचे रुपांतर जलोधित करणे बाबत सर्वसाधारण सभेत ठराव क्र.४०/१६, दि.२०.११.८९ नुसार अंदाजपत्रक रक्कम रु.८८,००,०००/- ला मंजूरी मिळालेली होती.

उपरोक्त ठरावानुसार निविदा मागविण्यात आल्या त्याचे दर खालीलप्रमाणे आहेत.

झोन क्र.१ मधील ४१७ जुन्या पध्दतीच्या संडासाचे अंदाजपत्रक र.रु.९,१७,४००/- रुपांतर जलोधीत करणे बाबत सदर कामाकरिता कार्यालयीन निविदा सूचना क्र.१२/९६६/८९, दि.१९.१२.८९ द्वारे बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण चार निविदा विकण्यात आल्या होत्या व केवळ दोन निविदा वसुल झालेल्या आहेत. त्याचा तुलनात्मक तक्ता दर खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.मझरुल हक्क | - | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | श्री.पॉल कन्स्ट्रक्शन | - | ५% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा म्हणजे अंदाजपत्रकीय दराचे श्री.मझरुल हक्क यांचे दरपत्रक आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सदर प्रस्ताव दि.०६.०४.९० रोजी झालेल्या स्थायी समिती सभेत विषय क्र.६८४ नुसार स्थगित ठेवण्यांत आल्यामुळे पुनर्विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री.कचरु नवपुते :** आजच्या सभागृहा समोरील विषय क्र.५ ते १४ मध्ये प्रत्येक झोन मधील जलनिःसारणाच्या कामाचा समावेश आहे. परंतू झोन क्र.५ मधील भागातील जलनिःसारणाच्या कामाचा समावेश यात दिसून येत नाही. तेव्हा झोन क्र.५ अंतर्गत येणाऱ्या भागात जलनिःसारणाच्या कामाची आवश्यकता नाही काय? याचा खुलासा व्हावा.

**कार्यकारी अभियंता :** सभागृहासमोर मंजूरीसाठी ठेवण्यांत आलेल्या जलनिःसारण कामाच्या अ.क्र.५ ते १४ च्या कामाबाबत सविस्तर टिप्पणी विषय पत्रिकेसोबत सभासदांच्या माहितीसाठी पाठविण्यांत आली आहे.

**श्री.प्रदिप जैस्वाल, श्री.केशव सोनवणे :** विषय पत्रिकेवरील अ.क्र.५ ते १४ पर्यंतच्या जलनिःसारण कामासाठी प्रशासनाने दाखल केलेल्या टिप्पणी वरुन सविस्तर बोध होत नाही. तसेच या कामाचा सभासदांकडून अभ्यासही झालेला नाही. व या जलनिःसारणाचे कामाबाबत मागील सभेत स.सभासद, श्री.मोरेश्वर सावे, यांनी केलेल्या वक्तव्यानुसार प्रशासनातर्फे आवश्यक ती माहिती देण्यांत यावी. म्हणजे सभागृहात यावर विचार करता येईल. करिता अ.क्र.५ ते १४ पर्यंतचे विषय पुढे ढकलण्यात यावेत.

**ठराव :**

सर्वानुमते असे ठरले की, जलनिःसारण प्रकल्पा अंतर्गत सविस्तर टिप्पणी सादर करुन सदरचा प्रस्ताव पुढील सभेत ठेवण्यांत यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.६/६ :**

झोन क्र.२ मधील १६० ज्यांचे अंदाजपत्रक रक्कम रु.३,५२,०००/- जुन्या पध्दतीचे संडासाचे रुपांतर जलोधित करणे बाबत सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.१२/९६६/८९, दि.२९.१२.८९ द्वारे बी-१ नमुन्यात निविदा मागविण्यात आल्या असता

एकूण तीन निविदा विकण्यात आल्या असून केवळ दोनच निविदा वसुल झालेल्या आहेत. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

१. श्री.आनंद बिल्डर्स - १.९९% कमी
२. श्री.आर.एस.भाटीया - १.२३% कमी

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.९९% कमी दराचे श्री.आनंद बिल्डर्स यांचे दर पत्रक आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सदर प्रस्ताव दि.०६.०४.९० रोजी झालेल्या स्थायी समिती सभेत विषय क्र.६८५ नुसार स्थगित ठेवण्यांत आल्यामुळे पुनर्विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

सर्वानुमते असे ठरले की, जलोत्सारण प्रकल्पा अंतर्गत सविस्तर टिप्पणी सादर करुन सदरचा प्रस्ताव पुढील सभेत ठेवण्यात यावा.

**विषय क्र.७/७ :**

झोन क्र.३ मधील (अ) विभागातील १२० जुन्या पध्दतीचे संडासाचे रुपांतर अंदाजपत्रक र.रु.११,४४,०००/- जलोधित करणे बाबत सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.१२/९६६/८९, दि.२९.१२.८९ द्वारे बी-१ नमुन्यात निविदा मागविण्यात आल्या असता एकूण चार निविदा विकण्यात आल्या होत्या. त्यापैकी केवळ दोनच निविदा वसुल झालेल्या आहेत. व त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

१. श्री.एम.एम.बेग - ०.०१% कमी
२. श्री.मझरुल हक्क - ८% जास्त

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराचे श्री.एम.एम.बेग यांचे दर पत्रक आहे. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सदर प्रस्ताव दि.०६.०४.९० रोजी झालेल्या स्थायी समिती सभेत विषय क्र.६८६ नुसार स्थगित ठेवण्यांत आल्यामुळे पुनर्विचारार्थ सादर.

**ठराव :**

सर्वानुमते असे ठरले की, जलोत्सारण प्रकल्पा अंतर्गत सविस्तर टिप्पणी सादर करुन सदरचा प्रस्ताव पुढील सभेत ठेवण्यात यावा.

**विषय क्र.८/८ :**

झोन क्र.३ मधील वार्ड क्र.(ब) मधील ५२० जुन्या पध्दतीच्या संडासाचे रुपांतर ज्यांचे अंदाजपत्रक र.रु.११,४४,०००/- जलोधित करणे बाबत सदर कामाकरिता कार्यालयीन निविदा सूचना क्र.१२/९६६/८९, दि.११.१२.८९ द्वारे बी-१ नमुन्यात निविदा मागविण्यात आल्या असता एकूण चार निविदा विकण्यात आल्या होत्या. त्यापैकी केवळ तीनच निविदा वसुल झाल्या आहेत. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

१. श्री.पॉल कन्स्ट्रक्शन - १०% जास्त
२. श्री.कुलवंतसिंग - ५% जास्त
३. श्री.बी.आर.आनंद - ०.१०% कमी

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी दराची श्री.बी.आर.आनंद यांचे दर पत्रक आहे. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सदर प्रस्ताव दि.०६.०४.९० रोजी झालेल्या स्थायी समिती सभेत विषय क्र.६८७ नुसार स्थगित ठेवण्यांत आल्यामुळे पुनर्विचारार्थ सादर.

**ठराव :**

सर्वानुमते असे ठरले की, जलोत्सारण प्रकल्पा अंतर्गत सविस्तर टिप्पणी सादर करुन सदरचा प्रस्ताव पुढील सभेत ठेवण्यात यावा.

**विषय क्र.९/९ :**

झोन क्र.३ मधील (अ) विभागातील ५०४ जुन्या पध्दतीच्या संडासाचे रुपांतर ज्यांचे अंदाजपत्रक र.रु.११,०८,८००/- जलोधित करणे बाबत सदर कामाकरिता कार्यालयीन निविदा सूचना क्र.१२/९६६/८९, दि.१९.१२.८९ द्वारे बी-१ नमुन्यात निविदा मागविण्यात आल्या असता एकूण तीन निविदा विकण्यात आल्या होत्या. त्यापैकी केवळ दोनच निविदा वसुल झालेल्या आहेत. त्याचा तुलनात्मक दर खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.कुलवंतसिंग | - | ६% जास्त |
| ३. | श्री.बी.आर.आनंद | - | ०.१०% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी दराचे श्री.बी.आर.आनंद यांचे दर पत्रक आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सदर प्रस्ताव दि.०६.०४.९० रोजी भरलेल्या स्थायी समिती सभेत विषय क्र.६८८ नुसार स्थगित ठेवण्यांत आल्यामुळे पुनर्विचारार्थ सादर.

**ठराव :**

सर्वानुमते असे ठरले की, जलनिःसारण प्रकल्पा अंतर्गत सविस्तर टिप्पणी सादर करुन सदरचा प्रस्ताव पुढील सभेत ठेवण्यात यावा.

**विषय क्र.१०/१० :**

झोन क्र.३ मधील (अ) विभागातील ३९३ जुन्या पध्दतीच्या संडासाचे रुपांतर ज्यांचे अंदाजपत्रक र.रु.८,६४,६००/- जलोधित करणे बाबत सदर कामाकरिता कार्यालयीन निविदा सूचना क्र.१२/९६६/८९, दि.१९.१२.८९ द्वारे बी-१ नमुन्यात निविदा मागविण्यात आल्या असता एकूण आठ निविदा विकण्यात आल्या होत्या. त्यापैकी सहा निविदा वसुल झाल्या आहेत. व त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | एम.एम.बेग | - | ८.५०% जास्त |
| २. | श्री.कुलवंतसिंग | - | ०.५% कमी |
| ३. | श्री.बी.आर.आनंद | - | ३.२१% कमी |
| ४. | पी.जे.तमखाने | - | २.२२% कमी |
| ५. | डी.सी.पंजाबी | - | १०.५६% कमी |
| ६. | पॉल कन्स्ट्रक्शन | - | ७.८६% जास्त |

**मा.सभापती :** दि.०२.०२.८९ रोजी स.सदस्य श्री.प्रभाकर विधाते यांनी दिलेल्या अर्जानुसार त्यांच्या वार्डातील रोडचे काम कुठल्या स्टेजला आहे. या संबंधी माहिती पुढच्या मिटींगमध्ये देण्यात यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ठराव क्र३२ दि.०२.०७.९० व प्रस्ताव क्र.७८० दि.३०.०४.९० अन्वये रेल्वेस्टेशन येथील सेल्स टॅक्स कार्यालयाच्या संरक्षित भिंतीचे व रोडचे काम होणे आवश्यक असल्याने जे अविलंब होणे आवश्यक आहे. अशी खात्री स.नगरसेवक श्री.प्रदिप जैस्वाल यांची झाली. दि.२७.०६.९० च्या बैठकीतील त्यांची हरकत त्यांनी मागे घेतल्यामुळे सदरचे काम गुत्तेदार श्री.आय.ए.खान यांचे मार्फत करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. इ.दुरुस्त्यांसह दि.०२.०७.९० रोजी संपन्न झालेल्या गत स्थायी समितीचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.४५/२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, रोकडे हनुमान कॉलनी वार्ड क्र.३९ अंतर्गत रस्त्यास २० मी.मी.जाडीचे मिक्स सिल सरफेसिंग करणे बाबतच्या कामासाठी अंदाजपत्रक र.रु.१,६२,६००/- चे सन १९८९-९० च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डी.एस.आर.दराप्रमाणे तयार करण्यांत आले आहे. सदरील खर्च भांडवली रस्ते या सदराखाली करण्यात येईल. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रोकडे हनुमान कॉलनी वार्ड क्र.३९ अंतर्गत रस्त्यास २० मी.मी.जाडीचे मिक्स सिल सरफेसिंग करणे बाबतच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु.१,६२,६००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.४६/३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, शहागंज (गांधी पुतळा) ते भडकल गेट ५०" डी.पी.रोडचे रुंदीकरण व डांबरीकरण व रस्ता दुभाजक करणे बाबतच्या कामासाठी सन १९८९-९० च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डी.एस.आर.दराप्रमाणे अंदाजपत्रक खालीलप्रमाणे तयार करण्यांत आले आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | पार्ट-अ, रस्ता रुंदीकरण, खडीकरण | - | रु.७,५०,४१०.०० |
| २. | पार्ट-ब, डांबरीकरण | - | रु.३,७१,७००.०० |
| ३. | पार्ट-क, रस्त्यामध्ये बांधीत होणारे घरे पाडणे | - | रु.०,६१,५२०.०० |
| | **एकूण** | **-** | **रु.११,८३,६३०.००** |

वरीलप्रमाणे अंदाजपत्रक र.रु.११,८३,६३०/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च सरकारकडून मिळालेल्या अनुदानामधून करण्यात येईल. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री.अहमद एकबालोद्दीन :** हा कोणता रोड आहे. याचे स्पष्टीकरण करावे.

**मा.उपआयुक्त :** सदरचा रस्ता ५० फुट डी.पी.रोड असून शासकीय मंजूरीस्तव प्रस्ताव स्थायी समितीने मंजूर करुन शासनाकडे पाठवावयाचा आहे.

**मा.सभापती :** हे सर्व शासकीय प्रस्ताव असून त्यास स्थायी समितीच्या मंजूरीअंती शासनाकडे पाठवावयाचे आहेत.

**श्री.स.अ.इकबालोद्दीन :** या रस्त्यामध्ये बाधित होणाऱ्या इमारती व जागेच्या मालकास जागेच्या मोबदला देण्यता आला का?

**मा.सभापती :** आतापर्यंत विकास योजने अंतर्गत बांधित होणाऱ्या इमारती व जागेच्या मालकांना मोबदला देण्यात आला आहे.

**श्री.मो.इस्माईल :** नवाबपुरा ते खासगेट या रस्त्यावर फार मोठ्या प्रमाणात वाहतुक आहे. तेव्हा हा रस्ता विकास योजने अंतर्गत समाविष्ट आहे का?

**मा.सभापती :** हया रस्त्याबाबतचा प्रस्ताव विकास योजने अंतर्गतच्या कार्यक्रमात समाविष्ट करण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहागंज (गांधी पुतळा) ते भडकल गेट या ५०" फुट डी.पी.रस्त्याचे रुंदीकरण, खडीकरण, डांबरीकरण, इ.कामा अंतर्गत बाधित होणारी घरे पाडण्याकरिता तयार करण्यांत आलेल्या र.रु.११,८३,६३०/- च्या खर्चास व अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी (देण्यांत येते) दिली जाते.

**विषय क्र.४७/४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, नेहरु भवन ते जुना बाजार ४० फुट डी.पी.रस्त्याचे खडीकरण, डांबरीकरण, व वेस्ट मटेरियल उचलणे बाबतच्या कामासाठी सन १९८९-९० च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डी.एस.आर.दराने अंदाजपत्रक खालील प्रमाणे तयार करण्यात आले आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | पार्ट-अ, खडी रस्ता तयार करणे | - | रु.१,३५,७००.०० |
| २. | पार्ट-ब, डांबरीकरण | - | रु.३,०१,९२०.०० |
| ३. | पार्ट-क, वेस्ट मटेरीयल उचलणे | - | रु.०,३२,८२५.०० |
| | **एकूण** | **-** | **रु.०४,७०,४३५.००** |

वरीलप्रमाणे अंदाजपत्रक रक्कम रु.४,७०,४३५/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च सरकारकडून मिळालेल्या अनुदानातून करण्यात येईल, प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नेहरु भवन ते जुनाबाजार ४०" फुट डी.पी.रस्त्याचे खडीकरण, डांबरीकरण व वेस्ट मटेरियल उचलणे बाबतच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रु.४,७०,३३५/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र.४८/५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, रोशनगेट ते सिडको पर्यंतच्या ८०" डी.पी.रस्त्याचे रुंदीकरण, डांबरीकरण, व फुटपाथ तयार करणे बाबतच्या कामासाठी सन

१९८९-९० च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डी.एस.आर.दराप्रमाणे तयार करण्यांत आले आहे. ते खालील प्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | पार्ट-अ, रस्ता रुंदीकरण, खडीकरण व रस्ता दुभाजक | - | रु.११,५४,७६०.०० |
| २. | पार्ट-ब, डांबरीकरण | - | रु.०९,५०,८००.०० |
| ३. | पार्ट-क, फुटपाथ, व साईड ड्रेन | - | रु.०३,८८,७२०.०० |
| | **एकूण** | **-** | **रु.२४,९४,२८०.००** |

वरीलप्रमाणे अंदाजपत्रक र.रु.२४,९४,२८०/- चे तयार करण्यांत आले आहे. सदरील खर्च सरकारकडून मिळालेल्या अनुदानामधून करण्यात येईल, प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रोशन गेट ते सिडको पर्यंतच्या ८०" फुट डी.पी.रस्त्याचे रुंदीकरण, डांबरीकरण व फुटपाथ तयार करणे बाबतच्या कामासाठी तयार करण्यात आलेले र.रु.२४,९४,२८०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.४९/६ :**

शहर अभियंता यांना प्रस्ताव दिला आहे की, वार्ड क्र.१५ कांचीवाडा, माळीवाडा भागात खांडकी पेव्हींग करणे बाबतच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रु.१,३६,७००/- चे सन १९८९-९० च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डी.एस.आर.दराप्रमाणे तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च भांडवली रस्ते या सदराखाली करण्यात येईल. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.१५ काचीवाडा, माळीवाडा, भागात खांडकी पेव्हींग करणे बाबतच्या कामासाठी तयार करण्यांत आलेले र.रु.१,३६,७००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.५०/७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, वार्ड क्र.२२ नंदनवन कॉलनीतील खडी रस्ते तयार करणे बाबत च्या कामासाठी अंदाजपत्रक र.रु.३,४४,४७०/- चे सन १९८९-९० च्या सार्वजनिक खात्याच्या डी.एस.आर.दराप्रमाणे तयार करण्यांत आले आहे. सदरील खर्च भांडवली रस्ते या सदराखाली करण्यात येईल. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.२२ नंदनवन कॉलनीतील खडी रस्ते तयार करणे बाबतच्या कामासाठी तयार करणे बाबतच्या कामासाठी तयार करण्यांत आलेले र.रु.३,४४,४७०/- अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.५१/८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, वार्ड क्र.३६ बारी कॉलनी अंतर्गत रस्त्याचे सिमेंट लींग (                              ) करणे बाबतच्या कामासाठी अंदाजपत्रक

र.रु.१,०५,९७०/- चे सन १९८९-९० च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डी.एस.आर.दराप्रमाणे तयार करण्यांत आले आहे. सदरील खर्च भांडवली रस्ते या सदराखाली करण्यांत येईल. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.३६ बारी कॉलनी अंतर्गत रस्त्याचे सिमेंट लिंग करणे बाबतच्या कामासाठी तयार करण्यात आलेले र.रु.१,०५,९७०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.५२/९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, वार्ड क्र.३३ विजय टी, हाऊस ते शहागंज पाण्याच्या टाकी पर्यंतच्या रस्त्याचे बाजुला गल्लीसह डांबरीकरण करणे बाबतच्या कामासाठी अंदाजपत्रक र.रु.१,०१,१५०/- चे सन १९८९-९० च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डी.एस.आर.दराप्रमाणे तयार करण्यांत आले आहे. सदरील खर्च भांडवली रस्ते या सदराखाली करण्यांत येईल. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.३३ विजय टी.हाऊस ते शहागंज पाण्याच्या टाकी पर्यंतच्या रस्त्याचे बाजुला गल्लीसह डांबरीकरण करणे बाबतच्या कामासाठी तयार करण्यांत आलेले र.रु.१,०१,१५०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.५३/१० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, स्थायी समिती बैठक दि.०८.०२.८९ विषय क्र.९००/३७ अन्वये त्रिमुर्ती हौसिंग सोसायटी अंतर्गत भावसिंगपुरा येथे खडी रस्ता तयार करण्याच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रु.१,३०,५००/- ला मंजूरी मिळालेली (आहे) होती. त्यानुसार स्थायी समिती दि.२१.०३.८९ विषय क्र.५१/१०४३ अन्वये टेंडर मंजूर झाल्यानुसार पॉल कन्स्ट्रक्शन १७.८०% कमी दराने काम करीत आहे.

या सोसायटी अंतर्गत ५०" फुट डी.पी.रस्ता जात आहे. या कामास सुमारे र.रु.८७,७२०/- खर्च येईल.

त्रिमुर्ती हौसिंग सोसायटी अंतर्गत खडी रस्त्याचे मुळ गुत्तेदार मे.पॉल कन्स्ट्रक्शन हे मंजूर दराप्रमाणे म्हणजे १७.८०% कमी दराने काम करण्यास तयार आहेत. तरी प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे त्रिमुर्ती हौसिंग सोसायटी भावसिंगपुरा येथील सोसायटी अंतर्गत ५०" फुट डी.पी.रस्त्याचे कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रु.८७,७२०/- च्या अंदाजपत्रकास व सदरील काम मे.पॉल कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.८०% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.५४/११ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, एम.आय.डी.सी.चिकलठाणा येथील अंतर्गत रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९८९-९० चे सार्वजनिक बांधकाम

खात्याच्या डी.एस.आर.दराप्रमाणे र.रु.१०,४७,४२५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरचा खर्च "भांडवली रस्ते" या सदरातून करण्यात येईल. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दर्शविल्याप्रमाणे एम.आय.डी.सी. चिकलठाणा अंतर्गत रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेले र.रु.१०,४७,४२५/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.५५/१२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.शहानुरवाडी येथील शकुंतला गृह निर्माण संस्था अंतर्गत खडी रस्ता तयार करणेच्या कामासाठी सन १९८९-९० च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डी.एस.आर.दराने रक्कम रु.१,३०,१४४/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरचा खर्च "भांडवली रस्ते" या सदरातून करण्यात येईल.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.शहानूरवाडी येथील शकुंतला गृहनिर्माण संस्था अंतर्गत खडी रस्ता तयार करणे कामासाठी तयार करण्यात आलेले र.रु.१,३०,१४४/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.५६/१३ :**

शहर अभियांत यांनी प्रस्ताव सादर केला की, जयविश्वभारती कॉलनी येथील यांत्रिकी विभाग क्र.२ ते खैरटकर यांचे घरापर्यंत रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९८९-९० चे सा.बा.खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.१,९५,४८०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदरचा खर्च "विकास योजना रस्ते" या सदरातून करण्यात येईल. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जयविश्वभारती कॉलनी येथील यांत्रिकी विभाग क्र.२ ते खैराटकर यांचे घरापर्यंत रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेले र.रु.१,९५,४८०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.५७/१४ :**

शहर अभियंता यांना प्रस्ताव सादर केला आहे की, खोकडपुरा येथील अंतर्गत रोडचे रिसरफेसिंग करणेच्या कामासाठी सन १९८९-९० चे सा.बा.खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.१,६९,५७५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदरचा खर्च "भांडवली रस्ते" या सदरातून करण्यात येईल. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे खोकडपुरा येथील अंतर्गत रोडचे रिसरफेसिंग करणेच्या कामाकरिता र.रु.१,६९,५७५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.५८/१५ :**

शहर अभियंता यांना प्रस्ताव सादर केला की, परिमल सह.संस्थे अंतर्गत खडी रस्त्याचे रिसरफेसिंग करणेच्या कामासाठी सन १९८९-९० चे सा.बा.खात्याचे

डी.एस.आर.दराने र.रु.१,८६,०४१/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरचा खर्च "भांडवली रस्ते" या सदरातून करण्यात येईल.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे परिमल सह.संस्थे अंतर्गत खडी रस्त्याचे कामा करणेसाठी र.रु.१,८६,०४१/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.५९/१६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, अलंकारगृहनिर्माण संस्था (गारखेडा) अंतर्गत रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९८९-९० चे सा.बा.खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.१,४१,९१३/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरचा खर्च "भांडवली रस्ते" या सदरातून करण्यात येईल.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अलंकार गृहनिर्माण संस्था (गारखेडा) अंतर्गत रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी र.रु.१,४१,९१३/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.६०/१७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, उल्कानगरी (गारखेडा) येथील अंतर्गत डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९०-९१ चे सा.बा.खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.५१,४८९/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरचा खर्च "भांडवली रस्ते" या सदरातून करण्यात येईल.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे उल्का नगरी (गारखेडा) येथील अंतर्गत रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी र.रु.१,५१,४८९/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.६१/१८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, "गोपाल टी" हाऊस ते पीरबाजार पर्यंत रोडचे रिसरफेसिंग करणेच्या कामासाठी सन १९९०-९१ चे सा.बा.खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.१,७६,७७९/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदरचा खर्च "भांडवली रस्ते" या सदरातून करण्यात येईल. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गोपाळ टी हाऊस ते पीरबाजार पर्यंत रोडचे रिसरफेसिंग करणेच्या कामासाठी रक्कम रु.१,७६,७७९/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.६२/१९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, बीड रोड येथील जकात नाक्या शेजारी डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९०-९१ चे सा.बा.खात्याचे

डी.एस.आर.दराने र.रु.१,२८,९०१/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदरचा खर्च "भांडवली रस्ते" या सदरातून करण्यात येईल.

प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बीड रोड येथील जकात नाक्या शेजारी डांबरीकरण करणेच्या कामासाठी र.रु.१,२८,९०१/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.६३/२० :**

सहाय्यक आयुक्त महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला की, न्यायालयाची बरीच प्रकरणे प्रलंबित आहेत. तसेच कार्यालयात पण बरीचशी प्रकरणे विधी सल्लागार यांचे मत घेण्यासाठी विविध विभागातून येतात. प्रकरणात लेखी जवाब तयार करावा लागतो. महानगरपालिकेच्या सर्व मिटींगमध्ये हजर राहावे. ही सर्व कामे एकट्या विधी सल्लागार यांनी करावी लागतात ही कामे एकाचवेळी घेणे शक्य होत नाही. करीता जेष्ठ लिपिकाचे एकूण पदापैकी एक पद कमी करुन विधी सहाय्यक हे पद जेष्ठ लिपिकाच्या वेतनश्रेणीत केल्यास महानगरपालिकेवर आर्थिक बोजा पडणार नाही व कार्यालयीन दैनंदिन कामात अडथळा होणार नाही. विधी सहाय्यक पदावर विधी पदवीधारक व न्यायालयाचे काम हाताळणे बाबत अनुभवी उमेदवारांची नियुक्ती करण्यांत येईल.

तरी प्रस्ताव मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ कलम ५१ (२) अन्वये मंजूरीस्तव सादर.

<u>**संवाद :**</u>

**श्री.केशव सोनवणे :** विधी विभागाशी संबंधित प्रस्ताव आहे व विधी सल्लागार हे सभागृहात नाहीत.

**मा.सभापती :** विधी सल्लागार हे कार्यालयीन कामानिमित्त परगावी गेलेले आहेत. म्हणून सभेत हजर नाहीत.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** या पदाकरिता विधी विषयाच्या पदवीधर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यांत यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विधी विभागातील दिवसेंदिवस वाढणारा कामाचा व्याप लक्षात घेता जेष्ठ लिपीक श्रेणीतील एकत्रित पदापैकी एक पद कमी करुन तत्सम श्रेणीतील कार्यालयीन विधी पदवीधर कर्मचाऱ्यांतून जेष्ठतेनुसार "विधी सहाय्यक" हे पद कायम करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. सर्वसाधारण सभेस शिफारस करण्यात येते.

**विषय क्र.६४/२१ :**

उप अभियंता झोपडपट्टी सुधारणा यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.नागसेन नगर व कबीर नगर येथे २० मी.मी.जाडीचे मिक्स सिल सरफेस करणेच्या कामासाठीचे अंदाजपत्रक र.रु.२,०३,३००/- चे तयार करण्यात आले आहे. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.नागसेन नगर व कबीर नगर येथे २० मी.मी.जाडीचे मिक्स सिल सरफेस करणेच्या कामाकरिता र.रु.२,०३,३००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.६५/२२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, जवाहर कॉलनी येथील आकाशवाणी ते त्रिमुर्ती चौक रस्त्यावर मध्ये दुभाजक बांधणेच्या कामासाठी सन १९८९-९० चे सा.बा.खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.१,८१,६७१/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरचा खर्च "विकास योजना रस्ते" या सदरातून करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जवाहर कॉलनी येथील आकाशवाणी ते त्रिमुर्ती चौक रस्त्यावर मध्ये दुभाजक बांधणेच्या कामासाठी र.रु.१,८१,६७१/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.६६/२३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, जवाहर कॉलनी येथील आकाशवाणी ते त्रिमुर्ती चौक रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९८९-९० चे सा.बा.खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.८,७९,८०३/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरचा खर्च "विकास योजना रस्ते" या सदरातून करण्यात येईल.

प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जवाहर कॉलीन येथील आकाशवाणी ते त्रिमुर्ती चौक रस्त्याचे डांबरीकरण च्या कामासाठी रक्कम रु.८,७९,८०३/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.६७/२४ :**

मा.आयुक्त यांचे दि.०५.०६.९० चे कार्यालयीन आज्ञापन अन्वये श्री.जी.बी. सोनी यांना उपअभियंता या पदावरुन पदावन्नत केल्याने त्यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (४) अन्वये मुदतीच्या आत मा.आयुक्त यांचे आज्ञापना विरुध्द स्थायी समिती सभागृहापुढे दाद मागितली आहे. तद्अनुषंगाने श्री.जी.बी.सोनी यांनी दाखल केलेले अपील विचारार्थ सादर.
(सोबत : संबंधितांचे स्पष्टीकरण संलग्नीत केले आहे.)

<u>**संवाद :**</u>

**श्री.मोहमंद इस्माईल, श्री.प्रदिप जैस्वाल :** मा.आयुक्तांनी या संबंधी जो निर्णय घेतला तो योग्य आहे काय? योग्य असल्यास ते सर्व नियमांना धरुन केले काय? तसे असल्यास सदरचा प्रस्ताव स्थायी समिती समोर ठेवण्याचे प्रयोजन काय?

**उपआयुक्त :** कर्मचाऱ्यांचे चुकीचे मूल्यमापन करुन त्याप्रमाणे मा.आयुक्त हे कार्यवाही करतात. हया कार्यवाही विरुध्द स्थायी समिती मध्ये अपील होते. व त्यानंतर सर्वसाधारण सभेत अपील करता येते. ही अपीलाची पध्दत आहे.

**श्री.केशव सोनवणे :** प्रशासनाने संबंधितांवर कशा प्रकारचे आक्षेप लावले त्याची माहिती सभागृहास द्यावी म्हणजे त्यावर विचार करता येईल.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** मा.आयुक्त यांनी याबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीकडे पाठवावयास पाहिजे.

**मा.सभापती :** अर्जदारांनी अपील स्थायी समितीकडे केलेले आहे.

**श्री.कचरु सोनवणे, श्री.केशव सोनवणे :** संबंधितास नियमाप्रमाणे नोटीस देण्यात आली का?
**श्री.स.अहमद एकबालोद्दीन :** संबंधितास पदावन्नत करण्याचे कारण काय?
**मा.सभापती :** श्री.जी.बी.सोनी केलेले अपील व प्रशासनाने त्यांच्यावर काय कार्यवाही केली या बाबत विशेष बैठक घेवून निर्णय घेण्यांत येईल.

**ठराव :**

श्री.जी.बी.सोनी यांच्या अपीलावर चर्चा करण्याकरिता स्थायी समितीची विशेष बैठक घेऊन त्यावर निर्णय घेण्यांत यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.६८/२५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, हरीत औरंगाबाद योजने अंतर्गत सिडकोस्थित सुदर्शन नगर (जळगांव रोड) ते हर्सुल पर्यंत वृक्ष संवर्धक काटेरी तारेचे कुंपण करण्याकरिता र.रु.३,३९,७५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. दि.०६.०६.९० रोजी अल्प मुदतीची निविदा जाहीर प्रगटनाद्वारे प्रसिध्दीस दिली असता एकूण ९ (नऊ) निविदा विकल्या गेल्या पैकी दोन दरनिर्दिष्ट निविदा वसुल झाल्या त्या खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.आर.ए.शेख | - | ४.९०% जास्त |
| २. | श्री.एस.ए.नवाब | - | ७% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या ठेकेदार श्री.आर.ए.शेख यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९०% जास्त दराची निविदा कमी दराची आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे "हरीत औरंगाबाद योजने" अंतर्गत सिडकोस्थित सुदर्शन नगर (जळगांव रोड) ते हर्सुल पर्यंत वृक्ष संवर्धक काटेरी तारेचे कुंपन करण्याकरिता र.रु.३,३९,७५०/- च्या अंदाजपत्रकास व तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे श्री.आर.शेख यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९०% जास्त दराच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.६९/२६ :**

जलगृह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सन १९९०-९१ वर्षाकरिता एसी.प्रेशर पाईप्स व सी.आय.डी.जाईन्टस खरेदी करण्यासाठी र.रु.४१,७२,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९०-९१ वर्षाकरिता एसी.प्रेशर पाईप्स व सी.आय.डी.जाईन्टस खरेदी साठी र.रु.४१,७२,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७०/२७ :**

जलगृह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सन १९९०-९१ वर्षाकरिता ॲलम फेरीक (तुरटी) खरेदी करण्याबाबतचे रक्कम रु.१,४०,५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९०-९१ वर्षाकरिता ॲलम फेरीक (तुरटी) खरेदी करण्याकरिता रक्कम रु.१,४०,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७१/२८ :**

जलगृह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सन १९९०-९१ वर्षाकरिता सी.आय.स्पेशल्स खरेदी करण्याकरिता र.रु.३,८९,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९०-९१ वर्षाकरिता सी.आय.स्पेशल्स खरेदी करण्याकरिता र.रु.३,८९,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७२/२९ :**

जलगृह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सन १९९०-९१ वर्षाकरिता ब्लिचिंग पावडर खरेदी करण्याकरिता र.रु.३,१४,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९०-९१ वर्षाकरिता ब्लिचिंग पावडर खरेदी करण्याकरिता रक्कम रु.३,१४,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७३/३० :**

जलगृह अभियंता (१) यांनी प्रस्ताव सादर केला की, कार्यालयातर्फे पडेगांव, चिकलठाणा, व मुकूंदवाडी येथे पाणीपुरवठा व्यवस्थेसाठी एकंदर र.रु.३६,००,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त झालेल्या विशेष अनुदानातून करावयाचा आहे. मनपा सर्वसाधारण सभेमध्ये ठराव क्र.५४, दि.२०.११.८९ अन्वये रक्कम रु.३६,००,०००/- ला मंजूरी मिळालेली आहे.

सदरील तिन्ही ठिकाणी सी.आय.लाईन टाकण्याच्या कामासाठी स्वतंत्ररित्या जाहिररित्या निविदाही मागविण्यांत आल्या असून एजन्सी ठरावही झाला आहे.

सदरच्या कामासाठी जाहिर निविदा सी.आय.एल.ए.पाईप खरेदी साठी निविदा मागविण्यांत आल्या असता निविदा स्विकारणेच्या दिनांकास (२२.०१.९०) ५.३० वाजेपर्यंत एकच मे.इस्को उज्जैन पाईप ॲण्ड फॉऊन्ड्री कं.मुंबई यांची निविदा कार्यालयात प्राप्त झाली असून उपस्थितांसमोर सदरील निविदा उघडली असता सदरील निविदेतील दर हे पुढील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | साईज | परिणामा | दर प्रती मिटर | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | १०० मी.मी.व्यासाची | ६००० मीटर | १६०.५० प्र.मी. | ९,६३,४२०.०० |
| २ | १५० मी.मी.व्यासाची | १२०० मीटर | २३७.२५ प्र.मी. | २,८४,७००.०० |
| ३ | २०० मी.मी.व्यासाची | १८०० मीटर | ३४५.५९ प्र.मी. | ४,४२,०६२.०० |
| ४ | २५० मी.मी.व्यासाची | ५०० मीटर | ४६५.६६ प्र.मी. | २,३२,८३०.०० |
| ५ | ३०० मी.मी.व्यासाची | ३०० मीटर | ६००.४८ प्र.मी. | १,८०,१४४.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | ३५० मी.मी.व्यासाची | ३०० मीटर | ७५७.१४ प्र.मी. | २,२७,१४२.०० |
| | **एकूण रुपये** | | | **२३,३०,२९८.००** |

तरी वर दिल्याप्रमाणे इस्को उज्जैन पाईप अँण्ड फाऊन्ड्री कं.मुंबई यांचे निविदेस मंजूरी मिळणेस्तव प्रकरण विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पडेगांव, चिकलठाणा व मुकूंदवाडी येथे पाणी पुरवठा व्यवस्थेसाठी सी.आय.(लोखंडी) जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता सी.आय.एल.ए.पाईप खरेदीसाठी मे.इस्को उज्जैन पाईप ॲण्ड फाऊन्ड्री क.मुंबई यांच्या खालील दराच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

| अ.क्र. | साईज | परिणामा | दर प्रती मिटर | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | १०० मी.मी.व्यासाची | ६००० मीटर | १६०.५० प्र.मी. | ९,६३,४२०.०० |
| २ | १५० मी.मी.व्यासाची | १२०० मीटर | २३७.२५ प्र.मी. | २,८४,७००.०० |
| ३ | २०० मी.मी.व्यासाची | १८०० मीटर | ३४५.५९ प्र.मी. | ४,४२,०६२.०० |
| ४ | २५० मी.मी.व्यासाची | ५०० मीटर | ४६५.६६ प्र.मी. | २,३२,८३०.०० |
| ५ | ३०० मी.मी.व्यासाची | ३०० मीटर | ६००.४८ प्र.मी. | १,८०,१४४.०० |
| ६ | ३५० मी.मी.व्यासाची | ३०० मीटर | ७५७.१४ प्र.मी. | २,२७,१४२.०० |

यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा.सभापतींनी जाहिर केले.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
मा.सभापती, स्थायी समिती
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक २३ जुलै, १९९० रोजी भरलेल्या स्थायी समिती सभेचा इतिवृत्तांत.**

**सोमवार दिनांक २३ जुलै, १९९० रोजी दुपारी ३.०० वाजता समिती सभागृहात मा.सभापती श्री.रतनकुमार पंडागळे यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभेस सुरुवात झाली. या सभेमध्ये कार्यालयीन अधिकाऱ्यांसह निम्ननिर्दिष्ट स.सभासद उपस्थित होते.**

१. श्री.प्रदिप जैस्वाल
२. श्री.केशव सोनवणे
३. श्री.कचरु नवपुते
४. श्री.शंकर मगर
५. श्री.स.अ.इकबालेद्दीन
६. श्री.प्रभाकर विधाते
७. श्री.गजानन बारवाल
८. श्री.मो.इस्माईल अ.करीम
९. श्री.इकबालसिंग गील
१०. श्री.गंगाधर गाडे

**विषय क्र.७४/१ :**

दि.११.०७.९० रोजी संपन्न झालेल्या गत स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री.प्रदिप जैस्वाल, श्री.कचरु नवपुते :** या विषय पत्रिकेवर असलेल्या विषयाशी संबंधित सर्व अधिकारी या सभेस उपस्थित आहेत काय?

**मा.सभापती :** आजच्या विषयपत्रिकेवर असलेल्या विषयाशी संबंधित सर्व अधिकारी या सभेत उपस्थित आहेत.

**श्री.कचरु नवपुते :** गत सभेत ठरल्याप्रमाणे स्थायी समितीमध्ये मंजूर झालेल्या कामापैकी ए-१ ऐवजी बी-१ निविदावर करुन घेतलेल्या कामाची माहिती उपलब्ध आहे काय?

**मा.सभापती :** आगामी बैठकीपुर्वी आपणांस सदरची माहिती देण्यात येईल.

**श्री.केशव सोनवणे, श्री.कचरु नवपुते :** या माहिती बाबत बराच कालावधी लोटला असून अद्यापपर्यंत माहिती उपलब्ध झालेली नाही. ती उपलब्ध होणे आवश्यक आहे.

**श्री.इकबालसिंग गिल श्री.स.अहमद एकबालोद्दीन :** यावरुन असे निदर्शनास येते की, सभापती हे कार्यालयीन कर्मचाऱ्यांची बाजू घेत आहेत.

**मा.सभापती :** सदरील माहिती आगामी बैठकीपुर्वी दोन दिवस अगोदर देण्यात येईल.

**श्री.केशव सोनवणे, श्री.कचरु नवपुते :** गत सभेच्या इतिवृत्तामधील पाईपच्या संदर्भात विचारलेल्या प्रश्नांची माहिती सभागृहास देण्यात येईल काय?

**मा.सभापती :** सर्व स.सभासद अधिकारी व पत्रकार यांनी सदरील पाईपची प्रत्यक्ष पाहणी केलेली आहे. करिता आपण सर्वांनी याबाबत काय निर्णय घेतला ते कळाले तर मला योग्य निर्णय घेता येईल.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** आपण सर्वांनी आयातीत पाईपची प्रत्यक्ष स्थळावर पाहणी केलेली आहे. पाईपच्या (क्वालिटी) दर्जामध्ये फरक आहे. त्या संदर्भात संबंधित कंपनीस कळविणे आवश्यक आहे.

**श्री.स.अ.इकबालोद्दीन :** सदरील पाईप निकृष्ट दर्जाचे आहेत. या पाईप मध्ये निर्धारित नियमान्वये लोखंडाचे प्रमाण आहे काय?

**श्री.मो.इस्माईल, श्री.गंगाधर गाडे :** या सभेच्या उर्दू विषय पत्रिकेसाबत गत सभेचा इतिवृत्तात का दिला नाही? इतिवृत्त दिले नाही याचा अर्थ सभागृहापासून काही तरी लपवता आहात.

**मा.सभापती :** उर्दू करणासाठी नवीन नेमणूक झालेली आहे. आगामी बैठकीत विषय पत्रिकेसह इतिवृत्त हस्तांतर केले जाईल.

**श्री.कचरु नवपुते :** स.सदस्य श्री.मुजाहेद यांनी दिलेल्या पत्रानुसार ज्या कंपनीकडून सदरील पाईप खरेदी करण्यांत आले आहेत. ती कंपनी आय.एस.आय.मार्क आहे का? त्या आयातीत पाईपमध्ये लोखंड व सिमेंट यांचे प्रमाण काय आहे?

**मा.सभापती :** या बाबत कार्यकारी अभियंता यांनी खुलासा करावा.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.व.ज.नि.) :** आयातीत पाईपची आय.एस.आय.व्यवस्थापनाने प्रमाणित केल्याप्रमाणे पाईपचे वजन केले जाते. संकल्पनेप्रमाणे पाईपचे वजन बरोबर आहे. या संदर्भात स.सदस्यास काही शंका असल्यास सदरील पाईप आय.एस.आय.को चौकशी करुन तपासणी करीता पाठविण्यांत येईल. क्वालिटी कंट्रोल मार्फत सदरच्या पाईपची प्रत/दर्जा तपासणी करण्यास हरकत नाही.

**श्री.कचरु नवपुते :** निविदाप्रमाणे खरेदी केलेले पाईप बरोबर आहेत काय? ६०० एम.एम.पाईप मध्ये किती लोखंड असते.

**कार्यकारी अभियंता,(पा.पु.ज.नि.) :** ज्या वेळेस कंपनीत पाईप तयार होतात. त्या वेळेस लोखंडाचे वजन केले जाते.

**श्री.स.अ.इकबालोद्दीन :** आपण खरेदी केलेल्या पाईप पैकी एक पाईप फोडून त्यातील लोखंडाचे वजन व परिक्षण करण्यात यावे.

**श्री.गंगाधर गाडे :** निविदामध्ये नमूद केलेल्या अटीप्रमाणे आयातीत पाईपचा दर्जा/प्रत आहे काय?

**श्री.स.अ.एकबालोद्दीन :** पाईप तपासणी व परिक्षणा करिता कोठे पाठविले जातात.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.व.ज.नि.) :** सदरील पाईप हे एम.एस.एस.आय.डी.सी.या शासनाच्या अंगीकृत संस्थेकडून खरेदी केलेले आहेत. ते आय.एस.आय.मार्कचे आहेत. म्हणून आपण केव्हाही खरेदी केलेल्या पाईपमधून एखादा पाईप फोडून त्याची तपासणी व वजन करु शकतो.

**मा.सभापती :** आयात झालेल्या पाईपांपैकी एक पाईप सर्वासमक्ष फोडून त्यातील लोखंड व सिमेंट इ.चे परिमाण परिक्षण करु.

**श्री.मो.इस्माईल :** या आर्थिक वर्षात रस्त्याच्या कामाकरिता अंदाजपत्रकात किती तरतूद ठेवण्यात आली आहेत? आज काय परिस्थिती आहे?

**शहर अभियंता :** या वर्षाच्या अर्थसंकल्पीय तरतूदी अन्वये रस्त्यांकरिता एकूण रु.१.२५ कोटीची तरतूद करण्यता आलेली आहे. त्यापैकी एक कोटी रु. विकास रस्त्याकरिता व २५ लाख रुपये कॅपीटल अकौंट रोड या करिता तरतूद आहे.

**श्री.गंगाधर गाडे :** स्थायी समिती सभेस विश्वासात घेऊन ही अर्थसंकल्पीय विभागणी केली आहे काय?

**श्री.मोहमंद इस्माईल :** रस्त्यांकरिता अंदाजपत्रकात करण्यात आलेली तरतूद संपली असे वाटते.

**शहर अभियंता :** गतवर्षी विकास रस्त्याच्या कामाकरिता रु.९३ लाख खर्च झाले असून यावर्षी रक्कम रु.१ कोटीची अंदाजपत्रकीय तरतूद करण्यात आली आहे.

**श्री.मो.इस्माईल :** मागील वर्षाच्या कामावर या वर्षाच्या अंदाजपत्रकातून खर्च होणार असेल तर यावर्षी नवीन रस्त्यांची कामे हाती घेता येणार नाहीत. त्यामुळे आमच्या वार्डातील प्रलंबित कामे होणार नाहीत.

**श्री.गंगाधर गाडे :** शहरा अंतर्गतच्या रस्त्याची कामे अग्रक्रमाने हाती घेणे आवश्यक आहे.

**श्री.इकबालसिंग गिल, श्री.स.अ.एकबालोद्दीन :** शहरातील संपूर्ण विकास रस्त्याची कामे अर्धवट पडलेली आहेत. रस्त्यांमध्ये बाधित होणाऱ्या मालमत्ता तोडल्या जातात. व कामे प्रलंबित राहतात.

**शहर अभियंता :** शहरातील विकास रस्त्याची कामे चालू आहेत पण काही तांत्रिक अडचणीमुळे एखाद्या कामास विलंब होतो.

**श्री.केशव सोनवणे :** गत मिटींगमध्ये ठरल्याप्रमाणे सिडकोच्या रस्त्यामध्ये आलेली पाईप लाईन बदल्याबाबत काय झाले कारण सिडकोतर्फे त्या रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे काम लवकरच हाती घेतले जाईल.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.ज.नि.) :** त्या पाईप लाईन बदलण्याबाबत सिडको प्रशासनाकडे पत्रव्यवहार चालू आहे.

**श्री.एकबालसिंग गील :** मार्च महिन्यांत सदस्य स्वेच्छा निधीतून विहीरीवर मोटार बसविण्याचा जो प्रस्ताव मंजूर झाला होता. तो रद्द करण्यात यावा व त्या शिल्लक रकमेचा खर्च इतर कामासाठी करण्यात यावा.

**कार्यकारी अभियंता :** तत्संबंधी माझ्याकडे प्रस्ताव आलेला असून त्यावर कार्यवाही चालू आहे.

**श्री.गंगाधर गाडे :** म.फुले नगर मधील लोकांची घरे पावसाने पडली आहेत. त्या घराच्या मालकास त्याचा मोबदला देण्यात यावा असे ठरले होते. त्याबाबत काय कार्यवाही झाली?

**मा.सभापती :** कोणत्या मिटींगमध्ये सदर प्रस्ताव मंजूर झाला. याचा संदर्भ द्यावा. म्हणजे विचार करण्यांत येईल.

**श्री.गंगाधर गाडे :** आपल्याकडे याबाबत नोंद घेण्यात आलेली आहे. त्यावर काय कार्यवाही झाली? याचा खुलासा व्हावा.

**मा.सभापती :** या प्रकरणात सविस्तर माहिती व दिनांक कळवावा म्हणजे चौकशी करुन उत्तर देण्यांत येईल.

**ठराव :**

उक्त चर्चेअंती ठराव क्र.६३ अंतर्गत निर्दिष्ट तत्समश्रेणी हा शब्द वगळून जेष्ठ लिपीक श्रेणीतील एकत्रित पदापैकी एक पद कमी करुन विधी पदवीधर व अनुभवी कर्मचाऱ्यांतून जेष्ठतेनुसार विधी सहाय्यक हे पद कायम करणेस्तव सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. सर्वसाधारण सभेस शिफारस करण्याची आवश्यकता नाही. हया दुरुस्तीसह दि.११.०७.९० रोजी संपन्न झालेल्या गत स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७५/२ :**

वार्ड क्र.४१ मो.खोकडपुरा येथे १५० मी.मी.व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र.रु.४०,५०७/- ला स्थायी समितीचा ठराव क्र.७४, दि.२९.०६.८९ अन्वये मंजूरी मिळाली आहे. सदर कामासाठी निविदा सूचना क्र.५/४३२६/९० एकूण चार निविदा विकण्यात आल्या. पैकी केवळ एकच निविदा १९.१०% कमी दराची श्री.स.रफीउद्दीन यांची वसुल झाली. परंतू सदर दर हे फारच कमी असल्यामुळे मा.आयुक्त साहेब यांनी दि.२०.०९.८९ द्वारे फेरनिविदा मागवावे असा आदेश दिला. तद्नंतर सदर कामासाठी निविदा सूचना क्र.१२, दि.२७.११.८९ द्वारे दुसऱ्यांदा मागविण्यात आल्या असता एकूण दोन निविदा वसुल झाल्या. पैकी कमी दराची म्हणजे २२.३२% कमी दराची श्री.एस.बी.इंगळे यांची निविदा होती. परंतू संबंधित गुत्तेदार यांनी दि.१६.०१.९० ला पत्र देऊन काम न करण्यास संमती दर्शविली आहे. करिता मा.आयुक्तांचे दि.०९.०२.९० नुसार फेर निविदा मागवाव्या असा आदेश दिला. त्या अनुषंगाने कार्यालयीन निविदा सूचना क्र.१९/२५६/९०, दि.०६.०३.९० द्वारे तिसऱ्यांदा बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण तीन निविदा वसुल झाल्या. त्याचा तुलनात्मक दर खालीलप्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.सा.सिराजुद्दीन | - | ४.२५% जास्त |
| २. | श्री.आनंद बिल्डर्स | - | ४.९८% जास्त |
| ३. | श्री.जरिवाला | - | ९% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.२५% जास्त दराचे श्री.स.सिराजुद्दीन यांचे दर पत्रक आहे. परंतू संबंधित गुत्तेदार यांना आपल्या दरात सुधारणा करण्या करिता कार्यालयीन प.क्र.२४८/दि.२०.०४.९० ला पत्र देण्यात आले होते. संबंधिताने दि.२३.०४.९० ला पत्र देऊन काम अंदाजपत्रकीय दराने करण्यास संमती दिली आहे. करिता श्री.स.सिराजुद्दीन यांच्या अंदाजपत्रकीय दरास मंजूरीस्तव प्रस्ताव सादर.

**संवाद :**

**श्री.कचरु नवपुते :** सदर कामाकरिता दोन वेळेस कमी दराच्या निविदा प्राप्त झाल्या परंतू तिसऱ्यांदा मागविलेल्या निविदा जास्त दराच्या कशा हयाचा खुलासा व्हावा.

**उपअभियंता (ज.नि.) :** या कामाकरिता एकच निविदा प्राप्त झाल्यामुळे मा.आयुक्तांनी त्या निविदाचे दर मंजूर केले नाही.

**श्री.कचरु नवपुते, श्री.गंगाधर गाडे :** कमी दराच्या निविदा आल्या तर मा.आयुक्त त्या नामंजूर करतात व जास्त दराच्या निविदा आल्या तर त्या मंजूर करतात असे का होते?

**कार्यकारी अभियंता :** कमी दराच्या निविदा मंजूर केल्या तर काम चांगल्या प्रतीचे होत नाही. म्हणून कमी दराची निविदा स्विकारली नाही.

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी यांनी केलेला खुलासा समाधानकारक आहे प्रशासनाचे आर्थिक नुकसान होणार नाही. या बाबतीत सतर्क राहणे यापुढे योग्य ती खबरदारी घेण्यांत यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.४१ मो.खोकडपुरा येथे १५० मी.मी.व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता गुत्तेदार श्री.सय्यद सिराजुद्दीन यांनी लेखी संमती दिल्याप्रमाणे अंदाजपत्रकीय दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७६/३ :**

वार्ड क्र.१८ मो.कबाडीपुरा येथे लक्ष्मी वॉच सेंटर समोर ३०० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईनटाकणे बाबत अंदाजपत्रक र.रु.११,६८५/- ला स्थायी समिती ठराव क्र.६३९, दि.३०.०३.९० द्वारे मंजूरी मिळालेली आहे. सदर कामासाठी कार्यालयीन निविदा मागविल्या असता एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.जाफर खान | - | ०.८% कमी |
| २. | श्री.सलीम पटेल | - | ३.५०% जास्त |
| ३. | श्री.इनायत खान | - | ४% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.८% कमी दराचे श्री.जाफर खान यांचे दर पत्रक आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.१८ मो.कबाडीपुरा येथे लक्ष्मी वॉच सेंटर समोर ३०० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे करिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.८% कमी दराचे श्री.जाफर खान यांचे दर पत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७७/४ :**

वार्ड क्र.५१ पदमपुरा येथे गटार बांधणे बाबत अंदाजपत्रक र.रु.६,११२/- ला स्थायी समितीचा ठराव क्र.६३३, दि.३०.०३.९० द्वारे मंजूरी मिळालेली आहे. सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.२/१७५४ द्वारे बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण दोन दरनिर्दिष्ट निविदा वसुल झाल्या त्या खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.जी.जे.सिकची | - | ०.०५% कमी |
| २. | श्री.सय्यद रफिकउद्दीन | - | अंदाजपत्रकीय दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराचे श्री.जी.जे.सिकची यांचे दर पत्रक आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.५१ मो.पदमपूरा येथे गटार बांधणे करिता तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराचे श्री.जी.जे.सिकची यांचे दरापत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७८/५ :**

जलगृह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे काही भागात सी.आय.पाईप्स टाकण्याची कामे हाती घेण्यांत आलेली आहेत. कार्यकारी अभियंता परिसर अभियांत्रिकी विभाग क्र.२ यांचेकडून र.रु.८,६०,४२०/- चे खालील आकाराचे पाईप्स खरेदी करावयाचे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | २५० मी.मी.व्यासाचे | | ५००X५६९ |
| | सी.आय. (एल.ए.) पाईप्स | र.मीटर प्रती र.मीटर | २,८४,५००.०० |
| | १०% सुपरव्हिजन चार्जेस | | २८,४५०.०० |
| २. | ३०० मी.मी.व्यासाची | | ३००X७३४ |
| | सी.आय. (एल.ए.) पाईप्स | र.मीटर प्रती र.मीटर | २,२०,२००.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| | १०% सुपरव्हिजन चार्जेस | | २२,०२०.०० |
| ३. | ३५० मी.मी.व्यासाची | | ३००X९२५ |
| | सी.आय. (एल.ए.) पाईप्स | र.मीटर प्रती र.मीटर | २,७७,५००.०० |
| | १०% सुपरव्हिजन चार्जेस | | २७,७५०.०० |
| | | **एकूण रु.** | **८,६०,४२०.००** |

तरी रक्कम रु.८,६०,४२०/- च्या रकमेस व कार्यकारी अभियंता परिसर अभियांत्रिकी विभाग क्र.२ यांचे कडून सी.आय.पाईप्स खरेदी करणे बाबतचा प्रस्ताव व मंजूरीसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेतर्फे काही भागात सी.आय.पाईप्स टाकण्याच्या कामाकरिता रक्कम रु.८,६०,४२०/- च्या रकमेस व सदरील सी.आय. पाईप्स कार्यकारी अभियंता परिसर अभियांत्रिकी विभाग क्र.२ यांचेकडून खरेदी करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७९/६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, पदमपूरा येथील अंतर्गत रोडचे खडी रस्त्याचे काम करणेसाठी सन १९८८-८९ चे सा.बा.खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.३२,२८८/- चे अंदाजपत्रक स्थायी समिती ठराव क्र.७६२/दि.२४.०४.९० नुसार मंजूरी मिळालेली आहे.

सदर कामासाठी कार्यालयीन निविदा बी-१ नमुन्यात मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.इकबाल अहमद | - | १% कमी |
| २. | श्री.एस.एच.असोशिएट्स | - | ४% जास्त |
| ३. | श्री.आर.एल.बारवाल | - | ५% अधिक |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराची श्री.इकबाल अहमद यांची निविदा आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पदमपुरा येथील अंतर्गत रोडचे खडी रस्त्याचे काम करणेसाठी तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराची श्री.इकबाल अहमद यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.८०/७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, चिकलठाणा येथील सार्वजनिक मुतारीचे बांधकाम करणेसाठी सन १९८९-९० चे सा.बा.खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.१४,५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. मा.आयुक्तांचे आदेशानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.२ दि.२५.०५.९० नुसार बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण सहा दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.आर.एल.बारवाल | - | २१.९४% कमी |
| २. | श्री.इ.बी.पठाण | - | १८% कमी |
| ३. | श्री.अे.के.अरोरा | - | १८% कमी |
| ४. | श्री.आनंद बिल्डर्स | - | १७.६% कमी |

५. श्री.सय्यद आलम हुसेन - ११.२% कमी
६. सुखबीरसिंग - ८.२५% कमी

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.९४% कमी दराची श्री.आर.एल.बारवाल यांची निविदा आहे. सदर निविदेस व रक्कम रु.१४,५००/- ला मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चिकलठाणा येथे सार्वजनिक मुतारीचे बांधकाम करणेसाठी रु.रुपये १४,५००/- च्या खर्चास व सदर कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.९४% कमी दराच्या श्री.आर.एल.बारवाल यांच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.८१/८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, शहरातील पॅचवर्कसाठी खडी पुरवठा करणेच्या कामासाठी र.रु.२६,९००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र.६-१ दि.२६.०३.९० नुसार मंजूरी मिळालेली आहे. सदर कामासाठी बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण सहा दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे

१. श्री.आर.एल.बारवाल - २१.८०% कमी
२. मे.शैलेस कन्स्ट्रक्शन - २१.१% कमी
३. मे.आनंद बिल्डर्स - १९.६% कमी
४. मे.सय्यद आलम हुसेन - १८.८६% कमी
५. सुखबीर सिंग - १६.२५% कमी
६. श्री.सईद खान - १६.९०% कमी

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.८०% कमी दराची श्री. आर.एल.बारवाल यांची निविदा असून मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरातील पॅचवर्क साठी खडी पुरवठा करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.८०% कमी दराच्या श्री.आर.एाल.बारवाल यांच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.८२/९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, नक्षत्रवाडी येथील प्राथमिक शाळेची दुरुस्ती करणेच्या कामासाठी र.रु.४०,१७४/- च्या अंदाजपत्रकास व सा.बा.खात्याचे डी.एस.आर.दराने तयार करुन सदरचे काम दुरुस्तीचे असून तातडीने करुन घेणे असल्यामुळे कार्यालयीन निविदा सूचना क्र.१०, दि.२९.०३.९० नुसार बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण नऊ ९ दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालीलप्रमाणे

१. श्री.प्रकाश एस.केदार - २८.१% कमी
२. श्री.एस.एस.साठे - २५% कमी
३. श्री.सरवदे एस.पी. - २०% कमी
४. श्री.रनबिरसिंग - १७.६% कमी

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | श्री.मे.कॅकवेल कॉन्ट्रक्टर | - | १९.२०% कमी |
| ६. | श्री.मे.पॉल कन्स्ट्रक्शन | - | १५.७८६% कमी |
| ७. | श्री.बी.एम.काथार | - | १५% कमी |
| ८. | श्री.जी.बी.गवळी | - | १३% कमी |
| ९. | श्री.मे.एस.एच.असोशिएटस | - | ११% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २८.१% कमी दराची श्री.प्रकाश एस.केदार यांची निविदा असून सदर निविदेस व र.रु.४०,१७४/- ला मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नक्षत्रवाडी येथील प्राथमिक शाळेची दुरुस्ती करणेच्या कामासाठी रक्कम रु.४०,१७४/- च्या अंदाजपत्रकास व सदर कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २८.१% कमी दराच्या श्री.प्रकाश एस.केदार यांच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.८३/१० :**

उप अभियंता झोपडपट्टी सुधारणा यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.डॉ.आंबेडकर नगर, वार्ड क्र.९ येथे १० बैठकीचे संडास बांधणेबाबत र.रु.१,१२,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदर खर्च झोपडपट्टी सुधारणा या शिर्षकाखाली करण्यात येईल. मंजूरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.९ मो.डॉ.आंबेडकर नगर येथे १० बैठकीचे संडास बांधणेकरिता रक्कम रु.१,१२,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.८४/११ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, वार्ड क्र.२ कोतवालपूरा, मिलकॉर्नर येथे बडीगिरणी, प्राथमिक शाळेसाठी पाण्याची टाकी व दोन स्वच्छता गृह बांधणे बाबतच्या कामासाठी र.रु.३९,०५०/- ला.मा.आयुक्तांची मंजूरी मिळाली आहे. त्यासाठी दि.३१.०५.९० रोजी निविदा मागविल्या असता फक्त एकच निविदा श्री.अब्दुल सलाम यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराची प्राप्त झाली. विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री.प्रदिप जैस्वाल :** अंदाजपत्रकास प्रथम मंजूरी न घेता या कामाकरिता निविदा मागविण्यांत आल्या आहेत. खुलासा व्हावा.

**मा.सभापती :** सदरील काम तातडीच्या स्वरुपाचे असून शाळेतील विद्यार्थी विद्यार्थीनीशी निगडीत आहे. म्हणून अंदाजपत्रक व निविदा एकाच वेळेस मंजूरीस्तव स्थायी समितीकडे आल्या आहेत.

**विषय क्र.८५/१२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, वार्ड क्र.३८ भवानी नगर, अंतर्गत देवी मंदिरासमोर खडी रस्ता तयार करणे बाबतच्या र.रु.२६,०५०/- च्या अंदाजपत्रकास मा.आयुक्तांची मंजूरी मिळाली आहे. सदर कामासाठी दि.३१.०५.९० रोजी निविदा मागविल्या असता श्री.अब्दुल सलाम यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०९% कमी दराची फक्त एकच निविदा प्राप्त झाली. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.३८, भवानीनगर, अंतर्गत देवी मंदिरासमोर खडी रस्ता तयार करणेच्या कामाकरिता र.रु.२६,०५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. सदर कामासाठी फेरनिविदा मागविण्यांत याव्यात असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.८६/१३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, वार्ड क्र.२६ मधील मछली खडक भाग येथे खांडकी दुरुस्ती करणे व नवीन बसविणेच्या कामाकरिता र.रु.४०,५८०/- च्या अंदाजपत्रकास व सदर कामासाठी श्री.अब्दुल सलाम यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी दराच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.८७/१४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, वार्ड क्र.२०, खडकेश्वर येथील पशुसंवर्धन खात्याची ८० फुट डी.पी.रस्त्यात बाधीत होणारी वॉल बांधणेच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दि.३०.०३.९० ठराव क्र.६२३ नुसार र.रु.७८,२४०/- च्या अंदाजपत्रकास मंजूरी प्राप्त झालेली आहे. सदर कामासाठी निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.एस.एच.असोशिएट्स | - | १.५०% जास्त |
| २. | श्री.कुलवंतसिंग | - | ०.५०% कमी |
| ३. | श्री.कैसर खान | - | १% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५०% कमी दराची श्री.कुलवंतसिंग यांची निविदा आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.२० खडकेश्वर येथील पशुसंवर्धन खात्याची ८० फुट डी.पी.रस्त्यात बाधित होणारी वॉल बांधणेच्या कामाकरिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५०% कमी दराच्या श्री.कुलवंतसिंग यांच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.८८/१५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र.४६ औरंगपुरा ते समर्थनगर हया ८० फुट डी.पी.रोडवरील भूषण कॉम्पलेक्सच्या बाजूस असलेल्या स्लॅब कल्व्हेटची रुंदी वाढविणेच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दि.२४.०४.९० ठराव क्र.७४३ नुसार र.रु.१,६९,४८०/- च्या अंदाजपत्रकास मंजूरी प्राप्त झाली आहे. सदर कामासाठी निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी दराची श्री.अब्दुल सलाम यांची निविदा आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.४६ औरंगपुरा ते समर्थनगर हया ८० फुट डी.पी.रोडवरील भुषण कॉम्प्लेक्सच्या बाजूस असलेल्या स्लॅब कल्व्हेटची रुंदी वाढविणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी दराच्या श्री.अब्दुल सलाम यांच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.८९/१६ :**

दशमेशनगर ते स्टेट बँक कॉलनीकडे जाणारा उस्मानपुरा येथील ८० फुट रुंद रस्ता यात नगर भूमापन क्र.१६९३७ ची जमीन क्षेत्र २५५३ चौ.मी. ही बाधित झालेली असून तिचा ताबा महानगरपालिकेने दि.०७.०४.८९ रोजी घेतला असून डांबरी रस्ताही जागेवर तयार करणेत आलेला आहे. जमीन मालक श्री.साबीर अली व आजमखाँ यांनी सदर जमीनीचे सर्व अधिकारपत्र श्री.कमरुद्दीन पिता सरफोद्दीन यांना दिलेले आहेत. सदरील जमिनीचे मूल्यमापन आजचे बाजारभावानुसार केलेले असून वरील संपादित क्षेत्रास र.रु.३,१०,९००/- (तीन लाख दहा हजार नऊशे केवळ) मोबदला श्री.कमरुद्दीन पि.सरफोद्दीन यांना देणेसाठी प्रस्ताव सादर.

**<u>संवाद :</u>**

**श्री.गजानन बारवाल :** या प्रकरणात कोणत्या दराने मोबदला देण्यात आला. हया बाबत खुलासा व्हावा.

**सहा.संचालक, नगर रचना :** या रस्त्यामध्ये बाधित होणाऱ्या जागेच्या मालकास रुपये २०७.५५ प्रति चौ.मीटर या दराने मोबदला दिला आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दशमेश नगर ते स्टेट बँक कॉलनीकडे जाणारा उस्मानपुरा येथील ८० फुट रुंद रस्त्यात नगर भूमापन क्र.१६९३७ चे बांधित क्षेत्र २५५३ चौ.मीटर मनपाने ताब्यात घेऊन रस्ता तयार केल्यामुळे जमीन मालक श्री.साबीर अली व आजमखाँ यांनी अधिकार पत्र दिल्यानुसार श्री.कमरुद्दीन पिता सरफोद्दीन यांना सदरील जमिनीच्या मुल्यमापनानुसार आजचे बाजार भावानुसार रक्कम रु.३,१०,९००/- (तीन लाख हजार नऊशे केवळ) संपादित क्षेत्राचा मोबदला म्हणून अदा करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९०/१७ :**

उप अभियंता पाणी पुरवठा-२ यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.आंबेडकर नगर व गौतमनगर येथे फक्त काही भागातच पाणी वितरण जलवाहिन्या आहेत. त्यामुळे या भागात अपुरा पाणी पुरवठा होतो. परिमाणी तेथील रहिवाशी या भागातील मुख्य जलवाहिनी अनधिकृतरित्या फोडून पाणी वापरतात. सदरील प्रकरण पोलिसांकडे सोपवून सुध्दा परिस्थितीत फरक पडत नाही. या भागातील रस्ते लहान असल्यामुळे तेथे टँकरने पाणी पुरवठा करणे शक्य होत नाही. त्यामुळे आंबेडकर नगर व गौतमनगर भागात सी.आय.१५० मी.मी.व्यासाची व ए.सी.१०० मी.मी.व्यासाची पाईपलाईन टाकण्याच्या कामासाठी

र.रु.५,७८,६९३/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून ठरावास प्रशासकीय मान्यता मिळणेस्तव सादर.

**संवाद :**

**श्री.केशव सोनवणे, श्री.मो.इस्माईल, श्री.प्रदिप जैस्वाल :** प्रशासकीय मान्यता म्हणजे काय याबाबत खुलासा व्हावा.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** कुठल्याही कामाचे अंदाजपत्रक मंजूर करतांना त्यास प्रथम तांत्रिक मान्यता तांत्रिक विभागातर्फे घेण्यांत येणे व नंतर सदरील अंदाजपत्रक आर्थिक तरतूदी करिता प्रशासकीय मान्यतेस्तव मा.आयुक्त यांची मंजूरी घेऊन सभागृहापुढे मंजूरीस्तव देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.आंबेडकर नगर व गौतमनगर येथे सी.आय.१५० मी.मी.व ए.सी.१०० मी.मी.व्यासाची पाणी पुरवठा पाईप लाईन टाकण्याच्या कामाकरिता र.रु.५,७८,६९३/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.९१/१८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, पीरबाजार, उस्मानपुरा येथील अंतर्गत रोडचे डांबरीकरण करणेसाठी र.रु.६४,०००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र.५७९, दि.१५.०३.९० नुसार मंजूरी प्राप्त झाली आहे. सदर कामासाठी "बी-१" नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.एम.एस.जग्गी | - | १५.२५% कमी |
| २. | मे.गुरुनानक इंडस्ट्रीज | - | ५% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.२५% कमी दराची श्री.एम.एस.जग्गी निविदा आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.आंबेडकर नगर व गौतमनगर येथे सी.आय.१५० मी.मी. व ए.सी.१०० मी.मी.व्यासाची पाणी पुरवठा पाईप लाईन टाकण्याच्या कामाकरिता र.रु.५,७८,६९३/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र. ९२/१९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, पीरबाजार, उस्मानपुरा येथील अंतर्गत रोडचे डांबरीकरणाचे काम करणेसाठी र.रु.५,१७,२५५/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र.५४२, दि.२६.०२.९० नुसार मंजूरी मिळालेली आहे. सदरचे कामामधून अगोदर खडी रस्त्याचे काम करणेसाठी बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण अकरा (११) निविदा प्राप्त झाल्या. त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.गिरीश सिकची | - | ३०.८६% कमी |
| २. | मे.पॉल कन्स्ट्रक्शन | - | २८.७८६% कमी |
| ३. | श्री.मो.सलीम | - | २७.७८६% कमी |
| ४. | श्री.बदर बीन सालम | - | २६.८६% कमी |
| ५. | श्री.एस.ए.नवाब | - | २४.१३% कमी |
| ६. | श्री.एम.एम.बेग | - | २२.७८६% कमी |

| | | | |
|---|---|---|---|
| ७. | श्री.कैसर खान | - | २२.५०% कमी |
| ८. | श्री.कुलवंतसिंग | - | २२.१०% कमी |
| ९. | श्री.अब्दुल सलाम | - | २०.२०% कमी |
| १०. | श्री.मनजितसिंग | - | १९.२५% कमी |
| ११. | श्री.एस.एच.असोशिएट्स | - | १०% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०.८६% कमी दराची श्री.गिरीश सिकची यांची निविदा आहे. विचारार्थ सादर.

**संवाद :**

**स.अ.एकबालोद्दीन :** या रस्त्याच्या खडी करणावर किती तरतूद करण्यात आली आहे.

**उपअभियंता :** या कामाअंतर्गत खडी रस्ता तयार करण्याकरिता र.रु.१,९५,२५५/- ची तरतूद करण्यात आली आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बीबीका मकबरा भोवताली खडी रस्ता तयार करणेच्या कामाकरिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०.८६% कमी दराच्या श्री.गिरीश सिकची यांच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.९३/२० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, चिकलठाणा येथील नदीवर पुलाचे बांधकाम करणेच्या कामासाठी र.रु.१,१७,८००/- चे अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र.७३९, दि.२४.०४.९० नुसार मंजूरी मिळालेली आहे. सदर कामासाठी बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण सहा दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.पी.जे.तमखाने | - | २३.७९% कमी |
| २. | श्री.सय्यद सिराजुद्दीन | - | २२.१५% कमी |
| ३. | श्री.सुरेश बी.सादवाणी | - | १८.५% कमी |
| ४. | श्री.अब्दुल सलाम | - | १५.९०% कमी |
| ५. | मे.पॉल कन्स्ट्रक्शन | - | १४.५०% कमी |
| ६. | मे.एस.एच.असोशिएट्स | - | १३% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.७९% कमी दराची श्री.पी.जे.तमखाने यांची निविदा आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चिकलठाणा येथील नदीवर पुलाचे बांधकाम करणेसाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.७९% कमी दराच्या श्री.पी.जे.तमखाने यांच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.९४/२१ :**

जलगृह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र.३६ मो.बायजीपुरा येथे मध्यवर्ती जकात नाका ते मोतीवाला नगर पर्यंत २०० मी.मी.व्यासाची अे.सी.जलवाहिनी टाकणेच्या कामाचे र.रु.१,६०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.

सिडकोतर्फे सदरील ठिकाणी रस्ता रुंदीकरणाचे काम झाल्यामुळे सदरील ठिकाणी अस्तित्वात असलेली जलवाहिनी सतत फुट आहे. व रस्त्यावर पाणी वाहून डांबरी रस्ता खराब होत आहे.

करिता सदरील जलवाहिनी त्वरीत काढून रस्त्याच्या कडेस घ्यावी. असे ठरले आहे. त्या प्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून या अंदाजपत्रकात जुनी लाईन काढणे तसेच नवीन जलवाहिनी टाकणे या बाबींचा समावेश आहे. करिता अंदाजपत्रक र.रु.१,६०,०००/- मंजूरीस्तव व विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री.केशव सोनवणे :** या पाईप लाईन करिता होणारा खर्च हा सिडकोकडून वसुल करण्यांत यावा.

**कार्यकारी अभियंता :** सदरील पाईप लाईन आपल्या मालकीची असून त्याद्वारे मनपा क्षेत्रातील वार्ड क्र.३७ ला पाणी पुरवठा करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.३६ मधील मो.बायजीपुरा येथे मध्यवर्ती जकात नाका ते मोतीवाला नगर पर्यंत २०० मी.मी.व्यासाची अे.सी.जलवाहिनी (जुनी लाईन काढणे व नवीन जलवाहिनी टाकणे) टाकणे च्या कामाकरिता रक्कम रु.१,६०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.९५/२२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, रस्त्याचे खडीकरण, रस्ता, दुभाजक, फुटपाथ व साईड ड्रेनच्या कामाच्या र.रु.१०,९३,७२८/- च्या एकत्रित अंदाजपत्रकास स्थायी समिती सभा ठराव क्र.१०४९, दि.२१.०३.८९ अन्वये मंजूरी मिळालेली आहे. उपरोक्त कामांपैकी खडीकरण व रस्ता दुभाजकाच्या कामाची निविदा यापुर्वीच मंजूर झालेली आहे, आता सिटी क्लब ते भडकल गेट ९७० मीटर लांबीच्या रस्त्यावर साईडड्रेन व फुटपाथचे कामाची अंदाजपत्रकीय र.रु.३,१०,०००/- आहे. हे काम शासनाच्या विकास अनुदानित रकमेतून करावयाचे आहे. सदर कामासाठी प्रगट निविदा मागविल्या असता एकूण आठ दर निर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.फाराज असोशिएटस | - | २०% कमी |
| २. | श्री.मौला अली यारखान | - | १९% कमी |
| ३. | मे.आर.एल.बारवाल | - | १८.१८% कमी |
| ४. | श्री. पॉल कन्स्ट्रक्शन | - | १४.४०% कमी |
| ५. | श्री. मनजितसिंग | - | ८.२५% कमी |
| ६. | श्री.कुलवंतसिंग | - | ५.१०% कमी |
| ७. | श्री.एस.ए.नवाब | - | ४% कमी |
| ८. | श्री.एच.एस.असोशिएटस | - | ५% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०% कमी दराची श्री.मे.फराज असोशिएटस यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिटी क्लब ते भडकल गेट ९७० मीटर लांबीच्या रस्त्यावर साईडड्रेन व फुटपाथचे काम करणेसाठी (अंदाजपत्रकीय रक्कम रु.३,१०,०००/-)

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०% कमी दराच्या मे.फराज असोशिएटस यांच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

## ऐनवेळचे विषय

**संवाद :**

**श्री.मो.इस्माईल :** माझ्या वार्डातील बहुसंख्य नळांना केव्हाही पाणी पुरवठ्याच्या वेळा निश्चित नाही. जो पाणीपुरवठा होतो. तो २० ते २५ मिनीटे पाण्यात दाब अजिबात नाही. खुलासा व्हावा.

**जलगृह अभियंता :** या भागात पाणी पुरवठा करणाऱ्या पाईप लाईन बरीच खराब झालेली होती. व गेल्या तीन चार (३/४) दिवसापासून त्याची दुरुस्ती चालू आहे. काम आज संपेल उद्यापासून पाणी पुरवठा सुरळीत चालू होईल. तसेच या भागास पाणी पुरवठा करणाऱ्या टाकीतून तीन ठिकाणी पाणी पुरवठा केला जातो. विद्युत पुरवठा देखील वारंवार खंडीत होतो. त्यामुळे पंपींग करुन पाणी पुरवठा करावा लागतो.

**श्री.मो.इस्माईल :** औरंगाबाद शहरात पाणी पुरवठा करणाऱ्या किती टाक्या आहेत.

**जलगृह अभियंता :** शहरात एकूण अकरा टाक्या आहेत.

**श्री.मो.इस्माईल :** जिन्सी जलकुंभाप्रमाणे आणखी अन्य कोणत्या जलकुंभावरुन प्रतिदिन तीन वेळा जलवितरण केले जाते.

**जलगृह अभियंता :** अन्यत्र जलकुंभावरुन असा पुरवठा होत नाही.

**श्री.मो.इस्माईल :** मग याचा टाकीवरुन तीन तीन भागात पाणीपुरवठा का केला जातो. आमच्या प्रभागात अर्धा घंटा पाणी द्या. परंतू तो व्यवस्थित दाब असलेला करावा.

**मा.सभापती :** उद्या ५.३० नंतर स्थळ पाहणी करुनच योग्य तो निर्णय घेऊ.

**श्री.मुजाहेद :** आलमगीर कॉलनीत दोन तीन दिवसापासून पाणी नाही.

**जलगृह अभियंता :** उद्या त्या भागाची स्थळ पाहणी करुन पाणी पुरवठा सुरळीत करुन घेऊ.

**श्री.बारवाल :** विद्युत विभागात किती दिवसापासून विद्युत साहित्य नाही.

**अतिरिक्त उपअभियंता :** विद्युत साहित्य खरेदीच्या निविदा मंजूर झाल्या आहेत. मा.सभापतींची स्वाक्षरी घेवून लवकरच स्थायी समितीपुढे ठेवण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे १५ ऑगस्ट १९९० स्वातंत्र्य दिनानिमित्त महानगरपालिकेतील शालेय विद्यार्थ्यांना सुमारे पस्तीस हजार मुलांना "प्रत्येकी २ (दोन) बिस्कीटे" (पार्ले) ब्रिटानीया) वाटप करण्यासाठी रक्कम रु.१३,०००/- च्या खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.९७/२४ :**

मालमत्ता अधिकारी महानगरपालिका प्रस्ताव सादर करीत आहेत की, सन १९९०-९१ सालात अग्नीशमन दलासाठी खालील विविध साहित्य खरेदी करावयाचे आहे. त्यासाठी मा.आयुक्त यांचे मंजूरीनुसार पुरवठादाराकडून मोहरबंद निविदा मागविण्यांत आल्या असता

शेवटच्या तारखेपर्यंत बारा निविदा दाखल झालेल्या आहेत. खरेदी करणे असलेल्या वस्तुनिहाय सर्वात कमीचे दर खालील पुरवठादारांनी त्यांचे निविदेत नमूद केलेले आहेत.

**सर्वात कमीचा दर नमूद करणारा पुरवठादार**

| अ. क्र. | साहित्य | न्यु भारत स्टोअर्स | इन्शा हार्डवेअर | विजय जनरल स्टोअर्स | चिंतामणी ट्रेडींग कंपनी |
|---|---|---|---|---|---|
| १. | सी.ओ.२ ९ कि.ग्रॅ. सिलेंडर | -- | -- | ८०० प्र.नग | -- |
| २. | डी.सी.बी.१०० कि.ग्रॅ.सिलेंडर | १९०० प्र.नग | -- | -- | -- |
| ३. | डॉलन<br>अ-१२११<br>ब-१३०१ | <br>--<br>४९०० प्र.नग | <br>--<br>-- | <br>४९९० प्र.नग<br>-- | <br>--<br>-- |
| ४. | जम्पॉंग सिट १२x१२ | ३००० प्र.नग | -- | -- | -- |
| ५. | नायलॉन होस्टींग हरनेस बेल्ट | -- | -- | २५०० प्र.नग | -- |
| ६. | फोम.३५० (एफ.एफ.एफ.) प्र.लि. | -- | --- | -- | -- |
| ७. | (फोमा अल्काहोल रजिस्टरींग फोम) | -- | -- | ४१० प्र.लि. | -- |
| ८. | प्रोटीन फोम | -- | --<br>६१.५० प्र.लि. | -- | -- |

वरील चार निविदापैकी तीन निविदा धारकाचे दर वेगवेगळ्या बाबतीत सर्वात कमीच आहेत. त्यांचे दराप्रमाणे खरेदी करणे असलेल्या साहित्यांची किंमत खालीलप्रमाणे (आहे) होते. सदरचा खर्च अग्नीशमन दलाचे साहित्य खरेदीसाठी सन १९९०-९१ चे अंदाजपत्रकात असलेल्या रु.५.०० तरतूदीमधून करण्यात येईल.

| अ.क्र. | साहित्य | खरेदी | वरील कमीच्या दराने किंमत |
|---|---|---|---|
| १ | सी.ओ.२ सिलेंडर | ७ नग | ३३,६००/- |
| २. | डी.सी.पी.सिलेंडर | ८ नग | १५,९२०/- |
| ३. | हॅलान<br>अ) १२११<br>ब) १३०१ | <br>२ नग<br>२ नग | <br>९,९८०/-<br>९,८००/- |
| ४. | जमांग सीट | २ नग | ६,०००/- |
| ५. | नायलॉन होस्टींग हरनेस बेल्ट | १० नग | २५,०००/- |
| ६. | फोम (एफएफएफ) | ६०० लि. | २,१०,०००/- |
| ७. | अल्कोहोल आर.फोम | ४०० लि. | १,६४,०००/- |
| ८. | प्रोटीन फोम | ४०० लि. | २४,६०० |
| | | **एकूण** | **४,९८,९००/-** |

कमी दर नमूद केलेल्या निविदा धारकांच्या निविदा स्विकारुन साहित्य खरेदीस मान्यता घेणेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९०-९१ सालात अग्नीशमन दलासाठी विविध साहित्य खरेदी करण्याकरिता रक्कम रु.४,९८,९००/- च्या खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. तसेच सदर साहित्य खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे कमी दर असलेल्या निविदा धारकांकडून साहित्य खरेदी करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**सर्वात कमीचा दर नमूद करणारा पुरवठाधारक**

| अ. क्र. | साहित्य | न्यु भारत स्टोअर्स | इन्शा हार्डवेअर | विजय जनरल स्टोअर्स | चिंतामणी ट्रेडींग कंपनी |
|---|---|---|---|---|---|
| १. | सी.ओ.२ ९ कि.ग्रॅ. सिलेंडर | -- | -- | ८०० प्र.नग | -- |
| २. | डी.सी.पी.१० कि.ग्रॅ.सिलेंडर | १९०० प्र.नग | -- | -- | -- |
| ३. | हॅलॉन | | | | |
| | अ-१२११ | -- | -- | ४९९० प्र.नग | -- |
| | ब-१३०१ | ४९०० प्र.नग | -- | -- | -- |
| ४. | जम्पॉंग सिट १२x१२ | ३००० प्र.नग | -- | -- | -- |
| ५. | नायलॉन होस्टींग हरनेस बेल्ट | -- | -- | २५०० प्र.नग | -- |
| ६. | फोम (एफ.एफ.एफ.) | ३५० प्र.लि. | --- | -- | -- |
| ७. | फोम (अल्काहोल रजिस्टरींग फोम) | -- | -- | ४१० प्र.लि. | -- |
| ८. | प्रोटीन फोम | -- | ६१.५० प्र.लि. | -- | -- |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९८/२५ :**

पुस्तक पेढी योजने खाली इयत्ता १ ली ते २ री च्या विद्यार्थ्यांना नवीन क्रमीक पुस्तकांचे संच उपलब्ध करुन देणे करिता खर्चाच्या प्रमाणात शासनाकडून आर्थिक तरतूद केली आहे.

शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१, यांचे पत्र क्र.प्राशिस/३९९०/९०/९१ पुपेपा/(न.प.प्राथ/१०-ड(६) दि.०५.०५.९० प्रमाणे शासनाकडून औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद शिक्षण विभागाकरिता पुस्तक योजने अंतर्गत सन १९९०-९१ करिता एकूण र.रु.१५,०००/- रुपये पंधरा हजार अनुदान मंजूर केले आहे.

| | | |
|---|---|---|
| सर्वसाधारण घटक योजना | - | १,०००.०० |
| विशेष घटक योजना | - | १४,०००.०० |
| एकूण | - | १५,०००.०० |

करिता पुस्तक पेढीसाठी पुस्तके खरेदी करिता रक्कम रुपये १५,०००/- रु.पंधरा हजार मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका शिक्षण विभागाकरिता पुस्तक पेढी योजनेखाली इयत्ता १ ली ते २ री च्या विद्यार्थ्यांना नवीन क्रमीक पुस्तकांचे संच उपलब्ध करुन देणे करिता रक्कम रुपये १५,०००/- च्या पुस्तके खरेदीस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.९९/२६ :**

स्थायी समिती दिनांक ३०.०३.९० विषय क्र.६७६ मंजूरी दिल्यानुसार शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, बलवंत वाचनालय, औरंगपुरा समोरील चौकात महात्मा जोतीबा फुले यांचा पुतळा आणि मिलकॉर्नर चौकात छत्रपती शाहू महाराज यांचा पुतळा उभारण्याच्या कामासाठी निविदा सूचना क्र.१, दि.०७.०५.९० रोजी निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत एक निविदा मडिलगेकर्स आर्ट स्टुडिओ यांचेकडून दर भरुन प्राप्त झाली. तरी दि.२१.०५.९० रोजी उपस्थित असलेल्या ठेकेदारा समक्ष उघडण्यात आली. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

| अ.क्र. | तपशिल | साईज | किंमत |
|---|---|---|---|
| १. | महात्मा ज्योतीबा फुले यांचा पुर्णाकृती उभा ब्रॉंझ धातुचा पुतळा | ६ फुट उंच (१)<br>९ फुट उचं (२) | रु.९९,०००.००<br>रु.१,६०,०००.०० |
| २. | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती उभा ब्रॉंझ धातुचा | ६ फुट उंच (३)<br>९ फुट उचं (४) | रु.९६,०००.००<br>रु.१,६०,०००.०० |
| ३. | छत्रपती शाहू महाराज यांचा पुर्णाकृती उभा ब्रॉंझ धातुचा पुतळा | ६ फुट उंच (५)<br>९ फुट उचं (६) | रु.१,०५,०००.००<br>रु.१,७५,०००.०० |

**<u>बस्ट साईज अर्ध पुतळ्याचे कोटेशन</u>**

| अ.क्र. | तपशिल | साईज | किंमत |
|---|---|---|---|
| १. | म.ज्योतीबा फुले ब्रॉंझ धातुचा पुतळा बस्ट | २'९" | रु.२७,०००.०० |
| २. | डॉ.बाबासाहेब आंबेडकर ब्रान्झ धातुचा अर्धपुतळा बस्ट | २'९" | रु.२७,०००.०० |
| ३. | छ.शाहू महाराज यांचा ब्रॉंझ धातुचा अर्ध पुतळा | २'९" | रु.२७,०००.०० |

दर पत्रका बरोबर खालील अटींचा समावेश आहे.

**<u>नियम व अटी :</u>**

१. २५% रक्कम ऑर्डर सोबत ॲडव्हॉन्स
२. ५०% रक्कम क्ले मॉडल अप्रुव्हल नंतर
३. २५% रक्कम काम पूर्ण झाल्यावर
४. पुतळ्याची डिलेव्हरी औरंगाबाद येथे देण्यांत येईल.
५. पुतळ्याच्या खालील पेडेस्टल आपणास करावे लागेल व त्यावर पुतळे बसविणेच्या खर्च त्यासाठी लागणारी साधन सामुग्री आपणास पुरावावी लागेल.

६. पुतळ्यांची कामे पूर्ण करण्यास खालीलप्रमाणे वेळ लागेल.
अ) पूर्णाकृती पुतळे क्ले मॉडेल अप्रुव्हल नंतर - ९-१० महिने
ब) अर्धपुतळे ३-४ महिने
७. बाकी इतर खर्च आपणांस करावा लागेल.

मा.आयुक्त यांनी सुचविल्यानुसार महात्मा फुले यांचा पूर्णाकृती ६" फुट उंचीचा व छत्रपती शाहू महाराज यांचा पूर्णाकृती ६" उंचीचा पुतळा बसविणे बाबत शिफारस आहे.

पुतळ्याची किंमत (९९,०००/- + १,०५,०००/-) रु.२,०४,०००/- व मडीलगेकर्स आर्ट स्टुडिओ यांचे निविदा मंजूरीस्तव सादर कामाची तातडी लक्षात घेता स्थायी समिती मंजूरी अपेक्षित (आहे) धरुन काम लवकर हाती घेण्याकरिता मडीकगेकर्स आर्ट यांना कार्य आदेश देण्यांत आले आहे.

प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात निर्दिष्ट केल्याप्रमाणे औरंगपुरा स्थित बलवंत वाचनालयासमोर आणि मिल कॉर्नर चौक हया ठिकाणी नियोजित अनुक्रमे महात्मा ज्योतिबा फुले आणि छत्रपती शाहू महाराज हयांचे सहा फुट उंचीचे ब्रॉंझ धातुचे पुर्णाकृती पुतळे उभारणीचे कामा अंतर्गत प्राप्त झालेल्या मुर्तीकार मे.मडिलगेकर्स आर्ट स्टुडिओ, औरंगाबाद हयांचे रक्कम रु.९९,०००/- आणि रु.१,०५,०००/- असे एकूण रु.२,०४,०००/- चे फक्त दोन पत्रकास प्रस्तावा अंतर्गतचे अटीसह सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१००/२७ :**

श्री.जी.बी.सोनी यांच्या अपिलावर विचार करण्यात यावा.

**<u>संवाद :</u>**

**श्री.बारवाल :** श्री.जी.बी.सोनी यांना सन्मानपूर्वक पूर्ववत कामावर घ्यावे व उपअभियंता या पदावर कायम करावे.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** श्री.सोनी यांना लाचलुचपत खात्यातर्फे त्यांच्या चौकशीत कांहीही ठपका ठेवलेला नाही. तसेच प्लॉट खरेदी केला त्याबाबत त्यांनी कळविले नाही हा गुन्हा त्यांनी कबुल केला व त्याबाबत कार्यालयास लेखी देऊन क्षमा मागितली आहे. तसेच त्यांनी हया प्लॉटवर घर बांधण्याकरिता मनपा कार्यालयातर्फे रितसर परवानगी पण घेतली आहे.

**श्री.कचरु नवपुते :** प्रशासनाने मनपा कार्यालयातील इतर अधिकारी वर्गाकडे किती स्थावर व जंगम मालमत्ता आहे. याची चौकशी केलेली आहे काय?

**श्री.केशव सोनवणे :** त्याच्याशी आपला संबंध नाही.

**श्री.बारवाल :** श्री.जी.बी.सोनी यांची नेमणूक सर्वसाधारण सभेने केलेली आहे. तेव्हा त्यांना पदावनत करण्याचा अधिकार मा.आयुक्त यांना नाही.

**श्री.केशव सोनवणे :** श्री.सोनी यांच्या कार्यालयीन कामाच्या बाबतीत बेपर्वाई असल्यास त्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात यावी व त्यानुसार त्यांना नियमाअधिन योग्य ते शासन करावे. अशा प्रकारे मोठ्या स्वरुपाची शिक्षा विचार व चौकशी न करता कोणत्याही कर्मचाऱ्यांवर होवू नये.

**<u>प्रशासकीय खुलासा</u>**

वरील अर्जदारांनी दाखल केलेल्या अपिलाबाबत प्रशासनामार्फत खालीलप्रमाणे निवदेन सादर करण्यात येते.

अर्जदारास ठराव क्र.६७५ अन्वये प्रथम दर्शनी केवळ सहा महिन्यासाठी उप अभियंता यांत्रिकी म्हणून पदोन्नती देण्यात आली होती. अर्जदारांची कार्य पध्दती पाहून पुढील आदेशांपर्यंत अर्जदारास त्याच पदावर कायम करण्यात आले. पण त्यांना कायमचे काम दिलेले नाही. म्हणून अर्जदार त्या पदावर कायम स्वरुपात नियुक्त केले असे म्हणता येणार नाही. पोलिस सह.आयुक्त विशेष पोलिस महानिरिक्षक अँटीकरप्शन (ब्येरा म.रा.मुंबई यांचे दिनांक २०.०२.९० चे गोपनिय पत्राअन्वये असे निदर्शनास आले आहे की, अर्जदाराने जी मालमता स्थायी व जंगम स्वरुपात घेतली त्याच्यासाठी त्यांनी (अर्जदराने) वरीष्ठांची मंजूरी घेतली नाही. म्हणून अर्जदाराविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा नियम (वर्तणूक) १९७९ चे नियम १९ (२) प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत हया कार्यालयास कळविले.

वरील गोपनीय पत्रान्वये आयुक्तांनी दि.०४.०४.९० ला अर्जदारास पत्र देऊन त्यांनी जी मालमत्ता जमविली ती घेण्यापुर्वी कार्यालयाची परवानगी घेतली किंवा काय? हया बाबत पत्र देण्यांत आले.

सदरील पत्राच्या उत्तरी अर्जदाराने दि.०६.०४.९० ला पत्र देऊन उक्त नियमांचे उल्लंघन झाल्याबद्दल अर्जदाराने सदर तरतूदीच्या अज्ञ ाानाबाबत गुन्हा कबुल केला म्हणून कार्यालयामार्फत दिनांक १६.०५.९० ला अर्जदाराला कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली. जी अर्जदाराने परिशिष्ट -क वर जोडली आहे. व अर्जदाराने वरील नोटीसीचे उत्तर दिले. पण हे समाधानकारक नसून त्यांनी जे कर्ज स्वतःच्या पत्नीकडून मेव्हुण्याकडून कर्ज घेणे ही बाब संयुक्तीक वाटत नाही. तसेच अर्जदार हा उपअभियंता (यांत्रिकी) हया पदावरील काम समाधानकारक नसल्यामुळे अर्जदारास त्याच्या मुळच्या पदावर पदावनत करण्यात आले. सदरील अर्जदाराचे गोपनिय अहवाल पाहता त्यांचे काम असमाधानकारक असल्याचे दिसून येते.

१. आयुक्तांचा पदावनत करण्याचा निर्णय योग्य असून त्यांनी पुर्वग्रहदुषित भावनेने पदावनत केले असे म्हणणे चुक आहे.
२. अर्जदारास त्यांचे म्हणणे मांडण्याची प्रशासनामार्फत योग्य ती संधी देण्यात आलेली आहे. अर्जदाराचे म्हणणे त्यास योग्य ती संधी दिली नाही. हे म्हणणे योग्य नाही. तसेच अर्जदाराने कार्यालयाची परवानगी न घेता जी मालमत्ता जमविली त्याबाबत त्यांनी अधिकृत परवानगी घेतलेली नाही. हे कबुल केलेलेच आहे. म्हणून आयुक्तांनी योग्य ते आदेश दिलेले आहेत.
३. अर्जदारास त्यांच्या कामाच्या निष्काळजीपणा बाबत योग्य ती संधी देण्यांत आलेली होती. त्यामुळे भारतीय संविधानाचे कलम १४-१६-३११ (२) चे कोणतेही उल्लंघन केलेले नाही.
४. अर्जदारास त्याच्या विरुध्दच्या आरोपाबाबत कलम ५६ (३) अन्वये योग्य ती संधी दिलेली आहे.

५. अर्जदार हा उपअभियंता (यांत्रिकी) हया पदावर कायम स्वरुपात कार्यरत नव्हता संबंधितांची नियुक्ती ही तात्पुरती पुढील आदेशापर्यंत करण्यात आली होती. त्यामुळे उप अभियंता (यांत्रिकी) हया पदावर अर्जदारास अधिकार म्हणून मागता येणार नाही.

६. आयुक्तांना कोणतीही पुर्वग्रह दोष विचारात न घेता अर्जदाराला तात्पुरत्या पदावरुन त्यांच्या स्वतःच्या कबुली जबावावरुनच पदावनत करण्यात आलेले आहे.

आयुक्ताचे आदेश योग्य कायदेशीर असून या आदेशात कोणताही बदल करु नये. असे निवदेन प्रशासनामार्फत करण्यात येते.

**ठराव :**

श्री.जी.बी.सोनी यांनी मुदतीच्या आत दाखल केलेले प्रस्ताव अपिल व त्यावर प्रशासनाने केलेला खुलासा लक्षात घेता न्याय दृष्टीकोनातून या प्रकरणाचा स्थायी समितीमध्ये विचार विनिमय करुन मा.आयुक्त यांनी काढलेला कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-१/६२२९/९०, दि.०५ जुन, १९९० ला दिलेल्या आदेश मुंबई प्रा.म.न.पा.अधिनियम १९४९ चे कलम ५६ (४) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उक्त कार्यालयीन आदेशा अन्वयेच्या आदेशास सभागृह तात्पुरती स्थगिती देत आहे. श्री.सोनी यांनी पुर्वीच्या पदावर कार्यरत व्हावे. सदरचे प्रकरणा अंतर्गतच्या अंतिम सुनावणीची तारिख नंतर कळविण्यांत येईल, असे सर्वानुमते ठरले.

या नंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा.सभापती यांनी जाहिर केले.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
मा.सभापती, स्थायी समिती
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक ०६.०८.१९९० रोजी सकाळी ११.०० वाजता भरलेल्या स्थायी समिती सभेचा इतिवृत्तांत. सोमवार दिनांक ०६.०८.१९९० रोजी सकाळी ११.०० वाजता समिती सभागृहात मा.सभापती श्री.रतनकुमार पंडागळे यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभेस सुरुवात झाली. या सभेमध्ये कार्यालयीन अधिकाऱ्यांसह निम्ननिर्दिष्ट स.सभासद उपस्थित होते.**

१. श्री.जैस्वाल प्रदिप शिवनारायण
२. श्री.मगर शंकर जिजाराम
३. श्री.स.अ.इकबालोद्दीन स.मो.कुतूबोद्दीन
४. श्री.गिल इकबालसिंग प्रितमसिंग
५. श्री.फैय्याजखान अहमद खान
६. श्री.बारवाल गजानन रामकिसन
७. श्री.मो.इस्माईल अ.करीम
८. श्री.विधाते प्रभाकर सिताराम
९. श्री.सोनवणे केशव काशिनाथ

**मा.सभापती :** औरंगाबाद महानगरपालिकेचे महापौर श्री.प्रदिप जैस्वाल यांचे सासरे श्री.काशिप्रसाद जैस्वाल व स.सभासद, श्री.गंगाधर गाडे यांच्या मातोश्री श्रीमती भागीरथबाई गाडे यांचे दु:खद निधन झाले आहे. करिता या मृत व्यक्तीस श्रध्दांजली अर्पण करण्यांत यावी. सभागृहाने या दोन मृत व्यक्तींना ००.०२ मिनीटे स्तब्धता पाळून श्रध्दांजली अर्पण केली. त्यानंतर सभेचे कामकाज सुरु झाले.

**विषय क्र.१०१/१ :**

दि.२३.०७.१९९० रोजी संपन्न झालेल्या गत स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांत कायम करणे.

<u>संवाद :</u>

**श्री.स.अ.एकबालोद्दीन :** सभेच्या इतिवृत्तांत स.सभासदांच्या नावापुढे वडिलांचे नांव येत होते. परंतू आता ते येत नाही याबाबत खुलासा व्हावा.

**मा.सभापती :** इतिवृत्तांत संपूर्ण नांव लिहिण्याची सर्व स.सभासदांची इच्छा आहे का?

**श्री.मो.इस्माईल :** मला प्राप्त झालेल्या विषय पत्रिकेवर सभेची वेळ सकाळी १२.०० वाजता अशी लिहीलेली आहे.

**मा.सभापती :** आमच्या सर्व विषय पत्रिकेवर सकाळी ११.०० वाजता ची वेळ लिहीलेली आहे. लिपीकाच्या नजर चुकीचे विषय पत्रिकेवर वेळ चुक नोंदविल्या गेली आहे. यापुढे अशी चुक होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.

**श्री.इकबालसिंग गिल :** म.फुले नगर येथील रहिवाशांना नुकसान भरपाई देण्याबाबत काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा.

**मा.सभापती :** गत सभेच्या वेळेस आवश्यक ती माहिती संबंधितास दिलेली आहे.

**श्री.सोनवणे, उपअभियंता, पाणी पुरवठा :** हा प्रश्न स.सभासद श्री.मोतीराम घडामोडे यांनी दि.३०.०४.९० च्या सभेत उपस्थित केलेला होता. त्यावेळेस प्रश्नाचा असा खुलासा करण्यात आला होता की, संबंधित अधिकारी यांनी स्थळ पाहणी करुन अहवाल दिला होता की, या भागातील ५ घरांच्या भिंती पडल्या आहेत. व एका घराच्या भिंतीस तडे गलेले आहे.

**मा.उपआयुक्त :** अशा प्रकारे पडलेल्या घराबाबत संबंधितांना नुकसान भरपाई देण्याची पध्दत नाही.

**श्री.इकबालसिंग गिल :** या बाबत शहर अभियंता यांनी असा अहवाल दिलेला आहे की, या भागात जलनिःसारण पाईप लाईन टाकण्याकरिता खोदकाम केले. गेल्या मुळे घराच्या भिंती पडल्या आहेत.

**श्री.सोनवणे, उपअभियंता, पा.पु. :** या भागातील दोन घरांमध्ये फक्त ५ फुटाची गल्ली आहे. त्या गल्लीमध्ये डुकरांची सतत वर्दळ असून त्यांच्या बसण्यामुळे त्या गल्लीत खड्डे पडले आहेत. तसेच त्या घराच्या भिंतीचे पाया कच्च्या स्वरुपांचे आहेत. यामुळे या भिंती पडल्या आहेत. असे अहवालात नमूद केलेले आहे.

**श्री.इकबालसिंग गिल :** अशा प्रकारे चुकीची माहिती देवून सभागृहाची दिशाभूल केली जाते.

**श्री.केशव सोनवणे :** पावसामुळे घरे पडल्यास अशा घरांच्या मालकांना मा.जिल्हाधिकारी यांचे तर्फे नुकसान भरपाई देण्यात येते.

**मा.उपआयुक्त :** या प्रकरणी सभागृहास पाहणी अहवाल वाचून दाखविण्यांत आला होता.

**श्री.इकबालसिंग गिल :** या संचिकेप्रमाणे सभागृहात खुलासा करण्यात आला होता का?

**मा.उपआयुक्त :** या प्रकरणात संबंधित अधिकाऱ्यांनी माजी सभापतींना पाहणी अहवालाची माहिती दिली होती. त्या माहिती मा.सभापती यांनी त्यावेळेस सभागृहात द्यावयास पाहिजे होती. तसेच या संदर्भात माजी सभापतींनी दि.१५.०५.९० ला संबंधित संचिकेची पाहणी केलेली आहे.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** स.सभासद श्री.प्रभाकर विधाते यांनी दि.२८.११.८८ व दि.०२.०८.१९८९ ला संबंधित अधिकाऱ्यांना पत्रे देऊन सुध्दा त्यांच्या प्रभागातील त्यांनी सुचविलेली नागरिकांच्या सुखसोयीची कामे झालेली नाहीत. त्याकामाची अंदाजपत्रके तयार होत नाहीत तर मग अधिकारी वर्ग काय करतात. पहाडसिंगपुरा येथील सेंप्टीक टँकच्या कामाबाबत काय कार्यवाही झाली याबाबत खुलासा व्हावा. संबंधित अधिकाऱ्यांकडून मागवून आगामी बैठकीत सभागृहात ठेवल्या.

**मा.सभापती :** शहर अभियंता यांनी या बाबत सविस्तर खुलासा आगामी बैठकीत करावा नसता संबंधित अधिकाऱ्याविरुध्द योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

**श्री.केशव सोनवणे, श्री.स.अहमद एकबालोद्दीन :** अशा प्रकारे अनेक स.सभासदांच्या मागण्या आहेत. प्रभाग क्र.३१ मध्ये आतापर्यंत किती कामे रेट लिस्टवर करण्यात आली आहेत. या बाबत आगामी बैठकीत खुलासा व्हावा.

**श्री.मो.इस्माईल :** शहरातील सर्वच वार्डात अशा प्रकारे थोडी बहुत कामे रेटलिस्टवर झालेली आहेत. काही महत्वाच्या व तातडीच्या कामास रेटलिस्टवर करुन घ्यावी लागतात.

**श्री.प्रभाकर विधाते, श्री.शंकर मगर :** जेथे गरज नाही ठिकाणी पण रेटलिस्टवर कामे करुन घेतली जातात.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** रेटलिस्टवर करण्यात आलेल्या कामाची माहिती सभागृहात यावी अशी मागणी केली असता ती उपलब्ध होत नाही. तरी याबाबत खुलासा व्हावा.

**मा.उपआयुक्त :** मा.सभापती यांचेकडे याबाबत माहिती दिलेली आहे.

**मा.सभापती :** सदरची माहिती आगामी बैठकीत सभागृहात देण्यात येईल.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** गलिच्छ वस्ती म्हणून घोषित झालेल्या शहाबाजार, संयजनगर, व विटखेडा येथील नाली बांधकामाबाबत काय झाले.

**श्री.काझी, उपअभियंता :** या भागातील सदरील कामे थोड्याच दिवसात चालू करण्यात येतील.

**मा.सभापती :** गलिच्छ वस्त्यांमध्ये जी कामे चालू आहेत. अशा कामांची मा.उपआयुक्त यांनी पाहणी करुन त्याचा अहवाल सभागृहापुढे ठेवावा. अशा प्रकारे मी सभागृहाच्या वतीने सुचवितो.

**श्री.केशव सोनवणे :** गत सभेत ठरल्याप्रमाणे काही मजूर कामे ए-१ ऐवजी बी-१ नमुन्यातील निविदावर करुन घेतली या बाबतची माहिती या बैठकीत सभागृहास देण्यात येणार होती त्याचे काय झाले.

**मा.सभापती :** याबाबतची माहिती आजच सभागृहात वाचून दाखविण्यात येऊन त्याची एक प्रत देण्यात येईल.

**मा.उपआयुक्त :** स्थायी समितीने ए-१ वर काम करुन घेण्यास मंजूरी दिल्यानंतर जी कामे बी-१ निविदावर करुन घेण्यांत आली ती खालीलप्रमाणे आहे.

जलनि:सारण विभागातील एकूण सहा (६) कामे त्या प्रित्यर्थ र.रु.६०,०००/- खर्च आला. झोपडपट्टी सुधार योजना अंतर्गत एकूण दोन (२) कामे त्या प्रित्यर्थ र.रु.२९,३००/- इतका खर्च झालेला आहे.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** अशा प्रकारे ए-१ ऐवजी बी-१ निविदावर कामे का करुन घेण्यात आली. त्यामागील हेतू काय?

**मा.सभापती :** गत स्थायी समितीच्या आपण उपस्थित केलेल्या प्रश्नांवरुन आपणास ही माहिती देत आहे.

**श्री.केशव सोनवणे :** स्थायी समितीने घेतलेला निर्णय आपण फिरविला आहे का?

**कार्यकारी अभियंता, पा.पु.ज.नि.:** ए-१ वर निविदा मागविल्या असता जेव्हढा कालावधी लागला असता तेव्हढाच कालावधी बी-१ वर निविदा मागविण्यास लागला असता म्हणून ही कामे ए-१ ऐवजी बी-१ वर निविदा मागविण्यात आल्या आहेत.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** सभागृहाची अशाप्रकारे दिशाभूल करुन स्थायी समितीच्या अधिकारास आव्हान देण्यात येऊ नये. गेल्या दोन वर्षापासून अशा प्रकारे चुका केल्या असल्यास त्यास जबाबदार कोण? संबंधित अधिकाऱ्यांवर योग्य कार्यवाही करण्यात यावी.

**श्री.केशव सोनवणे :** याप्रकरणात दोषी अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्यात यावी.

**मा.सभापती :** अशा घटना यापुढे घडणार नाही. याची दक्षता घेण्यात यावी. जर अशा घटना पुन्हा झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्यात यावी. असा धोरणात्मक निर्णय घेण्यांत येत आहे.

**श्री.फैय्याजखान :** रणमस्तपुरा भागातील ड्रेनेज लाईन नेहमी चोकअप होते याबाबत काय कार्यवाही करण्यात आली?

**श्री.इकबालसिंग गिल :** गत स्थायी समितीच्या सभेत ठराव क्र.६३ विषयी चर्चा झालेली नसतांना "तत्सम श्रेणी" हा शब्द कशाप्रकारे वगळण्यात आला याचा खुलासा व्हावा.

**मा.सभापती :** गत सभेच्या विषय पत्रिकेवर सदरील प्रस्ताव होता. त्यावर सविस्तर चर्चा होऊन (करुन) ठराव संमत करण्यात आलेला आहे.

**श्री.इकबालसिंग गिल :** "तत्सम श्रेणी" हा शब्द का वगळण्यात येत आहे. याबाबत त्वरीत खुलासा व्हावा. असे म्हणून सभापतीस अर्वाच्य शब्द वापरले.

**मा.सभापती :** स.सभासद श्री.गिल यांनी सभागृहाचा मान ठेवावा.

**श्री.इकबालसिंग गील :** विषयाला धरुन मी मिटींगमध्ये बोलत आहे. माझ्या पश्नाचा खुलासा व्हावा. असे म्हणू्न त्वेषाने विषय पत्रिका दोन/तीन वेळेस टेबलावर आपटली व खुर्ची उचलली.

**मा.सभापती :** आपण आपले शब्द मागे घ्यावे. नसता ना विलाजास्तव आपल्या विरुध्द योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

**श्री.शंकर मगर :** स.सभासद श्री.गील यांनी सभागृहात मा.सभापती यांचेबाबत जे अपशब्द वापरले व खुर्ची उचलून त्यांचे दिशेने ज्या प्रकारे आक्रमक पवित्रा घेतला. अशा प्रकारे सभागृहाचा व मा.सभातींचा जो अपमान केला झाला. त्यामुळे आम्ही सर्व नगरसेवक सभात्याग करीत आहोत. असे म्हणून स.सभासद श्री.प्रदिप जैस्वाल, श्री.शंकर मगर, श्री.केशव सोनवणे, श्री.प्रभाकर विधाते, श्री.गजानन बारवाल, यांनी ठिक १२.३५ वाजता सभागृह सोडले.

**मा.सभापती :** सर्व स.सभासदांचा व सभागृहाचा अपमान केल्यामुळे मी असा आदेश देतो की, स.सभासद श्री.इकबालसिंग गील यांनी सभागृह सोडून जावे.

**श्री.इकबालसिंग गील :** स.सभापती मी किती वेळा करिता सोडून जावे याबाबत खुलासा व्हावा.

**मा.सभापती :** आपण ००.१० मिनीटाकरिता सभागृह सोडून जावे.

**श्री.इकबालसिंग गील :** सभागृहाच्या व सभापतींचा आदर म्हणून मी सभागृह सोडून जात आहे. परंतू या कालावधीत विषयावर चर्चा होवू नये. असे संबोधून सभागृहातून बाहेर पडले.

**मा.सभापती :** सदरील प्रश्न माझ्या अधिकारातील आहे.

**श्री.सय्यद अहमद एकबालोदीन :** मनपाने खरेदी केलेल्या पाईप पैकी एक पाईप फोडून त्यातील लोखंडाचे वजन केव्हा करुन घेणार.

**श्री.गजानन बारवाल :** आजच गुणवत्ता नियंत्रण (क्वालिटी कन्ट्रोल) कार्यालयाचा याबाबत अहवाल प्राप्त झालेला आहे.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** आलेला अहवाल सभागृहास दाखवावा व असे प्रश्न पुन्हा पुन्हा सभागृहापुढे येवू नये, याची दक्षता घ्यावी.

**श्री.केशव सोनवणे, श्री.शंकर मगर :** "तत्सम श्रेणी" म्हणजे काय याबाबत खुलासा व्हावा.

**मा.सभापती :** विधी सल्लागार यांनी याबाबत खुलासा करावा.

**विधी सल्लागार :** विधी सहाय्यक हे पद ज्या वेतनश्रेणीत मंजूर केले गेले आहे. त्याच वेतनश्रेणीतील विधी पदवीधर कर्मचारी असावा.

**सचिव :** विधी सहाय्यक हे पद निर्माण करतांना असा स्पष्ट खुलासा केलेला आहे की, जेष्ठतेनुसार विधी पदवीधर व अनुभवी कर्मचाऱ्यांतून हे पद भरण्यात यावे.

**श्री.केशव सोनवणे :** इतिवृत्तांत दिलेला "प्रशासकीय खुलासा" वरील चर्चा वगळून इतिवृत्तांतास मंजूरी देण्यांत यावी.

**मा.उपआयुक्त :** ठराव क्र.१००/२७ या प्रकरणात एक तर्फी निर्णय होवू नये म्हणून या प्रशासकीय खुलाशावर चर्चा होणे आवश्यक आहे.

**मा.सभापती :** या विषयाबाबत स्थायी समितीची खास बैठक बोलावण्यात येईल. त्या सभेत चर्चा करुन तद्नंतर यावर निर्णय घेण्यांत येईल.

**श्री.मो.इस्माईल :** सन १९८८ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील तरतूदी नुसार ज्या कामाची अंदाजपत्रके मंजूर झालेली आहेत. त्या कामाबाबतच्या संचिका गेल्या तीन बैठकीपासून सभागृहापुढे आलेल्या नाहीत. याचा अर्थ या वर्षाच्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात या कामाकरिता तरतूद नाही का?

**मा.सभापती :** या बाबत शहर अभियंता यांनी खुलासा करावा.

**श्री.मो.इस्माईल :** राजाबाजार येथील नंदलाल बिल्डींगच्या बाजुस असलेल्या रस्त्याच्या कामाची संचिका दि.२४.०५.९० रोजी व बुक्कलकुडा भागात खांडकी बसविण्याबाबतची संचिका दि.३०.०५.८९ ला मा.शहर अभियंता यांचे कडे गेलेल्या आहेत. मोतीवाला नगर येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे काम का थांबले. याबाबतचा खुलासा आगामी स्थायी समिती सभेत देण्यांत यावा.

**श्री.स.अहमद एकबालोद्दीन :** गत सभेत मी सुचविलेल्या कबाडीपुरा, रोहिलागल्ली या भागातील कामाचे काय झाले याबाबत खुलासा व्हावा.

**उपअभियंता (बांध-१) :** त्या भागातील कामाकरिता निविदा मागविण्यात आल्या आहेत. अद्यापपर्यंत निविदा प्राप्त झालेल्या नाहीत.

**श्री.गजानन बारवाल, श्री.शंकर मगर :** गत सभेच्या विषय पत्रिकेवरील विषय क्र.८५/१२ मधील कामाकरिता आलेली निविदा रद्द करण्यात येऊन या कामावर फेर निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले होते. त्याऐवजी फेर निविदा न मागविता त्या कामावर आलेली कमी दराची असल्यामुळे मंजूर करण्यांत यावी.

**मा.सभापती :** गत सभेच्या विषय पत्रिकेवरील विषय क्र.८५/१२ च्या कामाकरिता आलेली निविदा रद्द करण्यांत आली होती. त्याऐवजी ती निविदा मंजूर करण्यांत येते.

**ठराव :**

उक्त चर्चेअंती ठराव क्र.१००/२७ बाबत प्रशासकीय खुलासा वगळून या विषयाकरिता स्थायी समितीची खास बैठक बोलावण्यात येऊन चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल. अशी दुरुस्ती करण्यात येते. तसेच विषय क्र.८५/१२ मधील कामाकरिता आलेल्या श्री.अब्दुल सलाम यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराच्या निविदेस मंजूरी देण्यात येते. हया दुरुस्तीसह दिनांक २३.०७.१९९० रोजी संपन्न झालेल्या गत स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र.१०२/२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, वार्ड क्र.२३ गरमपाणी व छावणी दरम्यान खाम नदीवर पुल (                    ) बांधण्याकरिता रक्कम रु.४,३७,४३०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

या पुलामुळे मोहल्ला (औरंगाबाद) व छावणी हे दोन भाग जोडले जाऊ शकतात. ज्यामुळे छावणी तथा औरंगाबाद नगरवाशियांना रहदारी करिता पुलाचा उपयोग होईल. आणि म्हणून मा.आयुक्त साहेब यांनी औरंगाबाद महानगरपालिका व छावणी प्रशासन यांनी मिळून ५०:५० तत्वावर खर्च करुन बांधकामाला निधी उपलब्ध करावा असे सुचविले आहे.

करिता अंदाजपत्रकाचे ५०% रक्कम भांडवली रस्ते या सदरातून मंजूरी घेणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर. करिता अंदाजपत्रकाचे ५०% रक्कम, औरंगाबाद महानगरपालिका प्रशासनातर्फे भांडवली रस्ते या सदरातून खर्च करणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री.प्रदिप जैस्वाल :** या कामाकरिता छावणी प्रशासनातर्फे अनुदान प्राप्त होणार आहे काय?
**श्री.मो.इस्माईल :** छावणी प्रशासनातर्फे या कामाकरिता अनुदान प्राप्त झाल्यास काम करावे नसता काम करु नये.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.२३ गरमपाणी व छावणी दरम्यान खाम नदीवर पुल बांधण्याकरिता तयार करण्यात आलेले रक्कम रु.४,३७,४३०.०० चे अंदाजपत्रकास छावणी प्रशासनाने ५०% अनुदान देण्याची हमी दिल्यास काम करण्यात येईल, या अटीवर सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र.१०३/३ :**

वार्ड क्र.६ हर्षनगर येथे १५० मी.मी.व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र.रु.३०,२१०/- ला स्थायी समितीचा ठराव क्र.६३५/१४, दि.३०.०३.९० द्वारे मंजूरी मिळालेली आहे.

सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.१/३३६/९०, दि.११.०४.९० द्वारे अ-१ नमुन्यात निविदा मागविण्यात आल्या असता एकूण तीन निविदा विकण्यात आल्या होत्या. सदर तीनही निविदा वसूल झालेल्या आहेत. त्याचा तुलनात्मक दर खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.जाफर खान | - | ५% जास्त |
| २. | श्री.सलीम पटेल | - | ३% जास्त |
| ३. | श्री.ई.बी.पठाण | - | ०.१०% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी दराचे श्री.ई.बी.पठाण यांचे दरपत्रक आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री.प्रदिप जैस्वाल :** निविदा सूचना कोणत्या वृत्तपत्रात प्रसिध्द केली याचा खुलासा व्हावा.
**मा.सभापती :** कार्यकारी अभियंता श्री.सोनी यांनी खुलासा करावा.
**श्री.सोनी :** निविदा सूचना वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात येवून निविदा मागविल्या आहेत.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.६ हर्षनगर येथे १५० मी.मी.व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणे बाबत तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी दराचे गुत्तेदार श्री.ई.बी.पठाण यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र.१०४/४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, महापौर निवासस्थानाच्या आवारात विटाची करबींग बांधणेच्या कामासाठी सन १९८९-९० चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे

डी.एस.आर.दराने र.रु.१५,२५०/- चे अंदाजपत्रकास स्थायी समितीच्या सभेमध्ये ठराव क्र.७५९/३३/दिनांक २४.०४.९० नुसार मंजूरी मिळालेली आहे.

सदरचे काम करणेसाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.१/९०-९१, दि.०४.०५.९० चे निविदा सूचनाद्वारे बी-१ नमून्यात निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित दिनांक १०.०५.९० पर्यंत एकूण (१३) तेरा निविदा विक्री झाल्या असून निविदा स्विकारणेच्या नियोजित दिनांक १५.०५.९० ला एकूण (९) नऊ निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.इनामत खान | - | २६% कमी |
| २. | श्री.अब्दुल सत्तारखान | - | २५.८६% कमी |
| ३. | श्री.सय्यद सिराजुद्दीन | - | २५.१०% कमी |
| ४. | श्री.मे.शकील बिल्डर्स | - | २२.२२% कमी |
| ५. | श्री.आर.एल.बारवाल | - | २२.२२% कमी |
| ६. | श्री.इकबाल अहमद | - | १८% कमी |
| ७. | श्री.अे.अे.अरोरा | - | १४.३% कमी |
| ८. | श्री.आनंद बिल्डर्स | - | १३.६% कमी |
| ९. | श्री.एन.बी.पाथ्रीकर | - | ५% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २६% कमी दराची श्री.इनायत खान यांची निविदा असून मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महापौर निवासस्थानाच्या आवारात विटाची करबींग बांधणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २६% कमी दराचे गुत्तेदार श्री.इनायत खान यांचे निविदापत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र.१०५/५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, रेल्वेस्टेशन येथील महानगरपालिका गेस्ट हाऊसच्या आवारातील रोडचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी सन १९८८-८९ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.२९,८६५/- चे अंदाजपत्रकास स्थायी समितीच्या सभेमध्ये ठराव क्र.७४६/२०, दि.२४.०४.९० नुसार मंजूरी मिळालेली आहे.

सदर काम करणेसाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.१/९०-९०/दि.०४.०५.९० चे निविदा सूचनेद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित दिनांक १०.०५.९० पर्यंत एकूण (३) तीन निविदा विक्री झाल्या असून निविदा स्विकारणेच्या नियोजित दि.१५.०५.९० ला एकूण (२) दोन निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.गुरुनानक इंडस्ट्रीज | - | १२% कमी दराने |
| २. | एम.एस.जग्गी | - | दर दिलेले नाही. |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२% कमी दराची मे.गुरुनानक इंडस्ट्रीज यांची निविदा असून मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री.मो.इस्माईल :** महानगरपालिकेच्या विश्रामगृहाचे मासिक व वार्षिक उत्पन्न किती आहे. याचा खुलासा व्हावा.

**श्री.गजानन बारवाल :** विश्रामगृहाच्या परिसरात म.न.पा.चे विभाग क्र.६ चे कार्यालय तसेच कर्मचाऱ्यांची निवासस्थाने आहेत.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रेल्वेस्टेशन येथील महानगरपालिका गेस्ट हाऊसच्या आवारातील रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १२% कमी दराचे मे.गुरुनानक इंडस्ट्रीज यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१०६/६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मसनतपूर येथील प्राथमिक शाळेच्या मोकळ्या जागेस संरक्षित भिंत व पाण्याचा हौद बांधण्याच्या कामासाठी सन १९८९-९० चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर.दराने रक्कम रु.१८,२१,१५४/- चे अंदाजपत्रकास स्थायी समितीच्या सभेमध्ये ठराव क्र.७४८/२२/दि.२४.०४.९० नुसार मंजूरी मिळालेली आहे.

सदरचे काम करणेसाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.१/९०-९१/दि.०४.०५.९० चे निविदा सूचना द्वारे बी-१ नमुन्यात प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित दि.१०.०५.९० पर्यंत एकूण सतरा (१७) निविदा विक्री झाल्या असून निविदा स्विकारणेच्या नियोजित दि.१५.०५.९० ला एकूण (७) सात निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या. असून त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.मो.सलीम | - | २१% कमी दराने |
| २. | श्री.एम.एम.बेग | - | १८.१८% कमी दराने |
| ३. | श्री.अब्दुल सलाम | - | १६.९०% कमी दराने |
| ४. | श्री.आनंद बिल्डर्स | - | १३.६% कमी दराने |
| ५. | श्री.मे.पॉल कन्स्ट्रक्शन | - | १०% कमी दराने |
| ६. | एस.एच.असोशिएट्स | - | अंदाजपत्रकाचे दराचे |
| ७. | श्री.आर.एल.बारवाल | - | ११.११% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१% कमी दराची श्री.मो.सलीम यांची निविदा असून मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**<u>संवाद :</u>**

**श्री.मो.इस्माईल :** मसनतपूर कोणत्या ठिकाणी आहे. तेथील शाळेच्या जागेस संरक्षित भिंत बांधण्यास इतका खर्च कशा करिता.

**मा.सभापती :** मसनतपूर चिकलठाणा औद्योगिक वसाहतीच्या मागील बाजूस आहे.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** पिरबाजार उस्मानपुरा येथील मनपाच्या शाळेस संरक्षित भिंत नसल्यामुळे हया भागातील काही नागरिक दारु प्राशन करुन शाळेत जातात. असे होवू नये म्हणून मनपाच्या सर्व शाळांना संरक्षित भिंती बांधण्यात याव्यात.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मसनतपूर येथील प्राथमिक शाळेच्या मोकळ्या जागेस संरक्षित भिंत व पाण्याचा हौद बांधणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व

अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २१% कमी दराचे श्री.मो.सलीम यांचे निविदापत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१०७/७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद औद्योगिक वसाहत अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९०-९१ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.२,५८,२१२/- चे अंदाजपत्रकास स्थायी समितीच्या सभेमध्ये ठराव क्र.७३६/१०, दि.२४.०४.९० नुसार मंजूरी मिळालेली आहे.

सदरचे काम करणेसाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.१/९०-९१ दि.०४.०५.९० चे निविदा सूचनेद्वारे बी-१ नमुन्यात प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित दि.१०.०५.९० पर्यंत एकूण (४) चार निविदा विक्री झाल्या असून निविदा स्विकारणेच्या नियोजित दि.१५.०५.९० ला एकूण (३) तीन निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.पी.एम.चोरडीया | - | १५% कमी |
| २. | श्री.मे.गुरुनानक इंडस्ट्रीज | - | ११.२०% कमी |
| ३. | श्रीएम.एस.जग्गी | - | ४% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% कमी दराची श्री.पी.एम.चोरडीया यांची निविदा असून मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री.स.अ.एकबालोद्दीन :** औद्योगिक वसाहती अंतर्गतचे रस्ते सुस्थितीत आहेत. तसेच त्या भागापासून म.न.पा.स काय उत्पन्न आहे. करिता या भागातील रस्त्याचे डांबरीकरण करण्याची आवश्यकता दिसत नाही.

**मा.उपआयुक्त :** औद्योगिक वसाहतीतील उद्योजकांची या बाबत गेल्या वर्षा पासूनची मागणी असून त्या उद्योजकांकडून आपण मालमत्ता कर वसुल करतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद औद्योगिक वसाहत अंतर्गत रत्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% कमी दराचे गुत्तेदार श्री.पी.एम.चोरडीया यांच्या निविदा पत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१०८/८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, रेल्वेस्टेशन पासून डेक्कन फ्लोअर मील पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९८८-८९ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.२,१५,०००/- चे अंदाजपत्रकास स्थायी समितीच्या सभेमध्ये ठराव क्र.७५१/२५, दि.२४.०४.९० नुसार मंजूरी मिळालेली आहे.

सदरचे काम करणेसाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.१/९०-९१ दि.०४.०५.९० चे निविदा सूचनेद्वारे बी-१ नमुन्यात प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित दि.१०.०५.९० पर्यंत एकूण (४) चार निविदा विक्री झाल्या असून निविदा स्विकारणेच्या नियोजित दि.१५.०५.९० ला एकूण (४) चार निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.रे.कन्स्ट्रक्शन | - | २०.५०% कमी दराने |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | श्री.पी.एम.चोरडीया | - | १७.९७% कमी दराने |
| ३. | मे.गुरुनानक इंडस्ट्रीज | - | १७.७०% कमी दराने |
| ४. | श्री.एम.एस.जग्गी | - | ७% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.५०% कमी दराची मे.रे.कन्स्ट्रक्शन यांची निविदा असून मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रेल्वेस्टेशन पासून डेक्कन फ्लोअर मील पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.५०% कमी दराचे मे.रे.कन्स्ट्रक्शन यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१०९/९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, चिकलठाणा येथील स्मशानभूमी कडे जाणाऱ्या रस्त्यावरील नदीवर पुलाचे बांधकाम करणेच्या कामासाठी सन १९८८-८९ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.१,१७,८००/- चे अंदाजपत्रकास स्थायी समितीच्या सभेमध्ये ठराव क्र.७३९/१३, दि.२४.०४.९० नुसार मंजूरी मिळालेली आहे.

सदरचे काम करणेसाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.१/९०-९१ दि.०४.०५.९० निविदा सूचनेद्वारे बी-१ नमुन्यात प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित दि.१०.०५.९० पर्यंत एकूण (९) नऊ निविदा विक्री झाल्या असून निविदा स्विकारणेच्या नियोजित दि.१५.०५.९० ला एकूण (६) सहा निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.पी.जे.तमखाने | - | २३.७९% कमी दराने |
| २. | श्री.सैय्यद रफिकोद्दीन | - | २२.१५% कमी दराने |
| ३. | श्री.सुरेश बी.सादवानी | - | १८.५% कमी दराने |
| ४. | श्री.अब्दुल सलाम | - | १५.९०% कमी दराने |
| ५. | श्री.मे.पॉल कन्स्ट्रक्शन | - | १४.५०% कमी दराने |
| ६. | श्री.मे.एस.एच.असोशिएट्स | - | १३% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.७९% कमी दराची श्री.पी.जे.तमखाने यांची निविदा असून मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री.इकबालसिंग गील :** आकाशवाणी ते मनजीतनगर येथून स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता पण दुरुस्त करण्यात यावा व त्याचे डांबरीकरण करण्यात यावे.

**मा.सभापती :** या कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात यावे.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** बेगमपूरा स्थित स्मशानभूमीस संरक्षित भिंत बांधण्यात यावी.

**उपअभियंता, बांध-१ :** बेगमपूरा स्थित स्मशानभूमीत संरक्षित भिंत बांधण्याचा प्रस्ताव मिटींग विभागास पाठविण्यात आलेला आहे.

**मा.सभापती :** आगामी बैठकीत बेगमपूरा स्थित स्मशानभूमीस संरक्षित भिंत बांधण्याचा प्रस्ताव ठेवण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चिकलठाणा येथील स्मशानभूमी कडे जाणाऱ्या रस्त्यावरील नदीवर पुलाचे बांधकाम करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.७९% कमी दराचे श्री.गुत्तदार श्री.पी.जे.तमखाने यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.११०/१० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिल्क मिल कॉलनी येथील अंतर्गत रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९०-९१ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.२,११,४५५/- चे अंदाजपत्रकास स्थायी समितीच्या बैठकीमध्ये ठराव क्र.७४५/१९, दि.२४.०४.९० नुसार मंजूरी मिळालेली आहे.

सदरचे काम करणेसाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.१/९०-९१ दि.०४.०५.९० निविदा सूचनेद्वारे बी-१ नमुन्यात प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित दि.१०.०५.९० पर्यंत एकूण (४) चार निविदा विक्री झाल्या असून निविदा स्विकारणेच्या नियोजित दि.१५.०५.९० ला एकूण (३) तीन निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.गुरुनानक इंडस्ट्रीज | - | १५% कमी दराने |
| २. | श्री.एम.एस.जग्गी | - | ५% कमी दराने |
| ३. | श्री.पी.एम.चोरडीया | - | ९.१७% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% कमी दराची श्री. मे.गुरुनानक इंडस्ट्रीज यांची निविदा असून मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिल्क मिल कॉलनी येथील अंतर्गत रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% कमी दराचे मे.गुरुनानक इंडस्ट्रीज यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१११/११ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, चिकलठाणा एम.आय.डी.सी.एरियामध्ये अस्तित्वात असलेल्या रोडचे पार्टपोरशनचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९८९-९० चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.६,५४,७३९/- चे अंदाजपत्रकास स्थायी समितीच्या सभेमध्ये ठराव क्र.७३७/११, दि.२४.०४.९० नुसार मान्यता मिळालेली आहे.

सदरचे काम करणेसाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.१/९०-९१ दि.०४.०५.९० निविदा सूचनेद्वारे बी-१ नमुन्यात प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित दि.१०.०५.९० पर्यंत एकूण (४) चार निविदा विक्री झाल्या असून निविदा स्विकारणेच्या नियोजित दि.१५.०५.९० ला एकूण (३) तीन निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.गुरुनानक इंडस्ट्रीज | - | १८% कमी दराने |
| २. | श्री.पी.एम.चोरडीया | - | १७.९७% कमी दराने |
| ३. | श्री.एम.एस.जग्गी | - | १६% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८% कमी दराची श्री. मे.गुरुनानक इंडस्ट्रीज यांची निविदा असून मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**<u>संवाद :</u>**

**श्री.प्रभाकर विधाते :** प्रस्तावात दर्शविलेले काम प्रत्यक्ष चालू आहे. मग या कामास कार्योत्तर मंजूरी देण्यांत यावी का?

**श्री.सोनी उपअभियंता :** सदरील काम तातडीच्या स्वरुपाचे असल्यामुळे त्वरीत हाती घेण्यात आले आहे.

**श्री.मो.इस्माईल :** नियम क्र.६६ (३) अन्वये या कामाची प्रत्यक्ष स्थळ पाहणी करण्यात यावी. व त्यानंतर या प्रस्तावाबाबत निर्णय घ्यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कामाची सर्व स.सभासदांबरोबर स्थळ पाहणी करुन त्यानंतर निर्णय घेण्यांत येईल असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.११२/१२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, वार्ड क्र.४० फकीरवाडी (चुनाभट्टी) जवळ पुलाची उंची वाढवून बांधकाम करणे बाबतच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दि. दि.२४.०४.९० रोजी एवेजी विषय क्र.७७२/४६ नुसार अंदाजपत्रक रक्कम रु.३,००,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.१/मनपा/बांधकाम विभाग-२/१०६/दि.०४.०५.९० नुसार निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत एकूण दहा (१०) निविदा फॉर्म विकल्या गेल्या. त्यापैकी शेवटच्या तारखेपर्यंत एकूण (५) पांच निविदा फॉर्म भरुन प्राप्त झाल्या त्या दि.१५.०५.९० रोजी उपस्थित असलेल्या ठेकेदारांसमक्ष उघडण्यात आल्या. त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | एस.एच.असोशिएट्स | - | २५% जास्त |
| २. | आर.एल.बारवाल | - | १४.०२% कमी |
| ३. | कैसर खान | - | ७.८६% कमी |
| ४. | एस.ए.नवाब | - | १४.११% कमी |
| ५. | पॉल कन्स्ट्रक्शन | - | १०.१५% कमी |

वरीलपैकी अ.क्र.४ श्री.एस.ए.नवाब यांची निविदाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकापेक्षा १४.११% कमी दराची आहे.

प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.४० फकीरवाडी (चुनाभट्टी) जवळ पुलाची उंची वाढवून बांधकाम करणे बाबतच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.११ कमी दराचे गुत्तेदार श्री.एस.ए.नवाब यांचे निविदापत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र.११३/१३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, विद्यापीठ गेटजवळील म.न.पा.क्वॉर्टर मध्ये प्रत्येकी एक खोली वाढवून देण्याच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रु.५०,५००/- ला स्थायी समिती बैठक दि.३०.०४.९० विषय क्र.६२५/४ नुसार मान्यता प्राप्त झाली आहे.

सदर कामासाठी कार्यालयीन निविदा क्र.१/मनपा/बांध-वि-१/४०८६/९० दि.१५.०५.९० रोजी निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत एकूण आठ (८) निविदा फॉर्म विकल्या गेल्या. त्यापैकी शेवटच्या तारखेपर्यंत एकूण (३) तीन निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्या दि.१५.०६.९० रोजी उपस्थित असलेल्या गुत्तेदारांसमक्ष उघडण्यात आल्या. त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | शेख एकबाल अहमद | - | ५% जास्त |
| २. | सय्यद रफिकउद्दीन | - | ४% जास्त |
| ३. | सय्यद सिराजुद्दीन | - | १% कमी |

वरील अ.क्र.३ श्री.सय्यद सिराजउद्दीन यांचे निविदा दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजे १% कमी दराचे आहे. विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री.मो.इस्माईल :** विद्यापीठ गेटजवळील मनपाच्या निवासस्थानात अस्तित्वात असलेल्या खोल्यांची संख्या किती आहे.

**उपअभियंता, बांध-१ :** या ठिकाणच्या निवासस्थानात प्रत्येकी दोन खोल्या आहेत.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** स्वतःची घरे बांधण्याकरिता कार्यालयाकडून कर्ज घेतलेले काही कर्मचारी मनपाच्या निवासस्थानाचा वापर करीत आहेत. अशा कर्मचाऱ्यांकडील निवासस्थाने रिकामे करुन घ्यावीत.

**मा.सभापती :** मा.उपआयुक्त यांनी या प्रकरणात खुलासा करावा.

**मा.उपआयुक्त :** नियमाप्रमाणे अशा कर्मचाऱ्यांना नोटीसा देऊन १५ दिवसात निवासस्थाने रिक्त करण्याबाबत कळविण्यांत येईल. नसता आपल्या अधिकारात सदरील निवासस्थाने रिक्त करुन घेण्यात येतील.

**श्री.मो.इस्माईल :** अग्नीशामक दलाच्या परिसरात किती निवासस्थाने आहेत. त्यामधील निवासस्थाने वाहनचालकास देण्यात आली का? तेथील किती निवासस्थाने रिक्त आहेत. या बाबतचा खुलासा आगामी बैठकीत करण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विद्यापीठ गेटजवळील म.न.पा.च्या क्वॉर्टर मध्ये प्रत्येकी एक खोली वाढवून देण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराचे गुत्तेदार श्री.सय्यद सिराजउद्दीन यांचे निविदापत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.११४/१४ :**

उप अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र.५८ मो.प्रियदर्शनी इंदिरानगर, इंदिरानगर, गारखेडा येथे ३५० मी.मी.व्यासाची अर्धगोलाकार गटारीचे काम करण्यासाठी अंदाजपत्रक र.रु.१,०२,१९०/- चे तयार करण्यांत आले आहे. सदरचे काम म्हाडा अंतर्गत मिळणाऱ्या अनुदानातून करण्यांत येत आहे.

सदरील कामाकरिता वर्तमानपत्रातून निविदा सूचना प्रसिध्द केल्यानंतर निविदा स्विकृतीच्या दिवशी एकूण आठ निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या. त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.सय्यद रफीकोद्दीन | - | १९.१५% अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| २. | श्री.पी.जे.तमखाने | - | १५.३१% अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ३. | श्री.इकबाल अहमद | - | २१.००% अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ४. | श्री.एस.बी.इंगळे | - | १८.७०% अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ५. | श्री.आनंद बिल्डर्स | - | २१.६०% अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ६. | श्री.आर.एम.मैत्री | - | २३.९९% कमी किंवा जास्त नोंदविले नाही. |
| ७. | श्री.बी.डी.बनकर | - | १८.७९% अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ८. | श्री.अंबादास इंगळे | - | १९.००% अंदाजपत्रकापेक्षा कमी |

सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २३.९९% कमी दराची निविदा श्री.आर.एम.मैत्री यांची निविदा आहे. परंतू निविदामध्ये त्यांनी सदरील दर कमी किंवा जास्त लिहिलेले नाही. त्यामुळे दुसऱ्या क्रमांकाचे ठेकेदार श्री.आनंद बिल्डर्स यांची निविदा २१.६०% कमी दराची निविदा आहे.

तरी श्री.आनंद बिल्डर्स यांची २१.६९% कमी दराची निविदा स्विकारणेस्तव व मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**<u>संवाद :</u>**

**श्री.प्रदिप जैस्वाल :** स्लम विभागात सध्या किती कामे चालू आहेत.

**उपअभियंता स्लम :** सध्या गलिच्छ वस्त्यांमध्ये एकूण १५ (पंधरा) स्लम कामे चालू आहेत.

**श्री.इकबालसिंग गील :** आर.टी.ओ.कार्यालयाच्या मागील बाजुस असलेल्या नाल्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली.

**श्री.प्रभाकर विधाते :** विद्युत कॉलनी अंतर्गतच्या रस्त्यावर एक फार मोठा खड्डा पडलेला आहे. त्या बाबत कार्यवाही का होत नाही.

**श्री.शंकर मगर :** सिल्लेखाना येथील नाल्याबाबत काय कार्यवाही झाली.

**मा.सभापती :** शहर अभियंता यांनी सर्व प्रकरणांचा खुलासा करावा.

**श्री.मो.इस्माईल :** सिल्लेखाना प्रभागाचे स.सभासदांनी सुचवूनसुध्दा अद्यापपर्यंत जुन्या कत्तलखान्याची इमारत पाडून त्या जागेवर शाळेच्या इमारतीचे बांधकाम झालेले नाही.

**मा.सभापती :** सर्व धार्मियांचे सणासुदीचे दिवस जवळ येत असल्यामुळे अशा कामात मा.आयुक्तांनी स्वत: लक्ष देवून युध्द पातळीवर अशी कामे करण्यास्तव योग्य ती कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.५८ मो.प्रियदर्शनी इंदिरानगर, इंदिरानगर, गारखेडा येथे ३५० मी.मी.व्यासाची अर्धगोलाकार गटारीचे कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.६०% कमी दराचे गुत्तेदार श्री.बी.आर.आनंद यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.११५/१५ :**

मोहल्ला समर्थनगर स्थित पोलिस कार्यशाळेच्या मागील भागातील गलिच्छ पाणी हमरस्त्या येऊन नागरिकांना कमालीचा त्रास वाढला होता. तसेच समर्थनगर सहजीवन वसाहतीतील नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होण्याची दाट शक्यता निर्माण झाल्याने (सदरची स्थळ पाहणी मा.महापौर यांनी प्रत्यक्ष करुन गांभीर्य कबुल केले आहे.) पुर्वरचित अर्धगोलाकार गटार टाकणेच्या कामा अंतर्गत (मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) (क) नुसार प्राप्त अधिकारान्वये) व रक्कम रु.६३,१२०/- चे अंदाजपत्रकीय दराने श्री.संजय जैस्वाल हयांचे मार्फत तातडीने करुन घेण्यांत आले. कार्योत्तर मंजूरी व्हावी.

**संवाद :**

**श्री.मो.इस्माईल :** अधिकारी वर्गाच्या जवळ असलेल्या ठेकेदाराकडून अशा प्रकारे तातडीच्या स्वरुपाची कामे करुन घेतली जातात. त्याऐवजी त्यांचेकडे येणाऱ्या ठेकेदरातून सर्वात कमी दराच्या निविदा धारकांकडून कमी दराने काम करुन घेतल्यास मनपाचा त्यात आर्थिक फायदा होईल.

**मा.सभापती :** स.सभासदांच्या भावनांशी मी सहमत आहे. अशी काही महत्वाची व तातडीच्या स्वरुपाची कामे असल्यास तीन ठेकेदारांना बोलावून दर निश्चित करण्यात यावेत व कमी दराच्या ठेकेदाराकडून काम करुन घ्यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.समर्थनगर भागात पुर्वरचित अर्धगोलाकार गटार टाकणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रु.६३,१२०/- चे अंदाजपत्रकास मंजूरी देण्यांत येते व तसेच सदर काम तातडीचे स्वरुपाचे असल्यामुळे गुत्तेदार श्री.संजय जैस्वाल यांचेतर्फे अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास कार्योत्तर मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र.११६/१६ :**

घाटी ते टाऊन हॉल हया अस्तित्वात असलेल्या १५० एम.एम.जलनि:सारण वाहिनीस ताजकॅफेजवळ मकाई गेट आणि घाटी परिसरा अंतर्गत च्या जलनि:सारण वाहिनी अशा दोन्ही ३०० एम.एम.च्या जलनि:सारण वाहिन्या १५० एम.एम.च्या मुख्य जलवाहिनीस मकाई गेट आणि घाटी परिसरातील जलनि:सारण वाहिनी अशा दोन्ही ३०० एम.एम.च्या जलवाहिन्या जोडल्याने सदरच्या जलनि:सारण वाहिन्यांचे अतिजलोत्सारणाने जलोत्सारण लाईन विस्थापित होत असे ज्यामुळे सदरचे दुषित पाणी हमरस्त्यावर इतस्तत: पसरुन पादचाऱ्यास कमालीचा त्रास होत असे व जलवितरण वाहिन्यांमध्ये व्हॉल्व्हद्वारे दुषित पाणी शिरुन लोकांचे आरोग्य धोक्यात येण्याची दाट शक्यता वेळीच लक्षात घेऊन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) (ब) ७नुसार प्राप्त अधिकारान्वये कामाची लक्षात घेऊन सदरची काम र.रु.७५,९७५/-चे अंदाजपत्रकीय दराने गुत्तेदार श्री.हबीबखान यांचेकडून करुन घेतले. कार्योत्तर मंजूरी व्हावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे घाटी ते टाऊन हॉल हया अस्तित्वात असलेल्या १५० एम.एम.जलनि:सारण वाहिनीस ताजकॅफेजवळ मकाई गेट आणि घाटी परिसरा अंतर्गत च्या जलनि:सारण वाहिनी अशा दोन्ही ३०० एम.एम.च्या जलनि:सारण वाहिन्या १५० एम.एम.च्या

मुख्य जलवाहिनीस मकाई गेट आणि घाटी परिसरातील जलनिःसारण वाहिन्यांचे अति जलोत्सारण होत असल्याने सदरील लाईन दुरुस्तीच्या कामासाठी तयार करण्यांत आलेले र.रु.७५,९७५/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. तसेच सदरील काम तातडीच्या स्वरुपाचे असल्याने गुत्तेदार श्री.हबीबखान यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास कार्योत्तर मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.११७/१७ :**

स्थायी समिती ठराव क्र.६५८/३८ दिनांक ३०.०३.९० अन्वये रक्कम रु.१४,१२२/- च्या विहीरीच्य दुरुस्ती व बांधकामाचे कामास मंजुरी मिळाली असून सदरील कामासाठी अ-१ वर निविदा मागविण्यात आल्या असता एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे तयार करण्यांत आला आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.जी.पी.थोटे | - | अ.प.दरापेक्षा ३ % जास्त |
| २. | श्री.के.पी.पाटील | - | अंदाजपत्रकीय दराने |
| ३. | श्री.सी.पी.गायकवाड | - | अ.प.दरापेक्षा २% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या श्री.के.पी.पाटील यांची निविदा (अंदाजपत्रकीय दराने) सर्वात कमी दराची असून सदरील निविदा स्विकारणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री.मोहमंद इस्माईल :** मोंढा येथील हरी मस्जीद मागील ड्रेनेज लाईन नेहमी फुटून बंद होऊन वाहात असते. त्याबाबत काय कार्यवाही झाली या ड्रेनेज लाईन विषयी शहा कमीशनचा अहवाल आल्या शिवाय काम करता येत नाही. असे मागे सांगण्यात आले आहे. तो आला किंवा नाही.

**मा.सभापती :** सदरील काम तातडीच्या स्वरुपाचे असल्याने त्वरीत करण्यात यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विहीद दुरुस्तीचे व बांधकामाचे कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची गुत्तेदार श्री.के.पी.पाटील यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

## ऐनवेळचे विषय

**संवाद :**

**श्री.मो.इस्माईल :** मनपाच्या शाळेतील २५ शिपायाच्या जागेपैकी २३ जागा भरल्या गेल्या व दोन जागा व दोन जागा का भरल्या गेल्या नाहीत. गेल्या दोन वर्षापासून प्रतिक्षा यादीत असलेल्या दोन सेंविकांना का? नेमणूका दिल्या नाहीत.

**मा.सभापती :** या पदावर अद्याप नेमणूका करण्यात आलेल्या नाहीत. जे कर्मचारी या पदावर काम करीत आहेत. त्यांना निश्चित असे मासिक वेतन देण्यात येते.

**मा.सभापती :** स्वेच्छानिधी कोणकोणत्या कामाकरिता उपयोगात आणता येतो. याबाबत खुलासा व्हावा.

**मा.उपआयुक्त :** स्वेच्छा निधीमधून आपण भांडवली स्वरुपाची कामे करु शकतो.

**श्री.मो.इस्माईल :** याबाबत सविस्तर विवरण करावे की भांडवली कामे कोणती व इतर कामे कोणती.

**मा.सभापती :** स्वेच्छा निधी कोणकोणत्या कामाकरिता वापरले जावी अथवा कोणास अनुदान म्हणून देता येते का? याबाबत आगामी बैठकीत सविस्तर खुलासा व्हावा.

**विषय क्र.११८/१८ :**

निवासी उप अभियंता मनपा यांनी प्रस्ताव सादर केला की, सन १९९०-९१ या वर्षाकरिता शहरातील स्ट्रीट लाईट दुरुस्तीसाठी ४'x४० वॅट रॉड एकूण दहा हजार नग खरेदी करण्यासाठी सा.बा.खाते (विद्युत) दरसुची नुसार रक्कम रु.३,६७,५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर खर्च नवीन खरेदी यामधून करण्यात येईल, त्यास मान्यता मिळावी.

सदर विद्युत साहित्य खरेदी करण्यासाठी कार्यालयीन पत्र क्र.मनपा/विद्युत/६२९/९०, दि.३०.०५.९० अन्वये निविदा मागविल्या असता एकूण तीन दर निर्दिष्ट निविदा वसुल झाल्या खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.पगारीया इंटरप्राईजेस, औरंगाबाद | - | रुपये २९.९९ प्र.नग (क्रॉम्पटन) |
| २. | मे.चिंतामणी ट्रेडींग कं.,औरंगाबाद | - | रुपये ३०.५० प्र.नग |
| ३. | मे.कॉम्पटन ग्रीव्ह लि., औरंगाबाद | - | रुपये ३१.५० प्र.नग |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजे र.रु.२९.९९ प्रति नग या दराची मे.पगारीया इंटरप्राईजेस यांची निविदा आहे. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९०-९१ या वर्षाकरिता शहरातील स्ट्रीट लाईट दुरुस्तीसाठी ४'x४० वॅट ट्युब रॉड एकूण १०००० नग खरेदी करण्यासाठी रक्कम रु.३,६७,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. तसेच सदर ट्युब रॉड तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे मे.पगारीया इंटरप्राईजेस, औरंगाबाद यांचेकडून र.रु.२९.९९ प्रति नग या दराने खरेदी करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र.११९/१९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, वार्ड क्र.३७ इंदिरानगर येथे प्राथमिक शाळा बांधणेच्या कामाकरिता सन १९८९-९० च्या सा.बा.खात्याच्या डी.एस.आर.दराप्रमाणे अंदाजपत्रक र.रु.५,००,०००/- चे भाग एक बाबतचे तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च भांडवली इमारती या सदरातून करण्यात येईल. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.३७ इंदिरानगर येथे प्राथमिक शाळा बांधणेच्या कामाकरिता रक्कम रु.५,००,०००/- (भाग एकचे) च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१२०/२० :**

शिक्षणाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, १५ ऑगस्ट १९९०, स्वातंत्र्य दिनानिमित्त महानगरपालिका शालेय विद्यार्थ्यांसाठी सुमारे ३५ हजार मुलांना प्रत्येकी दोन बिस्कीटे देण्यांत येतात.

तसेच तुलनात्मक तक्त्यानुसार बिस्कीटाचे दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | बिस्कीटाचे प्रकार | प्रतिपुडा नग | फर्मचे नांव व दर | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | महावीर प्रोव्हीजन्स | मनोज इंटरप्राईजेस | परवीन ट्रेडर्स |
| १. | पारले गुल्कोज | १ | ३.९५ | ३.७५ | ३.८५ |
| २. | साठे बिस्कीट | १ | ३.२५ | ३.१० | ३.४० |

तुलनात्मक तक्त्यानुसार मनोज इंटरप्राईजेस यांचे साठे बिस्कीटचे दर कमी आहेत. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे १५ ऑगस्ट १९९० "स्वातंत्र्य दिना" निमित्त महानगरपालिका शालेय विद्यार्थ्यांसाठी एकूण पस्तीस हजार मुलांना प्रत्येकी दोन याप्रमाणे बिस्कीटे वाटप करण्याकरिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे मे.मनोज इंटरप्राईजेस यांचे कडून रक्कम रु.३.१० प्रति नग या दराने बिस्कीटे खरेदी करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१२१/२१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिटी क्लब ते जिल्हाधिकारी कार्यालय रस्ता रुंदीकरण व खडीकरण करण्याच्या कामासाठी र.रु.२,५७,५२०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. हे काम शासनाच्या विकास अनुदानित रकमेतून करावयाचे आहे.

सदर कामासाठी स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देऊन प्रगट निविदा मागविल्या असता एकूण दहा निविदा विक्री झाल्यापैकी सात दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.कुलवंतसिंग | - | ३२.९०% कमी |
| २. | श्री.मनजितसिंग | - | २५.९५% कमी |
| ३. | श्री.फाराज असोशिएटस | - | २९.०५% कमी |
| ४. | श्री.पी.जे.तमखाने | - | २७.७७% कमी |
| ५. | श्री.एस.एच.असोशिएटस | - | २७% कमी |
| ६. | श्री.कैसर खान | - | २१.५५% कमी |
| ७. | श्री.पॉल कन्स्ट्रक्शन | - | १६.७८६% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३२.९०% कमी दराची श्री.कुलवंतसिंग यांची निविदा आहे. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिटी क्लब ते जिल्हाधिकारी कार्यालय रस्ता रुंदीकरण व खडीकरण करण्याच्या कामासाठी र.रु.२,५७,५२०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी

देण्यांत येते. तसेच सदर कामासाठी प्राप्त निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३२.९०% कमी दराची श्री.कुलवंतसिंग यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
मा.सभापती, स्थायी समिती
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक ०३.०९.१९९० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**सोमवार दिनांक ०३.०९.१९९० रोजी दुपारी ठीक ३.०० वाजता सभापती मा.श्री.रतनकुमार पंडागळे यांच्या अध्यक्षतेखाली समिती सभागृहात स्थायी समितीच्या सभेस सुरुवात झाली. सदर सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

१. श्री.गाडे गंगाधर सुखदेव
२. श्री.जैस्वाल प्रदिप शिवनारायण
३. श्री.नवपुते कचरु चंद्रभान
४. श्री.मगर शंकर जिजाराम
५. श्री.स.अ.इकबालोद्दीन स.मो.कुतूबोद्दीन
६. श्री.गिल इकबालसिंग प्रितमसिंग
७. श्री.बारवाल गजानन रामकिसन
८. श्री.विधाते प्रभाकर सिताराम
९. श्री.सोनवणे केशव काशिनाथ

<u>**संवाद :**</u>

**श्री.कचरु नवपुते :** आजच्या स्थायी समितीच्या सभेसंबंधी कार्यालयातर्फे जी सूचना आम्हास देण्यांत आली आहे. त्यामध्ये विषयपत्रिकेवरील विषयांपैकी उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार असे नमूद करण्यात आले आहे. करिता उच्च न्यायालयाचा आदेश आम्हास वाचून दाखविण्यात यावा.

**विधी सल्लागार :** न्यायालयाने या प्रकरणात असा आदेश दिला की, so for as the item before the standing committee are concerned an subject Nos.19,21,29 and 32 (List of which is produced) Since they donot involve any major policy decisicer.

**श्री.एकबलासिंग गील, श्री.गंगाधर गाडे :** न्यायालयात कोणत्या कामाची यादी देण्यात आली होती.

**सचिव :** विषय पत्रिकेवरील अ.क्र.१ ते ३३ या आलेल्या प्रस्तावांच्या कामाची यादी न्यायालयात सादर करण्यात आली होती.

**श्री.एकबालसिंग गील, श्री.गंगाधर गाडे :** आजच्या स्थायी समिती सभेचे अध्यक्ष कोण आहेत.

**मा.सभापती :** न्यायालयाच्या आदेशानुसार विषय पत्रिकेवरील फक्त चार विषयावर आजच्या सभेत चर्चा करण्यांत येईल. इतर विषयांवर चर्चा होणार नाही.

**श्री.एकबालसिंग गील :** आजच्या स्थायी समितीचे अध्यक्ष कोण? याचा खुलासा व्हावा.

**सचिव :** मा.श्री.रतनकुमार पंडागळे ह आजच्या स्थायी समितीचे अध्यक्ष आहेत.

**श्री.इकबालसिंग गील :** मागील स भेचा इतिवृत्तांत मंजूर केल्याशिवाय पुढील सभा होवू शकते का?

**श्री.गंगाधर गाडे :** गत सभेच्या इतिवृत्तांतास मान्यता मिळाली, हा विषय न्यायालयासमोर का सादर केला नाही. न्यायालयाच्या आदेशानुसार धोरणात्मक निर्णय घेवू नये.

असे ठरले असता न्यायालयासमोर विषयपत्रिका सादर केली होती का? स्थायी समिती सभा घेण्याची परवानगी विषयपत्रिका न्यायालयात सादर करुन घेतली का? कृपया कोर्टाचा आदेश वाचून दाखवावा.

**विधी सल्लागार :** न्यायालयाने या प्रकरणांत असा आदेश दिला की, so for as item before the standing committee are concerned the standing commettee can take decision can subject no. 19-21-29 and 32 (list of which is produced) Since they do not involve not involve any major policy Decision.

**श्री.इकबालसिंग गील :** गत सभेच्या इतिवृत्तांतास मान्यता घेतल्याशिवाय पुढील सभा होवू शकत नाही.

**सचिव :** न्यायालयाने या प्रकरणात दि.०१.०९.९० रोजी जो निर्णय दिला त्या निर्णयानुसार पुर्वीचा आदेश स्थगित करुन स.श्री.रतनकुमार पंडागळे हे दि.१२.०९.९० पर्यंत सभापती पदाचे काम पाहू शकतात.

**श्री.गंगाधर गाडे :** दि.१२.०९.९० पर्यंत स्थायी समिती सभेत कोणत्या ही धोरणात्मक निर्णय घेऊ नये असे न्यायालयाच्या आदेशा नमूद केले आहे. यांच्य अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभा घ्यावी असा आदेश न्यायालयाने दिलेला नाही.

**मा.सभापती :** न्यायालयाने दिलेला आदेश आपणांस मान्य नाही का?

**श्री.गंगाधर गाडे :** न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या आदर करतो. तसेच त्याचे पालनही करेन.

**मा.सभापती :** मा.विधी सल्लागार यांनी न्यायालयाचा आदेश आपणा सर्वांना वाचून दाखविला आहे. त्यांनी त्यावर खुलासापण केला आहे.

**श्री.गंगाधर गाडे :** न्यायालयाने दिलेला आदेश मला मान्य आहे. या बैठकीत न्यायालयाच्या आदेशानुसार धोरणात्मक निर्णय घेण्यात येवू नयेत. स्थायी समितीची सभा आपण नियमबाह्य घेत आहात. तेव्हा आम्ही सभा त्या करीत आहोत असे म्हणून सभागृह सोडले - (वेळ दुपारी वेळ ३.२५ वाजता श्री.गाडे, श्री.गील, श्री.स.अ.एकबालोद्छीन, व श्री.मो.इस्माईल यांनी सभागृह सोडले.)

**श्री.प्रदिप जैस्वाल :** स.सदस्य श्री.गांगधारजी गाडे यांनी दिलेला अर्ज वाचून दाखविण्यात यावा.

**मा.सभापती :** स.सदस्य श्री.गंगाधर गाडे यांचा दि.०३.०९.९० चा अर्ज वाचून दाखविला.

**विषय क्र.१२२/१९ :**

जलनि:सारण वाहिनी चे मेनहील करिता सी.आय.कव्हर आणि फ्रेमचा पुरवठा करण्याकरिता र.रु.९३,०००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र.४८६ दि.२६.०२.९० अन्वये मंजूरी मिळालेली आहे. सदर कामाकरिता निविदा मागविल्या असता एकूण चार दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.बी.आर.आनंद | - | २.९९% जास्त |
| २. | श्री.पॉल कन्स्ट्रक्शन | - | २६.७८६% जास्त |
| ३. | श्री.कैसर खान | - | १०% जास्त |
| ४. | श्री.आनंद बिल्डर्स | - | ४०% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.९९% जास्त दराचे श्री.बी.आर.आनंद यांचे दर पत्रक आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जलनिःसारण वाहिनीचे मेनहील करिता सी.आय.कव्हर आणि फ्रेमचा पुरवठा करण्याकरिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.९९% जास्त दराचे श्री.बी.आर.आनंद यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१२३/२१ :**

वार्ड क्र.३५ मधील उघड्या गटारीवर सिमेंट ढापे तयार करुन टाकणेच्या कामाकरिता र.रु.१९,०००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र.७५७ दि.२४.०४.९० ला मंजूरी प्राप्त झालेली आहे. सदर कामाकरिता बी-१ नमून्यात मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.गौतम कन्स्ट्रक्शन | - | ७.१०% कमी |
| २. | श्री.एस.ए.बाहोद्दीन | - | २७% कमी |
| ३. | श्री.सलीम खान | - | १०.८६% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७% कमी दराचे श्री.एस.ए.बाहोद्दीन यांचे दर पत्रक आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.३५ मधील उघड्या गटारीवर सिमेंट ढापे तयार करुन टाकणेच्या कामाकरिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७% कमी दराची श्री.एस.ए.बाहोद्दीन यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१२४/२९:**

वार्ड क्र.४८ श्रेयनगर जवळील मंजूर रेखांकन सी.टी.एस.१६०३१/मंथन मागासवर्गीय गृहनिर्माण संस्थेतील रहिवाशांनी (स.न.४६) अर्ज देऊन सदरील ठिकाणी पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन टाकणे बद्दल कार्यालयास विनंती केली होती.

सदरील संस्थेने १०० टक्के विकास निधी भरलेला आहे. सदर अर्ज विचारात घेऊन र.रु.६२,६४०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास स्थायी समिती ठराव क्र.२, दि.०८.०६.८९ अन्व्ये मंजूरी मिळालेली आहे.

जाहीर निविदाद्वारे दिलीप जैस्वाल यांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३% कमी दराची निविदा दाखल केली. तीस ठराव क्र.११७ दिनांक २५.०८.८९ अन्वये मंजूरीही मिळालेली आहे. परंतू आजारी असल्यामुळे आपण सदर काम करु शकत नसल्याने दिलीप जैस्वाल यांनी लेखी कार्यालयास लिहून दिले आहे.

दुसऱ्या क्रमांकांचे कंत्राटदार श्री.अर्शद नोमी यांना दिलीप जैस्वाल यांचे दरामध्ये म्हणजे २३% कमी दरामध्ये काम करणेस तयार आहात काय अशी विचारणा केली असता त्यांनी सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३% कमी दराने काम करणेस तयार असल्याचे लिहिले आहे. दिलीप जैस्वाल यांची इसारा रक्कम जप्त करण्यात आली आहे.

सदरील कामात साहित्याची किंमत वजा जाता मजूरीची रक्कम रु.२१,४९१/- इतकी आहे. मा.आयुक्तांनी दि.१२.०७.९० रोजी दुसऱ्या क्रमांकाचे गुत्तेदार श्री.अर्शद नोमी यांचेकडून काम करुन घेण्यास मान्यता दिली आहे. करिता सदरील प्रकरणी श्री.अर्शद नोमी

यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३% कमी दराने काम करुन घेणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.४८ श्रेयनगर, जवळील मंजूर रेखांकन सी.टी.एस.नं.१६०३१ मंथन मागासवर्गीय गृहनिर्माण संस्थेतील अंतर्गत पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन टाकणे करिता दुसऱ्या क्रमांकाचे कंत्राटदार श्री.अर्शद नोमी यांनी लेखी दिल्याप्रमाणे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३% कमी दराने काम करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१२५/३२ :**

सन १९९०-९१ सालाकरिता ब्लिचिंग पावडर खरेदी करणे करिता र.रु.३,१४,०००/- च्या अंदाजपत्रकास ठराव क्र.७२, दि.११.०७.९० अन्वये मंजूरी मिळालेली आहे. सदर खरेदी करिता कार्यालयीन निविदा सूचना क्रमांक पापु/भांडार/११३०/९०, दि.१४.०७.९० अन्वये उत्पादकाकडून निविदा मागविण्यांत आल्या असता दि.३०.०७.९० पर्यंत एकूण दोन निविदा उपलब्ध झाल्या पैकी सर्वात कमी दराची निविदा रक्कम रु.४,५९१/- प्रति मे.टन या दराची मे.पी.आर.केमीकल्स, बीड यांची आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

सन १९९०-९१ सालाकरिता ब्लिचिंग पावडर खरेदी करणेसाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची मे.पी.आर.केमिकल्स बीड, यांची प्रतिटन रक्कम रु.४,९५१/- या दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

यानंतर मा.सभापती यांनी उच्च न्यायालयाने दर्शविलेल्या विषयावरील आजची सभा संपल्याचे जाहिर केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | मा.सभापती, स्थायी समिती |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक २४.०९.१९९० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**सोमवार दिनांक २४.०९.१९९० रोजी दुपारी ३.०० वाजता समिती सभागृहात मा. सभापती श्री.रतनकुमार पंडागळे यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभेस सुरुवात झाली. या सभेमध्ये कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

१. श्री.जैस्वाल प्रदिप शिवनारायण
२. श्री.नवपुते कचरु चंद्रभान
३. श्री.मगर शंकर जिजाराम
४. श्री.स.अ.इकबालोद्दीन स.मो.कुतूबोद्दीन
५. श्री.गिल इकबालसिंग प्रितमसिंग
६. श्री.फैय्याज खान अहमद खान
७. श्री.मो.इस्माईल अ.करीम
८. श्री.विधाते प्रभाकर सिताराम
९. श्री.सोनवणे केशव काशिनाथ

**संवाद :**

**श्री.केशव सोनवणे :** कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा यांना सिडको परिसरातील पाणी पुरवठ्याच्या व्यवस्थेसंबंधी एका पत्राद्वारे काही माहिती विचारण्यात आली होती. सदरची माहिती अद्यापपर्यंत प्राप्त झालेली नाही.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** सभेच्या सुरवातीस प्रथम गत सभेच्या इतिवृत्तावर चर्चा करुन त्यास कायम केल्यानंतर दुसऱ्या विषयांवर चर्चा करण्यांत यावी.

**मा.सभापती :** शहरातील पाणी पुरवठा करणारी जलवाहिनी एका ठिकाणी फुटल्यामुळे संबंधित अधिकारी सभागृहात उपस्थित नाही. तेव्हा त्याबद्दल आजच्या बैठकीत माहिती देता येवू शकत नाही.

**श्री.कचरु नवपुते :** सिडको परिसरातील पाण्याची टंचाई दूर करण्याच्या संदर्भात कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा यांना एक पत्र देण्यात आले होते. त्यावर विचार झालेला दिसत नाही.

**श्री.केशव सोनवणे :** सिडको परिसरात गेल्या ८/१० दिवसांपासून एक दिवस आड पाणी पुरवठा करण्यात येत आहे. त्यामुळे सिडकोवासियांना पाण्याकरिता फार त्रास होत आहे. याप्रकरणी मनपाच्या एका कर्मचाऱ्यांस काही दिवसापुर्वी मारहाण झालेली आहे. यापुढे असे होऊ नये म्हणून सिडको परिसरातील पाणी पुरवठा सुरळीत करण्यात यावा.

**मा.सभापती :** ही सभा संपल्यानंतर कार्यकारी अभियंता व मी प्रत्यक्ष पाहणी करुन सिडकोतील पाणी पुरवठा सुरळीत होण्याच्या दृष्टीने तोडगा काढण्यात येईल.

**श्री.मो.इस्माईल :** स्थायी समितीच्या पाहिल्या बैठकीपासून वारंवार मागणी करुन सुध्दा माझ्या वार्डातील कामाच्या दोन संचिकांवर अद्यापपर्यंत काही कार्यवाही

झालेली नाही. तसेच सदरील संचिका सापडल्या का? हयाचा खुलासा व्हावा.

**उपअभियंता :** आपल्या वार्डातील दोन्ही कामांपैकी नंदलाल बिडी इमारती जवळील कामाकरिता निविदा मागविण्यांत आल्या आहेत. नवाबपुरा भागातील कामाचे अंदाजपत्रक मंजूरीस्तव शहर अभियंता यांचेकडे पाठविण्यांत आले आहे.

**श्री.मो.इस्माईल :** नवाबपुरा परिसरात खांडकी बसविण्याच्या कामाचे फक्त र.रु.४५,०००/- चे अंदाजपत्रक आहे. सदर रक्कम फार मोठी नाही. आयुक्तांच्या कक्षेतील व अधिकारातील असल्यामुळे सदरचे काम त्वरीत करण्यात यावे.

**मा.सभापती :** शहर अभियंता यांनी खुलासा करावा.

**शहर अभियंता :** सदरील कामाच्या संचिकेस आगामी सभेपर्यंत प्रशासकीय मंजूरी घेण्यांत येईल. तसेच एक महिन्यात काम सुरु करण्यांत येईल.

**मा.सभापती :** प्रथम गत सभेचे इतिवृत्त कायम करण्यांत यावे. त्यानंतर इतर विषयांवर चर्चा करण्यांत येईल.

**विषय क्र.१२६/१ :**

दि.०६.०८.९० व ०३.०९.९० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री.कचरु नवपुते :** चिकलठाणा येथील आठवडी बाजारासंबंधी कालच्या वर्तमान पत्रात बातमी आली होती की, आठवडी बाजारामधील रस्त्याची परिस्थिती अत्यंत दयनीय व खराब आहे. याबाबत काय कार्यवाही करण्यांत आली, याचा खुलासा व्हावा.

**शहर अभियंता :** चिकलठाणा येथील आठवडी बाजारात मुरुम टाकून तेथील रस्ते पक्के करण्यात येईल.

**श्री.कचरु नवपुते :** आठवडी बाजारात मुरुम टाकून काही फायदा नाही. पुढील आठवडी बाजाराच्या वेळेस, बाजाराकरता येणारे व्यापारी पैसे (फीस) देणार नाहीत.

**उपअभियंता :** पुढील महिन्यांत चिकलठाणा येथील आठवडी बाजारातील रस्ते पक्के करण्यात येतील.

**श्री.शंकर मगर :** गलिच्छ वस्तीमध्ये पाणी पुरवठ्याची पाईपलाईन टाकण्याकरिता तेथील नागरिकांकडून विकास खर्चाची रक्कम वसुल करण्यात आली. परंतू अद्यापपर्यंत त्या भागात पाणी पुरवठा पाईप लाईन टाकण्यांत आलेली नाही. या कामाची अंदाजपत्रके तयार करण्यात आली का?

**जलगृह अभियंता :** या कामाकरिता अंदाजपत्रके तयार करावयाचे आहे. आगामी सभेत अंदाजपत्रके सादर करण्यांत येतील.

**श्री.प्रभाकर विधाते :** जयसिंगपुरा भागात खांडकीची एक गटार बंद झाल्यामुळे या गटारीचे घाण पाणी रस्त्यावर वाहत आहे. त्यामुळे रस्त्यावर घाण झालेली असून नागरिकांना फार त्रास होत आहे. म्हणून तेथील नागरिकांच्या संतप्त तक्रीर येत आहेत.

**जलगृह अभियंता :** जयसिंगपुरा येथील गटारीची स्थळ पाहणी करुन अहवाल सादर करण्यात येईल.

**मा.सभापती :** उद्या सकाळी जलगृह अभियंतासह मी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन पाहणी अहवाल आगामी सभेत सादर करण्यात येईल.

**श्री.एकबालसिंग गिल :** दि.०६.०८.९० रोजी संपन्न झालेल्या सभेत स्वेच्छा निधीमधून कोणास अनुदान देण्यात येते का? या बाबत खुलासा मागविला होता. त्याचा खुलासा अद्यापपर्यंत मिळालेला नाही.

**मुख्यलेखापरिक्षक :** सभागृहाकडे याबाबत खुलासा पाठविण्यांत आलेला आहे.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** दि.०६.०८.९० रोजी संपन्न झालेल्या सभेच्या इतिवृत्तातील पा.क्र.२ अन्वये स.सदस्य श्री.विधाते यांच्या वार्डातील कामाबाबत खुलासा करण्यांत यावा.

**मा.सभापती :** स.सदस्य श्री.विधाते यांना त्यासंबंधी माहिती पुरविण्यांत आली आहे.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** सदरील माहिती सभागृहात देण्यात यावी.

**मा.सभापती :** उपअभियंता यांनी याबाबत खुलासा करावा.

**उपअभियंता :** स.सदस्य श्री.विधाते यांच्या वार्डात त्यांनी सुचविल्याप्रमाणे चार कामे करावयाी आहेत. त्यापैकी बेगमपूरा भागात रस्ता तयार करण्याकरिता खडी टाकण्याचे काम चालू आहे. जयसिंगपुरा येथील कामाकरिता निविदा मागविण्यांत आलेल्या आहेत. इतर कामाबाबत कार्यवाही चालू आहे.

**श्री.केशव सोनवणे :** इतिवृत्ताचे पा.क्र.३ अन्वये रेटलिस्ट वरील कामाची माहिती अद्यापपर्यंत उपलब्ध झालेली नाही. याबाबत खुलासा व्हावा.

**मा.सभापती :** सर्व संबंधित विभागाकडून रेटलिस्टवरील कामाची यादी प्राप्त झाल्यावर आपणास स्वतंत्ररित्य अवलोकनार्थ देण्यांत येईल.

**श्री.स.अ.एकबालोद्दीन :** इतिवृत्ताचे पान क्र.५ प्रमाणे मनपाने खरेदी केलेल्या पाईपपैकी एक पाईप फोडून त्यातील लोखंड मोजण्यात आले का? याबाबत खुलासा व्हावा.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** स.सदस्य स.अ.इकबालोद्दीन यांनी सुचविल्याप्रमाणे मनपाने खरेदी केलेल्या पाईपपैकी एक पाईप फोडून त्यातील लोखंडाचे वजन करुन दाखवावे याकरिता तारिख, वेळ, व स्थळ प्रथम निश्चित करण्यात यावे.

**मा.सभापती :** स्थायी समिती सभापती पदाचा वाद न्यायप्रविष्ट असल्याकारणाने आपणास वेळ मिळाला नाही. आता आपणास भरपूर वेळ आहे. तेव्हा सुचवाल त्यावेळेस पाईप फोडून त्यातील लोखंडाचे वजन करण्यात येईल.

**श्री.केशव सोनवणे :** सभागृहातील स.सदस्य तांत्रिकदृष्ट्या तज्ञ आहेत का? याबाबत आपणांस काय समजणार आहे. तेव्हा तांत्रिकदृष्ट्या तज्ञ असलेल्या व्यक्तीकडून तपासणी करुन घ्यावी अथवा आय.एल.आय.इन्स्टिट्युटला पत्र लिहून याची शहानिशा करावी.

**मा.सभापती :** खरेदी केलेल्या पाईपपैकी एक पाईप क्वालिटी कंट्रोल कार्यालयास पाठवून त्याबाबत त्यांचा अहवाल मागविण्यांत येईल. तो अहवाल प्राप्त झाल्यावर आपण निर्णय घेऊ.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** इतिवृत्त पा.क्र.९ अन्वये पीरबाजार येथील मनपा च्या शाळेस संरक्षित भिंत बांधण्यासाठीच्या बाबी संबंधी काय कार्यवाही करण्यांत आली. याचा खुलासा व्हावा.

**उपअभियंता :** पीरबाजार येथील शाळेस संरक्षित भिंत बांधण्याकरिता शाळेच्या बाजूस जागा उपलब्ध नाही. मनपाच्या ताब्यात सध्या जी जागा आहे त्या जागेवर भिंत बांधणे शक्य नाही.

**मा.सभापती :** पीरबाजार शाळेच्या इमारतीच्या बाजूस असलेल्या जागेवर अतिक्रमण करुन विनापरवाना बांधकाम झालेले आहे. सदरील विनापरवाना बांधकाम पाडून तिथे भिंत बांधण्यात यावी.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** दोन दिवसापुर्वी प्रत्यक्ष या शाळेची पाहणी केली असता असे निदर्शनास आले की, काही व्यक्ती दारु प्राशन करुन शाळेच्या आवारात प्रवेश करतात. त्यामुळे शिक्षकांना आणि विद्यार्थ्यांना त्यांच्यापासून फार त्रास होतो. करिता या शाळेस त्वरीत संरक्षित भिंत बांधणे जरुरीचे आहे.

**मा.सभापती :** सहाय्यक संचालक, नगररचना यांनी पीरबाजार येथील शाळेलगतची जागा संपादन करण्याकरिता भूसंपादनाची कार्यवाही करावी. तसेच नगर रचना अधिकारी, उपअभियंता-२, व मी स्वत: प्रत्यक्ष जागेची पाहणी करुन त्या शाळेची अडचण दुर करण्याचा प्रयत्न करीन.

**श्री.स.अ.एकबालोद्दीन :** हर्ष नगर येथील मनपाच्या शाळेस संरक्षित भिंत नाही. तसेच त्याठिकाणी चौकीदार पण नाही. त्यामुळे शाळेच्या इमारतीत जुगार खेळला जातो. असे मला कळाले आहे.

**मा.सभापती :** मनपा शाळेच्या इमारतीस ज्या ज्या ठिकाणी जागा उपलब्ध आहे. तिथे संरक्षित भिंत बांधण्यात यावी. ज्या शाळेच्या इमारतीस संरक्षित भिंत बांधण्यास जागा उपलब्ध नाही. अशा ठिकाणी तारेचे कुंपण घालावे तसेच शाळेच्या इमारतीच्या ठिकाणी चौकीदाराच्या नेमणूका करण्यात याव्यात.

**श्री.मो.इस्माईल :** एन-७ सिडको येथील मनपाच्या शाळेत रात्रीच्या वेळेस जुगार खेळतांना पोलिसांनी काही व्यक्तींना पकडले. अशी वर्तमानपत्रात बातमी आली आहे. तेव्हा त्या व्यक्तींनी दरवाजा तोडून आत प्रवेश केला का? अथवा तेथील चौकीदारांच्या संगनमताने तेथे जुगार खेळला जातो का? त्या शाळेच्या मुख्याध्यापकाकडून यासंबंधी काही माहिती प्राप्त झाली का? याचा खुलासा व्हावा.

**मा.सभापती :** शिक्षणाधिकारी यांनी खुलासा करावा.

**शिक्षणाधिकारी :** माझ्याकडे अद्यापपर्यंत हयासंबंधी काहीच माहिती प्राप्त झालेली नाही.

**मा.सभापती :** त्या शाळेच्या मुख्याध्यापकास या प्रकरणी नोटीस देवून त्याचा खुलासा मागविण्यात यावा. व चौकशी करण्यात यावी.

**श्री.प्रभाकर विधाते, श्री.कचरु नवपुते :** मध्यवर्ती बसस्थानक येथील जकात नाक्यावरील लिपीकाने आलेल्या मालावर जकात वसूल न करता माल सोडून दिला. जकात न भरता सोडलेला माल स.सदस्य श्री.सुदाम वाघमारे यांनी पकडून झालेला भ्रष्टाचार उघडकीस आणला. या संदर्भात वर्तमानपत्रात पण बातमी प्रसिध्द झाली होती. या प्रकरणी काय कार्यवाही करण्यात आली याचा खुलासा व्हावा.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** जकात पावती न घेता माल सोडून देण्यात आला. संबंधित लिपीक जकात पावती पुस्तक घेवून बाहेर गेलेला होता. या प्रकरणी चौकशी करण्यांत आली का?

**मा.सभापती :** मा.उपआयुक्त यांनी या प्रकरणात खुलासा करावा.

**मा.उपआयुक्त :** याप्रकरणी सर्वसाधारण सभेत चर्चा झालेली आहे. या प्रकरणात चौकशी चालू आहे. चौकशी अहवालानुसार दोषी असलेल्या कर्मचाऱ्यांवर कार्यवाही करण्यात येईल. चौकशी करिता त्या जकात नाक्याचे एक महिन्यापुर्वी

पासूनचे अभिलेखे मागविण्यांत आले आहेत. तसेच एक चौकशी समिती कायम करण्यात आलेली आहे.

**ठराव :**

दिनांक ०६.०८.९० व ०३.०९.९० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीच्या सभेचे इतिवृतांत कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१२७/२ :**

जालना रोडवरील सुराणानगर येथे १५० मी.मी.व्यासाची चीनी मातीची ड्रेनेज लाईन टाकण्याचे कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु.१,१४,७५५/- चे तयार करण्यात आले व अंतर्गत ले आऊटमध्ये र.रु.७१,२३०/- चे काम करण्यात आले. सदरील ड्रेनेज लाईन मुख्य ड्रेनेजला जागेच्या वादामुळे जोडण्यात आली नाही. सदरील जागा उपलब्ध करुन देण्यास्तव उपअभियंता, जलनि:सारण हयांचे तर्फे संचिका सहा.संचालक नगर रचना विभागाकडे दिनांक २२.१२.८९ ला पाठविण्यांत आली व त्यांनी दिनांक १७.०३.९० ला मा.आयुक्तांनी सदरील जागा संपादनास्तव कार्यवाही करणे बाबत दि.१४.०३.९० ला मान्यता दिली आहे. व नगररचना विभागातर्फे जमीन संपादण्याची कार्यवाही सुरु झाल्याबाबत कळविले आहे.

परंतू, अद्यापपावेतो जमीन संपादन केलेबाबत सुचनापत्र मिळालेले नाही व त्यामुळे सुराणानगर मध्ये टाकलेल्या ड्रेनेज लाईनचा फायदा तेथील प्लॉट धारकांना मिळत नाही. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**कार्यकारी अभियंता :** सदरच्या प्रस्तावातील कामास मंजूरी मिळालेली आहे. प्रस्ताव चुकीने स्थायी समितीच्या विषयपत्रिकेवर घेण्यांत आला आहे.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** प्रस्ताव काय आहे, हे समजत नाही.

**मा.सभापती :** कार्यकारी अभियंता यांनी खुलासा करावा.

**कार्यकारी अभियंता :** सुराणानगर परिसरात १५० मी.मी.व्यासाची पाईप लाईन टाकण्याच्या कामाकरिता र.रु.१,१४,७५५/- ला मंजूरी प्राप्त झालेली असून त्यापैकी रक्कम रु.७१,२३०/- चे काम करण्यात आले आहे. जागेच्या वादामुळे सदरील ड्रेनेजच्या लाईनचे काम पूर्ण झाले नाही. पाईप लाईन करिता जागा उपलब्ध करुन देण्याकरिता या कामाची संचिका सहा.संचालक, नगररचना यांचेकडे पाठविण्यांत आली आहे. या प्रस्तावात जमीन संपादन करण्याबाबत काय कार्यवाही झाली. याचा खुलासा मागविला होता.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** या कामाकरिता एकतर ठराव मंजूर झाला आहे. तेव्हा प्रस्ताव पाठविण्यांची आवश्यकता नव्हती. सदरील प्रस्ताव आजच्या विषयपत्रीकेवरुन वगळण्यात यावा.

**मा.सभापती :** सदरचा प्रस्ताव विषयपत्रिकेवर आहे. तेव्हा तो विषय पत्रिकेवरुन वगळण्यात येतो.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** प्रस्ताव विचारार्थ सादर ऐवजी माहिति सादर याप्रमाणे चुकीची दुरुस्ती करण्यात यावी.

**मा.सभापती :** माहितीस्तव सादर अशी दुरुस्ती करण्यात यावी.

**ठराव :**

दिनांक २४.०९.९० च्या स्थायी समितीच्या विषयपत्रिकेवरील विषय क्र.२ माहितीस्तव असल्यामुळे आजच्या विषय पत्रिकेवरुन सदर विषय सर्वानुमते वगळण्यास मान्यता देण्यांत येते.

**विषय क्र.१२८/३ :**

वार्ड क्र.५७ मो.बन्सीलालनगर रेल्वेस्टेशन रोड येथे दगडी गटार बांधणे बाबत अंदाजपत्रक र.रु.१,५१,३६५/- चे तयार करण्यांत आलेले आहे.

सदर इंजिनीअरींग कॉलेजपासून पावसाळ्यांत पावसाचे पाणी वाहत येऊन मोहल्ल्यातील बऱ्याचशा घरांमध्ये पाणी शिरते. त्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागतो. करिता हॉटेल तंदूर पर्यंत गटार बांधणे जरुर असून सदर गटारीची लांबी २०० मीटर आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

**श्री.स.अ.एकबालोद्दीन :** इंजिनियरींग कॉलेजच्या बाजूस असलेल्या कोणाच्या घरात पाणी जाते?

**श्री.मो.इस्माईल :** या कामाची पाहणी करण्यात यावी. एम.आय.डी.सी.येथील कामाची स्थळ पाहणी करण्याचे मागे ठरले होते. त्या कामाची पाहणी अद्यापपर्यंत झालेली नाही.

**मा.सभापती :** सभापती पदाचा वाद न्यायप्रविष्ट होता. त्यामुळे स्थळपाहणीस वेळ मिळाला नाही. आता दिनांक व वेळ निश्चित करुन स्थळ पाहणी करण्यात येईल.

**श्री.मो.इस्माईल :** नवाबपुरा येथील माझ्या जुन्या घराच्या पत्त्यावर पत्रव्यवहार करण्यात येतो. त्यामुळे पत्र वेळेवर प्राप्त होत नाही. करिता माझ्या नवीन घराच्या पत्त्यावर पत्रव्यवहार करावा. पत्रव्यवहाराची सर्व कागदपत्रे मनपा सचिवामार्फत पाठविण्यांत यावी.

**मा.सभापती :** स.सदस्यांच्या सुचनेनुसार यापुढे यांच्या नवीन घराच्या पत्यावर पत्रव्यवहार करण्याबाबत दक्षता घ्यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.५७ मो.बन्सीलालनगर, रेल्वेस्टेशन रोड येथे दगडी गटार बांधणेच्या कामाकरिता र.रु.१,५१,३६५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१२९/४ :**

वार्ड क्र.३८ मो.भवानी नगर येथे २५० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे करिता र.रु.२,९३,०००/- अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे. सदर ठिकाणी १५० मी.मी.व्यसाची जुनी पाईप लाईन असून सांडपाणी चौकोनी चेंबरमध्ये सोडल्याने सदर लाईन वारंवार चोकअप होऊन नागरिकांना दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागतो. करिता या ठिकाणी १३५० लांबीची ड्रेनेज लाईन टाकणे आवश्यक आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.३८ मो.भवानी नगर येथे २५० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेकरिता र.रु.२,९३,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१३०/५ :**

वार्ड क्र.२४ मध्यवर्ती बसस्थानक मस्जिद जवळ १५० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेकरिता र.रु.१८,१००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र.६३२, दि.३०.०३.९० अन्वये मंजूरी मिळालेली आहे. सदर कामासाठी बी-१ नमून्यात निविदा मागविल्या असता एकूण दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.अब्दुलखान | - | १५.८२% कमी |
| २. | श्री.शेख सलीम | - | ११% कमी |
| ३. | श्री.सलीमखाँ रशीद खाँ | - | १७.८६% कमी |
| ४. | श्री.सय्यद सिराजुद्दीन | - | २४% कमी |
| ५. | श्री.नरेंद्रसिंग तारासिंग | - | २५.५२% कमी |
| ६. | श्री.शेख इकबालसिंग | - | २५% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५.५२% कमी दराचे श्री.नरेंद्रसिंग तारासिंग यांचे दर पत्रक आहे. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.२४ बसस्थानक (मध्यवर्ती) मस्जिदजवळ १५० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५.५२% कमी दराचे श्री.नरेंद्रसिंग तारासिंग यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१३१/६ :**

वार्ड क्र.४९ मो.नाथनगर येथे २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे करिता र.रु.२३,७४०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून मा.आयुक्तांच्या आदेशानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा बी-१ नमुन्यात मागविल्या असता एकूण दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.शंकर भैरव | - | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | श्री.एच.बी.शेळके | - | २% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी दराचे श्री.एस.बी. शेळके यांचे दर पत्रक आहे. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.४९ मो.नाथनगर येथे २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे करिता तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी दराचे श्री.एस.बी. शेळके यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र.१३२/७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, बेगमपुरा स्मशानभूमी येथे कंपाऊंडवाल बांधणेच्या कामासाठी र.रु.४,३७,६२०/- ला स्थायी समिती बैठक दि.२४.०४.९० रोजी मंजूरी प्राप्त झालेली आहे. सदर कामासाठी कार्यालयीन निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | एस.एच.असोशिएट्स | - | २% जास्त |
| २. | श्री.एस.ए.नवाब | - | ४% जास्त |
| ३. | श्री.एस.एम.मंडोरे | - | ०.२०% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.२०% कमी दराची श्री.एस.एम.मंडोरे यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

<u>संवाद :</u>

**मा.सभापती :** या कामाकरिता आलेल्या निविदाचे दर जास्त कमी असल्यामुळे फेरनिविदा मागविण्यांत याव्यात.
**उपअभियंता :** फेरनिविदा मागविल्यास कामास विलंब होईल. कारण फेरनिविदा मागविल्यास कमीत कमी १५ दिवसांचा द्यावा लागेल. अल्पमुदतीची निविदा काढल्यास काम त्वरीत होईल.
**मा.सभापती :** मा.आयुक्त यांची मंजूरी घेऊन अल्पमुदतीची फेरनिविदा मागवावी.

**ठराव :**
सदर कामाकरिता मा.आयुक्तांच्या मंजूरीने अल्पमुदतीची फेरनिविदा मागविण्यांत यावी. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.१३३/८ :**
शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, कोतवालपूरा येथील सी.टी.एस.नं.२९३० (भाग) येथील मंजूर रेखांकनातील खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी स्थायी समिती ठराव क्र.७५३, दि.२४.०४.९० अन्वये र.रु.१,३५,४३०/- च्या अंदाजपत्रकास मान्यता प्राप्त झालेली आहे. सदर कामासाठी कार्यालयीन निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.पॉल कन्स्ट्रक्शन | - | ५.६% जास्त |
| २. | श्री.जी.एम.बालचंदानी | - | ७% जास्त |
| ३. | श्री.संतोष सोनवणे | - | ०.१०% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी दराची श्री.संतोष सोनवणे यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**
प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कोतवालपूरा सी.टी.एस.नं.२९३० (भाग) येथील मंजूर रेखांकनातील खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी दराची श्री.संतोष सोनवणे यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१३४/९ :**
शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, शिवाजी मैदान येथील टी.बी.हॉस्पीटल जवळील रस्त्याचे खडीकरण करुन रिटेनींग वॉलचे काम करणेसाठी

र.रु.१,६३,४५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. हे काम शासनाचे विकास अनुदानित रकमेतून करावयाचे आहे.

सदरील कामासाठी स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देवून निविदा मागविल्या असता एकूण बारा दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.एस.एच.असोशिएट्स | - | २९.१% कमी |
| २. | श्री.रविंद्रसिंग | - | २८.७०% कमी |
| ३. | श्री.एस.बी.इंगळे | - | २७.७७% कमी |
| ४. | श्री.एम.एम.बेग | - | २७.८० कमी |
| ५. | श्री.मेकवेल कन्स्ट्रक्शन | - | २६.९९% कमी |
| ६. | श्री.मनजितसिंग | - | २६.२५% कमी |
| ७. | श्री.सय्यद सिराजोद्दीन | - | २४.५०% कमी |
| ८. | श्री.सलीम अहमद | - | २३.५०% कमी |
| ९. | श्री.मोहम्मद सलीम | - | २१.०५% कमी |
| १०. | श्री.पॉल कन्स्ट्रक्शन | - | १८.७८६% कमी |
| ११. | श्री.सय्यद अथर अली | - | १९.७८६% कमी |
| १२. | श्री.जी.एम.कटारीया | - | १७.७७% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २९.१% कमी दराची श्री.एस.एच.असोशिएट्स यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**<u>संवाद :</u>**

**श्री.शंकर मगर, श्री.केशव सोनवणे :** कामाच्या अंदाजपत्रकास मंजूरी मिळाली आहे का?

**मा.सभापती :** निवासी उप अभियंता यांनी याबाबत खुलासा करावा.

**नि.उप अभियंता :** सदरील काम तातडीच्या स्वरुपाचे असल्यामुळे व शासनाकडून प्राप्त होणाऱ्या विकास अनुदानातून कामाचा खर्च करावयाच्या मा.आयुक्त यांनी काम सुरु करण्याच्या आदेश दिला आहे.

**श्री.केशव सोनवणे :** शहरातील रस्त्याचे डांबरीकरण करण्याची कामे तेव्हा सुरु होणार आहेत.

**नि.उप अभियंता :** शहरातील रस्त्याचे डांबरीकरणाची कामे १०.१०.९० पासून सुरु करण्यात येत आहेत.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शिवाजी मैदान येथील टी.बी.हॉस्पीटल जवळील रस्त्याचे खडीकरण करुन रिटेनींग वॉलचे काम करणेसाठी रक्कम रु.१,६३,४५०/- च्या अंदाजपत्रकास व सदर कामाकरिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २९.१% कमी दराच्या श्री.एस.एच.असोशिएट्स यांच्या निविदेस तसेच हा खर्च शासनाकडून प्राप्त विकास अनुदानित रक्कमेमधून करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१३५/१० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मिल कॉर्नर ते सिटी क्लब या १०० फुट विकास रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामासाठी र.रु.१६,१९,३५२/- चे अंदाजपत्रक

तयार करण्यांत आले आहे. सदरील काम हे शासनाच्या विकास अनुदानित रकमेतून करावयाचे आहे. या कामासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविल्या असता एकूण दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालीलप्रमाणे

१. श्री.एम.एस.जग्गी - १५% कमी
२. श्री.गुरुनानक इंडस्ट्रीज - १४.९५% कमी

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% कमी दराची श्री.एम.एस.जग्गी यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मिल कॉर्नर ते सिटी क्लब या १०० फुट विकास रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामासाठी र.रु.१६,१९,३५२/- च्या अंदाजपत्रकास व सदर कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% कमी दराची श्री.एम.एस.जग्गी यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१३६/११ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिटी क्लब ते जिल्हाधिकारी कार्यालय या विकास रस्त्याचे डांबरीकरणाचे कामासाठी र.रु.२,८०,३००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम शासनाच्या विकास अनुदानित रकमेतून करावयाचे आहे. या कामासाठी स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देवून प्रगट निविदा मागविल्या असता एकूण दोन दर भरलेल्या निविदा प्राप्त झाल्या. त्याखालीलप्रमाणे

१. श्री.गुरुनानक इंडस्ट्रीज - १६% कमी
२. श्री.एम.एस.जग्गी - १५% कमी

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६% कमी दराची श्री. गुरुनानक इंडस्ट्रीज यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिटी क्लब ते जिल्हाधिकारी कार्यालय या विकास रस्त्याचे डांबरीकरणाचे कामासाठी र.रु.२,८०,३००/- चे अंदाजपत्रकास व सदर कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६% कमी दराच्या श्री. गुरुनानक इंडस्ट्रीज यांच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१३७/१२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सुपर मार्केट औरंगपुरा येथील पहिल्या मजल्याचे विद्युतीकरणाचे कामासाठी र.रु.२६,२२०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून त्यास मान्यता मिळाली. सदरील तयार करण्यात आले असून त्यास मान्यता मिळाली. सदरील कामासाठी निविदा मागविल्या असता एकूण नऊ दरनिर्दिष्ट कामासाठी निविदा मागविल्या असता एकूण नऊ दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

१. मे.एस.ए.ट्रेडर्स - १९% कमी
२. मे.बुश इलेक्ट्रीकल्स - २२% कमी

३. मे.संजय इलेक्ट्रीकल्स - ५.६५% कमी
४. मे.वरद इलेक्ट्रीकल्स - १५% कमी
५. मे.सुरेंद्र इलेक्ट्रीकल्स - २२.२% कमी
६. मे.ओमशांती इलेक्ट्रीकल्स - २४.९% कमी
७. मे.रिगल इलेक्ट्रीकल्स - १०% कमी
८. मे.शांती इलेक्ट्रीकल्स - २१% कमी
९. मे.श्रीसमर्थ इलेक्ट्रीकल्स - ३०% कमी

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २४.९% कमी दराची मे.ओम शांती इलेक्ट्रीकल्स औरंगाबाद यांचे दरपत्रक आहे. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

तसेच मा.आयुक्तांच्या तजविजीप्रमाणे सुपार मार्केट येथील दुसऱ्या मजल्याचे विद्युतीकरणाचे अंदाजपत्रक रक्कम रु.३०,५६०/- चे तयार करण्यांत आले आहे. सदरील काम पहिल्या मजल्याच्या कामासारखेच आहे. तेव्हा सदरील काम पहिल्या मजल्याच्या कामाच्या निविदातील सर्वात कमी दर असलेले ठेकेदार मे.ओमशांती इलेक्ट्रीकल्स औरंगाबाद यांचे तर्फे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २४.९% कमी दराने करुन घेणेस व अंदाजपत्रक र.रु.३०,५६०/- ला मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सुपर मार्केट औरंगपुरा येथील पहिल्या मजल्याचे विद्युतीकरणाचे कामासाठी र.रु.२६,२२०/- चे अंदाजपत्रकास व

त्याचप्रमाणे सुपारमार्केटच्या दुसऱ्या मजल्याचे विद्युतीकरणाचे कामासाठी र.रु.३०,५६०/- च्या अंदाजपत्रकास आणि सदर काम दरनिर्दिष्ट कामाचे ठेकेदार मे.ओमशांती इलेक्ट्रीकल्स यांचे कडून २४.९% (अंदाजपत्रकीय दरापेक्षा) कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१३८/१३ :**

निवासी उप अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सन १९९०-९१ करिता विद्युत दुरुस्तीसाठी लागणारे साहित्य खरेदी करण्यासाठी सन १९८९-९० चे सा.बा.खात्याच्या दरसुचीनुसार र.रु.५,२९,१००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरचा खर्च "नवीन खरेदी" या सदरातून करण्यात येईल.

सदर कामासाठी निविदा मागविल्या असता एकूण चार दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | विद्युत साहित्य | संख्या | मे.सत्य इलेक्ट्रीकल्स (बजाज) | पगारीया इंटरप्राईजेस (बजाज कॉम्पटन) | एस.ए.ट्रेडर्स (बजाज) | चिंतामणी (बजाज) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | प्रत्येकी | प्रत्येकी | प्रत्येकी | प्रत्येकी |
| १ | २५० व्ही १२५ वॅट एच.पी.एम.व्ही.पी.पीन लसी टाईप सेट | ३०० नग | १२५/- | ९८.९९ | ११८/- | १२२/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | २५० व्ही. २५० वॅट एच.पी.एम.व्ही.पी.पीन बीसी टूपीन टाईप लॅम्प | २०० नग | २७०/- | २३३.९९ | २३२/- | २६५/- |
| ३ | २५० व्ही.२५० वॅट एच.पी.एस.व्ही.पी.पीन टाइप लॅम्प | २०० नग | ८२५/- | ५३९/- | ७००/- | ७५०/- |
| ४ | २५० व्ही.४०० वॅट एच.पी.व्ही.पी.पीन वीसी टाइप लॅम्प | ५० नग | २५०/- | ७३०/- | ९००/- | ८७५/- |
| ५ | २५० व्ही.१००० वॅट हॅलेजन रॉड | १०० नग | ३२५/- | २५१/- | २३०/- | २२५/- |
| ६ | २५० व्ही.पॉलीस्टर कंपाऊंड हेवी ड्युटी कॉपर वाऊंड बॅलास्ट वुइथ पास्ट मार्क-४० वॅट फ्लोअरंट टयुब करिता | २००० नग | ९७/- | ६७.६७ | ७५/- | ९३/- |
| ७ | १२५ वॅट एम.व्ही.पॉलिस्टर हेवी ड्युटी कॉपरवुंड चोक पास्ट मार्क १२५ वॅट एम.व्ही.लॅम्प करिता | ५० नग | ३४०/- | २७१/- | २५०/- | ३३५/- |

तुलनात्मकदृष्ट्या मे.पगारिया इंटरप्राइजेस औरंगाबाद यांचे ॲटम नंबर १,३,४ व ६ चे दर सर्वात कमी असून मे.एस.ए.ट्रेडर्स औरंगाबाद यांचे ॲटम क्र.२, ७ चे दर तसेच मे.चिंतामणी ट्रेडींग ता.औंरगाबाद यांचे ॲटम नं.५ चे दर सर्वात कमी आहेत. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९०-९१ करिता विद्युत दुरुस्तीसाठी लागणारे साहित्य खरेदी करणे साठी र.रु.५,२९,१००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

तसेच सदर सहित्य खरेदी करीता मे.पगारिया इंटरप्राईजेस औरंगाबाद यांचे ॲटम क्र.१,३,४ व ६ चे सर्वात कमी दर व मे.एस.ए.ट्रेडर्स, औरंगाबाद यांचे ॲटम क्र.२ व ७ चे सर्वात कमी दर तसेच मे.चिंतामणी ट्रेडींग कंपनी, औरंगाबाद यांचे ॲटम क्र.५ च्या सर्वात कमी दरास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१३९/१४ :**

निवासी उपअभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, झोन नं.२ अंतर्गत मनपा इमारतीचे वार्षिक विद्युत वायरिंग दुरुस्ती करण्यासाठी सा.बा.खाते (विद्युत) दरसुची सन

१९८९-९० नुसार र.रु.४८,५५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले असून सदरचे खर्च हा एम.ॲण्ड आर.मधूनच करण्यात येईल. अंदाजपत्रकास मान्यता मिळावी.

तसेच वरील कामासाठी कार्यालयीन मनपा/विद्युत/६४०२/९०, दि.१४.०६.९० अन्वये निविदा मागविल्या असता एकूण ११ (अकरा) निविदा विकल्या गेल्या असून मुदतीच्या आत एकूण सात (७) निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे

| अ.क्र. | विद्युत ठेकेदाराचे नांव | प्राप्त दर |
|---|---|---|
| १. | मे.संजय इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद. | १५% कमी |
| २. | मे.एस.ए.ट्रेडर्स, औरंगाबाद. | १९% कमी |
| ३. | मे.बुश इलेक्ट्रीकल्स इंजि., औरंगाबाद. | ६.२५% कमी |
| ४. | मे.सुरेंद्र इले., औरंगाबाद. | ७% कमी |
| ५. | मे.ओमशांती इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद. | २१% कमी |
| ६. | मे.रिंगल इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद. | अंदाजपत्रकीय दराने |
| ७. | मे.श्रीसमर्थ इलेक्ट्रीकल्स ॲण्ड इंजि., औरंगाबाद. | १५% कमी |

याप्रमाणे प्राप्त निविदाची छाननी केली असता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी, अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१% कमी दराची निविदा श्री.मे.ओमशांती इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद यांची आहे. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री.प्रदिप जैस्वाल :** विभाग क्र.२ वसंत भवन इमारतीची विद्युत वायरिंग नादुरुस्त आहे. याबाबत खुलासा व्हावा.

**नि.उपअभियंता :** विभाग क्र.२ मधील मनपाच्या मालकीच्या सर्व इमारतीमधील विद्युत वायरिंग दुरुस्तीची कामे त्वरीत करण्यात येतील.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे झोन नं.२ अंतर्गत मनपा इमारतीचे वार्षिक विद्युत वायरिंग दुरुस्ती करण्यासाठी र.रु.४८,५५०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१% कमी दराची मे.ओमशांती इलेक्ट्रीकल्स यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१४०/१५ :**

निवासी उप अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सुपर मार्केट, औरंगपुरा येथे नवीन वॉटर पंप बसविण्यासाठी सा.बा.खाते (विद्युत) सन १९८८-८९ च्या दरसुचीनुसार र.रु.१८,६१७/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर खर्च भांडवली इमारत यामधून करण्यात येईल. अंदाजपत्रकास मान्यता मिळावी.

सदर कामासाठी कार्यालयीन निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे

१. मे.लुना इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद. - १५% जास्त
२. मे.बुश इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद. - १८% जास्त
३. मे.इगल इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद. - १५% जास्त

यांप्रमाणे प्राप्त निविदापैकी मे.लुना इलेक्ट्रीकल्स व मे.इगल इलेक्ट्रीकल्स यांचे दर कमी असून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% जास्त असल्याने संबंधितांना या कार्यालयाचे प.क्र.मनपा/विद्युत/२१४/९०, दि.२३.०३.९० अन्वये गुप्त पध्दतीने वरील दर कमी करण्याचे कळविले असता मे.इगल इलेक्ट्रीकल्स यांनी १% कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४% जास्त दरामध्ये वरील काम करण्यास तयार असल्याचे कळविले असून अंदाजपत्रकापेक्षा १४% यास मंजूरी मिळून वरील दरामध्ये र.रु.२१,२३३/- यास मंजूरी मिळून वरील दरामध्ये मे.इगल इलेक्ट्रीकल्स औरंगाबाद यांचेकडून वरील काम करुन घेण्यास मान्यता मिळावी. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सुपर मार्केट औरंगपुरा येथे नवीन वॉटर पंप बसविण्याकाठी र.रु.१८,६१७/- (१४% जास्त दराने र.रु.२१,२२३/-) च्या अंदाजपत्रकास तसेच सदर काम मे.इगल इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१४१/१६ :**

निवासी उप अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, टाऊन हॉल, अंजली टॉकीज, आणि बिबिका मकबरा येथील सेमी हायमास्ट चे केबल खराब झाल्यामुळे ते बदलणे आवश्यक असून त्यासाठी सा.बा.खाते (विद्युत) सन १९८८-८९ च्या दरसुचीनुसार र.रु.८,४१६/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. तसेच सदर कामासाठी कार्यालयीन प.क्र.८१८/८९, दि.०५.१०.८९ अन्वये कोटेशन मागविले असता एकूण चार कोटेशन प्राप्त झाले. ते खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.लुना इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद | - | ७.५७४% -//- |
| २. | मे.मुजाहिद इलेक्ट्रीक वर्क्स, औरंगाबाद | - | ७.६५१% -//- |
| ३. | मे.बुश इलेक्ट्रीक ॲण्ड इंजि., औरंगाबाद | - | ७.८०४% -//- |
| ४. | मे.वरद इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद | - | ८.४१६% -//- |

यांप्रमाणे प्राप्त कोटेशनची छाननी केली असता तुलनात्मकदृष्ट्या मे.लुना इलेक्ट्रीकल्स यांचे दर सर्वात कमी म्हणजे ७.५७४% आहे. तेव्हा टाऊन हॉल, अंजली टॉकीज, बिबिका मकबरा, सेमी हायमस्ट चे केबल बदलण्याचे काम मे.लुना इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद यांचे कडून करुन घेण्यास मंजूरी मिळणेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे टाऊन हॉल, अंजली टॉकीज, बिबीका मकबरा येथील "सेमी हायमास्ट" चे केबल बदलण्याचे काम मे.लुना इलेक्ट्रीकल्स, यांचेकडून र.रु.७.५७४% या दरात करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१४२/१७ :**

वार्ड क्र.१२ स्टेट ट्रान्सपोर्ट कर्मचारी हौसिंग सोसायटी, हस्तेसिंगपुरा येथे १५० मी.मी.व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज टाकणेच्या कामाकरिता र.रु.८९,९३०/- च्या अंदाजपत्रकास ठराव क्र.७६५ दि.२४.०४.९० ला मंजूरी मिळालेली आहे. सदरील कामाकरिता बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण पांच दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.सलीम खान | - | २४.८६% कमी |
| २. | श्री.सय्यद अख्तर | - | १३% कमी |
| ३. | श्री.सय्यद आलम जाफर | - | २८.७८६% कमी |
| ४. | श्री.एम.एम.बेग | - | १५% कमी |
| ५. | श्री.कुतुबखान बडे खाँ | - | १२.८६% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २८.८६% कमी दराचे श्री.सय्यद आलम जाफर यांचे दरपत्रक आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.१२ स्टेट ट्रान्सपोर्ट कर्मचारी हौसिंग सोसायटी, हस्तेसिंगपुरा येथे १५० मी.मी.व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २८.७८६% कमी दराचे श्री.सय्यद आलम जाफर यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१४३/१८ :**

मार्केट कमिटी ऑफिस जवळील भवानी नगर, कडे जाणाऱ्या रस्त्याच्या बाजूस गटार बांधणे करिता र.रु.३०,५००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र.३०.५००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र.६३६, दि.३०.०३.९० द्वारे मंजूरी मिळाली आहे. सदर कामासाठी ए-१ नमुन्यात लघु निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.मनान खान | - | २% जास्त |
| २. | श्री.सय्यद सिराजुद्दीन | - | अंदाजपत्रकीय दराने |
| ३. | श्री.सैय्यद रफिकउद्दीन | - | ३% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराचे श्री.सैय्यद सिराजुद्दीन यांचे दरपत्रक आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मार्केट कमिटी ऑफिस ऑफिस जवळील भवानी नगर कडे जाणाऱ्या रस्त्याच्या बाजूस गटार बांधणेकरिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराचे श्री.सय्यद सिराजुद्दीन यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१४४/१९ :**

वार्ड क्र.१४ शहाबाजार येथे ३०० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे करिता र.रु.१,०८,११५/- ला स्थायी समिती ठराव क्र.६३४ अन्वये दि.३०.०३.९० ला मंजूरी मिळालेली आहे. सदर कामासाठी बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.सय्यद रफिकउद्दीन | - | ०.१०% कमी |
| २. | श्री.कैसर खान | - | ४% जास्त |
| ३. | श्री.सय्यद सिराजुद्दीन | - | २% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी दराचे श्री.सय्यद रफिकऊद्दीन यांचे दरपत्रक आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.१४ शहाबाजार येथे ३०० मी.मी.व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणे करिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी दराचे श्री.सय्यद रफिकउद्दीन यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१४५/२० :**

वार्ड क्र.५७ मो.महावीर नगर येथे २५० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे करिता र.रु.२६,६९०/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र.७५५ दिनांक २४.०४.९० अन्वये मंजूरी मिळालेली आहे. सदर कामासाठी बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण पांच दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.के.बी.काल्डा | - | २३.७५% कमी |
| २. | श्री.गौतम कन्स्ट्रक्शन | - | १०.५% कमी |
| ३. | श्री.कैसर खान | - | १८% कमी |
| ४. | श्री.एस.ए.वाहोद्दीन | - | २८% कमी |
| ५. | श्री.शंकर भैरव | - | २३.७०% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २८% कमी दराचे श्री.एस.ए.वाहोद्दीन यांचे दरपत्रक आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.५७ मो.महावीर नगर येथे २५० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेकरिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २८% कमी दराचे श्री.एस.ए.वाहोद्दीन यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१४६/२१ :**

देवडी बाजार येथे मिनाबाजार समोरील ड्रेनेज लाईन बदलून २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.लाईन टाकणेच्या कामाकरिता रक्कम रु.१८,९८०/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र.४०१, दि.०४.०१.९० अन्वये मंजूरी मिळाली आहे. सदर कामासाठी बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.कैसर खान | - | १०% जास्त |
| २. | श्री.अब्दुल सत्तार खान | - | ४% जास्त |
| ३. | श्री.सय्यद सिराजुद्दीन | - | अंदाजपत्रकीय दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराचे श्री.सय्यद सिराजुद्दीन यांचे दरपत्रक आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे देवडी बाजार येथे मिनाबाजार समोरील ड्रेनेज लाईन बदलून २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.लाईन टाकणेच्या कामाकरिता तुलनात्मकदृष्ट्या

सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराचे श्री.सय्यद सिराजोद्दीन यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१४७/२२ :**

धन आईस कंपनी ते कबाडीपुऱ्यांपर्यंत नाला ट्रेडींग करणे बाबत शहा कन्सल्टेशनच्या अहवालात सदरील नाला ट्रेडींग ट्रंक "डी" मध्ये तरतूद आहे. व सदरील नाला ट्रेडींग साठी र.रु.६,६५,४०,०००/- ची तरतूद दाखविली आहे. परंतू मनपाची सध्याची आर्थिक स्थिती लक्षात घेता अत्यंत आवश्यक असलेल्या कामाचेच अंदाजपत्रक र.रु.१,४०,०००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र.७०४ दि.०६.०४.९० अन्वये मंजूरी मिळाल्यानंतर बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.के.जी.गुनवाणी | - | ५.९०% कमी |
| २. | श्री.कैसर खान | - | ५% जास्त |
| ३. | श्री.एस.ए.वाहोद्दीन | - | ०.१०% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५.९०% कमी दराची श्री.के.जी.गुनवानी यांची निविदा आहे. परंतू त्यांनी दि.०८.०५.९० ला काम करण्यास तयार नसल्याबाबत कळविले आहे.

करिता दुसऱ्या कमी दराचे गुत्तेदारास दि.२८.०५.९० रोजी पत्राद्वारे काम करण्याबाबत विचारणा केली असता संबंधित गुत्तेदार श्री.एस.ए.वाहोद्दीन यांनी ५.९०% कमी दराने काम करण्यास तयार असल्याबाबत दि.३०.०५.९० रोजी लेखी कळविले आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे धन आईस कंपनी ते कबाडीपुऱ्यापर्यंत नाला ट्रेडींग करणेच्या कामासाठी दुसरे कमी दराचे गुत्तेदार श्री.एस.ए.वाहोद्दीन यांनी लेखी दिल्याप्रमाणे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५.९०% कमी दराने त्यांचे कडून काम करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१४८/२३ :**

सम्राटनगर येथे १५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे करिता र.रु.६७,५०९/- चे अंदाजपत्रकास ठराव क्र.७५६, दि.२४.०४.९० अन्वये मंजूरी मिळाली आहे. सदर कामासाठी बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण चार दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.सईद आलम जाफर | - | १८% कमी |
| २. | श्री.एम.ए.मोईद | - | २०% कमी |
| ३. | श्री.के.बी.काल्डा | - | २३.७५% कमी |
| ४. | श्री.एम.एम.बेग | - | १९.९९% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.७५% कमी दराची श्री.के.बी.काल्डा यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सम्राटनगर येथे १५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे करिता प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.७५% कमी दराची श्री.के.बी.काल्डा यांच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१४९/२४ :**

वार्ड क्र.२५ मो.एस.बी.कॉलनी आर्य समाज मंदिराजवळ गटार बांधण्याचे कामाकरिता र.रु.१७,६००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र.६४० दि.३०.०३.९० द्वारे मंजूरी मिळालेली आहे. सदर कामासाठी ए-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.प्रदिप जैस्वाल | - | ०.०१% कमी |
| २. | श्री.बाबासाहेब देशमुख | - | २% जास्त |
| ३. | श्री.मुकेश जैस्वाल | - | ५% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराचे श्री.प्रदिप जैस्वाल यांचे दरपत्रक आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.२५ मो.एस.बी.कॉलनी आर्य समाज मंदिराजवळ गटार बांधण्याचे कामाकरिता प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराचे श्री.दिपक जैस्वाल यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१५०/२५ :**

वार्ड क्र.५७ मो.एकनाथनगर येथे आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता परिसर अभियांत्रिकी विभागाचे सन १९८९-९० दरसुची नुसार र.रु.३,१५,३५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. वार्ड क्र.५७ येथील ड्रेनेजच्या कामाचे हस्तांतरण म्हाडातर्फे महानगरपालिकेकडे दि.३०.०३.९० रोजी करण्यांत आले आहे. अंदाजपत्रकात ठेवलेल्या आर.सी.सी.पाईप खालीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १५० मी.मी. व्यासाची | - | ९९० मीटर लंब |
| २५० मी.मी. व्यासाची | - | ३०० मीटर लंब |
| ३०० मी.मी. व्यासाची | - | ३०० मीटर लंब |

१) मो.एकनाथनगर येथील ४५० गाळे अंदाजे लोकसंख्या १८०० आणि फुलेनगर स्लम १२०० असे एकूण ३००० लोकांना या लाईनचा फायदा होईल.
२) सदरील ड्रेनेज लाईन अस्तित्वात असलेली मुख्यजलनि:सारण वाहिनी ट्रंक एफळा ४५० मी.मी.व्यासाच्या लाईनला जोडणार आहेत.
३) म्हाडाने रुपये २,७५,०००/- म्हाडाने मनपाकडे जमा केलेली आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.५७ मो.एकनाथनगर येथे आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता रक्कम रु.३,१५,३५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१५१/२६ :**

झोन क्र.१ वार्ड क्र.२० डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासून भुईवाडा पर्यंत दगडीगटार बांधणेच्या कामाकरिता १८० मीटर लांबीची दगडी गटार बांधणेच्या कामाचे र.रु.९०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे झोन क्र.१ वार्ड क्र.२० डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या पासून भुईवाडा पर्यंत दगडी गटार बांधणेच्या कामाकरिता र.रु.९०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१५२/२७ :**

वार्ड क्र.३८ मधील बाबुलाल बसैय्ये नगर अंतर्गत पाणी पुरवठा व्यवस्था करणेसाठी राधाकिशन बाबुलाल बसैय्ये यांनी दि.१४.०२.९० रोजी अर्ज दिला होता. सदर संस्थेने १००% विकास निधी भरलेला आहे.

सदरील कामासाठी र.रु.१,६९,६०५/- चे अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र.७०३, दि.०६.०४.९० अन्वये मंजूरी मिळाली आहे. सदर कामासाठी जाहिर निविदा मागविल्या असता सर्वात कमी दराची श्री.गिरीश सिकची यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराची निविदा प्राप्त झाली आहे. सदर कामात साहित्याची रक्कम वजा जाता मजूरीची रक्कम रु.४३,९९४/- इतकी आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.३८ मधील बाबुलाल बसैय्येनगर अंतर्गत पाणी पुरवठा व्यवस्था करणेच्या कामासाठी प्राप्त निविदा पैकी सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराची श्री.गिरीश सिकची यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र.१५३/२८ :**

गांधीनगर, रेल्वेस्टेशन येथील अंतर्गत खडी रस्त्याचे काम करणेसाठी र.रु.१,८४,४५६/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र.७८५ दि.३०.०४.९० नुसार मंजूरी मिळाली आहे. सदर कामाकरिता बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण सहा दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.सुखवीरसिंग | - | ३२.२५% कमी |
| २. | श्री.शैलेश कन्स्ट्रक्शन | - | ३२.१०% कमी |
| ३. | श्री.मो.जाकेर | - | २६.९०% कमी |
| ४. | श्री.पॉल कन्स्ट्रक्शन | - | २४.७८६% कमी |
| ५. | श्री.एस.एच.असोशिएट्स | - | २१% कमी |
| ६. | श्री.जी.एम.रतरजा | - | १८% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३२.२५% कमी दराची श्री.सुखवीरसिंग यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री.प्रदिप जैस्वाल :** कामाच्या अंदाजपत्रकास दि.३०.०४.९० ला मंजूरी मिळालेली आहे. कामावर निविदा मागविण्यास इतका वेळ का लागला. याचा खुलासा व्हावा.

**उपअभियंता -२ :** या कामाकरिता फेरनिविदा मागविण्यांत आल्यामुळे उशीर झाला. त्या भागातील नागरिकांनी विकास खर्चाची रक्कम भरलेली नव्हती. ती आता भरली आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गांधीनगर, रेल्वेस्टेशन येथील अंतर्गत खडी रस्त्याचे काम करणेसाठी प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३२.२५% कमी दराच्या श्री.सुखवीरसिंग यांच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१५४/२९ :**

मुजीब कॉलनी येथील अस्तित्वात असलेली जलनिःसारण वाहिनी खराब झाल्यामुळे त्या भागातील नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होण्याची दाट शक्यता निर्माण झाल्याने (मा.आयुक्त यांनी पाहणी करुन काम तातडीने करुन घेण्याबाबत आदेश दिले) खराब झालेल्या जलनिःसारण वाहिनीस दुसरी समांतर जलनिःसारण वाहिनी टाकण्याच्या कामाचे (मु.प्रा.प.अ.१९४९ चे कलम ६७ (३) (क) नुसार प्राप्त अधिकारान्वये) र.रु.१,०३,५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून काम तातडीच्या स्वरुपाचे असल्यामुळे श्री.नुसरत अली यांचेतर्फे अंदाजपत्रकाच्या दराने तातडीने करुन घेण्यात आले आहे. त्यास कार्योत्तर मंजूरी द्यावी. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री.प्रदिप जैस्वाल :** मुजीब कॉलनी येथील जलनिःसारण वाहिनी टाकण्याच्या कामास मंजूरी केव्हा मिळाली. त्या कामास सुरुवात केव्हा झाली. सदरचे काम अद्यापपर्यंत पूर्ण का झाले नाही. याचा खुलासा व्हावा.

**मा.सभापती :** आगासी सभेत याबाबत खुलासा करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुजीब कॉलनी येथील अस्तित्वात असलेली जलनिःसारण वाहिनी खराब झाल्यामुळे सदर वाहिनीस दुसरी समांतर अशी ३०० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.जलनिःसारण वाहिनी टाकणेच्या कामाकरिता र.रु.१,०३,५००/- च्या अंदाजपत्रकास व कामाची तातडीची लक्षात घेता. अंदाजपत्रकीय दराने श्री. नुसरत अली यांच्या कडून करुन घेण्यात आलेल्या उपरोक्त कामास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१५५/३० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, जिल्हाधिकारी कार्यालय ते दिल्ली गेट येथील मनपा कर्मचारी निवासस्थानापर्यंतच्या रस्त्याचे सौंदर्यीकरण करण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु.३२,४९५/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

सदर कामासाठी निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.गिरीश सिकची | - | ६% जास्त |
| २. | श्री.ई.बी.पठाण | - | ४.५०% जास्त |
| ३. | श्री.कुलवंतसिंग | - | ६% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.५०% जास्त दराची श्री.ई.बी.पठाण यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री.म.ईस्माईल :** जिल्हाधिकारी कार्यालय ते दिल्ली गेट येथील मनपा कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानापर्यंतच्या रस्ता कशा प्रकारे सुंदर करणार आहात.

**नि.उप अभियंता :** विभागीय आयुक्त यांच्या निवासस्थानापासून ते जिल्हाधिकारी कार्यालयपर्यंतच्या रस्त्या लगत रिटेनिंग वॉल बांधून वृक्षारोपण करण्यात येणार आहे. हे काम शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानातून करण्यात येईल.

**श्री.मो.ईस्माईल :** प्रस्तावात तसे नमूद केलेले नाही.

**मा.सभापती :** प्रस्तावात दुरुस्ती करुन मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जिल्हाधिकारी कार्यालय ते दिल्ली गेट येथील, मनपा कर्मचारी निवासस्थानापर्यंतच्या रस्त्याचे सौंदर्यीकरण करण्याच्या कामासाठी प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.५०% जास्त दराची ई.बी.पठाण यांच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. सदर काम शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानित रकमेतून करण्यात यावे.

## ऐनवेळचे विषय

**मा.सभापती :** शहर अभियंता यांनी कार्यालयीन पत्रक क्र.मनपा/शअ/भांडार/४२९/९०, दि.२४.०९.९० अन्वये कळविले की, दि.०२.०७.९० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीच्या सभेत विषय क्र.३०/१६ अन्वये मे.व्ही.ए.ट्रेडींग कंपनीकडून सिमेंट खरेदीस कार्योत्तर मान्यता मिळण्यास्तव प्रस्ताव ठेवण्यांत आला होता. त्या सभेत सर्वानुमते असे ठरले की, खरेदी केलेल्या सिमेंटची सविस्तर माहिती आगामी स्थायी समितीच्या सभेत देण्यांत यावी. त्यानंतर दि.११.०७.९० च्या स्थायी समितीच्या सभेत काही कारणास्तव ती माहिती देता आली नाही. सदरची माहिती यासोबत आपल्या अवलोकनार्थ ठेवली आहे. करिता सिमेंट खरेदी बाबत कार्योत्तर मंजूरी देण्यांत यावी. विचारार्थ सादर.

**विषय क्र.१५६/३१ :**

महानगरपालिकेस बांधकाम विभागासाठी लागणारे सिमेंट खरेदी करण्यासाठी दरपत्रकासाठी वृत्तपत्रात निविदा प्रसिध्दी करुन मागविण्यांत आली असता एकूण तीन दरपत्रके निविदा मिळाली.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सिमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया, मुंबई | रु.१,४८२.१० | १) १०० टक्के अग्रीम रक्कम देणे.<br>२) सिमेंट दरात शासनाकडून वाढ झाल्यास वाढवून देणे. |
| २. | राजश्री सिमेंट कंपनी, (गुलबर्गा कनार्टक राज्य) | रु.१,५०२.०० | १) सिमेंट पुरवठा केल्यानंतर २१ दिवसांत पूर्ण देयक देणे.<br>२) सदरील दरपत्रक ३०.०६.९० पर्यंत राहील. |
| ३. | व्ही.ए.ट्रेडींग कंपनी, औरंगाबाद. | रु.१,४७८.०० | १) जकातसह सर्व करांसह माल गोडावून पर्यंत पोहचते.<br>२) संपूर्ण मालाचा पुरवठा झाल्यावर ७ दिवसात बिलाची अदाई करणे. |

मिळालेल्या दरपत्रकातील दराची तसेच अटींची पुर्तता पाहता सर्वात कमी दर व अट ही व्ही.ए.ट्रेडींग कंपनी यांचे दर रु.१,४७८.०० प्रति मे.टन व अटी शिथील आहेत. करिता १००० मे.टन सिमेंट खरेदीसाठी दराप्रमाणे अंदाजित र.रु.१४,७८,०००/- यास (अक्षरी रु.चौदा लाख अठ्ठ्याहत्तर हजार) कामाची गती लक्षात घेता व कार्यालयात सिमेंट उपलब्ध नसल्यामुळे कार्योत्तर मंजूरीसाठी प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या बांधकाम विभागासाठी लागणारे सिमेंट खरेदी करण्यासाठी प्राप्त निविदापैकी कमी दराच्या मे.व्ही.ए.ट्रेडींग कंपनी, औरंगाबाद यांचेकडून रक्कम रु.१,४७८/- प्रति मे.टन यादराने खरेदी करण्यांत आलेल्या व तद्नुषंगाने र.रु.१४,७८,०००/- च्या खर्चास सर्वोनुमते कार्योत्तर मंजूरी देण्यांत येते.

**<u>संवाद :</u>**

**श्री.शंकर मगर :** गतवर्षी माझ्या वार्डात जलनिःसारण वाहिनी टाकण्याचे काम करण्यात आले. परंतू सदरील जलनिःसारण वाहिनी एका महिलेच्या मालकीच्या जागेतून जात असल्यामुळे जलनिःसारण वाहिनी टाकण्यास त्या महिलेने मनाई केली त्यामुळे नवीन टाकण्यात आलेली जलनिःसारण वाहिनी मुख्य जलनिःसारण वाहिनीस जोडली गेली नाही. याबाबत खुलासा व्हावा.

**मा.सभापती :** जलनिःसारण वाहिनी टाकण्याकरिता जागेच्या मालकीनीशी परावनगी घेण्याची कार्यवाही करण्यात यावी.

**श्री.प्रभाकर विधाते, मो.इस्माईल :** शहरातील उघड्या गटारावर बऱ्याच ठिकाणी ढापे नसल्याकारणामुळे नागरिकांना त्रास होत आहे. रोशनगेट येथील मुख्य रस्त्यालगत ड्रेनेज चेंबरवर बऱ्याच दिवसापासून ढापे नाहीत.

**उपअभियंता :** रोशन गेट जवळील मुख्य रस्त्याच्या बाजूस असलेल्या ड्रेनेज चेंबरवर आठ दिवसांपूर्वी ढापे टाकण्यात आले आहेत.

**श्री.मो.ईस्माईल :** विभागीय कार्यालयात ढाप्याविषयी चौकशी केली असता ढापे शिल्लक नाहीत असे सांगितले जाते. एखाद्या ठिकाणी तातडीने ढाप्यांची आवश्यकता असली तर अशा वेळी काय करावे.

**उपअभियंता :** विभागीय अधिकाऱ्यांकडून ढाप्याची मागणी आल्यास ४/५ दिवसांत त्यांना ढापे पुरविण्याची व्यवस्था केली जाते.

**मा.सभापती :** स.सदस्यांच्या मागणीनुसार त्वरीत १०० ढापे तयार करण्यांत यावेत.

**श्री.मो.इस्माईल :** यापुर्वी विभाग क्र.२ कडून कचराकुंड्या पुरविण्याची वारंवार मागणी असून सुध्दा त्यांना कचरा कुंड्या देण्यात आल्या नाहीत. कमीत कमी २/३ कचराकुंड्या विभाग क्र.३ ला पुरविण्यात याव्यात.

**मा.सभापती :** कचराकुंड्या खरेदी करण्याकरिता त्वरीत निविदा मागविण्याचा आदेश देण्यांत यावा. कचरा कुंड्याचे नमूने मागविण्यात यावेत. करिता आगामी सभेत कचराकुंड्या खरेदीचा प्रस्ताव सादर करण्यात यावा.

यानंतर मा.सभापती यांनी आजची सभा संपल्याचे जाहिर केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | मा.सभापती, स्थायी समिती |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक ०८.१०.१९९० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**सोमवार दिनांक ०८ ऑक्टोंबर १९९० रोजी दुपारी ३.०० वाजता समिती सभागृहात मा.सभापती श्री.रतनकुमार पंडागळे यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभेस सुरुवात झाली. या सभेमध्ये कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

१. श्री.गाडे गंगाधर सुखदेव
२. श्री.जैस्वाल प्रदिप शिवनारायण
३. श्री.नवपुते कचरु चंद्रभान
४. श्री.मगर शंकर जिजाराम
५. श्री.स.अ.इकबालोद्दीन स.मो.कुतूबोद्दीन
६. श्री.गिल इकबालसिंग प्रितमसिंग
७. श्री.फैय्याज खान अहमद खान
८. श्री.बारवाल गजानन रामकिशन
९. श्री.मो.इस्माईल अ.करीम
१०. श्री.विधाते प्रभाकर सिताराम
११. श्री.सोनवणे केशव काशिनाथ

**विषय क्र.१५७/१ :**
दिनांक २४.०९.९० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

<u>संवाद :</u>

**श्री.प्रदिप जैस्वाल :** सिडको हडको भागातील नागरिकांना पिण्याच्या पाण्या करिता फार त्रास सहन करावा लागत आहे. त्या भागात पाण्याची परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. अद्यापपर्यंत याप्रकरणी आपण काय कार्यवाही अथवा उपाय योजना केली याचा खुलासा व्हावा.

**मा.सभापती :** कार्यकारी अभियंता यांनी खुलासा करावा.

**कार्य.अभियंता :** औरंगाबाद शहरास एकूण ३८ दशलक्ष लिटर पाण्याचा पुरवठा करण्यात येतो. त्यापैकी शहराकरिता ३० दशलक्ष लिटर व सिडको हडको करिता ८ दशलक्ष लिटर पाणी पुरवठा नियमित करण्यात येतो.

**श्री.केशव सोनवणे :** एका महिन्यात सिडको हडकोच्या नागरिकांना किती दिवस पाणी पुरवठा करण्यात येतो. भागात नियमित पाणी पुरवठा करण्यात येत नाही. पाणी पुरवठ्यामध्ये १५/१५ दिवसाचा खंड पडतो. त्यामुळे या परिसरात गंभीर परिस्थिती निर्माण होते. पाणी पुरवठा सुधारण्याबाबत अनेकवेळा पत्रव्यवहार करण्यात आला आहे. परंतू त्यास संबंधिताकडून समाधानकारक उत्तर मिळत नाही. अशाप्रकारे सिडको-हडको नागरिकांना पाणी पुरवठा करण्याबाबत भेदभाव केला जातो. प्रशासनाच्या दृष्टीने ही बाब योग्य नाही.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** स.सदस्य श्री.सोनवणे यांच्या म्हणण्यानुसार आपण सिडको हडको वासियांना नियमित पाणी पुरवठा करु शकत नाही. त्यामध्ये १९/१९

दिवसाचा खंड पडतो. तर मनपा प्रशासनातर्फे पाणीपट्टी कर पूर्ण वर्षाचा का वसुल करण्यांत येतो.

**मा.सभापती :** गेल्या महिन्यांत सिडको हडको परिसरात पाणी पुरवठ्यामध्ये किती दिवसाचा खंड होता.

**कार्य.अभियंता :** गेल्या महिन्यांत पाणी पुरवठ्यामध्ये १६ दिवसांचा खंड होता. त्यावेळेस त्या भागात टँकरने त्या भागात पाणी पुरवठा करण्यात आला.

**श्री.केशव सोनवणे :** सिडको-हडको भागात पाण्याच्या ज्या टाक्या आहेत. त्या पूर्ण भरल्या जातात का?

**कार्य.अभियंता :** सिडको हडको परिसरात एकूण चार पाण्याच्या टाक्या आहेत. त्यापैकी तीन टाक्यात पूर्ण पाणी भरल्या जाते. एका टाकी बाबत वाद चालू असल्यामुळे ती टाकी पाण्याने भरली जात नाही. तसेच त्या टाकीस अद्यापपर्यंत जलवाहिनी जोडलेली नाही.

**मा.सभापती :** सिडको परिसरातील नवीन टाकी संबंधी न्यायालयात वाद चालू होता. त्याचा निकाल मनपाच्या बाजुने लागला आहे. या टाकीत पाणी भरण्यासाठी दिनांक १३.१०.९० पर्यंत जलवाहिनी जोडण्यात येईल. यामुळे सिडको परिसरातील पाणी पुरवठा सुरळीत होईल.

**श्री.गंगाधर गाडे :** शहरात देखील पाणी पुरवठा वेळेवर व भरपू प्रमाणात होत नाही.

**श्री.स.अ.एकबालोद्दीन :** सिडको हडको परिसरात पाणी पुरवठा कोठून करण्यात येतो?

**कार्य.अभियंता :** सिडको-हडको परिसरास जायकवाडी प्रकल्प व हर्सुल तलाव या दोन्ही जलाशयातून पाणी पुरवठा करण्यात येतो.

**श्री.केशव सोनवणे, श्री.गंगाधर गाडे :** शहरात एकूण किती नळ कनेक्शन आहेत? सिडको-हडको भागास पाणी पुरवठा करण्याकरिता किती टँकर्स आहेत.

**कार्य.अभियंता :** शहरात एकूण २२ हजार नळ कनेक्शन आहेत. सिडको -हडको भागात १६ हजार नळ कनेक्शन्स आहेत. सिडको हडको करिता पाण्याचे दोन टँकर्स दिलेले आहेत. त्या टँकरच्या दिवसातून ६-७ फेऱ्या होतात.

**श्री.गंगाधर गाडे :** शहरातील पाणी पुरवठा व्यवस्था बरोबर नाही. काही भागातील नागरिकांना फारच कमी प्रमाणात पाणी देण्यांत येते. कोटल कॉलनी परिसरातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याकरिता फार त्रास सहन करावा लागतो.

**श्री.केशव सोनवणे :** सिडको हडको परिसरात कोणत्याही वेळेला पाणी पुरवठा करण्यात येतो.

**कार्य.अभियंता :** पाण्याचा दाब कमी असल्यामुळे सिडको-हडको परिसरातील पाण्याच्या टाक्या पूर्णपणे भरल्या जात नाहीत. क्रांतीचौक व दिल्ली गेट येथील जलकुंभाद्वारे सिडको हडको पाणी पुरवठा करण्यात येतो. यामुळे पाणी पुरवठा करण्याची वेळ निश्चित करता येत नाही.

**मा.सभापती :** शहरातील पाण्याच्या टंचाईग्रस्त भागास व सिडको हडकोच्या भागाची कार्यकारी अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळपाहणी करुन काही तांत्रिक अडचणी असल्यास त्या दूर कराव्यात नवीन जलवाहिन्यांची कामे तात्काळ सुरु करावीत. सिडको वासियांना पाणी पुरवठा करण्याकरिता पुर्वीप्रमाणे सिडको एन-१२ जवळील नर्सरीतील विहीरीवर ५ अश्वशक्तीची विद्युत मोटार बसविण्यांत यावी. यामुळे या भागात पाणी पुरवठ्यात सुधारणा होईल.

**मो.इस्माईल :** कालच्या वृत्तपत्रात जी बातमी प्रसिध्द झाली. त्याबातमीमध्ये काही स.सदस्यांच्या नावांचा उल्लेख असून त्या स.सदस्यांनी मनपा प्रशासनातील अधिकाऱ्यांशी गैरवर्तन केल्याबाबत तारिखवार माहिती प्रसिध्दी झाली आहे. त्याबाबत खुलासा व्हावा.

**मा.सभापती :** वृत्तपत्रात प्रसिध्द झालेली माहिती कोणाच्या सहकार्याने प्रसिध्दीस्तव देण्यात आली. याची चौकशी करण्यांत यावी.

**श्री.मो.इस्माईल :** एखाद्यास सदस्याचा वार्ड ब्लॅक लिस्टमध्ये आहे असे मा.आयुक्त यांनी संबोधून निर्णय घेणे असे वक्तव्य करणे मा.आयुक्तांसारख्या उच्च पदस्थ अधिकाऱ्यांच्या दृष्टीने योग्य वाटत नाही. करिता स.सदस्यांना अशी विनंती करतो की, वृत्तपत्रातील या बातमीविरुध्द निषेध नोंदवून आजची सभा स्थगित करावी.

**श्री.गंगाधर गाडे :** शहरातील नागरिकांच्या सुखसोयी करिता स.सदस्यांची व मा.आयुक्तांची शाब्दीक चकमक होत असेल तर त्यात गैर असे काही नाही. असे मला वाटते.

**श्री.स.अ.एकबालोद्दीन :** मुंबई प्रांतिक येथील उर्दू दैनिकात पण ही बातमी प्रसिध्द झाली आहे.

**मा.सभापती :** स.सदस्य श्री.रशीद मामू यांनी मा.आयुक्त यांना फार वाईट प्रकारची शिवीगाळ केलेली आहे. मा.आयुक्त यांचेकडून ही बातमी प्रसिध्दीस्तव देण्यात आलेली नाही. सदरची बातमी एखाद्या संघटनेने दिलेली असल्यास त्यास आपण जबाबदार नाही.

**श्री.गंगाधर गाडे :** सर्वसाधारण सभेच्या बैठकीस उपस्थित राहणार नाही. असे पत्र देऊन अधिकारी सभेत उपस्थित राहात नाहीत. संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. ही स.सदस्यांची मागणी चुकीची आहे का? अधिकाऱ्यांच्या अशा वर्तनामुळे लोकप्रतिनिधी दोषी आहेत. हे सिध्द होते. महाराष्ट्र राज्यातील इतर मनपामधील सर्वसाधारण सभेस मा.आयुक्त उपस्थित असतात. मा.आयुक्त सभेस अनुपस्थित राहून स.सदस्यांची बदनामी करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

**मा.सभापती :** या प्रकरणी स.सदस्य श्री.गंगाखेडकर श्री.नरेंद्र पाटील, श्री.बंडू प्रधान व आयुक्त यांचे स्वीय सहाय्यक यांना आपण प्रत्यक्ष विचारणा करुन सत्य प्रकार आहे तो समजावून घ्यावी विनाकारण वातावरण दुषित करण्याचा प्रयत्न करण्यात येवू नये.

**श्री.कचरु नवपुते :** लोकमत टाईम्स या वृत्तपत्रा व्यतिरिक्त इतर वृत्तपत्रात पण ही बातमी प्रसिध्द झाली आहे. या बाबत खुलासा व्हावा.

**मा.सभापती :** जनसंपर्क अधिकारी यांनी खुलासा करावा.

**जनसंपर्क अधिकारी :** मनपातर्फे अशा प्रकारची कोणतीही बातमी प्रसिध्दीस्तव देण्यात आलेली नाही.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** जनसंपर्क अधिकारी यांच्या खुलाशा वरुन सदरची बातमी मनपातर्फे देण्यात आलेली नाही. सदरची बातमी वृत्तपत्रात कोणी दिली (प्रसिध्दी करिता) दिली या प्रकरणी चौकशी करण्यांत यावी. मनपामध्ये अशा प्रकारे राजकारण खेळण्याचा प्रयत्न करण्यात येवू नये.

**मा.सभापती :** ही बातमी वृत्तपत्रास कोणत्या माध्यमाद्वारे प्राप्त झाली. याबाबत सदर वृत्तपत्रांच्या संपादकाकडे चौकशी करण्यांत यावी.

**श्री.मो.इस्माईल :** सदरची बातमी मनपातर्फे प्रसिध्दीस देण्यात आली नाही. अशा प्रकारचा खुलासा मनपातर्फे प्रसिध्द करण्यात आला नाही. म्हणून आम्ही आजच्या सभेत या प्रकरणी निषेध नोंदवून सभात्याग करीत आहोत. (असे म्हणून सभागृह सोडले वेळ : ४.०७ वाजता स.सदस्य श्री.मो.इस्माईल, श्री.गंगाधर गाडे, श्री.इकबालसिंग गील, श्री.फैय्याज खान व श्री.स.अ.एकबालोद्दीन)

**मा.सभापती :** सदरील बातमी वृत्तपत्रास कोणातर्फे देण्यात आली. याबाबत तीन दिवसांत सविस्तर चौकशी करण्यांत यावी.

**श्री.शंकर मगर :** पा.क्र.३ अन्वये गलिच्छ वस्तीसाठी पाणी पुरवठा करण्याकरिता जलवाहिनी टाकण्याच्या कामाचे अंदाजपत्रके तयार करण्यांत आली का? याचा खुलासा व्हावा.

**मा.सभापती :** या कामाची अंदाजपत्रके तयार करण्यांत आलेली आहेत. सदरच्या कामाची अंदाजपत्रके १ लाखाच्या आतील असल्यामुळे मा.आयुक्तांच्या मंजूरीस्तव पाठविण्यांत आलेली आहेत. मंजूरीनंतर या कामाकरिता निविदा मागविण्यांत येतील.

**श्री.प्रभाकर विधाते :** जयसिंगपुरा येथील गटार बंद करण्यांत आली आहे. ती गटार बंद झालेली नाही.

**उप अभियंता :** रस्त्याचे काम चालु असल्यामुळे गटार बंद झाली होती. आता ती पुर्ववत चालू करण्यांत येईल.

**मा.सभापती :** उप अभियंता यांनी संबंधित सदस्यांसह प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन त्या भागातील अडचण दूर करावी. (स.सदस्य श्री.मं.इस्माईल, श्री.फैय्यजखाँ, श्री.स.अ.इकबालोद्दीन, गंगाधर गाडे, व श्री.एकबालसिंग गील यांनी ठीक ४.१५ वाजता सभागृहात प्रवेश केला.)

**श्री.प्रदिप जैस्वाल :** पान क्र.५ प्रमाणे सिडको येथील मनपाच्या शाळेत घडलेल्या प्रकारासंबंधी खुलासा करण्यात यावा.

**मा.सभापती :** शाळेच्या मुख्याध्यापकांशी प्रत्यक्ष चर्चा केली त्यानुसार शाळेच्या इमारतीस असलेल्या पटांगणात ही घटना घडलेली आहे. शाळेच्या परिसरात अशा प्रकारची कोणतीही घटना घडली नाही.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** पा.क्र.४ अन्वये पीरबाजार येथील शाळेच्या इमारतीस संरक्षित भिंत बांधण्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली.

**मा.सभापती :** या जागेसंबंधी न्यायालयाचा निकाल मनपाच्या बाजूने लागला आहे. आता वैधानिक कार्यवाही करुन शाळेस संरक्षित भिंत बांधण्यांत येईल.

**श्री.स.अ.इकबालोद्दीन :** पा.क्र.४ अन्वये मनपाने खरेदी केलेल्या पाईप संबंधी काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा.

**श्री.मो.इस्माईल :** स.सदस्यांचा हा प्रश्न गेल्या दोन तीन महिन्यापासून सतत येत आहे. यावर कायमस्वरुपी तोडगा काढण्यात यावा.

**मा.सभापती :** स.सदस्यांनी आगामी स्थायी समितीपुर्वी त्यांच्या पसंतीने एक पाईप मागवून सर्व स.सदस्यांसमोर फोडून पहावा व त्यातील लोखंडाचचे वजन करण्यात यावे.

**श्री.शंकर मगर :** गत सभेच्या विषय क्र.१५२ मधील वार्ड क्र.३८ ऐवजी ३७ अशी दुरुस्ती इतिवृत्तात करण्यात यावी.

**मा.सभापती :** गत सभेच्या विषय क्र.१५२ मधील वार्ड क्र.३८ ऐवजी ३७ अशी दुरुस्ती इतिवृत्तात करण्याची नोंद घ्यावी

**श्री.मो.इस्माईल :** गत सभेत ठरल्याप्रमाणे विभागीय कार्यालयास कचरा कुंड्या व ढापे पुरविण्याबाबत काय कार्यवाही झाली?

**मा.सभापती :** कचरा कुंड्या खरेदी करीता दि.१२.०९.९० रोजी मागविण्यात आल्या आहेत. कचरा कुंड्यांचे नमुनेपण मागविण्यात आले आहेत. ढापे तयार करण्याचे अंदाजपत्रक तयार करुन मंजूरीस्तव सादर करण्यांत आले आहे.

**श्री.मो.इस्माईल :** राजाबाजार येथील दुध डेअरी जवळील मनपाच्या जागेवर एक मुतारी बांधण्यात यावी.

**मा.सभापती :** संबंधित उप अभियंता यांनी याची नोंद घेवून योग्य ती कार्यवाही करावी.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** पान क्र.२३ अन्वये जलनि:सारण वाहिनी टाकण्याकरिता जागेच्या मालकीणीची परवानगी घेण्यांत आली का?

**मा.सभापती :** स्थगित असलेली जलनि:सारण वाहिनी टाकण्याचे काम सुरु करण्यांत यावे. याप्रकरणी मा.उपआयुक्त यांनी दि.१४.१०.१९९० पर्यंत पोलिस खात्यास पत्र देवून या कामाकरिता पोलिसांची मदत घ्यावी.

**श्री.मो.इस्माईल :** गत सभेत सांगितल्याप्रमाणे अद्यापपर्यंत माझ्या वार्डातील पाणी पुरवठ्यात सुधारणा झालेली नाही. तसेच पाणी पुरवठा करण्याची वेळ पण निश्चित करण्यात आलेली नाही.

**उप अभियंता :** या विभागाच्या पाणी पुरवठा करण्याकरिता असलेल्या दोन विद्युत मोटारीपैकी एक मोटार नादुरुस्त असल्यामुळे पाणी पुरवठा करण्याची वेळ निश्चित करता येत नाही.

**श्री.मो.इस्माईल :** विद्युत मोटारी बाबत ही तक्रार नाही. विद्युत मोटार उपलब्ध आहे. परंतू त्यास म.रा.वि.मंडळाकडून कनेक्शन जोडलेले नाही.

**मा.सभापती :** निवासी उप अभियंता यांनी या प्रकरणी जातीने लक्ष घालून त्वरीत विद्युत मोटार चालू करण्याची व्यवस्था व्हावी.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** सराफा भागातील पाणी पुरवठा जलवाहिनी वरुन लोटाकारंजा भागाकरिता नवीन जलवाहिनी टाकल्यामुळे या भागातील पाणी पुरवठा वर विपरीत परिणाम झालेला आहे. त्यामुळे पाण्याचा दाब पण कमी झाला आहे.

**जलगृह अभियंता :** सराफा भागाची प्रत्यक्ष पाहणी करुन त्या भागातील नागरिकांची पाण्या संबंधीच्य अडचणी दूर करण्यात येतील.

**श्री.केशव सोनवणे :** सिध्दार्थ नगर झोपडपट्टी येथे जलनि:सारण वाहिनी टाकण्याचे काम बऱ्याच दिवसांपासून मंजूर आहे. सदरची कामे अद्यापपर्यंत का सुरु करण्यात आली नाही. याचा खुलासा व्हावा.

**उप अभियंता :** या कामाकरिता निविदा मागविण्यांत आल्या आहेत. परंतू आलेल्या निविदाचे दर फारच कमी असल्यामुळे संबंधित ठेकेदाराकडून त्या दराचे रेट ॲनालिसीस मागविले आहेत.

**मा.सभापती :** संबंधित कामाची संचिका माझ्याकडे त्वरीत सादर करावी.

**ठराव :**

प्रस्ताव क्र.१५२ मधील वार्ड क्र."३८" ऐवजी वार्ड क्र."३७" अशा दुरुस्तीसह दिनांक २४.०९.९० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१५८/२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.रेल्वेस्टेशन येथील युसूफोद्दीन मगरबी कॉलनी अंतर्गत खडी रस्ता तयार करणेच्या कामासाठी र.रु.१,६२,७९६/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र.७६१ दिनांक २४.०४.९० नुसार मंजूरी मिळालेली आहे. सदर कामासाठी कार्यालयीन निविदा बी-१ नमुन्यात मागविल्या असता एकूण अकरा दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.रविंद्रसिंग | - | ३३.८०% कमी |
| २. | श्री.शैलेश कन्स्ट्रक्शन | - | ३३.६०% कमी |
| ३. | श्री.अमिनोद्दीन खान | - | ३२.५५% कमी |
| ४. | श्री.मुस्ताक अहमद | - | ३३.३२% कमी |
| ५. | सुखबीरसिंग | - | ३२.२५% कमी |
| ६. | श्री.एस.एच.असोशिएट्स | - | २८.३% कमी |
| ७. | श्री.पी.जे.तमखाने | - | २३.७९% कमी |
| ८. | श्री.मो.सलीम | - | २५% कमी |
| ९. | श्री.मे.पॉल कन्स्ट्रक्शन | - | २४.७८६% कमी |
| १०. | श्री.एस.ए.नवाब | - | २४.१०% कमी |
| ११. | श्री.जी.एम.सतरंगा | - | १५% कमी |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रेल्वेस्टेशन येथील युसूफोद्दीन मगरबी कॉलनी अंतर्गत खडी रस्ता तयार करणेच्या कामासाठी प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३३.८०% कमी दराची श्री.रविंद्रसिंग यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१५९/३ :**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, शहरातून साथींचे रोगांचा प्रादुर्भाव कमी करणेसाठी व उपाययोजनेसाठी पाणी शुध्दी करणाच्या गोळ्या सन १९९०-९१ साठी खरेदी करणे जरुरी आहे. त्याप्रमाणे स्थानिक वृत्तपत्रातून जाहिरात देवून निविदा मागविण्यांत आल्या असता एकूण चार निविदा प्राप्त झाल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जस इंटरप्राइजेस | - | रु.७५.८० पै.प्रती १००० गोळ्या |
| २. | मंगलम ट्रेडर्स | - | रु.८१.०० पै. प्रती १००० गोळ्या |
| ३. | दिशा फॉर्मास्टीकल्स | - | रु.७७.०० पै.प्रती १००० गोळ्या |
| ४. | प्रिमीयर असोशिएट्स | - | रु.७२.७५ पै. प्रती १००० गोळ्या |

त्यापैकी कमी दराचे दरपत्रक मे.प्रिमीयर असोशिएट्स, नागपूर यांचेकडून रक्कम रु.७२.७५ पै.प्रति १००० गोळ्यांसाठी आहेत. हे दर सन १९९०-९१ साठी मंजूर करण्यांत यावेत. व अंदाजपत्रकातील रकमेनुसार खरेदी करण्यांत येवून त्यांचबरोबर नियमानुसार करारपत्रक करणेसाठी मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९०-९१ साठी पाणी शुध्दीकरणाच्या १० लक्ष गोळ्या खरेदी करण्याकरिता र.रु.७५,०००/- च्या खर्चास व इतर गोळ्या मे.प्रमियर

असोशिएट्स, नागपूर यांचेकडून रु.७२.७५ पै.प्रति १००० या दराने खरेदी करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१६०/४ :**

वार्ड क्र.१० पॉवरलुम, एम.आय.डी.सी. चिकलठाणा येथे विटकामामध्ये गटार बांधणेच्या कामाकरिता रक्कम रु.११,७३३/- ला मा.आयुक्तांनी मंजूरी दिल्यानुसार सदर कामासाठी कोटेशन मागविले असता एकूण तीन कोटेशन्स प्राप्त झाले ते खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.शेख मसुद | - | ५% जास्त |
| २. | श्री.गिरीश सिकची | - | १०% जास्त |
| ३. | श्री.इ.बी.पठाण | - | ०.०५% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराचे श्री.इ.बी.पठाण याचे दरपत्रक आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.१० पावरलुम एम.आय.डी.सी.चिकलठाणा येथे विट कामामध्ये गटार बांधणेच्या कामाकरिता प्राप्त दरपत्रकापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराचे श्री.इ.बी.पठाण यांच्या दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१६१/५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, शहानुरवाडी शकुंतला गृहनिर्माण संस्था अंतर्गत खडी रस्ता तयार करण्याचे कामासाठी र.रु.१,३०,१४४/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र.५५ दि.११.०७.९० अन्वये मान्यता मिळालेली आहे. सदर कामासाठी कार्यालयीन निविदा बी-१ नमुन्यात मागविल्या असता एकूण आठ दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.सुखबीरसिंग | - | ३४.२५% कमी |
| २. | श्री.कैसर खान | - | ३३.७८६% कमी |
| ३. | मे.शैलेश कन्स्ट्रक्शन | - | ३३.७८६% कमी |
| ४. | मे.एस.एच.असोशिएट्स | - | ३२.५१% कमी |
| ५. | श्री.अब्दुल वकील कुरेशी | - | ३१.५% कमी |
| ६. | श्री.नरेंद्रसिंग | - | ३०.०२% कमी |
| ७. | मे.पॉल कन्स्ट्रक्शन | - | २९.७८६% कमी |
| ८. | श्री.कुलवंतसिंग | - | २६% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३४.२५% कमी दराची श्री.कुलवंतसिंग यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहानुरवाडी येथील शकुंतला गृहनिर्माण संस्था अंतर्गत खडी रस्ता तयार करण्याचे कामासाठी प्राप्त निविदापैकी, तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व

अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३४.२५% कमी दराची श्री.सुखबीरसिंग यांच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१६२/६ :**

मा.शहर अभियंता महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे पत्र जा.क्र./मनपा/आरोग्य/७९८४/९०, दि.२९.०८.९० अन्वये या विभागास कळविल्याप्रमाणे दि.०१.०९.९० ते ११.०९.९० पर्यंत सिडको येथील मनपाच्या दवाखान्यात लायन्स क्लब, औरंगाबाद यांनी नेत्र शिबीर आयोजित केलेले असल्याने त्या ठिकाणी आवश्यक त्या सर्व सोर्यीची उपलब्धता करणे आवश्यक होते. तसेच मा.आयुक्त मनपा यांचे सोबत वरील ठिकाणची प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर सदरील दवाखान्यामध्ये विद्युत वायरिंग केलेली होती. परंतू विद्युत पुरवठा केलेला नसल्याने विद्युत पुरवठा करणेसाठी मा.आयुक्तांनी प्रत्यक्ष पाहणी करुन काम त्वरीत करुन घेणे बाबत सुचित केले. सदरील ठिकाणी विद्युत खांब नसून अंतर जास्त असल्याने भुमिगत केवलींग वर्क करुन घेण्यांत आले आहे.

सदर कामाचे सा.बा.खाते (विद्युत) सन १९८९-९० अन्वये अंदाजपत्रक र.रु.१५,५०८/- चे तयार करण्यांत आले आहे. त्यास मान्यता मिळावी तसेच सदर काम अत्यंत तातडीचे असल्याने हे काम विद्युत ठेकेदार मे.जब्बार इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद यांच्याकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यात आलेले आहे. त्यास कार्योत्तर मंजूरी मिळावी. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको येथील महानगरपालिका, दवाखान्यात तातडीने विद्युत पुरवठा करण्याकरिता भुमिगत केवलिंगच्या मे.जब्बार इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद यांच्याकडून करुन घेण्यांत आलेल्या कामास व र.रु.१५,५०८/- च्या खर्चास सर्वानुमते कार्योत्तर मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१६३/७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, सिध्दार्थ उद्यान येथे नागरिकांच्या सोईसाठी दोन शेड बांधणेच्या कामासाठी र.रु.४५,६३५/- च्या अंदाजपत्रकास मा.आयुक्तांची मंजूरी मिळाली आहे.

सदर कामासाठी कार्यालयीन निविदा मागविल्या असता एकूण दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.संजय पो.सरवदे | - | ०.१०% कमी |
| २. | श्री.कैसर खान | - | ५% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी दराची श्री.संजय पो.सरवदे यांची निविदि आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ उद्यान येथे नागरीकांच्या सोयीसाठी दोन शेड बांधणेच्या कामाकरिता प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय

दरापेक्षा ०.१०% कमी दराची श्री.संजय पो.सरवदे यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१६४/८ :**

शहर अभियंता यांनी दि.२३.०७.९० रोजी झालेल्या स्थायी समितीमध्ये ऐनवेळी विषय क्र.९९ अन्वये शहरात खालील महापुरुषांचे पुतळे उभारण्याबाबत अंदाजपत्रकीय प्रस्ताव सादर केला होता.

१. राजर्षी शाहू महाराज यांचा पुतळा उभारणे बाबत.
२. महात्मा ज्योतीबा फुले यांचा पुतळा उभारणे बाबत.
३. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा उभारणे बाबत.

परंतू, स्थायी समितीच्या सभेमध्ये शाहू महाराज व महात्मा ज्योतीबा फुले यांच्या प्रतिकृती पसंद असल्यामुळे हे दोन्ही पुतळे उभारण्यासाठीच्या अंदाजपत्रकास मंजूरी देण्यात आली आहे. व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची प्रतिकृती पसंद न असल्यामुळे त्यावर निर्णय घेण्यात आला नव्हता. यानंतर मा.आयुक्त, मालमत्ता अधिकारी व निवासी उपअभियंता यांनी प्रत्यक्ष मुंबई येथील वाघ फाईन आर्ट स्टुडिओला भेट देवून भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा ८ फुट उंच हेरॉईक साईज ब्रान्झचा पुतळा तयार करण्यांबाबत चर्चा करुन त्यांच्याकडून पुतळा बनविण्यासाठी रक्कम रुपये रु.१,३०,०००/- इतका खर्च येणार आहे. आणि पुतळ्याच्या विमा खर्च, वाहतुक खर्च महानगरपालिकेला करणे असल्याने त्याचा अंदाजे खर्च रु.१०,०००/- लागणार आहे. असे एकूण रु.१,४०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. तसेच सदर पुतळा पूर्ण होण्याबाबतची कार्यवाही दि.१४.०४.९१ पुर्वी होणे आवश्यक असल्याने मे.वाघ फाईन आर्ट, मुंबई यांनी पुतळ्याच्या किंमतीच्या ७५% आगाऊ रकमेची मागणी केली होती.

त्यानुसार प्रशासनाने कलम ५ नियम दोन चे अपवाद चे अधिन राहून ट्रेंडर्स न बोलविता मे.वाघ फाईन आर्ट, मुंबई यांचे बरोबर पुतळा बनविण्यासाठी करारनामा करुन दि.१३.०९.९० रोजी धनादेश क्र.सी/५८२७३१/दि.११.०९.९० अन्वये आगाऊ रक्कम रु.९७,५००/- देण्यात आले आहेत.

तरी भडकल गेट येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा ८ फुट उंच हेरॉईक साईज ब्रान्झचा पुतळा उभारण्यासाठी र.रु.१,४०,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर काम मे.वाघ फाईन आर्ट स्टुडीओ, मुंबई यांचेकडुन करुन घेण्यास आणि त्यांना ७५% रु.९७,५००/- आगाऊ देण्यास व राहीलेली २५% रक्कम पुतळा पुर्ण झाल्यानंतर देण्यास कार्योत्तर मंजूरी देण्यांत यावी. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भडकल गेट येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा ८ फुट उंच हेरॉईक साईज ब्रान्झचा पुतळा उभारण्यासाठी रक्कम रु.१,४०,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर काम मे.वाघ फाईन आर्ट स्टुडिओ, मुंबई यांचेकडून करुन घेण्यास आणि त्यांना देण्यांत आलेल्या ७५% रक्कम रु.९७,५००/- च्या रकमेस कार्योत्तर सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. उर्वरित २५% रक्कम पुतळा पूर्ण तयार झाल्यावर अदाई करण्यात यावी.

**विषय क्र.१६५/९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, दिल्ली गेट येथील श्री.कुरेशी यांच्या घरापासून ते शांग्रील यांच्या घरापर्यंत रनिंग ट्रॅकचे काम करण्याच्या कामासाठी र.रु.८२,९००/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. सदर कामाचा खर्च डी.पी.रोड या सदराखाली करण्यात येईल. सदर कामासाठी स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देवून निविदा मागविल्या असता एकूण चार निविदा दरनिर्दिष्ट प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | पॉल कन्स्ट्रक्शन | - | १% कमी |
| २. | एच.एच.असोशिएट्स | - | ५% जास्त |
| ३. | सय्यद टी.अहमद | - | १.२४% कमी |
| ४. | मनजितसिंग सहेगल | - | २७.२५% कमी |

श्री.मनजितसिंग सेहगल यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.२५% कमी दराचे पत्रक तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे आहे. परंतू श्री.मनजीतसिंग यांनी दिनांक ०३.०९.९० अर्ज देवून विनंती केली होती की, मी दिलेले निविदापत्रक उघडण्यात येऊ नये. परंतू निविदापत्रक उघडले गेले. व नंतर त्यांनी दि.०७.०९.९० रोजी पुन्हा अर्ज देवून सदर काम मी उपरोक्त दर्शविलेल्या दरात करण्यास तयार नाही. असे कळविले आहे. तरी त्यांची निविदापत्रकासोबत भरलेली १% इसाऱ्याची रक्कम रु.८२९/- जप्त करुन सदर काम दुसऱ्या क्रमांकाचे दर असलेले ठेकेदार श्री.सय्यद टी.अहेमद यांनी निविदेत दर्शविलेल्या व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.२४% कमी दराने करुन घेण्यास मान्यता द्यावी. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिल्ली गेट येथील श्री.कुरेशी यांच्या घरापासून ते शांग्रील यांच्या घरापर्यंत रनिंग ट्रॅकचे काम करण्याच्या कामासाठी गुत्तेदार श्री.मनजितसिंग यांनी काम करण्यास नकार दिल्यामुळे त्यांची इसाऱ्यांची रक्कम जप्त करण्यात येऊन दुसऱ्या कमी दराचे ठेकेदार श्री.सय्यद टी अहमद यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.२४% कमी दराने सदर काम करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१६६/१० :**

हमालवाडा येथे सध्या कोटला कॉलनी टाकी अदालत रोड येथून पाणी पुरवठा होतो. हे अंतर बरेच आहे. व तसेच या वस्तीपर्यंत जातांना बरेच चढ उतार तसेच वळण घेऊन जलवाहिनी पोहचते. यामध्ये पाण्याचा दाब कमी होतो. नकाशात दर्शविल्याप्रमाणे जर जलवाहिनी टाकली तर पाणी पुरवठा व्यवस्थेत सुधारणा होईल. या कारणस्तव हमालवाडा येथे ८० मी.मी.व १५० मी.मी.व्यासाची अे.सी.जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता र.रु.१,६०,६४२/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र.४१८ दि.२२.०१.९० अन्वये मान्यता मिळाली आहे.

सदर कामासाठी स्थायी समिती ठराव क्र.६५६ दि.३०.०३.९० अन्वये श्री.एस.के.मिसाळ यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.८६% कमी दराच्या निविदेस मान्यता मिळालेली आहे. कंत्राटदराने २% अनामत रक्कम जमा केली असून करारनाम्याची पुर्तता करण्यात आलेली आहे.

परंतू सध्या ८० मी.मी.व्यासाचे पाईप अे.सी.पाईप मार्केटमध्ये उपलब्ध नसल्यामुळे व ८० मी.मी.व्यासाचे पाईपचे उत्पादन बंद असल्यामुळे उपरोक्त ठिकाणी ८० मी.मी.बंद असल्यामुळे उपरोक्त ठिकाणी ८० मी.मी.व्यासाचे पाईप ऐवजी १०० मी.मी.व्यासाचे अे.सी.पाईप टाकण्याचे ठरल्यामुळे साहित्याच्या किंमतीत व मंजूरीच्या किंमतीत वाढ होणार आहे.

तरी उपरोक्त बाब लक्षात घेऊन सदरील ठिकाणी १०० मी.मी.व १५० मी.मी.अे.सी.जलवाहिनी टाकणेचे सुधारित अंदाजपत्रक रक्कम रु.२,२७,५७०/- चे तयार करण्यात आलेले आहे. सुधारित अंदाजपत्रकामुळे मुळ अंदाजपत्रकापेक्षा रु.६६,९२८/- इतकी वाढ होते.

सदर कंत्राटदार श्री.एस.के.मिसाळ हे वाढीव काम त्यांनी पुर्वी निविदेस दिलेल्या दराने म्हणजे २१.८६% कमी दराने करणेस तयार आहेत. करिता सुधारित अंदाजपत्रक रक्कम रुपये २,२७,५७०/- चे अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हमालवाडा येथे ८० मी.मी.व १५० मी.मी.व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता ८० मी.मी.व्यासाचे अे.सी.पाईपचे उत्पादन बंद झाल्यामुळे ८० मी.मी.ऐवजी १०० मी.मी.व्यासाचे पाईप टाकण्याचे ठरल्यामुळे सदर कामासाठी सुधारित अंदाजपत्रक रक्कम रु.२,२७,५७०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. सदर वाढीव काम कंत्राटदार श्री.एस.के.मिसाळ यांचेकडून पुर्वी निविदेत दिलेल्या दराने म्हणजे २१.८६% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१६७/११ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, शहरामध्ये रस्त्यावर पुष्कळ खड्डे पडले असून तक्रारी वाढत आहेत. गरम डांबराचे पावसाळ्यात पॅचवर्क होवू शकत नाही. त्याकरिता थंड पॅचवर्क करणेसाठी उपलब्ध पुरवठा धारक एस.टी.पी.लिमिटेड, मुंबई यांच्याकडून दरपत्रक मागविणे असता सर्व करांसह प्रति मे.टन र.रु.५,३३५/- प्रमाणे पुरवठा करण्याबाबत कळविले आहे. तरी ५ मे.टनचे र.रु.२६,६७५/- च्या रकमेस व एस.टी.पी.लिमिटेड मुंबई यांच्याकडून पुरवठा करणे बाबत कार्योत्तर मान्यता मिळणेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरामधील रस्त्याचे खडी बुजविण्यासाठी पॅचवर्कचे कामाकरिता थंड डींबर मे.एस.टी.पी.लिमिटेड मुंबई यांचेकडून प्रति मे.टन रक्कम रु.५,३३५/- या दराने ५ मे.टन थंड डांबराकरिता र.रु.२६,६७५/- च्या खर्चास सर्वानुमते कार्योत्तर मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१६८/१२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, महाराष्ट्र विकास महामंडळ ते तंत्रनिकेतन महाविद्यालयापर्यंत रोडवर वायर फेन्सींग करण्याचे कामासाठी सन १९८९-९० चे सा.बा.खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.१,८३,७७५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले असून सदरच्या कामाची एकूण लांबी १००० मीटर असून सदरील काम "हरीत औरंगाबाद" योजने अंतर्गत उपलब्ध ठेकेदार मे.विशाल कन्स्ट्रक्शन यांचेकडून तातडीने

करावयाचे असल्यामुळे करुन घेण्यात आलेले आहे. तरी कार्योत्तर मंजूरी होणेसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र विकास महामंडळ ते तंत्र निकेतन महाविद्यालया पर्यंत रोडवर वायर फेन्सींग करण्याचे कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु.१,८३,७७५/- च्या अंदाजपत्रकास तसेच कामाची तातडी लक्षात घेता उपलब्ध ठेकेदार मे.विशाल कन्स्ट्रक्शन यांचेकडून करुन घेण्यांत आलेल्या कामास कार्योत्तर मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१६९/१३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, रेल्वेस्टेशन ते क्रांतीचौक या ५०" फुट डी.पी.रोडवर वायर फेन्सींग करण्याचे कामासाठी सन १९८९-९० चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.१,७५,२६०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले असून सदरच्या कामाची एकूण लांबी १००० मीटर असून सदरील काम "हरित औरंगाबाद योजने अंतर्गत" उपलब्ध ठेकेदार श्री.सय्यद गयासोद्दीन यांचेकडून काम करुन घेण्यास आलेले असून कार्योत्तर मंजूरी घेणेसाठी प्रस्ताव विचारार्थ मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रेल्वेस्टेशन ते क्रांतीचौक या ५०" फुट डी.पी.रोडवर वायर फेन्सींग करण्याचे कामासाठी तयार करण्यात आलेले रुपये १,७५,२६०/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील काम हरीत औरंगाबाद योजने अंतर्गत उपलब्ध गुत्तेदार श्री.सय्यद गयासोद्दीन यांचेकडून करुन घेण्यास सर्वानुमते कार्योत्तर मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१७०/१४ :**

उपअभियंता झोपडपट्टी सुधारणा यांनी प्रस्ताव सादर केला की, बनेवाडी येथे खडीरस्ता तयार करणे बाबत जाहीर प्रगटनाद्वारे निविदा मागविले असता निविदा विक्रीच्या दिवसी एकूण (२१) कोऱ्या निविदा विकल्या गेल्या निविदा स्विकृतीच्या दिवशी एकूण (९) नऊ निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या. त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.सुखबीरसिंग | - | ३२.२५% अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| २. | श्री.सलीम खान | - | ३२.८६% अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ३. | श्री.अे.व्ही.चव्हाण | - | २५.५% अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ४. | श्री.बी.एम.काथार | - | १२% अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ५. | श्री.अन्सारी जी.एम. | - | ३३.८६% अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ६. | श्री.व्ही.आर.पाटील | - | ११% अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ७. | श्री.सिराजुद्दीन | - | २९.७०% अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ८. | श्री.एस.एच.असोशिएट्स | - | १७% अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ९. | श्री.रविंद्र सिंग | - | २७.७०% अंदाजपत्रकापेक्षा कमी |

निविदा उघडल्यानंतर त्यात सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३३.८६% कमी दराची निविदा श्री.अन्सारी जी.एम.मुजताबा यांची निविदा आहे. तरी श्री.अन्सारी जी.एम.मुजताबा यांची ३३.८६% कमी निविदा स्विकारणेस्तव व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बनेवाडी येथे खडी रस्ता तयार करणे बाबतचे कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३३.८६% कमी दराचे गुत्तेदार श्री.अन्सारी जी.एम.मुजताबा यांचे निविदापत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१७१/१५ :**

वार्ड क्र. डेक्कन फ्लॉवर मील, पैठण रोड, वरील रेखांकनात १५० मी.मी.व्यासाची व २५० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रु.३,१०,९४७/- ला स्थायी समितीचा ठराव क्र.१०८८/४/दिनांक २६.०४.८९ नुसार मंजूरी मिळाली आहे.

सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.७/६१७/९०, दि.२१.०७.९० द्वारे बी-१ नमुन्यात दुसऱ्यांदा विकण्यात आल्या होत्या. त्यापैकी केवळ पांच निविदा वसुल झालेल्या असून त्यांचा तुलनात्मकदर खालीलप्रमाणे आहे-

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.मो.सलीम | - | ०.१% कमी |
| २. | श्री.कैसर खान | - | ३.९५% जास्त |
| ३. | श्री. एम.एम.बेग | - | १% जास्त |
| ४. | श्री.पी.जे.तमखाने | - | ३.३३% जास्त |
| ५. | श्री.एस.एच.असोशिएटस | - | १% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१% कमी दराचे श्री. मोहंमद सलीम यांचे दर पत्रक आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डेक्कन फ्लॉवर मील पैठण रोड वरील रेखांकनात १५० मी.मी. व २५० मी.मी.व्यासाच्या ड्रेनेज लाईन टाकणे बाबतचे कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१% कमी दराचे श्री.मो.सलीम यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१७२/१६ :**

शहर अभियंता महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मनपाच्या मालकीचे उस्मानपुरा येथील "संत एकनाथ रंगमंदिर" ही भव्य वास्तु असून त्या ठिकाणी सतत करमणुकीचे व इतर महत्वाचे कार्यक्रम होत असतात. आणि त्यापासून मनपाला आर्थिक उत्पन्न मिळते. परंतू मालमत्ता अधिकारी मनपा यांचे पत्रक दिनांक १६.०६.९० ला दैनिक लोकमत कात्रण दि.१८.०५.९० आणि व्यवस्थापक, "संत एकनाथ रंगमंदिर" यांचे पत्र दि.२२.०५.९० अनुसार वरील ठिकाणी विद्युत पुरवठा खंडीत झाल्यास कार्यक्रम बंद करावे लागतात पर्यायाने नागरिकांना त्रास होतो. तेव्हा वरील अडचण दूर होण्यासाठी आणि विद्युत पुरवठा खंडीत जरी झाल्या तरी कार्यक्रमात कोणत्याही प्रकारची बाधा येऊ नये यासाठी विद्युत जनित्र ३० के.व्ही.अे.०.६ सेट खरेदी करणे व बसविणेसाठी सा.बा.खाते (विद्युत) सन १९८९-९० च्या दरसुचीनुसार रक्कम रु.३,४०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले असून सदर खर्च नवीन वाहन खरेदी या सदरातून करण्यांत येईल.

प्रस्ताव विचारार्थ व प्रशासकीय मान्यतेसह मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावातील कामाबाबत त्या क्षेत्रातील तज्ञांशी चर्चा करुन त्यांची सविस्तर माहिती आगामी सभेत देण्यात यावी. तज्ञांचा सल्ला मिळेपर्यंत हा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो.

**विषय क्र.१७३/१७ :**

सन १९९०-९१ साला करिता अे.सी.प्रेशर पाईप्स (क्लास-१०) व सी.आय.डी.जाईन्टस खरेदी करणे बाबत.

अंदाजपत्रकीय रक्कम रु.४१,७२,०००/- ठराव क्रमांक ६९/२६/दिनांक ११.०७.१९९०.

कार्यालयीन निविदापत्रक क्रमांक/पापु/भांडार/११२८/९०/दि.१४.०७.९० अन्वये उपरोक्त कामासंबंधी निविदा मागविल्या असता दि.३१.०७.९० रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत पांच निविदा विकल्या गेल्या व आखरी तारखेस म्हणजे ०६.०८.९० रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत पांच निविदा कार्यालयात दाखल झाल्या. दि.०७.०८.९० रोजी सकाळी ११.०० वाजता मा.कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयात निविदा उघडण्यांत आल्या असता त्यांच्या दराचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

१) **<u>एम.एस.एस.आय.डी.सी.,औरंगाबाद</u>**

| | | **परिणाम** | **दर** | **एकूण रक्कम** |
|---|---|---|---|---|
| अ) | १०० मी.मी.व्यासाचे | २५३०० र.मी. | ६२.३५ | १५,७७,४५५.०० |
| ब) | १५० मी.मी.व्यासाचे | ९८०० र.मी. | ९७.२० | ०९,५२,५६०.०० |
| क) | २०० मी.मी.व्यासाचे | ३१०० र.मी. | १७१.८० | ०५,३२,५८०.०० |

**<u>सी.आय.डी.जॉईन्टस</u>**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अ) | १०० मी.मी.व्यासाचे | ७९०० संच | ७६.८० | ०४,४८,७२०.०० |
| ब) | १५० मी.मी.व्यासाचे | ३०६७ संच | ८५.७० | ०२,६५,८४१.९० |
| क) | २०० मी.मी.व्यासाचे | १२९० संच | १५५.०० | ०१,९९,९५०.०० |
| | | | **एकूण रक्कम** | **३९,७४,१०६.९०** |

(उपरोक्त एजन्सीने दिलेल्या दरात सर्व करांचा समावेश आहे.)

२) **<u>मे.हैद्राबाद इंडस्ट्रीज लि.हैद्राबाद.</u>**

| | | **परिणाम** | **दर** | **एकूण रक्कम** |
|---|---|---|---|---|
| अ) | १०० मी.मी.व्यासाचे | २५३०० र.मी. | ६७.९७ | १७,१९,६४१.०० |
| ब) | १५० मी.मी.व्यासाचे | ०९८०० र.मी. | १०५.८५ | १०,३७,३३०.०० |
| क) | २०० मी.मी.व्यासाचे | ०३१०० र.मी. | १९०.९२ | ०५,९१,८५२.०० |

**<u>सी.आय.डी.जॉईन्टस</u>**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अ) | १०० मी.मी.व्यासाचे | ७९०० संच | ७१.४१ | ०५,६४,१३९.०० |
| ब) | १५० मी.मी.व्यासाचे | ३०६७ संच | १०८.३३ | ०३,३२,२४८.१० |
| क) | २०० मी.मी.व्यासाचे | १२९० संच | १७४.१४ | ०२,२४,६४०.६० |
| | | | **एकूण रक्कम** | **४४,६९,८५०.७०** |
| | श्री.आफ कॉस्ट सी.आय.डी.जॉईन्टस चे | | | ०१,७०,४०७.०५ |
| | | | | **४२,९९,४४३.६५** |

१) मे.हैद्राबाद इंडस्ट्रीज हयांनी दिलेले दर हे सर्व करांसह आहेत.

२) प्रत्येक २० र.मीटर पाईप्स मागे एफ.सी.आय.डी.जॉईन्टसचा मोफत पुरवठा करण्यात येईल.

**३) स्वतिक इंडस्ट्रीज, पुणे**

**अे.सी.प्रेशर पाईप्स**

| | | परिणाम | दर | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| अ) | १०० मी.मी.व्यासाचे | २५३०० र.मी. | ५५.५३ | १४,०४,९०९.०० |
| ब) | १५० मी.मी.व्यासाचे | ९८०० र.मी. | ८६.६३ | ०८,४८,९७४.०० |
| क) | २०० मी.मी.व्यासाचे | ३१०० र.मी. | १३७.६० | ०४,२६,५६०.०० |

**सी.आय.डी.जॉईन्टस**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अ) | १०० मी.मी.व्यासाचे | ७९०० संच | ६१.०६ | ०४,८९,३७४.०० |
| ब) | १५० मी.मी.व्यासाचे | ३०६७ संच | ९७.६० | ०२,९९,३३९.२० |
| क) | २०० मी.मी.व्यासाचे | १२९० संच | १५७.०० | ०२,०२,५३०.०० |
| | | | **एकूण रक्कम** | **३६,६४,६८६.२०** |
| | | २% जकात दर | | **७३,२९३.००** |
| | | १.५०% सुट मुळ किंमतीवर | | **३७,३७,९७९.२०** |
| | | जर संपूर्ण ऑर्डर दिली तर | | **००,५०,५७२.००** |
| | | | | **३६,८७,४०७.२०** |

१) सदरील रक्कम ही २% जकात कर धरुन आहे.

२) स्वतिक इंडस्ट्रीज, पुणे यांनी दिलेल्या दरात जकात कर सोडून सेंट्रल एकसाईज ड्युटी सेल टॅक्स या करांचा समावेश आहे.

**४) वाडा अरुण ॲसबेस्टॉज प्रॉडक्ट प्रा.लिमिटेड**

**अे.सी.प्रेशर पाईप्स**

| | | परिणाम | दर | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| अ) | १०० मी.मी.व्यासाचे | २५३०० र.मी. | ६२.३६ | १५,७७,७०८.०० |
| ब) | १५० मी.मी.व्यासाचे | ९८०० र.मी. | ९७.२६ | ०९,५३,१४८.०० |
| क) | २०० मी.मी.व्यासाचे | ३१०० र.मी. | १७२.०० | ०५,३३,२००.०० |
| | | | | **३०,६४,०५६.००** |

**वाडा अरुण ॲसबेस्टॉज प्रॉडक्टस प्रा.लिमिटेड**

**सी.आय.डी.जॉईन्टस**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अ) | १०० मी.मी.व्यासाचे | ७९०० संच | ५६.८२ | ०४,४८,८७८.०० |
| ब) | १५० मी.मी.व्यासाचे | ३०६७ संच | ८५.७७ | ०२,६३,०५४.०० |
| क) | २०० मी.मी.व्यासाचे | १२९० संच | १५५.०३ | ०१,९९,९८८.७० |
| | | | **एकूण रक्कम** | **३९,७५,९७९.७०** |

१) वाडा अरुण ॲसबेस्टॉज प्रॉडक्ट प्रा.लिमिटेड यांनी दिलेल्या दरात सर्व करांचा समावेश आहे.

**५) के.इंजिनिअरींग ॲण्ड मेटल वर्क्स, लातुर**

१. उपरोक्त एजन्सीने फक्त सी.आय.डी.जॉईन्टसचे दर दिलेले आहेत.

२. तसेच दरपत्रकासोबत १% अनामत रक्कम भरलेली नाही. त्यांनी दिलेली सी.आय.डी.जॉईन्टसचे दर खालीलप्रमाणे आहेत.

अ) १०० मी.मी.व्यासाचे सी.आय.डी. जॉईन्टस
७९०० संच x ५४.३५ = ४,२९,३६५.००
ब) १५० मी.मी.व्यासाचे सी.आय.डी.जाईन्टस
३०६७ संच x ८६.८७ = २,६६,४३०.००
क) २०० मी.मी.व्यासाचे सी.आय.डी.जॉईन्टस
१२९० संच १३९.७५ = १,८०,२७७.५०
एकूण रक्कम = ०८,७६,०७२.५०

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे दरपत्रक म्हणजे रक्कम रुपये ३६,८७,४०७.०० चे स्वतिक इंडस्ट्रीज पुणे यांचे आहे. व सदरील पाईप्स आय.एस.आय. मार्क्सचे आहेत. सध्या भांडारात पाईप्स व सी.आय.डी. जॉईन्टस संपुष्टात आल्यामुळे सर्व पाणी पुरवण्याची कामे बंद पडली आहेत.

तरी प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९०-९१ सालाकरिता अे.सी.प्रेशर पाईप्स (क्लास-१०) व सी.आय.डी.जॉईन्टस खरेदी करणेसाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे मे.स्वतिक इंडस्ट्रीज, पुणे यांचे रक्कम रु.३६,८७,४०७.०० चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. तसेच त्यांचेकडून खालील दर्शविल्याप्रमाणे आय.एस.आय.मार्क्सचे पाईप्स (क्लास-१०) व सी.आय.डी.जॉईन्टस खरेदी करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**३) स्वतिक इंडस्ट्रीज, पुणे**

**<u>अे.सी.प्रेशर पाईप्स</u>**

| | | **परिणाम** | **दर** | **एकूण रक्कम** |
|---|---|---|---|---|
| अ) | १०० मी.मी.व्यासाचे | २५३०० र.मी. | ५५.५३ | १४,०४,९०९.०० |
| ब) | १५० मी.मी.व्यासाचे | ९८०० र.मी. | ८६.६३ | ०८,४८,९७४.०० |
| क) | २०० मी.मी.व्यासाचे | ३१०० र.मी. | १३७.६० | ०४,२६,५६०.०० |

**<u>सी.आय.डी.जॉईन्टस</u>**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अ) | १०० मी.मी.व्यासाचे | ७९०० संच | ६१.०६ | ०४,८९,३७४.०० |
| ब) | १५० मी.मी.व्यासाचे | ३०६७ संच | ९७.६० | ०२,९९,३३९.२० |
| क) | २०० मी.मी.व्यासाचे | १२९० संच | १५७.०० | ०२,०२,५३०.०० |
| | | | **एकूण रक्कम** | **३६,६४,६८६.२०** |
| | | २% जकात दर | | **७३,२९३.००** |
| | | १.५०% सुट मुळ किंमतीवर | | **३७,३७,९७९.२०** |
| | | जर संपूर्ण ऑर्डर दिली तर | | **००,५०,५७२.००** |
| | | | | **३६,८७,४०७.२०** |

१) सदरील रक्कम ही २% जकात कर धरुन आहे.
२) स्वतिक इंडस्ट्रीज, पुणे यांनी दिलेल्या दरात जकात कर सोडून सेंट्रल एकसाईज ड्युटी सेल टॅक्स या करांचा समावेश आहे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र.१७४/१८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.कुशल नगर येथील मालपाणी याचे घरापासून ते विहाळकर यांचे घरापर्यंत खडी रस्त्याचे काम करणे साठी सन १९८९-९० चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर.दराने रक्कम रु.३०,५२३.०० चे अंदाजपत्रकास दि.३०.०७.९० चे स्थायी समितीच्या सभेमध्ये ठराव क्र.५५/३९ नुसार मंजूरी मिळालेली आहे.

सदरचे काम करणेसाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.(५) १९९०-९१ दिनांक २२.०८.९० चे निविदा सुचनेद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित दि.२८.०८.९० पर्यंत एकूण आठ निविदा विक्री झाल्या असून निविदा स्विकारणेच्या नियोजित दि.०३.०९.९० ला पांच (५) निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.एस.एच.असोशिएट्स | - | ३६.६०% कमी दराने |
| २. | श्री.नरेंद्रसिंग | - | ३०.३३% कमी |
| ३. | श्री.इ.बी.पठाण | - | २८५०% कमी |
| ४. | श्री.रविंद्रसिंग | - | २३.५१% कमी |
| ५. | श्री.सुखबीरसिंग | - | २३.०५% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३४.६०% कमी दराची मे.एस.एच.असोशिएटस यांची निविदा असून मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.कुशलनगर येथील मालपाणी यांचे घरापासून ते विहाळकर याचे घरापर्यंत खडी रस्त्याचे काम करण्यासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३४.६०% कमी दराचे श्री.एस.एच.असोशिएट्स यांचे निविदापत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**संवाद :**

**श्री.मो.इस्माईल :** नगर भुवन येथील जागा हॉटेल टाकण्याकरिता एका व्यक्तीस भाड्याने दिली आहे का? या बाबत खुलासा व्हावा.

**मालमत्ता अधिकारी :** नगर भुवन येथील जागेवर हॉटेल टाकण्याकरिता एका व्यक्तीस ४'x६' क्षेत्र असलेली जागा भाड्याने देण्यांत आली आहे. परंतू याप्रकरणी अद्याप मा.आयुक्त यांची मंजूरी प्राप्त झालेली नाही. तसेच संबंधित व्यक्तीस जागा भाड्याने देण्याबाबत आदेश देण्यांत आलेला नाही.

**मा.सभापती :** या बाबत चौकशी करुन आगामी समोर माहिती सादर करावी.

**श्री.गंगाधर गाडे :** मनपा मुख्य कार्यालयाच्या परिसरात नवीन इमारतीचे बांधकाम चालू आहे. या ठिकाणी पुर्वी अस्तित्वात असलेल्या इमारतीचे पत्रे बल्ल्या, पंखे इत्यादी साहित्य कोठे आहे. याचा खुलासा व्हावा.

**निवासी उप अभियंता :** जुन्या इमारतीचे सर्व साहित्य काढून टाकण्यांत आले आहे. त्या साहित्यांची एक सुची तयार करुन साहित्य व्यवस्थीत ठेवण्यात आले आहे.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** घाटी ते टाऊन हॉल या रस्त्यावर ड्रेनजची जी घाण वाहात आहे. त्या बाबत काय कार्यवाही करण्यात आली.

**मा.सभापती :** घाटी ते टाऊन हॉल पर्यंत वाहत असलेली ड्रेनेजची घाण बंद करण्याकरिता संबंधित अधिकाऱ्यांनी त्वरीत कार्यवाही करावी.

यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा.सभापती यांनी जाहिर केले.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
मा.सभापती, स्थायी समिती
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**बुधवार दिनांक १०.१०.१९९० रोजी संपन्न झालेल्या विशेष स्थायी समिती सभेचा इतिवृत्तांत**

**बुधवार दिनांक १० ऑक्टोंबर १९९० रोजी सकाळी ११.०० वाजता समिती सभागृहात मा.सभापती श्री.रतनकुमार पंडागळे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष स्थायी समिती सभेस सुरुवात झाली. या सभेत मा.उपआयुक्त, मुख्य लेखा परिक्षक व विधी सल्लागार यांचेसह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

१. श्री.गाडे गंगाधर सुखदेव
२. श्री.जैस्वाल प्रदिप शिवनारायण
३. श्री.नवपुते कचरु चंद्रभान
४. श्री.मगर शंकर जिजाराम
५. श्री.स.अ.इकबालोद्दीन स.मो.कुतूबोद्दीन
६. श्री.गिल इकबालसिंग प्रितमसिंग
७. श्री.फैय्याज खान अहमद खान
८. श्री.बारवाल गजानन रामकिशन
९. श्री.विधाते प्रभाकर सिताराम
१०. श्री.सोनवणे केशव काशिनाथ

**विषय क्र.१७५/१ :**

दिनांक ०६.०८.९० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे श्री.जी.बी.सोनी यांच्या अपिलावर चर्चा करणे.

**संवाद :**

**श्री.प्रदिप जैस्वाल :** श्री.जी.बी.सोनी हयांना पदावनत करण्यात आल्यानंतर त्यांनी न्यायाची मागणी केली आहे. त्यांनी मनपाची परवानगी मालमत्ता जमवितांना घेतली नाही. असे आरोप त्यांचेवर आहेत. परंतू सर्व सुविधा मनपा तर्फे पुरविण्यांत आल्या आहेत.

**श्री.गंगाधर गाडे :** श्री.सोनी यांना घर बांधण्याकरिता कार्यालयातर्फेच कर्ज दिले. तेव्हा प्रशासनास हे माहिती होते की श्री.सोनी हे घर बांधत आहेत.

**श्री.गजानन बारवाल :** लाच लुचपत खात्याचा अहवाल समितीसमोर सादर करावा.

**श्री.कचरु नवपुते :** श्री.सोनी यांना पदावनत करण्यापुर्वी प्रशासनाने त्यांच्या सेवाकाळाचे गोपनिय अहवाल असे लिहिण्यात आलेले आहेत. यांची पाहणी करण्यात आली का?

**श्री.केशव सोनवणे :** मुं.प्रा.म.अ.१९४९ च्या कलम ५६ च्या नियम ३ व ४ अन्वये मनपा प्रशासनाने या नियमाच्या अधिन राहुन कार्यवाही केली का?

**श्री.शंकर मगर :** मा.आयुक्त मनपा हयांनी कोणत्या नियमानुसार श्री.सोनी यांच्या विरुध्द कार्यवाही केली याचा खुलासा व्हावा.

**श्री.गंगाधर गाडे :** श्री.सोनी यांना मनपा प्रशासनातर्फे देण्यांत आलेली कारणे दाखवा नोटीस, आरोपपत्र, लाचलुचपत प्रतिबंधक खात्यातर्फे त्यांना देण्यांत आलेली नोटीस अथवा आरोपपत्र सभागृहापुढे सादर करावे.

**श्री.शंकर मगर :** मुं.प्रा.म.अ.१९४९ च्या कलम ५६ (१) अन्वये भत्ते वगळून ज्यांचे मासिक वेतन दोनशे रुपयाहून अधिक आहे. अशा कर्मचाऱ्यांस बडतर्फे करण्यात येत नाही. तेव्हा श्री.सोनी यांच्याविरुध्द कोणत्या नियमाने कार्यवाही करण्यांत आली याचा खुलासा व्हावा.

**श्री.गजानन बारवाल :** लाचलुचपत प्रतिबंधक खात्याने मनपा अधिनियम मात हस्तक्षेप करु नये. श्री.सोनी गेल्या चार पांच वर्षापासून उपअभियंता (यांत्रिकी) या पदाचा कार्यभार पाहता आहेत. श्री.सोनी यांनी घर बांधण्याकरिता मनपाकडून घर बांधणी कर्ज घेतलेले आहे. घर बांधण्यास नियमाप्रमाणे मनपाची परवानगी देखील घेतली आहे. या सर्व बाबी संबंधित अधिकाऱ्यास माहिती आहेत. तेव्हा श्री.सोनी यांना लाचलुचपत प्रतिबंधक खात्याच्या आरोप पत्रान्वये शिक्षा देण्यांत आली का? अथवा मुं.प्रा.म.अ.१९४९ च्या अधिन राहुन त्यांना शिक्षा देण्यात आली याचा खुलासा व्हावा. तसेच त्यांना नैसर्गिक न्याय देण्यांत यावा.

**श्री.कचरु नवपुते :**श्री.सोनी यांनी केलेल्या अपिलाची प्रशासनाने चौकशी केली का?

**मा.सभापती :** दिनांक २३.०७.९० रोजी झालेल्या स्थायी समिती मध्ये श्री.सोनी यांच्या अपिलावर चर्चा करुन सभागृहाने या प्रकरणास प्रशासनाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यास स्थगिती दिली होती. त्यानंतर दि.०६.०८.९० रोजी झालेल्या स्थायी समितीच्या सभेत दि.२३.०७.९० च्या सभेचे इतिवृत्त कायम करतांना हा विषय वगळून इतिवृत्तास मान्यता दिली. या विषयी विशेष स्थायी समितीची सभा बोलावून त्यात निर्णय घेण्यात येईल. असे दि.०६.०८.९० च्या सभेत ठरल्याप्रमाणे आजची सभा समितीची विशेष सभा आयोजित करण्यात आलेली आहे.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** श्री.सोनी यांनी कार्यालयास कळविले की, स्थायी व जंगम मालमत्ता जमविण्याकरिता नियमाप्रमाणे कार्यालयाची परवानगी घ्यावी लागते. असे त्यांनी माहिती नव्हती ही चुक त्यांनी कबुल केलेली आहे. चुक कबुल करणे म्हणजे गुन्हा नव्हे. श्री.सोनी यांनी त्यांच्या पत्नीकडून कर्ज घेतले आहे. त्यांची पत्नी आयुर्विमा कंपनीची एजंट आहे. यापासून होणाऱ्या उत्पन्नावर त्या आयकर भरतात. पत्नी कडून घेतलेले कर्ज ग्राह्य मानण्यास मनपा प्रशासन का तयार नाही.

**श्री.एकबालसिंग गील :** मनपा प्रशासनातर्फे या प्रकारची नोटीस इतर मनपा कर्मचाऱ्यांना देण्यांत आलेली आहे का? श्री.सोनी यांना जो मानसिक त्रास झाला. त्यांचा मोबदला त्यांना मिळणार आहे का?

**श्री.गंगाधर गाडे :** मनपा कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरिक सेवा नियम लागू असल्याचा ठराव आपल्या सर्व साधारण सभेने मंजूर केला आहे का? मा.आयुक्त यांनी कोणत्या नियमाच्या अधिन राहून श्री.सोनी यांना पदावनत केले.

**श्री.शंकर मगर :** अशाप्रकारे सर्वश्री. शिरोडकर, श्री.सिसोदे, श्री.वाळुजकर इत्यादी कर्मचाऱ्यांना मा.आयुक्त यांनी नियमबाह्य निलंबित केलेले आहे.

**श्री.कचरु नवपुते, श्री.गंगाधर गाडे :** प्रशासनाने श्री.सोनी यांना दिलेली कारणे दाखवा नोटीस, त्यांच्या चौकशी संबंधी लाचलुचपत खात्याचा अहवाल, प्रशासनाने केलेला खुलासा सादर करावा.

**श्री.इकबालसिंग गील, श्री.स.अ.इकबालोद्दीन :** स्थायी समितीस आपले अधिकार वापरु द्यावेत. मा.आयुक्त यांनी मनमानी करु नये. नियमाप्रमाणे हे प्रकरण प्रशासनामार्फत स्थायी समितीसमोर यावयास पाहिजे होते.

**मा.सभापती :** मा.आयुक्त यांनी खुलासा करावा.

**मा.उपआयुक्त :** श्री.सोनी यांना पदावनत केल्याबाबत सभापती स्थायी समिती हयांना प्रशासनाचा खुलासा दिनांक ११.०७.९० रोजी सादर केला आहे. मनपा ही राज्य शासनाचीच यंत्रणा असून शासकीय कर्मचाऱ्यांना जी वर्तणूक शिस्त नागरी सेवा नियम खाते चौकशी संहिता लागू आहेत. ते नियम मनपा कर्मचाऱ्यांना लागू आहेत. १९८५ मध्ये प्रशासकांनी अशा आशयाचा ठराव मंजूर केला आहे.

विना परवाना स्थावर व जंगम मालमत्ता केल्याबाबत, श्री.सोनी यांना कार्यालयातर्फे पत्र देण्यांत आले होते की, स्थावर जंगम मालमत्ता खरेदी करण्यांस आपण कार्यालयाची पुर्व परवानगी घेतलेली नाही. तेव्हा आपण गुन्हा केला असे सिध्द होते. मुं.प्रा.म.अ.१९४९ अन्वये आयुक्तास प्राप्त अधिकारानुसार कार्यवाही करण्यांत आलेली आहे. मुं.प्रा.म.अ.१९४९ कलम ५६ (३) व (४) अन्वये कोणत्याही अधिकाऱ्यास व कर्मचाऱ्यास खालच्या पदावर आणणे, सेवेतून काढून टाकणे निलंबित करणे इ.कार्यवाही करता येते.

**श्री.गंगाधर गाडे :** मुं.प्रा.म.अ.१९४९ च्या कलम ५६ (१) अन्वये श्री.सोनी यांना पदावनत करण्यासाठी स्थायी समितीची परवानगी घेतली का?

**मुख्य लेखापरिक्षक :** मनपाने खाते चौकशी संबंधी नियम तयार करुन त्यास शासनाची मान्यता प्राप्त होणे आवश्यक असते म्हणून प्रशासनास शासनाचे अस्तित्वात असलेल्या नियमा अन्वये कार्यवाही करण्याचे अधिकार प्राप्त आहे. त्या नियमान्वये आयुक्त यांनी कार्यवाही केली आहे.

**मा.उपआयुक्त :** श्री.सोनी यांची वेतनश्रेणी रु.२००/- हुन अधिक आहे. परंतू मा.आयुक्त यांनी प्रशासकाचे अधिकार वापरुन शिक्षा दिली.

**श्री.कचरु नवपुते, श्री.गंगाधर गाडे :** आम्ही आपल्या मुद्यांशी व खुलाशाशी सहमत नाही.

**श्री.गंगाधर गाडे :** मनपाच्या सर्वसाधारण सभेने कर्मचाऱ्यांच्या व अधिकाऱ्यांस महाराष्ट्र नागरी सेवा नियम लागू करण्या बाबतचा ठराव मंजूर केलेला नाही. मनपाचा कारभार लोकप्रतिनिधीच्या हाती आल्या नंतर सर्वसाधारण सभेत असा ठराव ठेवून त्यास मंजूरी द्यावयास पाहिजे होती.

**मा.उपआयुक्त :** मनपा जोपर्यंत स्वत:चे सेवा नियम तयार करुन त्यास महाराष्ट्र शासनाची मंजूरी येत नाही. तोपर्यंत शासनाचे नियम लागू राहतील.

**श्री.कचरु नवपुते, श्री.गंगाधर गाडे, श्री.शंकर मगर :** मुं.प्रा.म.अ.१९४९ च्या कलम (३) व (४) अन्वये श्री.सोनी यांच्या विरुध्द प्रशासनाने केलेली कार्यवाही आम्हास मंजूर नाही व त्यास आम्ही सहमत नाही.

**मा.उपआयुक्त :** श्री.सोनी यास प्रशासनाने तात्पुरती पदोन्नती दिली होती. तेव्हा त्यांनी त्यांचे अपिल प्रथम परत घ्यावे म्हणजे प्रशासनातर्फे योग्य ती कार्यवाही करता येईल.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** श्री.यांचेकडे उपअभियंता (यांत्रिकी) या पदाचा पदभार किती वर्षापासून होता.

**मा.उपआयुक्त :** अधिकाऱ्याच्या गोपनीय अहवालानुसार ज्या अधिकाऱ्यांकडे पदाचा पदभार सोपविण्यांत येतो.

**श्री.गंगाधर गाडे :** कोणत्याही कर्मचाऱ्यांस जेष्ठता यादी डावलून पदोन्नती देण्यात येऊ नये. कर्मचाऱ्यांना अथवा अधिकाऱ्यांना पदोन्नती देण्याचा प्रस्ताव स्थायी समिती समोर ठेवण्यांत यावा.

**श्री.केशव सोनवणे :** दि.०९.११.८५ रोजी कार्यालयातर्फे श्री.सोनी यांना एक पत्र देवून कळविले की, आपले काम समाधानकारक असल्यामुळे आपणांस पदोन्नती देण्यांत येते.

**मा.उपआयुक्त :** श्री.सोनी यांचे गेल्या दोन वर्षाचे गोपनिय अहवाल विपरीत (ॲडव्हर्स) आहेत.

**श्री.गंगाधर गाडे :** प्रशासनातर्फे श्री.सोनी यांना देण्यांत आलेली कारणे दाखवा नोटीस दाखविण्यांत यावी.

**मा.उपआयुक्त :** कारणे दाखवा नोटीस दाखविली.

**श्री.गंगाधर गाडे :** प्रशासनाने श्री.सोनी यांना जी कारणे दाखवा नोटीस दिली त्यामध्ये प्रशासनाने असे स्पष्ट म्हटले आहे की, याचा अर्थ श्री.सोनी यास शिक्षा देण्याबाबत प्रशासनाने अधीच ठरविले होते. ते सिध्द होते. श्री.सोनी यांना नैसर्गिक न्याय ( ) दिलेला नाही. त्यांचे म्हणणे ऐकून पण घेण्यांत आले नाही.

**मा.उपआयुक्त :** याप्रकरणी जी प्राथमिक चौकशी करण्यांत आली. त्या चौकशीमध्ये श्री.सोनी हे दोषी आढळल्या मुळेच त्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यांत आली.

**श्री.गंगाधर गाडे :** दोषी व्यक्तीचे म्हणणे पुरेपुर ऐकून घ्यावे असे सर्वोच्च न्यायालयाची सुचना असतांना सुध्दा या प्रकरणात श्री.सोनी यांचे म्हणणे गृहीत धरण्यात आले नाही. याचा अर्थ प्रशासनाने या कर्मचाऱ्यांविषयी पुर्वग्रह दुषित ठेवून त्यास पदावनत केले. त्याला आपली बाजू मांडतांना अधिकार दिलेला नाही.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** सर्व स.सभासदांनी केलेल्या चर्चेचा तसेच प्रशासनाच्या खुलाशाचा विचार करुन मा.सभापती यांनी विनंती करण्यांत येते की, त्यांच्या अपिलावर विचार करुन योग्य निर्णय घ्यावा.

**श्री.शंकर मगर, श्री.गंगाधर गाडे व सर्व स.सभासद :** प्रशासनाने श्री.सोनी यांच्यावर केलेल्या आरोपाशी आम्ही सहमत नाही. श्री.सोनी यांना सन्मानपुर्वक पुन्हा कामावर घेण्यात यावे.

**मा.सभापती :** श्री.जी.बी.सोनी यांनी केलेल्या अपिलावर प्रशासनातर्फे करण्यात आलेला खुलासा व श्री.सोनी यांचे उत्तर या सर्व बाबींवर आजच्या स्थायी समिती सभेत झालेली सविस्तर चर्चा लक्षात घेता न्याय्य दृष्टीने स्थायी समिती खालील निर्णयावर पोहचली आहे.

१) मा.आयुक्त (यांनी) मनपा यांनी श्री.सोनी यांना दिलेली कारणे दाखवा नोटीसवरुन हे सिध्द होते की, श्री.सोनी यांना शिक्षा द्यावयाची हे अधिच ठरले होते. ( ) या मध्ये श्री.सोनी यांचे म्हणणे ऐकून घेण्यांत आलेले नाही. हे सिध्द होते.

२) श्री.सोनी जी.बी.यांचे उप अभियंता या पदावरचे काम समाधानकारक नाही. या आरोपास पुष्टी जोडणारे पुरावे (उदा.मेमो,

ज्ञापन कारणे दाखवा नोटीस, काम सुधारण्या संबंधी पत्र) प्रशासनातर्फे सादर करण्यांत आले नाही.

३) श्री.सोनी यास पदावनत केल्यानंतर त्यांचा अहवाल खरात आहे असे कळविणे म्हणजे पुर्वग्रह दुषित ठेवून हेतूपुरस्सर कर्मचाऱ्यांस त्रास देणे होय.

४) सहाआयुक्त/विशेष पोलिस महानिरिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, मुंबई यांचेकडून श्री.सोनी यांच्यावर लावण्यात आलेल्या आरोपासंबंधीचे कागदपत्र मनपा प्रशासनातर्फे स्थायी समिती समोर दाखविण्यांत आलेले नाहीत. याचा अर्थ त्या पत्रात श्री.सोनी विरुध्द कुठल्याही प्रकारचा गुन्हा सिध्द होत नाही. लाचलुचपत प्रतिबंधक विभागास म.ना.से.नि.१९७९ च्या कलम १९ (२) अन्वये कार्यवाही करण्याबाबत शिफारस करण्याचे अधिकार असल्याची तरतूद म.प्रा.म.अ.१९४९ मध्ये नाही.

५) महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९७९ हे महानगरपालिका, औरंगाबाद कर्मचाऱ्यांस लागू आहे. याबाबत मनपा प्रशासनाने कोणताही ठराव सभागृहास सादर केला नाही. याचा अर्थ महानगरपालिका कर्मचाऱ्यांना सदरील नियम लागू करणे बरोबर नाही.

६) मनपा प्रशासनातर्फे दि.०५.१०.८९ रोजी दिलेल्या पत्रात दि.१६.१०.९० रोजी श्री.सोनी यांनी उत्तर देवून स्थावर व जंगम मालमत्तेसंबंधी संपूर्ण माहिती सा.आयुक्त महानगरपालिका, औरंगाबाद यांचेकडे दिली आहे. श्री.सोनी यांनी नियमाप्रमाणे घर बांधण्यांस कार्यालयाकडून परवानगी घेतली. त्यानंतर बांधकाम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र घेतले. श्री.सोनी यांना घर बांधण्याकरिता महानगरपालिकेतर्फे कर्ज देण्यांत आलेले आहे. कर्मचाऱ्यांना स्थावर व जंगम मालमत्ता जमा करण्यांबाबत प्रशासनाने वेळोवेळी कर्मचाऱ्यांना त्यासंबंधी सुचना दिलेल्या नाहीत.

७) श्री.सोनी यांना मुं.प्रा.म.अ.१९४९ च्या कलम ५६ (२) अन्वये त्यांचे म्हणणे मांडण्यास योग्य संधी देण्यात आलेली नाही. श्री.सोनी यांची कोणतीही चौकशी न करता दोषी ठरवून पदावनती सारखी गंभीर स्वरुपाची शिक्षा ठोठावण्यात आलेली आहे. ती योग्य नाही. श्री.सोनी यांना नैसर्गिक न्याय देण्यांत आलेला नाही.

**ठराव :**

वर नमूद केलेल्या सर्व बाबींचा विचार करता स्थायी समिती सर्वानुमते असा निर्णय देते की, श्री.जी.बी.सोनी यांनी मुदतीच्या आंत स्थायी समिती समोर दाखल केलेले अपिलावर व या अपिलावरील मनपा प्रशासनाचा खुलाशावर दि.१०.१०.९० रोजी संपन्न झालेल्या विशेष स्थायी समितीच्या बैठकीत या प्रकरणी सखोल चर्चा करुन अनुक्रमांक १ ते ७ मधील निवाडा लक्षात घेता न्याय्य दृष्टीकोनातून स्थायी समिती सभेत विचार विनिमय करुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ५६ (४) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मा.आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी काढलेला कार्यालयीन आदेश क्र.मनपा/अस्था-१/६२२९/९०, दि.०५.०६.९० हा रद्दबादल करीत आहे.

श्री.जी.बी.सोनी यांना उपअभियंता (यांत्रिकी) या पदावर पुर्ववत आज दि.१०.१०.९० पासून रुजू करुन घेण्यास आदेश देत आहे.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
मा.सभापती, स्थायी समिती
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक १७.१०.१९९० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत**

**बुधवार दिनांक १७ ऑक्टोंबर १९९० रोजी दुपारी ३.०० वाजता समिती सभागृहात मा.सभापती श्री.रतनकुमार पंडागळे यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभेस सुरुवात झाली. यासभेमध्ये खालीलप्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

१. श्री.नवपुते कचरु चंद्रभान
२. श्री.मगर शंकर जिजाराम
३. श्री.स.अ.इकबालोद्दीन स.मो.कुतूबोद्दीन
४. श्री.फैय्याज खान अहमद खान
५. श्री.बारवाल गजानन रामकिशन
६. श्री.मो.इस्माईल अ.करीम
७. श्री.विधाते प्रभाकर सिताराम
८. श्री.सोनवणे केशव काशिनाथ

**विषय क्र.१७६/१ :**

दिनांक ०८.१०.९० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे व दि.१०.१०.९० च्या विशेष स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री.प्रभाकर विधाते :** दि.०८.१०.९० झालेल्या स्थायी समितीच्य सभेत दि.२४.०९.९० च्या स्थायी समितीचे इतिवृत्त कायम करते वेळेस विषय क्र.१३२/७, दि.२४.०९.९० च्य कामाकरिता आलेल्या निविदापैकी कमी दराच्या निविदास मंजूरी देण्यांत आलेली असतांना त्याची नोंद दि.०८.१०.९० च्या इतिवृत्तात घेण्यांत आलेली नाही. करिता दि.०८.१०.९० चे इतिवृत्त कायम करण्या अगोदर त्याची नोंद घेण्यांत यावी.

**मा.सभापती :** दि.०८.१०.९० रोजी झालेल्या स्थायी समितीच्या इतिवृत्तात विषय क्र.१३२/७ दि.२४.०९.९० च्या कामाकरिता आलेल्या निविदांपैकी कमी दराच्या निविदास मंजूरी देण्यांत येते. अशी नोंद करण्यांत यावी.

**श्री.गजानन बारवाल :** आजच्या स्थायी समितीच्या सभेत अधिकारी वर्ग उपस्थित नाही. याबाबत खुलासा व्हावा.

**मा.सभापती :** मनपा अधिकाऱ्यांच्या असोशिअेशनने पत्र देऊन कळविले की, ज्या स.सभासदांनी मनपा अधिकाऱ्यांशी गैरवर्तन केले. संबंधित स.सभासद जोपर्यंत आमच्या निविदेनाचा विचारा करीत नाही तोपर्यंत मनपातील सर्व अधिकारी वर्ग यापुढे होणाऱ्या सर्वसाधारण सभा, स्थायी समिती सभा व विशेष समितीच्या सभेस उपस्थित राहणार नाही. त्या अनुषंगाने सर्व अधिकाऱ्यांची एक बैठक घेण्यांत आली. या बैठकीत अधिकाऱ्यांचे म्हणणे ऐकून घेण्यांत आले असून त्यांचया काही अडचणी दूर करण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रकरणात तेरा स.सभासदांची एक समिती कायम करण्यांत

आलेली आहे. या तेरा सदस्यीय समिती समोर अधिकाऱ्यांचे म्हणणे मांडण्यांत येईल. त्यानंतर एक सभा घेऊन विचार विनिमय करुन सर्व स.सभासद व अधिकारी वर्गातील वाद संपुष्टात आणण्याचा प्रयत्न आगामी सभेपुर्वी करण्यात येईल.

**श्री.केशव सोनवणे :** अधिकारी वर्ग किती दिवस सभेस हजर राहणार नाहीत याचा खुलासा व्हावा. आपण प्रत्येक अधिकाऱ्यांला सभेत बोलावणार का?

**मा.सभापती :** सभेत चर्चा चालु असता अधिकाऱ्यांची आवश्यकता भासल्यास संबंधित अधिकाऱ्यांना सभेत बोलावण्यांत येईल.

**श्री.केशव सोनवणे :** सिध्दार्थ नगर झोपडपट्टीमध्ये जलनि:सारण वाहिनी टाकण्याच्या कामाबाबत काय झाल. या विषयीच्या संबंधित अधिकारी श्री.रोडे यांना बोलावून खुलासा करण्यांत यावा.

**मा.सभापती :** श्री.रोडे उप अभियंता गलिच्छ वस्ती सुधारणा यांना बोलावण्यात आले असता ते त्यांच्या कार्यालयात उपस्थित नाहीत असे कळले आहे.

**श्री.केशव सोनवणे :** गत सभेच्या विषय क्र.१६९/१३ च्या कामाकरिता आलेल्या निविदास मंजूरी दिलेली नाही. इतिवृत्तांत त्यास मंजूरी देण्यांत आली अशी नोंद आहे. याबाबत खुलासा करण्यांत यावा.

**मा.सभापती :** गत सभेच्या विषय क्र.१६८/१२ ला मंजूरी देतांना याप्रकरणी चर्चा करुन विषय क्र.१६९/१३ ला पण मंजूर करण्यात आलेला आहे.

**श्री.शंकर मगर :** इंदिरानगर बायजीपुरा येथील जलनि:सारण वाहिनी टाकण्याच्या कामाचे काय झाले याबाबत खुलासा व्हावा.

**मा.सभापती :** इंदिरानगर, बायजीपुरा येथे जलनि:सारण वाहिनी टाकण्याच्या कामाचे अंदाजपत्रक तयार आहे. या कामाकरिता निविदा मागवून ठेकेदार निश्चित करण्याचे काम बाकी आहे. सदरची वाहिनी तटबंदी (फोर्टवाल) एका व्यक्तीच्या खुल्या फ्लॉट मधून, पाईप लाईन जात असल्यामुळे, संबंधित वार्डचे नगर सेवक व अधिकारी यांनी त्या भागातील व्यक्तींशी चर्चा करुन हे काम पूर्ण करण्याकरिता कार्यवाही करावी, आवश्यकता भासल्यास व काही अडचण निर्माण झाल्यास पोलिसांची मदत या कामाकरिता घेण्यांत यावी.

**श्री.गजानन बारवाल :** माझ्या वार्डातील रक्कम रु.१८,०००/- चे एक काम होते. त्याचे काय झाले. सदरचे काम अद्यापपर्यंत झाले नाही.

**मा.सभापती :** उपरोक्त दोन्ही कामासंबंधी चर्चा करण्याकरिता श्री.रोडे, उपअभियंता यांना बोलावण्यांत आले परंतू श्री.रोडे जागेवर उपस्थित नसल्यामुळे या बाबत आगामी सभेत चर्चा करण्यात येईल.

**श्री.मो.इस्माईल :** आजच्या सभेत चर्चेकरिता अधिकारी उपस्थित नसल्यामुळे आपण विषयावर चर्चा करुन काय निष्पन्न होणार? अशा प्रकारे सभेचे आयोजन करण्यात काय फायदा आहे?

**श्री.गजानन बारवाल :** आम्ही सर्व स.सभासद नागरिकांच्या कामाकरिता सभेस येतो. अधिकारी उपस्थित नाहीत तर ही सभा घेण्याचा अर्थ काय?

**श्री.कचरु नवपुते :** आपल्या तर्फे दहा मिनीटाकरिता सभा तहकुब करुन अधिकारी वर्गास उपस्थित राहण्याबाबत कळवावे. दहा मिनीटात जर अधिकारी वर्ग सभेस आला नाही तर सभा घेण्याचा अर्थ काय?

**मा.सभापती :** माझ्याकडून सर्व स.सभासद व अधिकारी वर्गात समेट घडवून एकमत करण्याचा प्रयत्न चालू आहे. येत्या काह दिवसांत सर्वांचे एकमत होईल. त्या

नुसार आगामी सभेस अधिकारी आवश्य हजर राहतील असे आश्वासन देऊन आजची स्थायी समिती सभा तहकुब करण्यांत येते. असे मा.सभापती यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | मा.सभापती, स्थायी समिती |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक १७.१०.१९९० रोजी तहकुब झालेल्या व दिनांक ३१.१०.१९९० रोजी आयोजित स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**बुधवार दिनांक १७ ऑक्टोंबर १९९० रोजी तहकुब झालेल्या व दिनांक ३१.१०.१९९० रोजी आयोजित स्थायी समिती सभेस बुधवार दि.३१ ऑक्टोंबर, १९९० रोजी दुपारी ३.०० वाजता समिती सभागृहात मा.सभापती श्री.रतनकुमार पंडागळे यांचे अध्यक्षतेखाली सुरुवात झाली. या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील स.सभासद उपस्थित होते.**

१. श्री.गाडे गंगाधर सुखदेव
२. श्री.मगर शंकर जिजाराम
३. श्री.स.अ.इकबालोद्दीन स.मो.कुतूबोद्दीन
४. श्री.गिल इकबालसिंग प्रितमसिंग
५. श्री.सोनवणे केशव काशिनाथ

**विषय क्र.१७७/१ :**

दि.०८.१०.१९९०, १०.१०.१९९० व १७.१०.१९९० (तहकुब) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

<u>संवाद :</u>

**श्री.स.अ.एकबालोद्दीन :** काळा दरवाजा जवळील विहीरीत पडून एक मुलगा मृत्यू पावला. याबाबत खुलासा व्हावा.

**मा.सभापती :** आजच्या सभेची विषयपत्रिका चर्चेकरिता घेण्यात आली आहे. विषयपत्रिकेवरील चर्चा संपल्यानंतर इतर विषयांवर चर्चा करण्यांत येईल.

**श्री.केशव सोनवणे :** आजच्या स्थायी समितीच्या सभेत मनपाचे सर्व अधिकारी उपस्थित आहेत करिता प्रथम त्यांचे अभिनंदन करतो. परंतू मा.उपआयुक्त मात्र आजच्या सभेस अनुपस्थित आहेत.

**मा.सभापती :** मा.उपआयुक्त आजारी असल्यामुळे आज रजेवर आहेत. आजच्या सभेत उपस्थित राहिल्याबद्दल मी सभागृहातर्फे सर्व अधिकाऱ्यांचे अभिनंदन करतो.

**श्री.इकबालसिंग गील, श्री.गंगाधर गाडे :** स्थायी समितीच्या सभापतीचा वाद न्यायप्रविष्ट आहे. या प्रकरणात न्यायालयीन खर्चापोटी मा.सभापती यांनी मनपा कार्यालयाकडून रक्कम रु.५५,७५९/- ची उचल केली आहे. तेव्हा त्यांना तसा अधिकार आहे का?

**मा.सभापती :** स.सदस्यांना सुचित करण्यांत येते की, त्यांनी प्रथम आजच्या विषय पत्रिकेवर चर्चा करावी.

**श्री.गंगाधर गाडे :** हा औरंगाबाद शहरातील जनतेचा पैसा आहे. अशा प्रकारे आपण जनतेच्या पैशाचा वापर करु शकतो का?

**श्री.शंकरराव मगर :** या प्रकरणात प्रशासनास विचारणा करण्यांत यावी. त्यास प्रशासन जबाबदार आहे.

**मा.सभापती :** स.सदस्यांनी प्रथम आजच्या विषय पत्रीकेवर चर्चा करावी.

**श्री.गंगाधर गाडे :** आजच्या सभेत या विषयावर मा.सभापती यांनी आम्हास चर्चा करु दिली नाही. म्हणून याबाबत आक्षेप घेऊन नेंदवून सभात्याग करित आहोत. (असे म्हणून स.सदस्य श्री.गंगाधर गाडे यांनी सभागृह सोडले. वेळ ठीक ३.३५ वाजता त्यांच्या सोबत स.सदस्य श्री.इकबालसिंग गील व श्री.स.अ.एकबालोद्दीन यांनी सुध्दा सभागृह सोडले.)

**श्री.केशव सोनवणे :** सभात्याग केलेले स.सदस्य अद्यापपर्यंत सभागृहात आलेले नाहीत. गत सभेत जनतेच्या महत्वाच्या प्रश्नावर चर्चा करण्याकरिता अधिकारी वर्ग उपस्थित नव्हता तर आजच्या सभेत स.सदस्य निषेध नोंदवून सभात्याग केल्यामुळे नियमाप्रमाणे सभागृहात गणपुर्ती होवू शकत नाही. करिता आजची सभा होवू शकत नाही. म्हणून मा.सभापती यांनी अशी विनंती करतो की, आजची सभा तहकुब करण्यात यावी.

**मा.सभापती :** स.सदस्य श्री.सोनवणे यांनी निदर्शनास आणून दिल्याप्रमाणे सभागृहातील गणपुर्ती अभावी आजची सभा तहकुब करण्यात येते. आगामी सभेची तारिख आपणास स्वतंत्ररित्या कळविण्यांत येईल. असे मा.सभापतींनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
मा.सभापती, स्थायी समिती
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक ०५.११.१९९० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**सोमवार दिनांक ०५.११.१९९० रोजी दुपारी ३.०० वाजता समिती सभागृहात मा.सभापती श्री.रतनकुमार पंडागळे यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभेस सुरुवात झाली. या सभेत कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

१. श्री.गाडे गंगाधर सुखदेव
२. श्री.जैस्वाल प्रदिप शिवनारायण
३. श्री.नवपुते कचरु चंद्रभान
४. श्री.मगर शंकर जिजाराम
५. श्री.स.अ.इकबालोद्दीन स.मो.कुतूबोद्दीन
६. श्री.फैय्याज खान अहमद खान
७. श्री.बारवाल गजानन रामकिशन
८. श्री.मोहंमद इस्माईल अ.करीम
९. श्री.विधाते प्रभाकर सिताराम
१०. श्री.सोनवणे केशव काशिनाथ

**विषय क्र.१७८/१ :**

दिनांक ०८.१०.१९९०, १०.१०.१९९०, १७.१०.१९९० (तहकुब) व दिनांक ३१.१०.१९९० रोजी तहकुब झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**<u>संवाद :</u>**

**श्री.प्रदिप जैस्वाल :** काही दिवसापुर्वी काळा दरवाजा जवळील विहीरीत पडून एक मुलगा मृत्यू पावला आहे. त्याबाबत खुलासा व्हावा.

**मालमत्ता अधिकारी :** अग्नीशमन अधिकारी यांच्या अहवालानुसार पतंग उडवीत असतांना एक मुलगा विहीरीत पडला, त्यात त्याचा मृत्यू झाला. या घटनेची सुचना अग्नीशमन शमन अधिकारी यांना मिळताच त्या ठिकाणी अग्निशमन दलाची गाडी पाठवून त्या मुलास विहीरीतून बाहेर काढण्यांत आले.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** स.सभासद श्री.मुजाहेद यांनी यापुर्वी आपल्या कडे एक विनंती अर्ज करुन त्या विहीरीस संरक्षित भिंत बांधण्याबाबत सुचविले होते. त्यावेळेस पण या विहीरीत एक व्यक्ती पडून मृत्यु पावली होती. याबाबत मालमत्ता अधिकारी यांनी स्वत: लक्ष घालून आवश्यक ती व्यवस्था करावी.

**मा.सभापती :** या प्रकरणात चौकशी करुन आगामी सभेत सविस्तर माहिती सादर करण्यांत यावी.

**श्री.केशव सोनवणे :** गत स्थायी समितीची सभा तहकुब होण्याअगोदर सिध्दार्थ नगर येथील जलनि:सारण वाहिनीचे कामाबाबत संबंधित अधिकारी यांनी केलेला खुलाशाची नोंद या इतिवृत्तांतात करण्यांत यावी.

**उपअभियंता, ड्रेनेज :** सदरच्या कामाची अंदाजपत्रके तयार करुन प्रशासकीय मंजूरीस्तव पाठविण्यांत आलेले आहेत.

**मा.सभापती :** कार्यकारी अभियंता यांनी काम कसे लवकर करुन घेता येईल. या बाबत खुलासा करावा.

**कार्यकारी अभियंता :** सिध्दार्थ नगर भागात जलनि:सारण वाहिनी टाकण्याची दोन कामे आहेत. त्यापैकी रक्कम रु.४०,०००/- चे अंदाजपत्रकाचे काम ए-१ नमुन्याच्या निविदा मागवून करुन घेण्यासारखे आहे. दुसरे काम रक्कम रु.९०,०००/- चे असल्यामुळे या कामाकरिता नियमाप्रमाणे बी-१ नमुन्यात निविदा मागवाव्या लागतात.

**श्री.केशव सोनवणे :** रु.४०,०००/- च्या कामाकरिता ए-१ नमुन्यात निविदा मागवून घ्याव्यात व रु.९०,०००/- च्या कामाकरिता बी-१ नमुन्याच्या निविदा करिता शॉर्ट टेंडर मागवून काम त्वरीत करुन घ्यावे.

**मा.सभापती :** रक्कम रु.४०,०००/- चे काम ए-१ नमुन्याच्या निविदावर करुन घेण्यांत यावे. कामाची गरज व तातडी लक्षात घेता रक्कम रु.९०,०००/- चे कामाकरिता अल्पमुदतीची निविदा सुचना काढून काम त्वरीत करुन घेण्यांत यावे.

**श्री.शंकर मगर :** इतिवृत्तातील पान क्र.६ अन्वये काय कार्यवाही करण्यांत आली. याचा खुलासा व्हावा.

**उपअभियंता, जलनि:सारण :** इंदिरानगर भागात जलनि:सारण कामाचे अंदाजपत्रक तयार आहे. काम लवकरच सुरु करण्यात येईल. प्रत्यक्ष काम सुरु झाल्यावर जर कामात काही अडथळा निर्माण झाला. तर पोलिस खात्याची मदत घेण्यांत येईल.

**मा.सभापती :** नियमाप्रमाणे त्वरीत काम चालु करण्यांत यावे. काम चालु झाल्यावर कामात काही अडथळा आल्यास पोलिस खात्याची मदत घेण्यांत यावी.

**श्री.शंकर मगर :** इंदिरानगर भागात जलवाहिनी टाकण्याच्या कामाकरिता निविदा मागविल्या आहेत का? त्याबद्दल खुलासा व्हावा.

**जलगृह अभियंता :** इंदिरानगर भागात पाणी पुरवठा करण्यांकरिता जलवाहिनी टाकण्याच्या कामाचे रक्कम रु.२.२५ लाखाचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून त्याबाबत आगामी सभेत माहिती सादर करण्यांत येईल.

**श्री.कचरु सोनवणे :** इतिवृत्तातील पान क्र.५ अन्वये पीरबाजार येथील शाळेच्या इमारतीस संरक्षित भिंत बांधण्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली.

**मा.सभापती :** पिरबाजार येथील शाळेच्या जागेत ज्या लोकांनी अतिक्रमण केले आहे. त्याबाबतची संचिका पाहून सहाय्यक संचालक, नगररचना यांनी शाळेच्या जागेवरील अतिक्रमण काढून टाकण्याबाबत व संरक्षित भिंत बांधण्याचा (आदेश) वैधानिक आदेश देण्यांत आलेला आहे.

**श्री.शंकर मगर :** इंदिरानगर परिसरातील पथदर्शक दिवे गेल्या १५/२० दिवसांपासून बंद आहेत. या भागात फक्त ५०/६० पथदर्शक दिवे चालू आहेत. त्यामुळे त्या भागातील नागरिकांना अंधाराचा त्रास होत आहे. करिता सर्व पथदर्शक दिवे त्वरीत चालु करण्यांत यावेत.

**श्री.स.अ.एकबालोद्दीन :** पंचकुवाँ, किलेअर्क, बुढ्ढीलेन भागातील बरेचशे पथदर्शक दिवे बंद आहेत.

**मा.सभापती :** शहर अभियंता यांनी याबाबत खुलासा करावा.

**शहर अभियंता :** उपरोक्त स्थळाची आज प्रत्यक्ष पाहणी करुन दोन/तीन दिवसांत पथदर्शक दिवे चालू करण्याची व्यवस्था करण्यांत येईल.

**श्री.केशव सोनवणे :** दिल्ली गेट ते हर्सुल जेल या रस्त्यावरील पथदर्शक दिवे गेल्या ३/४ महिन्यापासून बंद आहेत. याबद्दल सुचना देवून सुध्दा अद्यापपर्यंत ते चालु करण्यांत आलेले नाहीत.

**मा.सभापती :** निवासी उप अभियंता यांनी खुलासा करावा.

**निवासी उपअभियंता :** आजच आपल्या विभागाचे विद्युत लाईनमन पथदर्शक दिवे चालु करण्याकरिता त्या भागात पाठविण्यांत आले आहेत. त्या भागाचे कार्यक्षेत्र मोठे असल्यामुळे काम पूर्ण होण्यास थोडा उशीर होत आहे.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** मागे पथदर्शक दिव्यांची स्थळ पाहणी करण्यांत आली. त्यावेळेस ज्या पुलावर बसून विद्युत दिव्यासंबंधी आपली चर्चा झाली होती. तेव्हा आपणांस दर्शविण्यांत आलेल्या ठिकाणी अद्यापपर्यंत विद्युत दिवे लावण्यात आलेले नाहीत.

**निवासी उपअभियंता :** आपण दर्शविलेल्या ठिकाणी ५ पथदर्शक दिवे लावण्यांत आलेले आहेत. त्यापैकी तीन दिवे चालू आहेत व दोन दिवे बंद आहेत.

**मा.सभापती :** पथदर्शक दिव्यांच्या तक्रारी लक्षात घेता शहर अभियंता यांनी स्वतः शहरात फिरुन स्थळ पाहणी करावी ज्या भागातील विद्युत दिवे बंद असतील किंवा निदर्शनास येतील ते बंद विद्युत दिवे त्वरीत चालु करण्याची व्यवस्था करावी.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** इतिवृत्तांच्या पान क्र.६ वरील सराफा भागातील पाणी पुरवठा जलवाहिनी वरुन लोटा कारंजा भागाकरिता नवीन जलवाहिनी टाकण्याबाबत खुलासा व्हावा.

**जलगृह अभियंता :** गत सभेत ठरल्याप्रमाणे प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली तेव्हा सराफा भागातील पाणी पुरवठा सुरळीत असून त्याबाबत नागरिकांच्या काहीही तक्रारी आलेल्या नाहीत.

**श्री.गंगाधर गाडे :** फुलेनगर व कबीर नगर भागात पाणी पुरवठ्या बाबत नागरिकांच्या तक्रीर आहेत. त्या बाबत काय कार्यवाही केली.

**जलगृह अभियंता :** फुलेनगर व कबीर नगर भागातील पाणी पुरवठा सुरळीत आहे. त्या भागातील नागरिकांना भरपूर प्रमाणात पाणी उपलब्ध होत आहे.

**मा.सभापती :** या भागाची प्रत्यक्ष स्थळ पाहणी करण्यात यावी. काही अज्ञात व्यक्तींनी तेथील जलवाहिनी फोडली असेल तर त्याबाबत सविस्तर अहवाल सादर करण्यांत यावा.

**श्री.मो.इस्माईल, श्री.प्रदिप जैस्वाल :** दि.०६.०८.१९९० रोजी झालेल्या स्थायी समितीच्या सभेत ठराव क्र.१११ अन्वये चिकलठाणा एम.आय.डी.सी.परिसरातील अस्तित्वात असलेल्या रोडच्या पार्ट पोरशनचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराच्या निविदास मंजूर करतांना असे ठरले होते की, सर्व स.सभासदांनी या कामाची प्रत्यक्ष स्थळ पाहणी केल्यानंतर निर्णय घेण्यांत येईल. असे सर्वानुमते ठरले होते. सर्व स.सभासदांना सदरील कामाची प्रत्यक्ष स्थळ पाहणी केलेली आहे. तेव्हा या कामावर आलेल्या निविदांपैकी सर्वात कमी दराच्या निविदास मंजूरी देण्यांत यावी.

**मा.सभापती :** सर्व स.सभासदांसह या कामाची प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली असता काम समाधानकारक असल्याचे आढळून आले करिता दि.०६.०८.९० च्या स्थायी समिती मध्ये ठराव क्र.१११ तील प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कामाकरिता

आलेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराच्या म्हणजे अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १८% कमी दराच्या मे.गुरुनानक इंडस्ट्रीज यांच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिनांक ०८.१०.१९९०, १०.१०.१९९०, दि.१७.१०.९० (तहकुब) व दिनांक ३१.१०.१९९० रोजी तहकुब झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१७९/२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, टाऊन हॉल परिसरात नव्याने बांधण्यात आलेल्या रोडमध्ये विद्युत वायरिंगचे काम करणेसाठी सन १९८९-९० च्या सा.बा.खाते (विद्युत) दर सुची नुसार तयार करण्यांत आलेल्या र.रु.२१,२३५/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र.७६७/- दिनांक २४.०४.१९९० अन्वये मंजूरी मिळालेली आहे. सदर कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.एस.ए.ट्रेडर्स, औरंगाबाद | - | ३.५% जास्त दराने |
| २. | मे.वरद इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद | - | ३% जास्त दराने |
| ३. | मे.बुश इले. ॲण्ड इंजिनीअर्स, औरंगाबाद | - | १.७५% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.७५% जास्त दराचे मे.बुश इले ॲण्ड इंजिनिअरींग यांचे दर पत्रक आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे टाऊन हॉल परिसरात नव्याने बांधण्यात आलेल्या शेडमध्ये विद्युत वायरिंगचे काम करणेसाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.७५% जास्त दराचे मे.बुश इले.ॲण्ड इजिनिअरींग औरंगाबाद यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१८०/३ :**

उप अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.चिकलठाणा वॉर्ड क्र.६० येथे ३५० मी.मी.व्यासाची अर्धगोलाकार गटारीचे काम करणेसाठी र.रु.१,६७,२२१/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत येऊन सदरील कामाकरिता प्रकट निवेदनाद्वारे निविदा मागविल्या असता एकूण नऊ दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.एन.बी.तावडे | - | ५% कमी |
| २. | श्री.एस.के.मिसाळ | - | २५.५१% कमी |
| ३. | श्री.एस.एच.असोशिएट्स | - | १५% कमी |
| ४. | श्री.एल.एम.चंचलानी | - | अंदाजपत्रकीय दराने |
| ५. | श्री.सै.सरिकोद्दीन | - | २४.१०% कमी |
| ६. | श्री.आर.एम.मैत्री | - | २४.९९% कमी |
| ७. | श्री.बी.आर.आनंद | - | २७.२८% कमी |
| ८. | श्री.संतोष सोनवणे | - | २६.४% कमी |

९. श्री.एस.बी.इंगळे - २२.२५% कमी

प्राप्त निविदा तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.२८% कमी दराची श्री.बी.आर.आनंद यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.चिकलठाणा वार्ड क्र.६० येथे ३५० मी.मी.व्यासाची अर्धगोलाकार गटारीची कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.२८% कमी दराची श्री.बी.आर.आनंद यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. तसेच कामाची प्रत व दर्जा चांगला राहील. याची दक्षता उपअभियंता यांनी घ्यावी.